# मुसलमान (सूफी) संतांचे मराठी साहित्य

लेखक
डॉ. यू. म. पठाण

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

# मुसलमान (सूफी ) संतांचे
# मराठी साहित्य

लेखक
डॉ. यू. म. पठाण

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

(एच) १६७–i

# *मुसलमान (सूफी ) संतांचे मराठी साहित्य*

**CONTRIBUTION 0F MUSLIM (SUFI) SAINT**
**TO MEDIEVAL MARATHI LITERATURE**

*लेखक*
*डॉ. यू. म. पठाण*
**Dr. Y. M. Pathan**

*द्वारा.* आतीक पठाण
२, आनंदनगर, टाऊन हॉल,
औरंगाबाद.

प्रथमावृत्ती : डिसेंबर २०११

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ,
पु. ल. देशपांडे,
महाराष्ट्र कला अकादमी आवार,
रविन्द्र भवन, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

प्रकाशाधीन :

मुद्रक :

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद.

किंमत : रु. २०५-००

# CONTRIBUTION OF MUSLIM (SŪFĪ) SAINT-POETS TO MEDIEVAL MARĀTHĪ LITERATURE

Dr. Y. M. Pathan

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
२०११

CONTRIBUTION OF MUSLIM (SUFI) SAINT
TO MEDIEVAL MARATHI LITERATURE

# निवेदन

*श्रीचक्रधर व श्रीज्ञानेश्वर यांच्यानंतरच्या काळामध्ये महाराष्ट्रात संतसाहित्याला एक प्रकारचा बहर आला होता. महाराष्ट्राच्या मूळच्या राजस, तेजस प्रवृत्तीला संतांनी सात्त्विकतेचे लेणे चढवले. अध्यात्माच्या बैठकीने आणि भक्तिरसाने परिपूर्ण असे संतसाहित्य महाराष्ट्राला गेली सातशे-आठशे वर्षे सात्त्विक आनंदाचा प्रत्यय देत आहे. हे संतसाहित्य जसे हिंदू, जैन, वीरशैव इ. धर्मांतील विविध समाजांतील संतांनी निर्माण केले तसेच इस्लामच्या सूफी पंथातील संतकवींनी त्याला फार मोठा हातभार लावला. सर्वधर्मसमभाव ही संकल्पना महाराष्ट्रामध्ये राबविण्यासाठी या संतसाहित्याचा फार मोठा उपयोग झाला. महाराष्ट्राची आजवरची सत्त्वगुणी वाटचाल या संतसाहित्याच्या पाठबळावर पुढे यशस्वीपणे चालली आहे.*

*महाराष्ट्रातील संतसाहित्याचे व सूफी संतांच्या साहित्याचे अध्ययन व संशोधन करणारे श्रेष्ठ संशोधक डॉ. यू. म. पठाण यांनी परिश्रमपूर्वक महाराष्ट्रातील सूफी संतकवींचे काव्य अभ्यासून त्याचा परिचय महाराष्ट्रीय वाचकांना करून देण्याचे मोलाचे कार्य या ग्रंथाच्याद्वारे पार पाडले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने आजवर प्रकाशित केलेल्या ग्रंथांपैकी हा ग्रंथ वेगळ्या तऱ्हेचा व अभिनव म्हणता येईल, अशा प्रकारचा आहे. हा ग्रंथ मंडळाला प्रकाशित करण्याची संधी मिळाली, याबद्दल धन्यता वाटते. त्यासाठी डॉ. यू. म. पठाण यांना मनापासून धन्यवाद देतो.*

(मधु मंगेश कर्णिक)

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

मुंबई,

दिनांक २९ सप्टेंबर २०११.

# मनोगत

महाराष्ट्रातील मुसलमान सूफी संतकवींचं अध्ययन-संशोधन करण्याची इच्छा माझ्या मनात गेलं अर्धशतक रुंजी घालीत होती. १९८५ साली आकाशवाणीच्या प्रतिष्ठाप्राप्त कै. पु. मं. लाड व्याख्यानमालेत या विषयासंबंधीची दोन पुष्पं गुंफून या निर्गुण कल्पनेला काहीसं सगुण/साकार केलं होतं. अधेमधे मी यांतील काही संतांविषयी काही संशोधनपर लेखही लिहिले होते तथापि इ. स. २००३ मध्ये साहित्य अकादमीची ज्येष्ठ गौरववृत्ती (सीनियर फेलोशिप) मिळाल्यानं या कार्याला गती लाभली, याबद्दल मी साहित्य अकादमीचे व केंद्र शासनाच्या मानवसंसाधन व सांस्कृतिक विभागांचे मन:पूर्वक आभार मानतो. म. रा. साहित्य संस्कृती मंडळानं काही वर्षांपूर्वीच हा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी स्वीकारला होता. त्याच्या प्रकाशनास २०११ हे वर्ष उजाडलं, सा. सं. मंडळाचे अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचे व मंडळाचेही मी आभार मानतो त्याचप्रमाणं त्याचं वितरण चांगलं व्हावं अशी अपेक्षाही व्यक्त करतो.

या कार्यात मला कितीतरी संस्था, ग्रंथालयं, अभ्यासक - सांप्रदायिक यांचं व अन्य व्यक्तींचं साहाय्य झालं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. के. पी. सोनवणे, अ. भा. महानुभाव परिषदेचे माजी अध्यक्ष महंत कै. नागराजबाबा, अहमदनगरच्या ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयाचे संचालक श्री. सुरेश जोशी, ऋद्धिपूरचे महानुभाव महंत गोपीराजशास्त्री, औरंगाबादच्या एकनाथ संशोधन मंदिराचे सर्व पदाधिकारी, गुलबर्गा विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुख डॉ. विजया तेलंग, राजवाडे संशोधन मंदिर व समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे या संस्थांचे सर्व पदाधिकारी, अन्य संशोधन संस्था व त्यांची ग्रंथालयं, माझे विद्यार्थी व डॉ. बा. आं. विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. कोत्तापल्ले यांचेही मी मन:पूर्वक आभार मानतो.

मराठी भक्तिसाहित्यात तसंच भारतीय साहित्य-संस्कृतीच्या इतिहासात अत्यंत मोलाची व मूलभूत स्वरूपाची भर घालणाऱ्या या ग्रंथाचं अभ्यासक/संशोधक/प्रसारमाध्यमं, विविध सांप्रदायिक व सर्वसामान्य मराठी रसिकही स्वागत करतील, असा मला विश्वास वाटतो.

औरंगाबादच्या शासकीय मुद्रणालयाचे प्रमुख सर्वश्री दुधगांवकर व गंगावणे त्याचप्रमाणं या मुद्रणालयाचे सर्व कर्मचारी यांनीही आत्मीयतेने हे मुद्रण केले, याबद्दल त्या सर्वांचे आभार.

२, आनंदनगर, टाऊन हॉल,
औरंगाबाद.

-डॉ. यू. म. पठाण

महाराष्ट्रातील सर्व
मुसलमान (सूफी) सन्तकवींना
कृतज्ञतापूर्वक अर्पण.

त्यांनी महाराष्ट्राच्या सन्तसाहित्याच्या
वेगळ्या लक्षणीय आयामांवर प्रकाश
टाकून मराठी सन्तसाहित्य अधिक
संपन्न व समृद्ध केले.
त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सर्वधर्म-
समभावाची, परस्परसामंजस्याची
व एकात्मतेची भावना वृद्धिंगत केली.
समाजप्रबोधन व अंधश्रद्धानिर्मूलनकार्यास
गती दिली.

- यू. म. पठाण

# मुसलमान (सूफी) संतांचे मराठी साहित्य

# अ नु क्र म


पृष्ठ

१. पार्श्वभूमी १ - ४

२. आलेख ५ - ९

३. वजीरुलमुल्क मुंतोजी (खिलजी) १०

४. शहा मुंतोजी बामणी (मृत्युंजय) ११- ५२

- प्रास्ताविक
- मुंतोजीचा काळ
- चरित्रविषयक आख्यायिका व दाखले
  - मुंतोजी व महाराष्ट्रातील धर्मसंप्रदाय यांचे संबध :
  - (अ) सूफी संप्रदाय
  - (आ) नागेश संप्रदाय आणि वीरशैव धर्म
  - (इ) वारकरी संप्रदाय
  - (ई) नाथ संप्रदाय
  - (उ) आनंद संप्रदाय
- निर्याण
- मुंतोजीचं साहित्य
  - (१) प्रकाशदीप

    ग्रंथकर्त्याचा नामोल्लेख

    ग्रंथाची थोरवी

    हस्तलिखित प्रतीचा विचार : १. तंजावर प्रत, २. धुळे प्रती, ३. गुलबर्गा-कल्याणी प्रत

    निर्मिति-प्रयोजन, प्रतिपाद्य विषय, मंगलाचरण, निर्गुण ईश्वर-संकल्पना आणि विश्वनिर्मिती, ईश्वर-जीव-अद्वैत, मुंतोजीचं जीवन-चिंतन : प्रबोधनकाराची भूमिका
  - (२) सिद्धसंकेत

    ग्रंथस्वरूप
  - (३) हिंदु-इस्लाम दर्शन-परिभाषा कोश :

    नकललेल्या धुळे प्रतीचं विवरण, या रचनेचं कर्तृत्व, नांदेड प्रतीचा विचार, मराठी परिभाषाकोशाचं एक नवं परिमाण.

अन्य रचना
(४) जीवोद्धरण
(५) स्वरूप-समाधन
(६) अद्वैतप्रकाश
(७) अमृतानुभव
(८) अनुभवसार
(९) गुरुलीला
ग्रंथनामांतून प्रकटणारं साधनेचं प्रयोजन व फलश्रुती
संदर्भ - टीपा
परिशिष्ट
'हिंदु-इस्लाम दर्शन' – परिभाषाकोश संहिता
५. अंबर हुसेन ५३ - ६१
- अंबर हुसेन, हुसेनी अंबरखान की हुसेन अंबरखान ?
- घराण्याची हकीगत
- अन्य चरित्रात्मक माहिती
(अ) जन्मतिथी व निर्याणकाळ
(आ) गुरुपरंपरा व सांप्रदायिक संदर्भ
- 'अंबर हुसेनी' स्वरूप व वैशिष्ट्यं
- 'समश्लोकी', 'समओवी' की ओवीबद्ध रचना ?
- संदर्भ - टीपा.
६. चांदसाहेब कादरी (चांद बोधले) ६२ - ६४
७. शेख महंमद ६५ - १३३
- शेख महंमदांची जीवनगाथा, सूफींची कादरी परंपरा, भौगोलिक परिसर, आख्यायिका, शेख महंमदांचा काळ, शिष्यपरंपरा, शेख महंमद आणि विविध धर्मसंप्रदाय
- शेख महंमदांचं साहित्य :
(१) योगसंग्राम :- 'योगसंग्रामा' च्या विविध प्रती / संपादन इ. स्वरूपदर्शन : प्रसंग - १ ते १८ विवरण
(२) पवन - विजय : त्रिखंडात्मक रचनेची वैशिष्ट्यं
(३) निष्कलंक प्रबोध : स्वरूपदर्शन व निर्मिति-प्रयोजन
(४) भक्तिबोध : अभंगबंधांचं विषयावार वर्गीकरण व
(५) आचारबोध : वैशिष्ट्यांचं विवेचन.
(६) भारुडं
(७) दक्खिनी रचना
(८) परिभाषाकोश
- शेख महंमदांचं 'ग्रामीण'त्व आणि प्रतिमासृष्टी
- समाजप्रबोधनकार शेख महंमद

- शेख महंमदांचा एकात्मतावाद
- संदर्भ - टीपा

८. दोन गुरुबंधू १३४ - १३५

(१) वाजीद पठाण

(२) शहाबेग ऊर्फ 'शाबेग'

९. आलमखान १३६ - १४९

आलमखान : चरित्र, आलमखानांची कविता, न हरवलेलं 'यवनपण', नाथ संप्रदायाचा प्रभाव

पदांचं वर्गीकरण :

(१) तत्त्वविवरणपर (२) उपदेशपर (३) गुरुमाहात्म्यपर (४) आध्यात्मिक अवस्थाविषयक (५) कूटात्मक (६) रूपकात्म (७) पाखांडखंडनपर व प्रबोधनात्मक रचना

- 'आंतरभारती'चं दर्शन
- समारोप
- संदर्भ - टीपा

१०. जंगली फकीर (सैयद हुसेन) १५० - १५१

११. जमाल फकीर १५२ - १५३

१२. शहामुनी १५४ - १९०

- 'सिद्धान्तबोध' स्वरूपदर्शन (अध्याय १ ते ५०)
- सिद्धान्तबोध : एक अवघड कोडं
- द्वैतमत- पुरस्कार
- महानुभावीय नमन - परंपरा

तीस अध्यायांपर्यंतची एकसंधता, ३१ ते ५० अध्याय कुणाचे ?

- शहामुनींचं समाजचिंतन व समाजप्रबोधन
- ग्रंथाची थोरवी
- ग्रामीण शब्दकळा व प्रतिमासृष्टी
- संदर्भ - टीपा

१३. लतीफशहा १९१ - १९३

लतीफशहांचा काळ, चरित्र, साहित्य

- संदर्भ - टीपा

१४. शेख सुलतान १९४ - २००

मराठी वाङ्‌मयेतिहासातील व अन्य नोंदी :

(१) महाराष्ट्र-सारस्वतकार वि. ल. भावे

(२) मुसलमानांची जुनी मराठी कविता

(३) प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास (डॉ. अ. ना. देशपांडे)

(४) एकात्मतेचे शिल्पकार

(५) श्रीनाथ गोपाळ

- शेख सुलतान व त्यांचा काळ,

- त्रिपुटीमठ-संबंध,

- गुरुपरंपरा व संप्रदाय

- शेख सुलतानांचं साहित्य :

(अ) पाच कथाकाव्यं

(आ) आरत्या

(इ) पदरचना

- सूफी मताचा प्रभाव ?

- संदर्भ - टीपा

१५. - 'रिवायतकार' गरीब अब्दुल २०१ - २०२

१६. उपसंहार २०३

# १.पार्श्वभूमी

मध्ययुगीन मराठी साहित्य विविध धर्मांच्या व धर्मपंथांच्या संतांच्या लेखनानं समृद्ध झालं आहे. मऱ्हाटी संस्कृती हीदेखील या संतांच्या कार्यानं समृद्ध झाली आहे, संपन्न झाली आहे. या सर्व-धर्मीय व पंथीय संतांचं ऋण मराठी भाषेच्या, वाङ्मयाच्या व मऱ्हाटी संस्कृतीच्या अभ्यासकांना मान्य करावं लागतं.

जैनधर्मीय संतांचं योगदान मराठी साहित्याच्या प्रारंभापासून लाभलं आहे. इतकंच काय, पण मराठी भाषेच्या उत्पत्तीचा शोध घेताना साहाय्यभूत ठरणाऱ्या ज्या साधनांचा आपण नेहमी उल्लेख करतो, त्यांतील अनेक साधनं जैनधर्मीय संतांची/अनुयायांची आहेत. मराठीचा पहिला शिलालेखच श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या भव्य मूर्तीच्या पायाशी खोदलेला आहे.'अपभ्रंशत्रयी,' 'राजीमतीप्रबोध' नि 'मानसोल्लास' या ग्रंथांच्या आधारे मराठी भाषेची व 'देशी' भाषांची कालनिश्चिती केली जाते. ही सारी साधनं जैन धर्मानुयायांची आहेत. यापूर्वी मी याविषयी 'जैन मराठी वाङ्मयाचं प्राचीनत्व' या लेखात माझे विचार विस्तारानं मांडले आहेत. हा लेख काही वर्षांपूर्वी दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स' च्या 'मैफल' पुरवणीत प्रसिद्ध झाला होता. (डॉ. अक्कोळे यांचा जैन मराठी वाङ्मयाविषयीचा प्रबंधही प्रसिद्ध झाला आहे.) केवळ मराठी भाषेच्या उद्‍गमाच्या संदर्भातच जैनधर्मीयांचं हे योगदान आढळत नाही तर मध्ययुगीन मराठी साहित्याच्या संदर्भातही आढळतं. या साहित्याच्या विकासालाही जैनधर्मीयांचा मोलाचा हातभार लागला आहे. महाकाव्य, आख्यानकाव्य, चम्पू, आध्यात्मिक प्रकरणं, चरित्रात्मक लेखन, भवान्तरकथा, भारुडं, पदं, आरत्या, लोकगीतं नि लोककथा-असं या वाङ्मयाचं बहुविध स्वरूप आहे. दुर्दैवानं या योगदानाची ज्या मनःपूर्वकतेनं नोंद घ्यायला हवी तशी नोंद घेतली जात नाही. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या अध्ययन-अध्यापन- संशोधनातही हे योगदान बहुधा दुर्लक्षितच राहतं.

थोड्याफार प्रमाणात हीच स्थिती वीरशैव मराठी संतकवींनी दिलेल्या योगदानाची आहे. मन्मथस्वामी, लक्ष्मणमहाराज, शांतलिंगस्वामी, बसवलिंग यांच्यासारख्या प्रमुख वीरशैव मराठी संतकवींच्या काव्याचीही मध्ययुगीन मराठी भक्तिकवितेचा विचार करताना कितपत दखल घेतली जाते ? वर निर्देशिलेल्या या सर्वच संतकवींविषयीचे संशोधन-प्रकल्प मी माझ्या विद्यार्थ्यांना दिले व त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची मान्यताही मिळाली. यांतील काही प्रबंध ग्रंथ-रूपानं प्रसिद्ध झाले आहेत. त्यामुळं कदाचित् काही अभ्यासकांची 'सह-अनुभूती' लाभेल, अशी अपेक्षा केल्यास ते अनाठायी व अनुचित ठरू नये. वीरशैव मराठी संतसाहित्याच्या संशोधनाला गती देण्याचा आनंद मला या लेखनानं गेली तीन-चार दशकं निश्चितच दिला आहे. जैन, वीरशैव हे तर भारतीय धर्मच आहेत पण भारताबाहेरून आलेल्या ख्रिस्ती व इस्लाम धर्मियांनी मराठी भाषेच्या साहित्याच्या अभिवृद्धीला व विकासाला फार मोलाचा हातभार लावला आहे.

ख्रिस्ती संतांपैकी फादर स्टीफन्स यांचं 'ख्रिस्तपुराण' हे तर मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचं लेणंच होय. त्यांनी लिहिलेल्या मराठी भाषेचा गौरव करणाऱ्या 'पुस्पामाजी पुस्प मोगरी' या एकमेव ओवीचा उल्लेख तेवढा केला जातो. मला वाटतं, हा फारच अल्पसा 'ऋणनिर्देश' आहे. डॉ. गंगाधर मोरजे यांनी ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचा विचार त्यांच्या ग्रंथात विस्तारानं केला आहे. जैन व वीरशैव संतकवींप्रमाणं ख्रिस्ती संतकवींचीही एक मोठी, प्रदीर्घ परंपराच आढळते.

त्याचप्रमाणं मुसलमान मराठी संतकवींची एक मोठी परंपरा आहे. या परंपरेचा सविस्तर अभ्यास व संशोधन मी गेली काही वर्षं करीत आहे. याविषयांची व्याप्ती व आलेख रेखाटणारी एक व्याख्यानमाला मी आकाशवाणीच्या कै. पु. मं. लाड व्याख्यानमालेच्या रूपानं १९८५ साली गुंफली होती व ती महाराष्ट्राच्या सर्व आकाशवाणी केंद्रांवरून ध्वनिक्षेपितही झाली होती. मराठी वाङ्मयाचे व मऱ्हाटी संस्कृतीचे साक्षेपी संशोधक व माझे स्नेही डॉ. रा. चिं. ढेरे यांनी या संदर्भात केलेलं चिन्तन मौलिक स्वरूपाचं आहे.

- असे मुसलमान संतकवी केवळ महाराष्ट्रातच होते का ? या प्रश्नाचं उत्तर ते संपूर्ण भारतात होते, असं द्यायला हवं ; कारण उत्तर आणि दक्षिण तसंच पूर्व आणि पश्चिम भारताच्या विविध प्रदेशांत मुसलमान संतकवींनी महत्त्वपूर्ण कार्य केलं आहे. हे कार्य राष्ट्रीय एकात्मतेचं नि मानवाच्या कल्याणाचं आहे. कबीरांसारख्या संतकवींचं अलौकिक कार्य तर जगन्मान्य आहे. रहीम आणि रसखान यांच्यासारख्या कित्येक मुसलमान संतकवींनी हिंदी साहित्य समृद्ध केलं, त्याचप्रमाणं जातिधर्मांच्या तटबंदी भेदून मानवतेचा व विश्वात्मकतेचा महान संदेशही दिला. स्वधर्मप्रेम आणि परधर्मसहिष्णुता यांचा आदर्श समन्वयही त्यांनी घालून दिला. विविध भारतीय भाषांचा मध्ययुगीन इतिहास अभ्यासला तर त्या त्या भाषेतील मुसलमान संतकवींच्या महत्त्वपूर्ण कार्याचं दर्शन घडल्याशिवाय राहात नाही.

मध्ययुगाच्या संदर्भात महाराष्ट्राचा नि मराठी भाषेचा विचार केला तर मुसलमान संतांनी किती लक्षणीय कार्य केलं होतं, याची कल्पना येऊ लागते. वारकरी संप्रदायात 'ज्ञानाचा एका' या उक्तीबरोबरच 'नामयाचा तुका' ही उक्ती आढळते व तिलाच 'कबीराचा शेका' ही उक्तीही जोडली आहे. ज्ञानदेव आणि एकनाथ या संतकवींत जशी एकरूपता आढळते तशीच नामदेव-तुकोबा नि कबीर-शेख महंमद या संतकवींत आढळते, असं वारकरी सांप्रदायिक मानतात. या संतकवींचं लेखन वाचल्यावर आपल्यालाही तोच प्रत्यय येतो.

वारकरी संप्रदायाला जशी शेख महंमद या संतकवींविषयी जवळीक वाटली, तशीच शेख महंमदांनाही वारकरी संप्रदायाबद्दल वाटली. अशी आत्मीयता विविध मुसलमान संतांना महाराष्ट्रातल्या अन्य धर्मसंप्रदायांबद्दलही वाटत आली आहे. स्वधर्माचरण करता करताच ते या विविध धर्मसंप्रदायांशीही एकरूप झाले आहेत. आश्चर्याची गोष्ट अशी की, ज्या वेळेपासून महाराष्ट्रात हे धर्मसंप्रदाय निर्माण झाले, जवळपास त्या वेळेपासून म्हणजेच मध्ययुगीन मराठी संतसाहित्याच्या

निर्मितीपासून (यादवकाळाचा अपवाद वगळता) इस्लामी संतांची महाराष्ट्रीय धर्मसंप्रदायांशी जवळीक होती नि त्यांना मऱ्हाटी संस्कृतीनं आपल्यामध्ये सामावून घेतलं होतं. मराठी माणसाशी त्यांनीही अत्यंत जिव्हाळ्यानं हृदयसंवाद केला होता नि मराठी माणसानंदेखील त्यांच्यामध्ये नि आपल्यामध्ये व अन्य (धर्माच्या व अन्य संदर्भातील) परकेपणाची लक्ष्मणरेषा कधीच निर्माण होऊ दिली नव्हती. त्यामुळेच या मुसलमान संतकवींचा महाराष्ट्राच्या लोकमानसावर लक्षात घेण्याजोगा प्रभाव असल्याचं चित्र महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास अभ्यासत असताना आपल्या डोळ्यांसमोर उमटू लागतं, उभं राहू लागतं.

या मुसलमान संतकवींचा संबंध महाराष्ट्रातल्या कोणकोणत्या धर्मसंप्रदायांशी आला होता ? यांतील बहुतेक मुसलमान संतकवींचे सूफींच्या चार शाखांपैकी कादरी या शाखेशी विशेषतः संबंध होते. चौदाव्या शतकापासून त्यांचा महाराष्ट्रातील विविध धर्मसंप्रदायांशी संबंध आला होता. या संदर्भात नागेश संप्रदाय हा जुन्यातला जुना संप्रदाय असावा, असं मला वाटतं. चौदाव्या शतकातील नागेश ऊर्फ नागनाथ या सत्पुरुषांना 'वडवाळसिद्ध नागेश' असंही म्हटलं जात असे. इस्लामधर्मीयांना असं वाटे की तेच त्यांचे प्रख्यात सूफी संत नसीरुद्दीन चिराग देहलवी हे असावेत. हेग्रसासारख्या वैदिक ब्राह्मणांनाही नागेश हे आपले वाटत. बदकव्वासारख्या वीरशैवांनाही ते आपले वाटत. तिमण्णा धनगरालाही ते आपले वाटत. एकलिंग तेल्यालाही ते आपले वाटत नि आलमखानासारख्या मुसलमान संतकवीलाही ते आपले वाटत. नागेश संप्रदाय हा चौदाव्या शतकातील समन्वयवादी संप्रदाय होता. त्याच्या शिष्यपरंपरेतील आलमखान या संतकवींची रचना औसा, किल्लारी, अहमदपूरसारख्या मराठवाड्यातील गावी मठामंदिरांत आढळते. तशीच कर्नाटकातल्या करळी-मुगळीच्या परिसरातही आढळते.

वारकरी संप्रदायाशी संबंध असलेले अनेक मुसलमान संतकवी आहेत. शेख महंमद हे त्यांतले अग्रगण्य होत. शेख महंमदबाबा अहमदनगर जिल्ह्यातल्या श्रीगोंद्याचे, 'योगसंग्राम' हा त्यांचा प्रमुख ग्रंथराज विख्यात इतिहास-संशोधक श्री. वा. सी. बेंद्रे यांनी हा ग्रंथ संपादिला. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायातील योगदुर्गाची कल्पना घेऊन, देहाचा हा दुर्ग सर करताना संग्राम कसा करावा लागतो, साधना कशी करावी लागते, हे शेख महंमदांनी या ग्रंथात अत्यंत रसाळ भाषेत वर्णिलेलं आहे. त्यांच्या अभंगपदादी अन्य रचनेत वारकरी संप्रदायाच्या तत्वविवरणाबरोबरच इस्लामचं तत्त्वविवरणही आलं असून या दोन्ही दर्शनांतील समान उद्दिष्टांकडे अंगुलिनिर्देश केला आहे. शेख महंमदांची काही भक्तिकविता श्री. बेंद्रे यांनी संपादिली असली तरी अद्यापि त्यांचे शेकडो अभंग / पदं अप्रकाशित आहेत. त्या काळात देवदासींसारख्या प्रथा व बुवाबाजी यांच्याविरुद्ध आवाज उठविणारे शेख महंमदांसारखे कवी हे संत असले तरी एका अर्थानं समाज-प्रबोधनकारही होते. सर्वधर्मांप्रमाणेच विविध धर्मांतील कर्मठपणावर त्यांनी कोरडे ओढले आहेत.

शहामुनी हे मुसलमान संतकवी मराठवाड्यातील शहागडचे. त्यांनी 'सिद्धान्तबोध' हा बृहद्ग्रंथ लिहिला. त्यात अद्वैत व द्वैत या दोन्ही मतांचं विवरण केलं आहे व द्वैतमताचा पुरस्कार केला

आहे. (इस्लामचं तत्त्वज्ञान व महानुभावीय तत्त्वज्ञान द्वैतमताधिष्ठित आहे). शहामुनींचा 'सिद्धांतबोध' हा महानुभाव संप्रदायातील अत्यंत लोकप्रिय ग्रंथ असून तो चातुर्मासात वाचला जातो, असं म्हणतात. शेख महंमदांचे गुरू चांदसाहेब कादरी (चांद बोधले) सूफींच्या कादरी शाखेचे होते. त्यांच्याविषयी पश्चिम जर्मनीच्या बॉन विद्यापीठातील डॉ. स्कायर्हाक यांनी संशोधन केलं आहे. संत एकनाथांना दत्तदर्शन मलंग (फकीर) वेषात झालं असा उल्लेख त्यांच्या चरित्रात आढळतो. यातूनही मुसलमान संत व महाराष्ट्रीय धर्मसंप्रदाय यांच्या काही अन्योन्य संबंधांवर प्रकाश पडतो. अनेक नाथसांप्रदायिक संतांना मुस्लिम संतांच्या पर्यायी नावांनीही ओळखलं जातं. हा स्वतंत्र अभ्यासाचा व संशोधनाचा विषय आहे.

रामदासी सांप्रदायिक व सूफी संत यांचे काही संबंध असावेत का ? रामदासांची काही (दक्खिनी) हिंदी पदं 'सफेज कलंदर' यासारख्या मुस्लिम नाममुद्रांनी अंकित आहेत, याचं कारण काय असावं, याचा विचार मी कॉंटिनेंटल प्रकाशनानं प्रसिद्ध केलेल्या 'समर्थदर्शन' ग्रंथातील 'समर्थांची हिंदी पदं' या लेखात विस्तारानं केला आहे. समर्थ संप्रदाय नि सूफी संप्रदाय यांतील संघटनापद्धती व धर्मविचार प्रसारपद्धती यांत विलक्षण साम्य आढळतं. समर्थांची 'मुसलमानी अष्टकं' डॉ. इंदु लिमये यांनी संपादिली आहेत. त्यांत सूफी तत्त्वज्ञानातील 'जिक़ीर' (जिक्र) 'फिकीर' (फिक्र् : ईश्वराचा ध्यास) सारख्या पारिभाषिक संज्ञा आढळतात. परभणीचे प्रसिद्ध सूफी संत शेख तुराब (तुरुत वली) यांनी समर्थांच्या 'मनाच्या श्लोकांचं 'मनसमझावन' या नावानं दक्खिनी उर्दूत रूपांतर केलं आहे. त्यांच्या शिष्यसंप्रदायात मुसलमानांप्रमाणंच हिंदूही बहुसंख्येने आहेत. वर उल्लेखिलेल्या बाबींवरून या दोन्ही संप्रदायांतील जवळीक लक्षात येईल. हाही एक संशोधनाचा विषय आहे.

दत्त सांप्रदायाशी सूफींचे जवळीकीचे आत्मीयतेचे संबंध असल्याची प्रमाणं उपलब्ध होतात. 'गुरुदेवदत्त' आणि 'शहादत्त' हाही एक असाच महत्त्वपूर्ण संशोधन-विषय आहे.

'मुसलमान संतकवी नि महाराष्ट्र' या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. त्याच्या अध्ययन-संशोधनाची फार आवश्यकता होती, त्यामुळं महाराष्ट्रीय धर्मसंप्रदाय नि मुसलमान संत /संतकवी- विशेषतः सूफी संतकवी यांच्या परस्पर संबंधावर त्यामुळं प्रकाश पडेल. या मुसलमान संतकवींचाही महाराष्ट्रातील जनमानसावर लक्षणीय प्रभाव होता. या सर्वांनीच विशाल मानवतावादी भूमिका स्वीकारल्यानं महाराष्ट्रात परस्पर-सामंजस्याचं, एकात्मतेचं नि समन्वयाचं वातावरण निर्माण व्हायला साहाय्य झालं. मध्ययुगीन महाराष्ट्रातील सांस्कृतिक सामंजस्याचं, एकात्मतेचं हे चित्र निश्चितपणे विलोभनीय होतं.

'मुसलमान (सूफी) मराठी संतांचा व त्यांच्या साहित्याचा अशा प्रकारचा संशोधनपूर्वक सविस्तर विचार या ग्रंथात प्रथमच होत आहे. त्यामुळं मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचं व वाङ्मयेतिहासाचं पुनर्लेखन हे नवीन संशोधन लक्षात घेऊन करावं लागेल.

---

# २. आलेख

मुसलमान (सूफी) संतकवींनी बहमनीकालापासून पेशवेकालाच्या अखेरीपर्यंतच्या मध्ययुगीन मराठी वाङ्मयात फार मोलाची भर टाकली. त्यांच्या साहित्याचं सूक्ष्म अध्ययन व सविस्तर विश्लेषणात्मक विवेचन या ग्रंथाच्या रूपानं प्रथमच होत आहे, याचा मला फार् आनंद वाटतो. या संशोधन- प्रकल्पाची पूर्ती ही मऱ्हाटी संस्कृतीचा व मराठी संतवाङ्मयाच्या इतिहासातील एक लक्षणीय घटना ठरावी. या संदर्भातील पाऊलवाट प्रा. अ. का. प्रियोळकर, श्री. वा. सी. बेन्द्रे व डॉ. रा. चिं. ढेरे यांच्यासारख्या मान्यवर संशोधकांनी तयार करून ठेवली होती. त्यांच्या पाउलखुणांची मी प्रथमच कृतज्ञतापूर्वक नोंद करतो.

मुसलमान (सूफी) संतांचं मराठी साहित्य हे मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील एक अभूतपूर्व, अनोखं दालन आहे, लेणं आहे. त्याच्या आकलनासाठी भारतीय दर्शन-परंपरेचं अध्ययन जसं आवश्यक आहे तसंच इस्लाम दर्शन व सूफी मताचं- 'तसव्वुफ'चं अध्ययनही आवश्यक आहे. संस्कृत व मराठी या भारतीय आर्यभाषांप्रमाणंच अरबी-फार्सी या भाषांचं ज्ञानही आवश्यक आहे. त्याचप्रमाणं 'दक्खिनी' चं नि मराठी ग्रामीण बोलीचं ज्ञानही आवश्यक आहे.

दोन मुंतोजींनी या दालनाचा प्रारंभ होतो. पहिले मुंतोजी हे 'वजीरुल्मुल्क मुंतोजी (खिलजी)' हे असून त्यांनी संगीत व ज्योतिषविषयक दोन ग्रंथ लिहिले. त्यांचा विचार या ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणात केला आहे. चवथ्या प्रकरणात मुंतोजी बामणी (बहमनी) यांच्याविषयी विवेचन केलं आहे. मुंतोजी बामणी (मुर्तुजा कादरी / मृत्युंजय) हे खऱ्या अर्थानं पहिले महत्त्वाचे मुसलमान मराठी संतकवी आहेत. ते त्यांच्या काळात व नंतरही महाराष्ट्र-कर्नाटक-तंजावरपर्यंतच्या परिसरात अत्यंत लोकप्रिय असावेत. हे या सर्व परिसरात विखुरलेल्या त्यांच्या ग्रंथाच्या हस्तलिखितांवरून जाणवतं. मुंतोजीविषयी प्रा. डॉ. जुल्फी शेख यांनी नागपूर विद्यापीठास सादर केलेल्या प्रबंधाचा मी एक परीक्षक होतो व त्या संदर्भात त्यातील त्रुटी दाखवून सूफी तत्त्वज्ञान व परंपरा यांच्या संदर्भात मुंतोजीचा विचार होणं अगत्याचं असल्याचं सुचविलं होतं. पुढं डॉ. शेख यांनी 'मृत्युंजय' हे पुस्तक प्रकाशित केलं पण त्यात काही त्रुटी राहून गेल्या व मुंतोजींचं सूफीपणच नाकारल्यानं त्यांच्या (मुंतोजींच्या) साहित्याविषयीच्या आकलनात उणीव निर्माण झाली. प्रबंधानंतर त्याला ग्रंथरूप देताना मुंतोजींच्या साहित्याचं अधिक सूक्ष्म व सर्वांगीण अध्ययन-संशोधन होणं अपेक्षित व अगत्याचं होतं. विशेषतः त्यांच्या 'अविंध पंचीकरणा'चा 'हिंदू-इस्लाम दर्शन-परिभाषाकोशा'चा मूळातून व बारकाईनं विचार होणं आवश्यक होतं. त्याचप्रमाणं त्यांच्या रचनांचाही तपशीलवार विचार होणं गरजेचं होतं कारण त्यामुळं मुंतोजींविषयक संशोधनाला वेगळी गती व आयाम प्राप्त होणार होता. यासाठी 'प्रकाशदीपा'ची आद्यन्तयुक्त व कालनिर्देशयुक्त धुळेप्रत मी मूळातून तपशीलवार अभ्यासून मुंतोजीविषयक प्रकरणात त्यांच्या अद्वैताधिष्ठित दार्शनिक दृष्टिकोणाचा विचार त्यांच्या अन्य रचनांसह केला. 'सिद्धसंकेत' या त्यांच्या योगशास्त्रविषयक

ग्रंथाचंही स्वरूपदर्शन घडविलं आहे. मुंतोजींचा काळ, त्यांच्या चरित्रविषयक आख्यायिका, सूफी-नागेश-वारकरी-आनंदादी संप्रदायांशी असलेले त्यांचे संबंध, 'प्रकाशदीपा' दी त्यांच्या नऊ रचनांचा विचार, भारतीय व इस्लाम / सूफी दर्शनांवरील त्यांचं प्रभुत्व, त्यांच्या ग्रंथनामांतून प्रकटणारं त्यांच्या साधनेचं प्रयोजन व या लेखनाची फलश्रुती, मुंतोजींची एकात्मतेची व समाजप्रबोधनाची भूमिका याविषयी मूलगामी विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय दर्शन-पारंगतता व 'सूफीत्व' यांच्या मनोज्ञ मीलनानं मुंतोजींच्या व्यक्तिमत्त्वाला व लेखनाला एक वेगळी झळाळी कशी प्राप्त झाली आहे, त्याचा विचार मध्ययुगीन सन्तसाहित्याच्या संदर्भात या ग्रंथात प्रथमच केला जात आहे. मुंतोजींचा मूळ संपूर्ण 'हिन्दु-इस्लाम दर्शन-परिभाषा कोश' या प्रकरणात हेतुतः परिशिष्टात दिला आहे. त्यानं मध्ययुगीन मराठी सन्तसाहित्याशी सूफी दर्शनाचं नातं जोडून पहिला सेतू बांधला. या ऐतिहासिक व सांस्कृतिक घटनेकडेही या प्रकरणात लक्ष प्रथमच वेधलं आहे. यामुळं मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या पुनर्लेखनास मोठंच साहाय्य होईल, असा मला विश्वास वाटतो.

या ग्रंथातील पाचव्या प्रकरणात अंबर हुसेन यांचा व त्यांच्या साहित्याचा विचार केला आहे. अंबर हुसेन हे एकमेव मुसलमान मराठी गीताटीकाकार संतकवी होते. त्यांच्याविषयी फारच त्रोटक लेखन झालं होतं. या प्रकरणात हुसेनी अंबरखान, हुसेन अंबरखान की अंबर हुसेन इ. नामचर्चा, अंबर हुसेनांचं घराणं, जन्मतिथि-निर्याणकाल, त्यांची गुरुपरंपरा व सांप्रदायिक संदर्भ, 'अंबर हुसेनी' या गीताभाष्याचं स्वरूप व त्याची विविध वैशिष्ट्यं, त्याचप्रमाणं 'तंजावरपर्यंतची त्यांची प्रभावकक्षा व शिष्यपरंपरा इ. चा सविस्तर विचार केला आहे. सूफी परंपरेशी त्यांचं काही नातं आहे काय, याचाही शोध घेण्याचा प्रथमच प्रयत्न या प्रकरणात केला आहे. त्यांची रचना ही केवळ 'समश्लोकी' वा 'समओवी' टीका नाही, याचीही सप्रमाण चिकित्सा केली आहे.

चांदसाहेब कादरीविषयक प्रकरणात चांद बोधल्याविषयी महिपतींच्या 'भक्तविजय' व 'संतविजय' या ग्रंथांतील माहिती दिली असून डॉ. ढेरे, श्री. वा. सी. बेंद्रे, डॉ. ब्रम्हानंद देशपांडे यांच्या मतांचा परमर्श घेऊन चांदसाहेब कादरी ऊर्फ चांद बोधले यांच्या शेख महंमदांपर्यंतच्या, सूफी परंपरेचा 'योगसंग्राम' व 'सिजरा-जदि-कादरी'च्या आधारे विचार केला आहे. त्यांचं फारसं साहित्य उपलब्ध नसल्यानं त्याचा मात्र विचार करता आला नाही.

या ग्रंथातील शेख महंमदविषयक प्रकरणातील विवेचन मुंतोजी बामणी यांच्याविषयीच्या विवेचनाप्रमाणंच अत्यंत मूलगामी स्वरूपाचं आहे. ते सूफींच्या कादरी शाखेतील आहेत, हे त्यांच्या बहुतेक अभ्यासकांनी मान्य केलं असलं तरी या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा व इस्लामदर्शनाचा त्यांच्यावर कितपत प्रभाव पडला होता, याविषयी मूलाधार व मूळ प्रमाणं लक्षात घेऊन कुणीही सूक्ष्म अध्ययन / संशाधन केलं नव्हतं, ते या ग्रंथात प्रथमच केलं गेलं

आहे, याची विनम्र नोंद इथं मी करीत आहे. या अभ्यासकांचं श्रेय मी मुळीच अमान्य करीत नाही तथापि सूफी दर्शनाची बाजूच या संदर्भात आजवर पूर्णतया प्रकाशात न आल्यानं त्यांच्याविषयी केलेला विचार काहीसा एकांगी झाला आहे, असं खेदानं म्हणावं लागतं.

या प्रकरणात शेख महंमदांची जीवनगाथा, सूफींची कादरी परंपरा व कवीच्या 'सिजरा-जदि-कादरी' नुसार शेख महंमदांशी असलेला तिचा संबंध, शेख महंमदांची जन्मभूमी व कर्मभूमी, त्यांच्याविषयीच्या आख्यायिका, त्यांचा काळ व त्यांची शिष्यपरंपरा; वारकरी, समर्थ, नागेश, नाथ इ. विविध महाराष्ट्रीय धर्मसंप्रदायांशी असलेले त्यांचे संबंध याविषयी विवेचन केलं आहे. आजवरच्या अभ्यासात ज्या त्रुटी जाणवल्या त्या नोंदवून त्यांची पूर्तताही केली आहे. त्यातून शेख महंमदांच्या व्यक्तिमत्त्वाचं व संतत्वाचं एक वेगळं दर्शन घडेल, अशी अपेक्षा आहे.

त्यांच्या साहित्याचा सूक्ष्म व तपशीलवार विचारही या प्रकरणात केला आहे. विशेषतः 'योगसंग्रामा'च्या पारंपरिक प्रतीच्या आधारे प्रसंगशः सर्व अठरा अध्यायांचे सविस्तर विवेचन या ग्रंथात प्रथमच केलं गेलं आहे. त्याशिवाय त्यांच्या त्रिखंडात्मक 'पवनविजय' व 'निष्कलंक प्रबोध' या रचनांचाही सूक्ष्म अभ्यास करून त्यांची वैशिष्ट्यं नोंदविली आहेत. 'भक्तिबोध' व 'आचारबोध' याही शेख महंमदांच्या लक्षणीय रचना. त्यांचा साधार अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न या ग्रंथात केला असून त्यांच्या अभंगबंधांचं विषयवार वर्गीकरणही केलं आहे. शेख महंमदांचं भारूडविश्व अनोखं असून दुर्लक्षितही आहे. त्याचा सम्यक् विचार या ग्रंथात प्रथमच होत आहे. त्यामुळं या कवीनं मराठी भारूड-वाङ्मयात जी मोलाची भर घातली, तिची कल्पना येईल.

शेख महंमदांच्या 'दक्खिनी' रचनांतून त्यांची सूफी मतप्रणाली ठळकपणे प्रकटते. याकडे अभ्यासकांचं काहीसं दुर्लक्ष झालं होतं. शिवाय याविषयी विचार करण्यासाठी सूफींच्या तत्त्वज्ञानाची बैठकही अभिप्रेत होती. तिच्या अभावामुळं आजवरच्या अध्ययन-संशोधनात ही बाजू प्रकाशातच आली नव्हती. ती या ग्रंथातील 'पंजीज मुसलमानी' व 'नसीहतनामा' या शेख महंमदांच्या रचनांमुळं तर आलीच पण 'दुचेष्मा' या मुंतोजीच्या' 'अविंध पंचीकरणसदृश' परिभाषा-कोशामुळंही आली. 'दुचेष्मा' हा या संदर्भातील संशोधनाचा व विवेचनाचा भक्कम आधार असल्यानं त्याची संपूर्ण संहिताच (काहीसा विस्तारदोष पत्करून) या ग्रंथात दिली आहे, हेही या ग्रंथाचं वैशिष्ट्य म्हणता येईल. शेख महंमदांच्या दक्खिनी भारुडांचा विचार आजवर झाला नव्हता, तोही या प्रकरणात केला आहे. शेख महंमदांचं हे 'दक्खिनी' साहित्य म्हणजे मुसलमान मराठी संतकवींनी हिंदी साहित्याला-विशेषतः दक्खिनी साहित्याला-दिलेली देणगीच होय.

'दोन गुरुबंधू' या प्रकरणात केशवस्वामी भागानगरकर यांच्या बाजीद पठाण व शहाबेग (शाबेग) या मुसलमान शिष्यांविषयी व त्यांच्या लेखनाविषयी विचार केला आहे.

आलमखान हे नागेशसंप्रदायातील प्रमुख मुसलमान संतकवी. डॉ. आवळीकर यांनी आलमखानांचा काहीसा चरित्रात्मक व डॉ. ढेरे यांनी थोडासा परिचयपर असा विचार केला असला तरी त्यांच्या न हरवलेल्या 'यवनपणा'चा व त्यांच्यावरील सूफी प्रभावाचा विचार आजवर कुणीही केला नव्हता, तो या ग्रंथात प्रथमच केला आहे. त्याचप्रमाणं 'नागेशदर्पणा'च्या आधारे आलमखानांच्या अभंगरचनेचं तत्त्वविवरणपर, उपदेशपर, गुरुमाहात्म्यपर, आध्यात्मिक अवस्थाविषयक, कूट, रूपकात्मक, पाखांडखंडनपर व प्रबोधनात्मक असं वर्गीकरणही प्रथमच इथं केलं आहे. त्यातून आलमखानांच्या लेखनाची स्वरूपवैशिष्ट्यं लक्षात येतील. या विवेचनातून एकात्मतावादी समाजप्रबोधनकार म्हणून त्यांचं महत्त्व लक्षात येईल. तसंच मुंतोजी-शेख महंमदांप्रमाणंच त्यांचं बहुभाषाकोविदत्वही लक्षात येईल. 'आंतरभारती'च्या कल्पनेचे अन्त : प्रवाह त्यांच्या काही रचनांत कसे आढळतात, याचा विचार या ग्रंथात पहिल्यांदाच प्रतिपादिला जात आहे.

दहाव्या व अकराव्या प्रकरणांत नागेश साम्प्रदायिक मुसलमान संतकवी जंगली फकीर (सैयद हुसेन ) आणि जमाल फकीर (जमालशा) यांचा व त्यांच्या लेखनाचा अल्पसा परिचय करून दिला आहे.

या ग्रंथातील बारावं प्रकरण हेही फार महत्त्वाचं प्रकरण असून त्यामुळं महानुभाव पंथाची मान्यता असलेल्या संतकवी शहामुनींविषयी व त्यांच्या 'सिद्धांतबोध' ग्रंथाविषयी आजवर जो विचार केला गेला, त्याला वेगळीच कलाटणी मिळणार आहे. यासाठी मी 'सिध्दान्तबोधा'च्या सर्वच-म्हणजे पन्नास अध्यायांचा सूक्ष्म अभ्यास केला व त्यांचं तपशीलवार 'स्वरूपदर्शन' (अध्यायशः) या प्रकरणात घडविलं आहे. या विचारमंथनातून एक वेगळंच सत्य प्रकटलं, ते असं की, पहिल्या तीस अध्यायांचा कर्ता हाच मूळ शहामुनी असून तो महानुभावीय द्वैतमताचा व पंचकृष्णादी परंपरेचा पुरस्कर्ता आहे. 'महानुभाव' मासिकाचे माजी संपादक श्री. तोंडोळीकर व श्री. योगेश सेवलीकर महानुभाव यांनी यापूर्वी हे मत लेखाद्वारे मांडलं होतं पण त्याची दखल घेतली गेली नाही. ३१ ते ५० अध्यायांच्या अद्वैतमतवादी कर्त्यानं मूळ ग्रंथाचं परिष्करण केल्यानं अद्वैतमत-विरोध, द्वैतमत-पुरस्कार व पुन्हा अद्वैतमत-प्रतिष्ठापना अशी वैचारिक विसंगती या ग्रंथात निर्माण झाली. पहिल्या तीस अध्यायांतील १ ते १५ अध्याय अद्वैतमतविवरणपर व त्याचा विरोध करणाऱ्या १५ ते ३० अध्यायांत महानुभावीय द्वैतमतप्रधान तत्त्वज्ञानाचं व परंपरेचं प्रतिपादन-विवरण करणारे ही सुसंगतीच कशी योग्य आहे, ते स्पष्ट करून पहिल्या तीस अध्यायांचा कर्ता मुसलमान संतकवी शहामुनी हाच खरा शहामुनी आहे, हा निष्कर्ष मी या प्रकरणात सप्रमाण सिद्ध केला असल्यानं आजवर डॉ. ढेरे, व मराठी वाङ्मयेतिहासकार यांनी जे मतप्रतिपादन केलं व महानुभाव शहामुनीला अद्वैतमतसमर्थक व द्वैतमतविरोधक ठरविलं, त्या विचाराला छेद गेला आहे. त्यातील तार्किक व वैचारिक विसंगतीवरही महानुभाव विद्वानांच्या मताधारे प्रकाश टाकला आहे. शहामुनींचं समाजचिंतन व समाजप्रबोधन, त्यांची ग्रामीण शब्दकळा व प्रतिमासृष्टी त्यांचे

इस्लामधर्मानुयायित्व याविषयी प्रस्तुत ग्रंथात केलेलं विवेचन आजवरच्या शहामुनीविषयक चिन्तन-संशोधनाला वेगळं वळण देणारं ठरेल, असा मला विश्वास वाटतो. या चिन्तनाला प्रारंभ झाला तरी मला या संदर्भात केलेल्या परिश्रमांचं सार्थक झालं असे वाटेल.

संतकवी लतीफशहा यांचा ओझरता नामोल्लेख संतनामावळ्यांत व मराठी वाङ्मयेतिहासात येत असे. त्यांचा काळ, चरित्र व साहित्य याविषयी अधिक माहिती मिळवून ती देण्याचा प्रयत्न तेराव्या प्रकरणात केला आहे.

चौदावं प्रकरण नाथसंप्रदायाशी संबंधित असलेले मुसलमान संतकवी शेख सुलतान यांच्याविषयी व त्यांच्या लेखनाविषयी विवरण करणारं आहे. या प्रकरणात शेख सुलतान व त्यांचा काळ, त्रिपुटी मठ-संबंध, शेख सुलतानांची गुरुपरंपरा व त्यांचा संप्रदाय, त्यांच्यावरील सूफी मताचा प्रभाव इ. बाबींचा (त्यांच्या रचनेच्या आधारे) विचार या ग्रंथात प्रथमच केला जात आहे.

'रिवायत' हा मुसलमानांचा शोकगीत-प्रकार आहे. 'गरीब अब्दुल' या रिवायतकार संतकवीनं मध्ययुगीन मराठी साहित्याच्या दालनात या काव्यप्रकाराची मौलिक भर कशी टाकली, याचा विचार पंधराव्या प्रकरणात केला आहे.

'उपसंहार' हे प्रकरण समारोपात्मक आहे.

## ३. 'वजीरुल् मुल्क' मुंतोजी (खिलजी)

पुढील प्रकरणात ज्यांच्याविषयी विवेचन केलं आहे ते शहा मुर्तुझा कादरी ऊर्फ मुंतोजी बामणी हे मुसलमान संतकवी म्हणून विख्यात होते व त्यांची मराठी रचनाही महाराष्ट्रात नव्हे तर कर्नाटकापासून तंजावरपर्यंत हस्तलिखितांच्या रूपानं उपलब्ध होते. ते बहमनी राजघराण्यातील होते तथापि, प्रस्तुत मुंतोजी हे पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धातील व सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धातील संतकवी असून त्यांनी मध्ययुगीन मराठी भक्तिसाहित्यात वेगळीच मौलिक भर टाकली आहे. ते खिलजी घराण्यातील असून स्वत:चा निर्देश 'वजीरुलमुल्क' असा करतात. श्री. गं. ना. (अबासाहेब) मुजुमदारांनी त्यांचा व त्यांच्या लेखनाचा परिचय भारत इतिहास सं. मंडळाच्या त्रैमासिकात (वर्ष २०, अंक-२) करून दिला असून त्यांचा काळ इ. स. १४३५ ते १४५० असा मानला आहे. त्यांनी संगीत आणि ज्योतिष या दोन विषयांवर ग्रंथलेखन केलं आहे. त्यांच्या संगीतविषयक ग्रंथाचं नाव 'संगीत मकरंद' असं असून ज्योतिषविषयक ग्रंथाचं नाव 'विजयभैरव' असं आहे. त्यांच्या वडिलांचं नाव 'जीया दौलतखान' असं असून गुरूचं नाव 'महेन्द्राचार्य' असं आहे.

'संगीत मकरंद' ही त्याच नावाच्या संस्कृत ग्रंथावरील मराठी टीका असून ही टीका ओवीबद्ध आहे. या ग्रंथाच्या हस्तलिखिताची माहिती उपलब्ध होत नाही. 'विजयभैरवा'चे हस्तलिखित तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात आहे. (ज्योतिष विभाग, क्र. २५४२) या ग्रंथात ज्योतिष शास्त्राच्या शकुन, शुभ आणि अशुभ मुहूर्त, भविष्यविचार इ. अंगांविषयी विवरण केलं आहे.

या संतकवींनं 'संगीत मकरंद' आणि 'विजयभैरव' या ग्रंथांच्या शेवटी अनुक्रमे पुढील उल्लेख केले आहेत–

१) 'श्रीमन्महाराजाधिराज श्रीसंगीतसहितसिरोमणि श्रीखलचिवंशवर्णन जीया दौलतखानाचा नंदन वजिरुलमुल्क तेन कृता संगित मकरंदश्या टीका'

२) 'श्रीसकळविद्याविशारद श्री मन्यींहेंद्राचार्यचरणांबुजशिष्य'

आपल्या ग्रंथाचं निर्मितिप्रयोजन सांगताना वजीरुलमुल्क, मुंतोजी 'अज्ञान-निरसन' आणि 'ज्ञानबोध' याचा आवर्जून उल्लेख करतात.

मुसलमान मराठी संतकवीच्या पहिल्यावहिल्या ग्रंथनिर्मितीची ही दोन उदात्त प्रयोजनं पाहून आपण काहीसे अवाकूही होतो नि संतुष्टही होतो. ही प्रयोजनं यापुढील काळातील मुसलमान संतकवींनी आपल्या दृष्टीसमोर कशी ठेवली होती, याचाही प्रत्यय हा ग्रंथ वाचताना पुढं येईलच. वजीरुलमुल्क मुंतोजींचे हे मूळ ग्रंथ वा त्यांच्या प्रती उपलब्ध न झाल्यानं मी त्यांच सविस्तर विवेचन करू शकलो नाही, ही काहीशी खंत मनात आहेच.

# ४. शहा मुंतोजी बामणी (मृत्युंजय)

## प्रास्ताविक

शहा मुंतोजी बामणी हे मुसलमान मराठी संतकवींपैकी एक महत्त्वाचे कवी आहेत. त्यांचं मूळ नाव 'शहा मुर्तुझा कादरी' असल्याचे उल्लेख आढळतात.[१] त्यांच्या रचनांच्या हस्तलिखित प्रतींवर ब्रह्मणी मुक्तोजी, मृत्युंजय ब्राह्मणी आणि ब्राह्मण मुक्तोजी अशा विविध नाममुद्रा आढळतात. याचा तपशील मी त्यांच्या 'प्रकाशदीप' या ग्रंथाविषयी केलेल्या विवेचनात पुढं दिलाच आहे. महीपतींनी आपल्या 'भक्तविजया'त त्यांचा उल्लेख 'महंमद बमणी' असा केला आहे.[२] डॉ. सौ. शेख यांना तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयात उपलब्ध झालेल्या 'प्रकाशदीपा'च्या प्रतीच्या पहिल्या प्रकरणाच्या दुसऱ्या ओवीत 'ब्राह्मण मुर्तिजा' असा उल्लेख असल्याचं त्यांनी नोंदविलं आहे.[३]

मराठी वाङ्मयाच्या व महाराष्ट्राच्या इतिहासात 'बहमनीकाळ' हा यादवकाळानंतर येत असल्याविषयीची कल्पना आपणा सर्वांना आहेत. 'ब्राह्मण', या शब्दाचं फार्सी-उर्दूतील एक रूप 'बरहमन' असं असून दुसरं रूप 'बहमन' असं आहे. मूळ बहमनी राज्यकर्ते धर्मांतरित होते, असेही उल्लेख आढळतात.

मुंतोजींच्या नावांमधील 'बमणी', 'बामणी' या 'ब्राह्मण', 'ब्राहमणी' हे शब्द वरील संदर्भात अत्यंत सूचक आहेत व आजवर कुणी अभ्यासकानं त्याचा असा भाषिक खुलासा केला नाही. एक मात्र खरं की, मुंतोजींचा संबंध बहमनी राजवटीशी होता किंवा असावा, असं या सर्व अभ्यासकांना मान्य असावं, असं दिसतं.

## मुंतोजींचा काळ

बहमनी राजवटीचा किंवा घराण्याचा नि मुंतोजींचा संबंध असल्याचं मराठी संतचरित्रकार मान्य करतात. बहमनी राजवटीचे जे पाच विभाग झाले, त्यांत बिदरची 'बरीदशाही' हा एक विभाग होता. उद्धव चिद्घनानं आपल्या 'मृत्युंजयचरित्रा'त

> "शहा महमद बमणी । करि बेदरिंची पाच्छाई ।
>
> मृत्युंजय साधूचा राजा । ऐका त्याची नवाई ।। २ ।।"

असा उल्लेख केला आहे तर हनुमदात्मजांनी 'पूर्णानंदचरित्रा'त १६ व्या अध्यायातील ओवी क्र. २६० मध्ये 'शहा मुंतोजी बेदरीचा बाच्छा' असा उल्लेख केला आहे. महीपती 'भक्तविजया'त त्यांचा निर्देश 'शहा ब्राह्मणी' व 'महंमद बमणी' असा करतात. (३० x ४१).

शहा, पाच्छा, पाच्छाई या शब्दांवरून मुंतोजींचा मुसलमान राजघराण्याशी- म्हणजेच बहमनी राजवटीशी-संबंध असल्याचं जसं सूचित होतं त्याचप्रमाणं बीदरच्या बरीदशाहीशी संबंध असल्याचं स्पष्ट होतं. या प्रमाणांच्या आधारे डॉ. जुल्फी शेख यांनी मुंतोजींच्या काळाविषयी पुढील अनुमान केलं आहे-[४]

''बेदरच्या राजघराण्यात त्यांचा जन्म झाला असे त्यांचे चरित्रकार नमूद करतात. परंतु मुंतोजींच्या जन्माआधीच बेदरची बहामनी राजवट विनाशाकडे वाटचाल करीत होती, हेही लक्षात घेण्यासारखे आहे.'' डॉ. सौ. शेख यांच्या मते इ. स. १५७५ ते इ.स. १६५० हा मुंतोजींचा काळ असावा. हा काळ १६ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि सतराव्या शतकाचा पूर्वार्ध असा येतो.

डॉ. सौ. शेख मुंतोजींची गुरुपरंपरा कल्याणीकर सहजानंदांपासून मानतात व त्यांचे हे मत योग्य आहे. श्री. शं देव यांनी सहजानंदांचा काळ शके १४६० म्हणजे इ. स. १५३८ नोंदविला आहे. यावरून 'महाराष्ट्र-सारस्वताचे पुरवणीकार डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी मृत्युंजयांचा म्हणजे मुंतोजींचा काळ श. १४५० (इ. स. १५२८) ते श. १४८० (इ. स. १५५८) हा ठरतो, [५] असं म्हटलं आहे. हा काळ १५ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि सोळाव्या शतकाचा पूर्वार्ध असा आहे. डॉ. सौ. शेख सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून सतराव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत नेतात, हे वरील प्रमाणांवरून योग्य वाटत नाही. सारस्वतकार भावे त्यांना नाथसमकालीन मानतात [६] तर डॉ. ढेरे त्यांना नाथोत्तरकालीन मानतात. डॉ. सौ. शेख मुंतोजींना जितके उत्तरकालीन मानतात तितके ते उत्तरकालीन असल्याचं वरील प्रमाणांनी सिद्ध होत नाही. त्यांचा काळ इतका पुढं नेता येणार नाही. त्यांना नाथ-समकालीन किंवा फार तर नाथोत्तरकालीन मानता येईल, असं आज उपलब्ध असलेल्या वरील प्रमाणांच्या आधारे म्हणता येईल. याचाच अर्थ, मुंतोजी हे शिवकालीन संतकवी नसून शिवपूर्व-कालीन संतकवी होते, असा आहे.

## चरित्रविषयक आख्यायिका व दाखले

मुंतोजी हे बहमनी राजघराण्यातील होते याविषयी अनेक दाखले मिळतात -

१) महीपतीविरचित 'भक्तविजय' आणि उद्धव चिद्धनविरचित 'मृत्युंजयचरित्र' यांत मुंतोजींना राजवैभव भोगत असताना उपरती कशी झाली, याचं वर्णन आढळते.

२) राजवैभवाचा त्याग करून ते कल्याणीला आले व दिंडीवरोबर पंढरपुराला गेले. तिथं त्यांना 'विवेकसिंधु'या ग्रंथाचा प्रसाद विठोबानं दिला, असा उल्लेख उद्धव चिद्धन करतात. कल्याणीच्या सहजानंदांचा गुरुपदेश घेण्याची प्रेरणा त्यांना तिथूनच लाभली. पुढं त्यांनी सहजानंदांची

दीक्षा घेतली. 'मृत्युंजय' हे नाव सहजानंदांनीच त्याना दिलं. 'भक्तविजया'तही या आख्यायिकेला पुष्टी मिळते-

'त्रिशत लोटता त्वरित ।
प्रसन्न जाहला रुक्मिणीकांत ।।
विवेकसिंधुचे पुस्तक साक्षात ।
दिधले स्वप्नात आणुनि ।।
सहजानंदस्वामी कल्याणात ।
तयाचा उपदेश घेई त्वरित ।
स्वप्नी सांगता पंढरीनाथ । '

(ओ. क्र. ४३)

३) 'पूर्णानंदचरित्र'कार हनुमदात्मज मात्र वरील बाबींचा उल्लेख न करता अधिक वास्तव वर्णन करतात. 'बेदरीचे बाच्छा शहा मुंतोजी' यांच्या मनात विरक्तिभाव निर्माण होऊन ते सहजानंदस्वामींकडे गेले. त्यांची त्यांनी अनेक-म्हणजे जवळपास बारा वर्षं-सेवा केली व मग सहजानंदस्वामींनी मुंतोजींवर अनुग्रह केला, अशा आशयाचं विवेचन हनुमदात्मज करतात. 'विवेकसिंधु'चा, विशेषतः त्यातील पंचीकरण-विचाराचा, मुंतोजींच्या बहुतेक ग्रंथांवर प्रभाव का पडला, याचा उलगडाही त्यामुळं होतो -

' यापरी बोलून हर्षेसी
विवेकसिंधु ग्रंथ त्यांसी ।
सांगुन संप्रदाय क्रमेसी ।
ब्रह्मसाक्षात्कार त्या केला ।। '

(-पूर्णानंदचरित्र ओ. क्र. १६ X २६५).

## मुंतोजी व महाराष्ट्रातील विविध धर्मसंप्रदाय यांचे संबंध

### अ) सूफी संप्रदाय

मुंतोजींचे मूळ नाव मुर्तुझा कादरी होतं, हे मान्य करुनही डॉ. जुल्फी शेख यांना त्यांचा सूफी संप्रदायाशी काहीही संबंध नव्हता, असं वाटतं ! त्यांना या संप्रदायाचं तत्त्वज्ञानचं माहीत नव्हतं, इथपर्यंत डॉ. सौ. शेख यांनी आपल्या मताचा आग्रह धरला आहे. कादरी ही सूफींच्या चार शाखांपैकी एक प्रमुख शाखा असून शेख महंमद हे संतकवी याच शाखेचे होते, हे त्यांच्या 'सिजरा-

जदि-कादरी' या रचनेवरून स्पष्ट होतं, नागेशसाम्प्रदायिक संतकवी व नागेश संप्रदायाचे भाष्यकार अज्ञानसिद्ध यांना इस्लाम धर्म व सूफी संप्रदाय यांच्या पारिभाषिक संज्ञा मुंतोजींनी किती तपशीलवार विशद केल्या, याचं प्रत्यक्ष प्रमाणच मी या प्रकरणाच्या शेवटी जोडलेल्या 'अविध पंचीकरणा'च्या रूपानं दिलं असून त्याविषयी विस्तृत विवेचनही केलं आहे. तेव्हा मुंतोजींना उर्दू-फार्सी भाषेचं ज्ञान नव्हतं, इस्लामच्या 'शरीयत'ची माहिती नव्हती, सूफी तत्त्वज्ञानातील म्हणजे 'तसव्वुफ' मधील संज्ञाच माहीत नव्हत्या, अशा आशयाची विधानं डॉ. सौ. शेख यांनी केली आहेत, याचं कारण त्यांना वरील 'परिभाषाकोश' उपलब्ध झाला नाही, हेच असावं. नांदेडच्या गोदातीर इतिहास संशोधन मंडळात डॉ. ढेरे यांना उपलब्ध झालेल्या (व डॉ. सौ. शेख यांना उपलब्ध न झालेल्या ) या रचनेतील डॉ. ढेरे यांनी उद्धृत केलेल्या अवतरणाचा मात्र त्यांनी दाखला दिला असून त्या चार पंक्ती महत्त्वाच्या असल्याचं सांगितलं आहे," ही या संदर्भात एक जमेचीच बाजू म्हणायची ! -

"शहा मुतबजी ब्रह्मणी ।
जिनमे नही मनामनी (मनमानी)
पंचीकरण का खोज किए ।
हिंदू-मुसलमान एक कर दिए ।।"

मुंतोजींप्रमाणंच सर्व मुसलमान (सूफी) संतांनीही हेच एकात्मतेचं महत्त्वाचं कार्य केलं आहे, एवढंच इथं नोंदवितो.

'सूफी संप्रदायाशी मुंतोजींचा काहीही संबंध नव्हता, असं म्हणता म्हणता डॉ. जुल्फी शेख ' ग्रंथाच्या शेवटी 'ते सूफींच्या संपर्कात आले असावेत' हे मात्र मान्य करतात.' 'ते राजघराण्यातील असावेत परंतु त्यांनी राज्योपभोग घेतला नसावा कारण त्यावेळी बहामनी सत्ता संपुष्टात आली होती. त्या काळी सूफी पंथ होता. सूफी लोकांच्या संपर्कात येऊन मलंगवेशात (ज्यांना दुरवेशी म्हणतात ) ते भटकले असावेत. पुढे सहजानंदस्वामींशी भेट होऊन त्यांच्या सान्निध्यात त्यांनी अध्यात्माची शिकवण घेतली असावी'... इ. निराधार तर्क डॉ. सौ. शेख कशा करू शकतात, याचं आश्चर्य वाटतं.

सुफी तत्त्वज्ञानाचा व इस्लामदर्शनाचा गाढा व्यासंग असल्याशिवाय मुंतोजी 'अविध पंचीकरणा'-सारखी प्रगल्भ पारिभाषिक-कोशरचना करूच शकले नसते. या दर्शनाबरोबरच त्यांचा भारतीय दर्शनांचा गाढा व्यासंग होता, हे त्यांच्या विविध रचनांतून सिद्ध होतंच. त्यामुळे त्यांना अगदी सहजपणे तुलनात्मक दर्शन-विवरण करता आलं, याबद्दल दुमत असण्याचं कारण नाही.

## (आ) नागेश संप्रदाय आणि वीरशैव धर्म

हा संप्रदाय हिंदू-मुसलमान, वीरशैव आदी धर्मियांशी समन्वय साधणारा संप्रदाय असून त्यात आलमखानांसारखे व अज्ञानसिद्धांसारखे संत होऊन गेले. अज्ञानसिद्ध हे स्वतः नागेश संप्रदायाचे

भाष्यकार ('वरदनागेश'कर्ते) असून ते मुंतोजींना इस्लाम/ सूफी दर्शनांतील पारिभाषिक संज्ञांसंबंधी 'पृच्छा' करतात, यातून नागेश संप्रदाय व मुंतोजी यांच्या अन्योन्य संबंधावरही प्रकाश पडतो. (काही मुसलमान अनुयायी नागेशांना सूफी संत नसीरुद्दीन चिराग देहलवी मानतात, याविषयी मी या पारिभाषिक कोशाच्या संदर्भात या प्रकरणात अन्यत्र विवरण करताना उल्लेखिलं आहेच).

मुंतोजींनी उत्तर आयुष्यात एका जंगम शिष्याला दीक्षा दिल्याचा उल्लेख डॉ. सौ. शेख यांनी केला आहे. जंगम शिष्य त्यांना 'ज्ञानसागरअय्या' म्हणत. नागेश सांप्रदायिकांप्रमाणं मुंतोजी हेही समन्वयवादी व अनेक धर्मांशी / पंथांशी एकरूप झालेले संत होते, याची प्रचीती इथं येते.

## (इ) वारकरी संप्रदाय

मुंतोजी पंढरपूरला दिंडीबरोबर गेले व तिथं पांडुरंगानं त्यांना मुकुंदराजकृत 'विवेकसिंधू' या ग्रंथाचा प्रसाद दिल्याची आख्यायिका यापूर्वी निर्देशिली आहे. उद्धवचिद्घन आणि महीपती यांच्या-सारख्या महत्त्वाच्या संतचरित्रकारांनी हा दाखला दिला असल्यानं मौखिक रूपात वा परंपरेनं ही घटना लोकमानसात दृढ झाली असावी, असं म्हणता येईल. त्यातून मुंतोजी आणि वारकरी संप्रदाय यांच्यामधील अनुबंध स्पष्ट होतो. याचं आणखी एक प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे मुंतोजींनी आपल्या रचनांत ज्ञानदेव आणि ज्ञानेश्वरी यांच्याविषयी प्रकट केलेला आदरभाव. 'प्रकाशदीपा'च्या शेवटी तर त्यांनी त्या ग्रंथातील काही बाबींचं अधिक स्पष्टीकरण हवं असल्यास 'कपिलगीते'-प्रमाणंच 'ज्ञानेश्वरी'त शोध घ्यावा, असं म्हटलं आहे. 'ज्ञानेश्वरी'तील गणेशरूपकाप्रमाणंच मुंतोजींच्या 'सिद्धसंकेता'तील गणेशरूपक आहे. त्यातील साम्यही लक्षणीय आहे.

## ई) नाथसंप्रदाय

'सिद्धसंकेत' या ग्रंथात मुंतोजींनी योगशास्त्रविवरण केलं असून विविध आसनांचे तपशील दिले आहेत. 'समाधी' ही योगसाधनेची परमोच्च फलश्रुती. तिचं विवरणही 'सिद्धसंकेता'च्या शेवटच्या प्रकरणात केलं आहे. 'सिद्ध' ही संज्ञा मुंतोजींवरील नाथसांप्रदायिक प्रभावाची एक लक्षणीय खूणच म्हणायला हवी.

'विवेकसिंधु' व 'ज्ञानदेवी' या ग्रंथांतील योगविचाराचे संदर्भ इथं लक्षात घ्यायला हवेत. त्याचप्रमाणं मुकुंदराज व ज्ञानदेव यांचा नाथसांप्रदायिक परंपरेशी असलेला संबंधही लक्षात घ्यायला हवा.

## ड) आनंद संप्रदाय

मुंतोजी हे कल्याणीच्या सदानंद मठाच्या आनंद संप्रदायाचे 'दीक्षित' होते. 'पूर्णानंद चरित्र'कार हनुमद्दासज हेही मुंतोजीप्रमाणं बीदर भागातील असून तेही याच संप्रदायाचे 'दीक्षित' होते.

मुंतोजींना सहजानंदांनीच 'ज्ञानसागरानंद' हे दीक्षानाम व 'मृत्युंजय' हे नामाभिधान दिलं [१]. सहजानंदांच्या सहवासात ते प्रदीर्घ काळ होते. यावरून मुंतोजींचे आणि आनंद संप्रदायाचे संबंध किती घनिष्ट होते, हे स्पष्ट होतं.

नागेश व आनंद हे दोन्ही संप्रदाय महाराष्ट्राजवळील कर्नाटकाशीही संबद्ध आहेत, ही भौगोलिक पार्श्वभूमी वडवळ-मोहोळ-मुगळी-करळी-कल्याणी-नारायणपूर-बिदर यांच्यामधील अनुबंध उलगडण्यास आणि मुंतोजींचा त्याच्याशी असलेला संबंध स्पष्ट करण्यास उपयुक्त आहे.

मुंतोजी आणि अन्य संप्रदाय यांच्याविषयींचं हे संशोधनात्मक सम्यक् विवेचन मययुगीन मराठीच्या अध्ययन-क्षेत्रात इथं प्रथमच होत असून ते मराठी वाङ्मयेतिहासकारांना उपयुक्त वाटेल, असा विश्वास वाटतो.

## निर्याण

कल्याणीजवळील नारायणपूरच्या परिसरातील एका टेकडीवर शहा मुर्तुजा कादरी यांचा दर्गा आहे. रमजान महिन्याच्या एकविसाव्या दिवशी त्यांचा उरुस होतो, त्या वेळी मुंतोजींची आरती दर्ग्याच्या दिशेकडे तोंड करून म्हटली जाते व मठातून दर्ग्यात पालखी नेतात. उरुसात हिंदु-मुस्लिम इ. अनेक धर्मांचे लोक असतात. त्यांची पुण्यतिथी मुस्लिम पद्धतीने साजरी करतात'. याविषयी डॉ. सौ. शेख यांनी चांगली माहिती दिली आहे.[७]

## मुंतोजींचं साहित्य

मुंतोजींचं साहित्यविश्व अत्यंत संपन्न आहे. त्यात दोन ग्रंथ ('प्रकाशदीप' आणि 'सिद्धसंकेत') एक परिभाषाकोश, सहा तत्त्वचिंतनपर प्रकरणं तसंच काही स्फुट अभंग/पदरचना इ. चा समावेश होतो. मुंतोजी 'प्रकाशदीप' अद्वैतविवेचनपर भाष्यात्मक ग्रंथ असून 'सिद्धसंकेता'त समाधि-अवस्थेपर्यंतचं योगविवरण आहे. पंचीकरण आणि अद्वैतमत यांचा प्रमुख ठसा त्यांच्या रचनांवर आहे; त्याचबरोबर ते मुळातले सूफी संप्रदायातील कादरी शाखेचे असल्यानं व त्यांचा भारतीय दर्शनांचाही चांगला व्यासंग असल्यानं त्यांतील साम्यस्थलांवर त्यांनी लक्ष केंद्रित करून आपला लेखन-प्रपंच थाटला आहे. विशिष्ट तत्त्वप्रणालीचा स्वीकार केल्यानं त्यांच्या रचनांमध्ये तिची पुनरावृत्ती होणं स्वाभाविक होतं. यासाठीच पहिल्या तीन ग्रंथांचा विचार मी तपशीलानं केला असून अन्य प्रकरणांचा थोडक्यात परिचय करून दिला आहे. यांतील परिभाषा-कोशाचा विस्तृत विचार मराठीत सर्वप्रथम होत असून इस्लामदर्शन व सूफीमत यांच्या वैशिष्ट्यपूर्ण पारिभाषिक संज्ञा व त्यांचे मुंतोजींच्या दृष्टीनं समान पर्याय-हे विवेचन शेख महंमदांचा अपवाद वगळता अन्य कोणत्याही मुसलमान संतकवीनं मराठीत केलं नाही. ते अभ्यासकांच्या/संशोधकांच्या जिज्ञासापूर्तीसाठी या प्रकरणाच्या शेवटी परिशिष्टात हेतुतः दिलं आहे.

मुंतोजींची कविता रसाळ व प्रासादिक आहे. सूर्य, प्रतिबिंब, बाबुळी यांच्यासारख्या प्रतिमांचं आवर्त त्यांच्या लेखनात जाणवतं पण ते अप्रस्तुत नसतं. त्यांचा वेद, उपनिषदं, पड्दर्शनं, कपिलगीता, पंचीकरण, विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी आणि इस्लाम/ सूफी दर्शन यांचा गाढा व्यासंग नि त्यांची बहुश्रुतता त्यांच्या लेखनातून प्रकटते. त्यांच्यामधील तत्त्वज्ञ, योगी, भाष्यकार, कवी, प्रबोधनकार, धार्मिक व सामाजिक एकात्मतेचा पुरस्कर्ता - या सर्वांचं दर्शन त्यातून घडतं.

## (१) प्रकाशदीप

मुंतोजींच्या अनेकविध रचनांपैकी ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण रचना. त्यांच्या जवळपास सर्वच रचनांविषयी मराठी वाङ्मयेतिहासातून केवळ ओझरते उल्लेख आढळतात. ज्यांनी मुंतोजीं-(मृत्युंजयां) विषयी प्रबंध लिहिला, त्या डॉ. जुल्फी शेख यांच्या ग्रंथातही या रचनेला उणीपुरी दोन पृष्ठं लाभली असून त्यांतही दोन अवतरणांनी (ओव्यांनी) भरपूर जागा व्यापली आहे. मुंतोजींच्या या लक्षणीय रचनेचं विवरण अवघ्या पंचवीस-सव्वीस ओळींत आणि तेही अगदी वरवरचं हे पाहून खेद वाटणं स्वाभाविक होतं. ही रचना तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयात उपलब्ध झाल्याचं व तिची नकललेली प्रत स्वतःजवळ असल्याचं लेखिकाच म्हणते ; तेव्हा तिच्या वाङ्मयीन व तात्त्विक वैशिष्ट्यांचं दर्शन घडविण्याची संधी तिनं का दडवावी, हे कळत नाही. यासाठीच या रचनेविषयी सविस्तर विवेचन करण्याचा प्रयत्न इथं केला आहे. ग्रंथाची उपलब्धी, त्याची महती, श्रोत्यांना क्षीर-नीर-विवेक करून सुढाळ मोती घेण्याची विनंती, गुरूवरील श्रद्धेचं महत्त्व व एका ओळीत पाच प्रकरण- विषयांची एकेक शब्दातील यादी इ. देऊन 'मुंतोजींच्या कविप्रतिभेला' 'प्रकाशदीप' या पोथीत सारखं काव्यात्म धुमारे फुटतात.' असं सांगून लेखिकेनं आपली जबाबदारी संपविली आहे. 'कविप्रतिभेला सारखे काव्यात्म धुमारे फुटतात' म्हणजे नेमकं काय होतं, ते कळत नाही. शिवाय 'रचना' किंवा 'ग्रंथ' याऐवजी 'पोथी' हाही शब्द लेखिकेनं का योजिला ते कळत नाही. परिभाषाकोशाचं स्वरूप तुलनात्मक दर्शनाचं असल्यानं निदान मुंतोजींच्या अन्य एका तरी रचनेचा सूक्ष्म विचार करावा, या हेतूनं इथं त्यासंबंधी सविस्तर विवेचन करीत आहे. त्यावरून या रचनेच्या विविध वैशिष्ट्यांची कल्पना येईल, अशी अपेक्षा आहे.

### ग्रंथकर्त्याचा नामोल्लेख

'प्रकाशदीपा'च्या उपलब्ध असलेल्या विविध प्रतींत या ग्रंथाच्या कर्त्याची मृत्युंजय ब्रहमणी, ब्रहमणी मुक्तोजी, ब्राहमण मुक्तोजी आणि ब्रह्म मृत्युंजय अशी विविध नावं आढळतात. त्यांतील आशय, विविध प्रकरणांचा विचार, ग्रंथनाम यांत साम्य असून या ग्रंथाचं कर्तृत्व मुंतोजी बामणी यांचंच आहे, याबद्दल वाद असण्याचं कारण नाही. शिवाय असा वाद कुणी उपस्थितही केलेला नाही.

## ग्रंथाची थोरवी

मराठी वाङ्मयेतिहासकारांना, अभ्यासकांना व मुंतोजींविषयी प्रबंध लिहिणारांना या ग्रंथाचं महत्त्व कळलं नसावं, असंही खेदानं म्हणावंसं वाटतं. खुद्द मुंतोजींना मात्र या ग्रंथाची महती निश्चितपणे जाणवली होती, हे त्यांनी या ग्रंथात केलेल्या अनेक विधानांवरून सहज लक्षात येतं. या गुरु-शिष्य-संवादरूप ग्रंथाविषयी ते म्हणतात-

१) 'उपनिषदांचे सार । वेदशास्त्राचे गव्हर ।
सिध्दांतिचे बिजाक्षर । मंथिले असे ।। १९ ।।

२) प्रकाशदिपिचे बोलणे । जैसे समर्थांचे देणें ।। १३५ ।।

३) हे सर्व सारांचे सार । बिजाचे बिजाक्षर ।
अनुभविता जाय आंधकार । निमिशामध्ये ।।
सकळ शास्त्रांचे निर्मित । आणि महावाक्याचें प्रकाशीत ।
तोचि म्यां यथार्थ । कथन केलें ' ।। ३३७-८ ।।

– आणि असं असूनही या ग्रंथवाचनानंतरही काही शंका असल्यास, ज्ञानेश्वरी वाचावी म्हणजे सर्व शंकांचं निरसन होईल, अशी विनम्र भूमिकाही मुंतोजींनी घेतली आहे.

## हस्तलिखितांची उपलब्धी

मुंतोजींचा 'प्रकाशदीप' हा ग्रंथ एके काळी तरी त्यांच्या अन्य ग्रंथांपेक्षा अधिक लोकप्रिय असावा, असं वाटतं, नाही तर त्याच्या प्रती अनेक प्रदेशांत (तंजावर, गुलबर्गा, कल्याणी, धुळे इ. ठिकाणी) का उपलब्ध झाल्या असत्या ?

### १) तंजावर-प्रत :

डॉ. जुल्फी शेख यांनी या हस्तलिखिताचा उपयोग केला असून ते त्यांना तंजावरच्या सरस्वती-महाल ग्रंथालयात उपलबध झालं. त्याची ओवीसंख्या ३९९ असल्याचा उल्लेख डॉ. शेख यांनी केला असला तरी प्रतलेखनकालाचा निर्देश केलेला नाही.

### २) धुळे-प्रती :

धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळात या रचनेची तीन हस्तलिखितं आहेत व श्री द. रा. भट यांनी संपादिलेल्या मराठी हस्तलिखित-ग्रंथसूचीत या ग्रंथाचे पुढील तपशील आढळतात. ते मूळाप्रमाणं उद्धृत करीत आहे. "

(अ) क्र. ४३४ : वे १२३ (३७९). **प्रकाशदीप** : कर्ता-मृत्युंजय ब्रह्मणी. आकार - ८।।" x ४". पत्रे -२९. काल शके १७३२ प्रमोद संवत्सर माघ कृ. ५.

**(आ)** क्र. ४३४ : चे १२४ (३८०). **प्रकाशदीप** : कर्ता-ब्रह्मणी मुक्तोजी. आकार - ६।।।" x ३।।।". पत्रे ५६, ओव्या ४३१. काल शके १६८६, तारण संवत्सर फाल्गुन व. ११ मंगळवार.

**(इ)** क्र. ४३४ : चे १२५ (३८१). **प्रकाशदीप** : कर्ता-ब्राह्मण मुक्तोजी. लेखक पांडुरंग हनुमंत एकबोटे. आकार -८।।" x ५". पत्रे -२४. लेखनकाल-शके १७७० त्र्यं. दा. शुक्ल-संग्रह.

**(३) गुलबर्गा - कल्याणी प्रत :**

माझे स्नेही व मध्ययुगीन मराठी साहित्याचे साक्षेपी संशोधक डॉ. पंडित आवळीकर यांना ही हस्तलिखित प्रत उपलब्ध झाल्याचं व ते तिचं संशोधन करीत असल्याचं ते मला म्हणालेही होते. दुर्दैवानं ते अकाली गेले व त्यांचं हे कार्य पूर्ण होऊ शकलं नाही. कर्नाटक विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुख डॉ. विजया तेलंग यांनी हे हस्तलिखित मला देऊन केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. ही प्रत मी डॉ. तेलंग यांना परत केली आहे.

या प्रतीत पहिली चार प्रकरणं आहेत. 'ब्रम्ह मृत्युंजय' असा कवीचा निर्देश प्रथम प्रकरणाच्या शेवटी आहे.

यांतील धुळे-प्रतींतील वर उल्लेखिलेली 'आ' प्रत मी या विवेचनासठी आधारभूत म्हणून निवडली आहे. याची काही कारणं आहेत : एक तर ती प्रत स्वयंपूर्ण असून आद्यन्तयुक्त आहे. तिच्यावर शके १६८६ (इ. स. १७६४) असा स्पष्ट कालनिर्देश आहे. अन्य उपलब्ध प्रतींपेक्षा तिची ओवीसंख्या सर्वाधिक म्हणजे ४३१ इतकी आहे. प्रत्येक प्रकरणाची ओवीसंख्या सलग लिहिली आहे. कालनिर्देशात संवत्सर, मास, पक्ष, तिथी आणि वार यांचाही तपशील दिला आहे. त्याचप्रमाणे 'भौम' (भूम) इथं हा ग्रंथ लिहिल्याविषयीचा स्थलनिर्देशही आहे. ही प्रत मिळविण्यासाठी मी स्वत: धुळ्याला गेलो होतो. या प्रतीची छायाप्रत मला उपलब्ध करून दिल्याबद्दल मी धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळाचा व प्रा. डॉ. मु. ब. शहा यांचा अत्यंत आभारी आहे.

ग्रंथ-लेखनाच्या स्थलकालादींचा निर्देश करणारी ओवी अशी आहे–

'शके १६८६ सोळा शते शासिं ।
तारणनाम संवत्सरासि ।
फाल्गुन वद्य त्रयोदसि ।
ग्रंथ भौमासि लिहिला ।। ४०१ ।।

## निर्मिति-प्रयोजन

आपण या ग्रंथाची निर्मिती का करीत आहोत व त्याची फलश्रुती काय, याविषयी मुंतोजींच्या मनात एक निश्चित योजना आहे, त्यांच्या या ग्रंथाच्या निर्मितीचं प्रयोजनही त्यांनी स्पष्टपणे प्रतिपादिलं आहे ते असं :

'या ग्रंथाचे नाम प्रकाशदिप ।
येथे बोलिजेल शुद्ध स्वरूप ।
हरपले दाविजेल आप ।
भवसागरि हे ।। २३ ।।'

या ग्रंथाच्या वाचनाची फलश्रुती अशी आहे-

'तुं निराकार स्वरूप । शुन्यासारिखे तुझे रूप ।
हे साकार सांडुनिया आप । पाहे आपण ।। १०८ ।।

जो भक्तिभावानं ईश्वराची उपासना करतो, त्याचं मन या ग्रंथात 'स्थिर' म्हणजे एकाग्र होतं, मग त्याच्या मनातील अज्ञानाचा अंधःकार नाहीसा होतो व त्यात ज्ञानाचा प्रकाशदीप प्रज्वलित होतो. मग त्याच्या मनात कुठलाही भ्रम वा संदेह राहात नाही, असा आपल्या ग्रंथाविषयीचा आत्मविश्वास कवीनं प्रकट केला आहे-

'ईश्वरभक्ति केली जेणे भावें । त्यांचे मन ग्रंथि स्थिरावे ।
आपेंआप उगवे । संदेह न पडे ।। १६ ।।'

संदेह तर पडतच नाही पण आत्मस्थितीचा प्रत्ययही त्याला कसा येतो, हे 'आपेआप उगवे' या चरणात स्पष्ट केलं आहे.

## प्रतिपाद्य विषय

आपल्या ग्रंथातील प्रतिपाद्य विषयाची विभागणी मुंतोजी सहा प्रकरणांत करतात. त्यांत क्रमबद्धता तर आहेच पण तर्कसंगतताही आहे. या प्रकरणांचा तपशील असा -

<u>प्रकरण १</u> - 'स्व'स्वरूपनिरूपण - ओव्या १ ते २४

<u>प्रकरण २</u> - लिंगदेहनिरसन - ओव्या २५ ते १३५

<u>प्रकरण ३</u> - कारणदेहनिरसन - ओव्या १३६ ते २१५

<u>प्रकरण ४</u> - महाकारण देहनिरसन - ओव्या २१६ ते ३१९

प्रकरण ५ - तत्पद निरसन - ओव्या ३२० ते ४००

प्रकरण ६ - मनविज्ञप्ति - ओव्या ४०१ ते ४३१

हे सारेच विषय मुंतोजींचे अत्यंत आवडीचे विषय असून त्यांचं विवरण त्यांनी आपल्या अन्य ग्रंथांतही केलं आहे.

'आपण कोण आहोत ?' ( कोऽहम ? ). या प्रश्नापासून या ग्रंथाचा प्रारंभ होतो. ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात मुंतोजींनी त्याचाच विचार केला आहे. 'आपले शुद्ध स्वरूप हारपले'आहे (ओ. २३) ते आपल्याला कळणं आवश्यक आहे. त्यावर आलेलं अज्ञान नि भ्रम यांचं सावट दूर करणं आवश्यक आहे. यासाठी 'लिंगदेह' म्हणजे काय, पंचमहाभूतांच्या एकत्रीकरणानं त्याची निर्मिती कशी होते, हा 'पंचीकरण - विचार' दुसऱ्या प्रकरणात येतो. पंचीकरण - विचाराचे अन्य पैलू पुढे क्रमशः 'कारणदेहनिरसन' (प्रकरण ३), 'महाकारणदेहनिरसन' (प्रकरण ४) आणि 'तत्पद-निरसन' (प्रकरण ५) यांत विवरिले आहेत. 'मनविज्ञप्ति' हे सहावं प्रकरण (ओ. ४०१ - ४३१) हे फार महत्त्वाचं असून त्यात हे आत्मज्ञान प्राप्त करण्यासाठी मनाला कोणतं वळण लावावं नि ते कसं लावावं, ते सांगून मुंतोजींनी साधकांना परमार्थाची वाट कशी चोखाळावी या-विषयीच्या स्वानुभूतीच्या जणू पाऊलखुणाच दाखविल्या आहेत. त्यांत त्यांनी मनोनिग्रहाचं महत्त्व तर विशद केलंच आहे पण अनेक उदात्त जीवनादर्श नि सुसंस्कार तसंच सद्गुण यांचंही वर्णन केलं असल्यानं हा ग्रंथ केवळ पारलौकिक तत्त्वविवेचनाच्या पातळीवर न राहता प्रत्यक्ष आदर्श, उदात्त जीवनमूल्याधारे लौकिक जीवन कसं जगावं, याचा जणू वस्तुपाठ देतो.

## मंगलाचरण

अन्य मुसलमान मराठी संतकवींप्रमाणंच मुंतोजीदेखील हिंदू देवतांना मंगलाचरणात वंदन करतात पण त्याचबरोबर स्वतःच्या इस्लामधर्माला अभिप्रेत असलेली निर्गुण, निराकार ईश्वराची संकल्पना लगेच तिथं मांडतात किंवा तिचा उल्लेख करून ग्रंथात तिचं आवर्जून विवरण करतात.

'प्रकाशदीपा'तील 'मंगलचरण असं आहे –

'श्रीगणेशायनमः
श्रीमद् गुरवे नमः
श्रीरामचंद्राय नमः ।।

श्रीपुराणपुरुषोत्तमा । तुं सच्चिदानंद रामा ।
परात्पर परमात्मा । आदिपुरुषा ।। १ ।।
तुजपासाय सकळ । गणेश शारदा कविकुळ ।
गुरु - शिष्य सकळ । चातुर्य जाले ।। २ ।।'

सूफी संप्रदायातही गुरु-शिष्य -परंपरेचं फार माहात्म्य आहे. गुरूबद्दल म्हणजे सूफी संप्रदायातील 'पीर'यांच्याबद्दल-आदर व्यक्त करण्याचं (भारतीय परंपरेप्रमाणं) सूफीतही हेच कारण आहे.

## निर्गुण ईश्वर-संकल्पना आणि विश्वनिर्मिती

मुंतोजींनी ही संकल्पना आपल्या ग्रंथात जागोजाग कशी व्यक्त केली आहे, ते पाहा. दुसऱ्याच प्रकरणात प्रारंभी ते म्हणतात –

'माया उपाधिवेगळा ।। जो निःप्रपंच निर्मळा ।।
तो परमपुरुष केवळा ।। शुद्ध तत्पदार्थ ।। ३२ ।।'

'परमपुरुष', 'केवळ', 'निःप्रपंच,' 'मायाउपाधिवेगळा', 'निर्मळ' या संज्ञा काय सुचवितात ?

'देहीं असोनि देहातीतता' हा विचार त्यांनी 'लिंगदेह-निरसन' या दुसऱ्या प्रकरणात मांडला आहे. (ओवी क्र. ८१).

जीवात्म्यात असलेल्या निराकार ईश्वरतत्त्वाचा बोध करून घेऊन स्वतःचं खरं स्वरूप ओळखायला हवं, हा 'प्रकाशदीपा'– म्हणजे खऱ्या अर्थानं आत्मप्रकाशदीपाचा हेतु आहे-

'तूं निराकार स्वरूप । शुन्यासारिखे तुझे रूप ।
हे साकार सांडुनिया आप । पाहे आपण' ।। १०८ ।।

मुंतोजींची निर्गुण कल्पना किती स्पष्ट, स्वच्छ, तर्कसंगत आहे, ते पुढील ओवीवरून लक्षात येईल. भारतीय (आस्तिक) दर्शन नि इस्लामदर्शन यांच्या ईश्वर-संकल्पनंतील साम्य यावरून सहज लक्षात येईल –

'तूं निराकार निराभास जे । निराकार स्वयंप्रकाश जे ।
तुं निशचल निरालंब । अविनाशी जें परमस्वरूप तुं' ।। २३७ ।।

हे ईश्वरतत्त्वच संपूर्ण विश्वात नांदत असतं, तेच विश्वातील चैतन्य होय व ते सर्वांत-सर्व प्राणिमात्रांत-असतं, ईश्वरामुळंच आपणा सर्वांना अस्तित्व आहे, तोच विश्वनिर्माता, विश्वाचा पालनकर्ता व संहारकर्ता आहे. (ओ. ६) या विचारसरणीतील अन्तःसूत्र भारतीय आस्तिक दर्शनांत जसं जाणवतं तसंच पवित्र कुराणातही जाणवतं. हे साम्य मुंतोजींना विशेष भावलं असावं. 'आदिईश्वर हाच 'सृष्टिकर्ता' आहे, (ओ. ३२७) हा विचारही भारतीय (आस्तिक) दर्शनांप्रमाणंच पवित्र कुराण आणि बायबलच्या 'ओल्ड टेस्टामेंट' ('जुन्या करारा') मध्ये आहे. मुंतोजींनी इथं विश्वचैतन्य आणि जीवचैतन्य यांचं नातं उलगडलं आहे, ईश्वरतत्त्व हे 'पूर्ण चैतन्य' आहे, या सिद्धान्ताचं प्रतिपादनही केलं आहे. इथं 'चिद्विलासाच्या सिद्धान्ता'चं सहजच स्मरण होतं –

'तु प्रत्यकू चैतन्यात्मा । तो पूर्ण चैतन्य परमात्मा ।
दोहि येकपणें होय ब्रह्म । निर्गुण निरामय जे' ।। ३३४ ।।

## ईश्वर-जीव-अद्वैत

हा विचार मुंतोजींच्या सवंच लेखनात आढळतो कारण ते एकात्मतेचे पुरस्कर्ते आहेत. समानतेचे ही पुरस्कर्ते आहेत. चातुर्वर्ण्यव्यवस्थेतील विषमता त्यांना जाणवत असल्यानं ती अमान्य करण्यात त्यांना संकोच वाटत नाही. इथंही त्यांच्या मनातील इस्लामधर्मातील समानता प्रकट होण्यासाठी धडपडत असावी, असं वाटतं, नाही तर–

'शुद्र, वैश्य, क्षेत्रि, ब्राह्मण । हा देहाचाचि गुण ।
तुज नाहिं जातिवर्ण । यासि तू भुलो नको' ।। ६५ ।।

असं त्यांनी ठासून म्हटलं नसतं.

हे 'जाणणं' म्हणजे 'ज्ञान' असून 'न जाणणं' हे 'अज्ञान' आहे. परमात्मा आणि आपण कुणीच त्यावेगळे नाही, हे 'निजरूप' आपण जाणायला हवं, असं मुंतोजी म्हणतात-

'जाणणे ते ज्ञान । नेणणे ते अज्ञान ।
जाणणे ते तुं चैतन्य । निजरूप' ।। १६७ ।।

पाण्यावर ज्याप्रमाणं शेवाळ (मुंतोजींच्या ग्रामीण शब्दांत 'बाबुळी' ) येतं, त्याचप्रमाणं आपल्या मनावर अज्ञानाचं सावट येतं. ते काढून टाकलं की स्वच्छ निर्मळ जल दिसतं, शुद्ध ज्ञानाची प्रचीती येते. ती यावी, हाच मुंतोजींच्या 'प्रकाशदीप'– निर्मितीचा हेतू आहे. 'आप आपणातें गंवसिले' (ओ. २१५) ही स्थिती अशा प्रकारे, साधनेनं प्रत्येकाला प्राप्त करता येईल. मग आपली अवस्था जीवनमुक्तासारखी होईल-

'अज्ञानावेगळा जाला । तो जीवनमुक्त बोलिला ।। १८६ ।।

असं म्हणून पुढं सूर्याच्या प्रतिमेच्या साहाय्यानं मुंतोजी हा विचार किती मार्मिकपणे व प्रत्ययकारी रीतीनं व्यक्त करतात, ते पाहा –

'आपुल्या प्रकाशे आपणासि । सूर्य दावी सूर्यासि ।।
तैसें अपुलिये प्रकाशि । देखत तुझा तुं ।। २३२ ।।'

'मी हें सकळ' (ओ - २२३) अशी विश्वात्मकतेची प्रचीतीही यामुळं आपल्याला येते, हा या आत्मज्ञानप्राप्तीचा केवढा मोठा लाभ !

## मुंतोजींचं जीवन - चिंतन : प्रबोधनकाराची भूमिका

'प्रकाशदीप' या ग्रंथावरून जसं पंचीकरणविषयक तत्त्वचिंतन केलं आहे तसंच जनलोकांना हितोपदेश करताना जीवनचिंतनही केलं आहे. हे करताना काही धर्मोपदेशकांनी समाजाला योग्य मार्गदर्शन केलं नाही, धर्माचा चुकीचा अर्थ लावला व 'विपरीत' ज्ञानाचा बडिवार माजविला, त्याचं 'पाखांडखंडन'ही केलं आहे. या ग्रंथातील 'मनविज्ञप्ति' हे सहावं प्रकरण या दृष्टीनं फार महत्त्वाचं आहे.

चौऱ्यांयशी लक्ष योनींत पुन:पुन्हा जन्म घेण्याऐवजी याच जन्मी आपल्याला जो नरदेह प्राप्त झाला आहे, त्याचा सदुपयोग केल्यानं जीवनाचं सार्थक होतं, असं मुंतोजी म्हणतात.

'नरदेही तेचि ईश्वर मानि' (ओ-४०३) असं म्हणून मुंतोजी सर्वप्रथम सर्व प्राणिमात्रांविषयी आपल्या मनांत समतेचा व दयेचा भाव असावा, या विचारावर भर देतात-

'दयाभूत अंत:कर्णि । समान जनि सर्वत्र ।।' (ओ. ४०३)

केवळ मोठेमोठे ग्रंथ वाचून नि टिळे-टोप्या-माळा धारण करून, पोटीं दया तिळमात्र नसेल तर त्याचा काही उपयोग नाही, असा परखड नि कठोर प्रहार मुंतोजी तथाकथित धर्ममार्तंडांवर करतात-,

'पुस्तकें वाचि त्याचे । टिळा, टोपि, माळा कंठी ।
दया तिळमात्र नसे पोटीं । ते ज्ञानगोष्टी पाखंडीची ।। ४०४ ।।
'.... त्यासी सांगे ब्रह्मज्ञान । आपुले गेलें नसे अज्ञान ।
जैसें विषाते सेउन । अमृतपान म्हणतसे ।। ४०६ ।।
.... येणे सर्वही गेले व्यर्थ । स्वार्थ बुडविला, विकिला परमार्थ ।
यालागि पुस्तकिचा अर्थ । मुखिच यथार्थ वाचिता ।। ४०८ ।।'

सर्वांविषयी दयाबुद्धी बाळगावी पण मनात गर्व नसावा, 'सर्वत्र भाव समान दृष्टी' असावी (ओ. ४११) हा विचार पुढं नेताना आपल्याला राव व रंक दोन्ही सारखेच वाटायला हवेत, असं मुंतोजी म्हणतात. गायी वेगवेगळ्या रंगांच्या असल्या तरी त्यांचं दूध सारखंच असत नाही का ? असा प्रश्नही ते आपल्याला विचारतात. (ओ. ४१२)

हा 'मनोबोध' करीत असताना मुंतोजींनी सत्संग-महिमा, कुसंगतीचा त्याग, शांती- क्षमा यांचं महत्त्व, भजानाचं नि भक्तिमार्गाचं महत्त्व इ. विषयी विवरण केलं असून त्यातून त्यांना अभिप्रेत असलेलं जीवनादर्श प्रकट झाले आहेत.

साधना करताना काही शंका आल्यास 'ज्ञानेश्वरी'सारख्या ग्रंथाचं अवलोकन / वाचन करावं, असं आवाहन या प्रकरणाच्या शेवटी म्हणजे ग्रंथ-समाप्तीच्या वेळी मुंतोजींनी आवर्जून केलं आहे. 'मना विनंति परिसिजे' असं त्यांचं आवाहन आहे. या सर्व विवेचनातून मुंतोजींमधील संताचं जसं दर्शन घडतं त्याचप्रमाणं समाज-प्रबोधनकाराचंही दर्शन घडतं. हा प्रबोधनकार उदात्त, न्याय्य, समताधिष्ठित मूल्यांचा जसा पुरस्कर्ता आहे तसाच अन्याय, विषमता, धर्माचा व्यापार यांच्यावर, तथाकथित 'धार्मिकां'वर व बुवाबाजीवर कठोर प्रहार करणाराही आहे.

## (२) सिद्धसंकेत

मुंतोजींच्या या ग्रंथाची छायाप्रत मला उपलब्ध होऊ शकली नाही. तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयात त्याच्या दोन प्रती (क्र. ५८९) असल्याचा निर्देश डॉ. जुल्फी शेख यांनी केला आहे.[१२] मी या संस्थेशी पत्रव्यवहार केला पण मला त्याची प्रत मिळू शकली नाही. डॉ. सौ. शेख यांच्याकडे मुंतोजींच्या ग्रंथाच्या स्वतः नकललेल्या प्रती असल्याचं त्यांनी [१३] नमूद केलं आहे. मला त्यांनी या नकललेल्या प्रतींच्या छायाप्रती द्याव्यात व त्यासाठी येणारा खर्च मी देईन असं दोन-तीन वेळा कळविलं होतं पण त्यांनी या पत्रांना उत्तर न दिल्यानं मला 'सिद्धसंकेता'ची छायाप्रत मिळू शकली नाही. तरीही मी धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळातून या ग्रंथांच्या 'विहंगममार्ग' या महत्त्वाच्या प्रकरणाची छायाप्रत स्वतः जाऊन मिळविली. राजवाडे संशोधन मंडळाच्या मराठी हस्तलिखित ग्रंथांच्या व दुर्मिळ ग्रंथांच्या सूचीत याचा निर्देश पृ. ४६ वर असा केला आहे –

'क्र. ४३४ : वे १७६ (४३३) संकेतु-प्रबंध, विहंगममार्ग, आकार - ८।।" x ४". पत्रे -५. त्रुटित' याच्याचवर याच प्रकरणाच्या आणखी एका प्रतीचा उल्लेख केला आहे, ती मला मिळाली नाही – 'क्र. ४३४ : वे १७६ (४३२) विहंगम मार्ग, मीनमार्ग, कर्ता मृत्युंजय, बाडलेखक - श्रीधर आनंद अयाचित, आकार - ८ ।।" x ६ ।।". पत्रे १८.

काल शके १८१७ संकेत-प्रबंधु'.

धुळ्याच्या राजवाडे सं. मंडळाचे प्रमुख व माझे स्नेही डॉ. मु. ब. शहा यांचे या सहकार्याबद्दल मी मनःपूर्वक आभार मानतो.

'सिद्धसंकेत' विषयक विवेचन मी डॉ. सौ. शेख यांच्या 'मृत्युंजय' या ग्रंथातील माहितीच्या व मला मिळालेल्या व वर उल्लेखिलेल्या 'विहंगम-मार्गा' च्या छायाप्रतीच्या आधारे करीत आहे. डॉ. सौ. शेख यांच्या प्रकाशित ग्रंथाचाही मी साभार उल्लेख करतो.

हा ग्रंथ राम-जानकी-संवादात्मक आहे. गुरु-शिष्य-संवादात जशी भूमिका असते तशीच इथंही आहे. मला उपलब्ध झालेल्या 'विहंगममार्गा'च्या प्रतीवरून असं वाटतं की, संस्कृत श्लोक

आणि त्यांचं मराठीत विवरण, असं या रचनेचं स्वरूप असावं पण असा उल्लेख डॉ. सौ. शेख करीत नाहीत. 'हा पद्मपुराणाचा अनुवाद' आहे, असं मुंतोजींनी आपल्या ग्रंथाची महती वर्णन करताना सांगितलं असल्याचा निर्देश त्यांनी [१४] केला आहे. पण संस्कृत श्लोक उद्धृत करून मग त्याचं विवरण वा त्यावर भाष्य केल्याचा उल्लेख त्या करीत नाहीत. 'विहंगम-मार्गा'च्या मला उपलब्ध झालेल्या प्रतीवरून हा समश्लोकी अनुवाद नसून 'श्लोक व त्यावरील मराठी भाष्य' असं त्याचं स्वरूप असावं, असं म्हणता येतं.

'सिद्धसंकेता'चा प्रतिपाद्य विषयही मुंतोजींच्या अन्य रचनांप्रमाणं जीवाचा उद्धार, 'स्व'रूपाचं ज्ञान (आत्मज्ञान) ते प्राप्त करण्याचे विविध, विशेषतः सिद्ध पुरुषांनी व योग्यांनी स्वीकारलेले मार्ग व त्यांची परमात्म्याशी एकरूपतेनं 'समाधी'त झालेली फलश्रुती असा आहे. त्यांच्या अन्य रचनांप्रमाणं त्यांनी या ग्रंथातही अद्वैतमतप्रतिपादन केलं आहे.

या ग्रंथाची विभागणी नऊ प्रकरणांत केली आहे, त्यांतील सातव्या प्रकरणाची फारशी माहिती डॉ. सौ. शेख देत नाहीत पण ते पंचीकरण असावं, असं त्यांना वाटतं. वस्तुतः 'अविध पंचीकरण' ही कशी स्वतंत्र व परिभाषाकोशविषयक रचना आहे, हे मी पुढं साधार स्पष्ट केलंच आहे. ती रचना हे या ग्रंथाचं सातवं प्रकरण होऊच शकत नाही. आणि पंचीकरणाचा आणखी वेगळा विचार मुंतोजींनी या ग्रंथात केलाच असेल तर तो इतक्या उशीरा-म्हणजे ग्रंथसमाप्तीपूर्वी दोन प्रकरणांच्या आधी आला असणं एकूण विषयाच्या मांडणीच्या दृष्टीनं स्वाभाविक वा तर्कसंगत वाटत नाही. त्याचप्रमाणं हा कोश अज्ञानसिद्धांच्या इस्लाम/सूफी दर्शनविषयक 'पृच्छे'तून निर्माण झाला आहे.

ही रचना एखाद्या ग्रंथाचं प्रकरण नसून स्वतंत्र कोश आहे.

## ग्रंथ स्वरूप

डॉ. सौ. शेख यांनी निर्देशिल्याप्रमाणं या रचनेचं स्वरूप प्रकरणशः असं आहे.-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रकरण | १ | - | पीपिलिकामार्ग | ओवीसंख्या | १८० |
| प्रकरण | २ | - | विहंगममार्ग | ओवीसंख्या | १२० |
| प्रकरण | ३ | - | मर्कटमार्ग | ओवीसंख्या | २०१ |
| प्रकरण | ४ | - | मनुष्यमार्ग | ओवीसंख्या | ११० |
| प्रकरण | ५ | - | प्रपंचनिरसन | ओवीसंख्या | १७५ |
| प्रकरण | ६ | - | मतभेद-खंडन | ओवीसंख्या | २३० |
| प्रकरण | ७ | - | ? | ओवीसंख्या | ? |
| प्रकरण | ८ | - | प्रारब्धबोधसंग्रहणी | ओवीसंख्या | १७५ |
| प्रकरण | ९ | - | उभयसमाधि | ओवीसंख्या | २३४ |

'ज्ञानेश्वरी'प्रमाणंच या ग्रंथातही पहिल्या प्रकरणात गणेशरूपक असून त्याचं 'ज्ञानेश्वरी' तील गणेशरूपकाशी बरंच साम्य आहे. प्रत्येकानं आपापलं कर्म, आपापला व्यवसाय करावा (कारण ती समाजातील विविध कार्यांची विभागणी आहे), असं मुंतोजी महणतात. त्यामुळं त्यांना कर्माधिष्ठित समाजव्यवस्था मान्य होती, हे त्यांच्या पुढील विधानावरून स्वीकारावं लागतं. [१७]

'म्हणोनि ब्राह्मण ब्रह्म कीजे ।

क्षत्रिये रणी जितिजे ।

वैश्ये वाणिज्य कीजे ।

कृषी शुद्रे ।। (सिद्धसंकेत, प्र. ३, ओ. १६).

तथापि त्यातील उच्चनीचता मान्य होती असं म्हणता येणार नाही कारण त्यांनीच 'सिद्धसंकेत' ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणाच्या बाराव्या-तेराव्या ओव्यांत म्हटल्याप्रमाणे –

'या चौ चा अनंत प्रकार ।

नाना वर्ण लोकाकार ।। १२ ।।

ईश्वर चळे ऐसी यातिस्वभाव ।

मग बहुविध यापासाव ।

जैसे एकी देहाचे अवयव ।

परि भिन्न राहती' ।।१३।।

विविध अवयवांनी मिळून एक देह सिद्ध होतो, त्याप्रमाणं विविध वर्ण-जातींचे लोक मिळून एकच समाज सिद्ध होतो, ही त्यांची समाजधारणेची व सामाजिक एकात्मतेची भूमिकाही समजून घ्यायला हवी. शिवाय या सर्व जातिवर्णांच्या लोकांत एक परमात्मा वसलेला असतो, ही त्यांची आध्यात्मिक समतेची भूमिका तर त्यांच्या अन्य सर्व रचनांमध्येही प्रतिबिम्बित झाली आहे. त्यामुळं ते चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते किंवा तिच्यातील विषमता त्यांना मान्य होती, असं कसं म्हणता येईल ? यासाठी त्यांच्या अन्य ग्रंथांतले या संदर्भातील किती तरी दाखले देता येतील. अद्वैतमत नि चिद्विलासवाद मानणारे मुंतोजी 'सिद्धसंकेत' याच ग्रंथात आपली समतावादी भूमिका कशी बदलतील ? 'अद्वैतप्रकाशा'तील स्वतः डॉ. सौ. शेख यांनी दिलेलं अवतरणच मी इथं पुन्हा उद्धृत करतो, त्यातील शेवटचा 'ब्रह्म सर्वत्रचि' हा विचार एकात्मतेच्या व समतेच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. [१८]

'जैसे आपुलेंचि प्रतिबिंब भासे ।
त्याचे नाव दिसत ऐसें ।
त्याशि देखणेपण जे असे ।
जैसे आपणचि होय **अभिन्नपण** ।।
तैसे वस्तूसी त्रिपुटी होणे ।
दृश्य-दृष्टी- द्रष्टत्व जाणे ।
**ब्रह्म सर्वत्रचि**' ।। (-अद्वैतप्रकाश, प्र. २, ओ. ६०).
(ठळक टाईप माझा)

मुंतोजींच्या अन्य रचनांचा विचार करता 'सिद्धसंकेता'चं वेगळेपण निश्चितपणे जाणवतं. त्यातून मुंतोजींचा योगशास्त्राचा व्यासंगही प्रतीत होतो. साधनेच्या विविध मार्गांचं दर्शन घडवून 'समाधी'च्या अत्युच्च अवस्थेप्रत कसं जाता येईल, याचं मार्गदर्शन मुंतोजींनी या ग्रंथात केलं आहे. त्यात अद्वैतमताचं सूत्र, अन्य ग्रंथांप्रमाणंच आढळतं व अन्य प्रतिपादनातही साम्य आढळतं. शेख महंमदांसारख्या अन्य मुसलमान सूफी संतांना जसं योगशास्त्राचं आकर्षण होतं व त्यांनी 'योगसंग्रामा'सारख्या ग्रंथाची रचना केली, त्याचप्रमाणं मुंतोजींनीही योगाच्या साहाय्यानं समाधीपर्यंत जाण्याचा मार्ग 'सिद्धसंकेत' या ग्रंथात समरसून प्रतिपादिला आहे. या काव्याची शैली प्रासादिक व रसाळ असून तिच्यातील चिंतनगर्भताही लक्षणीय आहे. तिचाच ठसा आपल्या मनावर अधिक उमटतो.

'प्रकाशदीप,' 'सिद्धसंकेत' आणि 'योगसंग्राम' या तीन ग्रंथांचा साकल्यानं विचार करता त्यांच्यामधील व त्यांच्या कर्त्यांमधील काही अन्तःसूत्रं जाणवतात. शेख महंमद हे सूफींच्या कादरी शाखेतले तर 'मुंतोजी ब्रह्मणी' हे 'मुर्तजा कादरी' म्हणजे सूफींच्या त्याच शाखेतले. या तिन्ही ग्रंथांवर काही प्रमाणात 'ज्ञानेश्वरी'चा प्रभाव आहे.

'प्रकाशदीपा'च्या शेवटी मुंतोजींनी केलेलं ज्ञानेश्वरी-माहात्म्य-कथन, 'सिद्धसंकेता'तील व 'ज्ञानेश्वरी' तील गणेशरूपकातील साम्य, 'ज्ञानेश्वरी'तील दहाव्या अध्यायातील योगदुर्गाचं रूपक व 'योगसंग्रामा'तील रूपक या सर्वांतील साम्य व अन्तःसूत्रं ही संतमनं कशी एकरूप झाली होती व त्यात धर्माधर्मांचा अडसर कसा आला नाही, या महत्त्वाच्या बाबींकडे जो संकेत नि अंगुलिनिर्देश करतात, तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एकात्मतेच्या वाटचालीस पाथेयासारखाच उपकारक ठरलेला नाही काय ?

## (३) 'हिंदू - इस्लाम दर्शन'-परिभाषा-कोश

'अविध पंचीकरण' किंवा 'पंचीकरण प्रमेय' या नावाच्या एका रचनेचा उल्लेख मुंतोजींच्या नावावर केला जातो तथापि हे नाव या रचनेस अन्वर्थक नाही. तिच्यात या दोन्ही धर्मांतील केवळ पंचीकरणविषयक-परिभाषाच दिलेली नाही तर त्यांतील अन्य संज्ञा व संकल्पनाही विशद केल्या आहेत. 'अविध' या शब्दानं जशा या रचनेला काही मर्यादा पडतात त्याचप्रमाणं 'पंचीकरण' या संज्ञेनेही पडतात. यासाठी त्या रचनेचा मूळातूनच विचार व्हायला हवा, असं मला वाटतं. आणि म्हणूनच तो इथं काहीशा विस्तारानं केला आहे. या विचारातील बराचसा-जवळपास दोन तृतीयांश पेक्षा अधिक-भाग अभ्यासकांसमोर आला नाही म्हणून तो इथं हेतुतःच दिला आहे. त्यामुळं मुंतोजी व त्यांचं साहित्य याविषयीच्या चिंतनाला एक वेगळी दिशा मिळेल, असा विश्वास वाटतो.

संतकवी मुंतोजी बामणी ऊर्फ मृत्युंजय यांची ही अत्यंत दुर्लक्षित रचना होय पण 'दुर्लक्षित' हा शब्दही तिच्यासाठी समर्पक वाटत नाही कारण तिची नोंद अभ्यासकांनी वा मराठी वाङमये-तिहासकारांनी अगदीच घेतली नाही असं नाही. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी आपल्या 'एकात्मतेचे शिल्पकार' (म्हणजेच 'पूर्वाश्रमी'च्या 'मुसलमान मराठी संतकवी') या ग्रंथात या रचनेविषयी अगदी त्रोटक का होईना उल्लेख केला आहे. महाराष्ट्र-सारस्वत, महाराष्ट्र साहित्य परिषदेनं प्रसिद्ध केलेला मराठी वाङमयाचा इतिहास (खंड २, अनुक्रमे पृ. २४९ व ६१७) यांत सदर पंचीकरणविषयक उल्लेख आढळतात पण हे उल्लेख केवळ 'जाता-जाता' केलेले उल्लेख वाटतात. ज्यांनी मुंतोजींविषयी प्रबंध लिहिला, त्या डॉ. सौ. जुल्फी शेख यांच्याकडून याविषयी विस्तारपूर्वक विवेचन अपेक्षिलं असतं तर ते वावगं ठरलं नसतं पण त्यांनी यासाठी आपल्या 'मृत्युंजय' या पुस्तकात केवळ साडेपाच पानं खर्ची टाकली आहेत. [१७] त्यातही त्यांनी अनेक चुकीची विधानं केल्यामुळं या ग्रंथाचं स्वरूप स्पष्ट होण्याऐवजी वैचारिक गोंधळच वाढला आहे. यात डॉ. सौ. शेख यांची चूक नाही कारण ही रचनाच त्यांना धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिराला प्रत्यक्ष भेट देऊन व शोध करुनही उपलब्ध झाली नाही, असं त्यांचं म्हणणं आहे. तिथंच नाही तर तंजावर, नांदेड, गुलबर्गा, आळंद, नारायणपूर, बसवकल्याण, लातूर या ठिकाणीही ती त्यांना उपलब्ध झाली नसल्याचं त्यांनी आपल्या पुस्तकाच्या ४९ व्या पृष्ठावर नोंदविलं आहे. मूळ रचनाच पाहायला न मिळाल्यामुळं त्यांनी या संदर्भात केलेल्या काही विधानांत गफलती होणं व त्यांनी केलेली काही अनुमानं चुकणं स्वाभाविक होतं, याबद्दल त्यांना दोष द्यावा, असं मला वाटत नाही. माझ्या एक विद्यार्थिनी डॉ. प्रा. सौ. संगीता देशमुख यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली अज्ञानसिद्धांविषयी व त्यांच्या साहित्याविषयी संशोधन केलं. त्यांना मात्र धुळ्याच्या समर्थवाग्देवता मंदिरातूनच मुंतोजींच्या रचनेची प्रत उपलब्ध झाली व ती श्री. दा. शं. जोशी यांनी नकलून पाठविली. ही प्रत डॉ. सौ. देशमुख यांनी मलाही उपलब्ध करून दिल्यामुळे मला याविषयी विचार करता आला याचा साभार उल्लेख करणं मला आवश्यक वाटतं. या नकललेल्या प्रतीचा सूक्ष्म अभ्यास केल्यावर मुंतोजींविषयी व त्यांच्या साहित्याविषयी विचार करण्यास एक वेगळंच परिमाण लाभलं, प्रमाण लाभलं आणि आधारही लाभला.

अज्ञानसिद्ध हे नागेशसाम्प्रदायिक संतकवी आहेत. या संप्रदायाविषयीचं मूलभूत संशोधन १९६०-६१ साली सर्वप्रथम मी केलं असून 'नागेशसंप्रदाय' ही या संप्रदायविषयक पुस्तिका तसेच 'वरदनागेश' या अज्ञानसिद्धविरचित नागेशसंप्रदायाचं तत्त्वज्ञान विशद करणाऱ्या भाष्यग्रंथाचं संपादनही प्रथम मीच केलं आहे. संतकवी आलमखान हे नागेशसंप्रदायाचे असल्यानं व त्यांचा 'संतांची खूण संतची जाणती' हा अभंगही याच रचनेसोबत समर्थ वाग्देवता मंदिरात उपलब्ध झाल्यानं अज्ञानसिद्ध, मुंतोजी आणि आलमखान या त्रयीच्या संदर्भात नवा विचार करण्यासाठी महत्त्वपूर्ण सामुग्री उपलब्ध झाली, याचा मला विशेष आनंद वाटतो. नागेशसंप्रदाय व मुंतोजी यांच्या अन्योन्यसंबंधांवरही त्यामुळं प्रकाश पडतो.

## नकललेल्या धुळे-प्रतीचं विवरण

या प्रतीची एकूण दहा (१०) पृष्ठं आहेत. त्यांत दोन स्तम्भांत लेखन केलं असून पहिल्या स्तंभावर (पहिल्या पृष्ठात) 'पंचिकरण प्रमय' आणि दुसऱ्या स्तंभावर 'अविंध भाषा' असं शीर्षक आहे. पहिल्या स्तंभावर 'ॐ राम' असं वंदन केलं असून दुसऱ्या स्तम्भावर 'बिस्मिल्ला' असा उल्लेख आहे. त्यानंतर पहिल्या स्तम्भावर 'चहु देहाचा उकला' असा उल्लेख असून दुसऱ्या स्तम्भावर 'चारो वजूद का खुलासा' असा उल्लेख आहे. त्यांचा एकुलता एक संदर्भ डॉ. ढेरे यांनी दिला व त्याचाच पुनरुल्लेख डॉ. जुल्फी शेख यांनी व काही वाङ्मयेतिहासकारांनी केला. हा उल्लेख असा- (नकललेल्या प्रतीनुसार)

| पंचीकरण प्रमेय | अविंध भाषा |
|---|---|
| ॐ राम | बिस्मिल्ला |
| चहु देहाचा उकला | चारो वजूद का खुलासा |
| १ स्थूळदेह १ | १ वाजबुल वजूद |
| १ लिंगदेह २ | १ ममकिनल वजूद |
| १ कारणदेह ३ | १ ममतनल वजूद |
| १ महाकारणदेह ४ | १ अरिफल वजूद |
| ४ | ४ |

पण त्यानंतरचे तपशील कुणी दिले नाहीत.वरील तपशीलाप्रमाणंच हे सारे तपशीलही भारतीय दर्शन, इस्लामदर्शन व सूफीमताच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहेत. उदा. चार अवस्थांचं हे विवरण पाहा-

| आवच्छा (अवस्था) चारी ४ | हाल ४ |
|---|---|
| १ जाग्रती १ | १ बेदारी |
| १ स्वप्नावस्छा २ | १ हाल खाब |
| १ सुषुप्ती ३ | ३ बेहोसी |
| १ तुर्मावस्छा ४ | ४ हाल होसी |
| ४ | ४ |

## चतुष्ट्याविवरण

यानंतर पुढील चतुषट्यांच्या भारतीय संज्ञा देऊन त्यापुढं इस्लामी संज्ञा दिल्या आहेत. (सोयीसाठी प्रथम भारतीय संज्ञा व कंसात तिचा पर्याय अरबी / फार्सी / दक्खिनी भाषेत दिला आहे.)

४. 'अभिमानी' - विश्व (जबराईल), तैजस (इसराफिल) प्राज्ञ (इजराइल), प्रत्यागात्मा (निकाइल)

४ स्थान (स्थान) - नेत्र (चष्म), कंठ (हलक), हृदय (सीने), मूर्छिस्छान (सिरमकान)

४ भोग (भोग -इथं इस्लामी पर्याय न देता 'भोग' हाच शब्द दिला आहे.) : स्थूळभोग (वजुद भोग), स्वप्न (वाहमा), मूर्छना (जुलमात), स्वानंदभोग (खयाली भोग)

वेद ४ (कावाब) - ऋग्वेद (तौरेद), यजुर्वेद (ईंजिल), सामवेद (जंबूर), अथर्वणवेद (फुर्कान)

गुण ४ - रजोगुण (हिरसानी), सत्त्वगुण (जमाली), तमोगुण (जलाली), शुद्ध सत्व (कमाली).

मार्ग ४ - (राहा ४) - कर्ममार्ग (शरीयत), भक्तिमार्ग (तरिकत), वैराग्यमार्ग (हकीकत), ज्ञानमार्ग (मारिफत).

मातृका (मनासुत) -

अकार (दर्मलकुत), उकार (दर्जब रुताबित), मकार (बिनलाहत जर्वुत), अर्धमात्रा.

वाचा ४ - वैखरी (नलि मुख बयान बोले), मध्यमा (कलबी मनसे छे), पश्यंती (रुहा देखे, तमाशा देखे) परा (सिरिसवा बारवे)

खाणी (रोहा) अंडज (रोहा नाकी), जारज (रोहा जवाती) स्वेदज (रोहा संगी), उद्भिज (रोहा जिस्मी).

## पंचीकरण

चतुष्ट्यांनंतर 'पंचका'चं विवरण केलं आहे. त्यात प्रथम पंचमहाभूतांचा विचार केला आहे. पंचमहाभूतं हेच पंचीकरणाचं अधिष्ठान होय. त्यांचा तपशील असा -

'स्थूळदेह, पंचमहाभूतांचे पंचेवीस कळांचे' (वाजुबुल वजूद, पंज अनासिर, पंचीस कळाकें), पृथिवी (खाक), आप (आब), तेज (अतश), वायु (वाव), आकाश (हवा)

यानंतर 'हे पंचभूत साहवा आत्मा (यो पंज अनासिर छे चि जात)' असं म्हटलं असून आत्म्याचा महत्त्वपूर्ण उल्लेख केला आहे. त्यानंतरही पुढं पृ. ३ आणि ४ वर हे 'पंचकविवरण' चालू आहे. त्यात पृथ्विपंचक (खाकपंज), आपपंचक (आबपंज), तेजपंचक (अतश ५), वायुपंचक (वाव पंज), आकाशपंचक (हवा पंज) इ. चा तपशील दिला आहे, तो मूळ परिशिष्टातूनच पाहावा.

पुढं हा 'स्थूल देह' (सो यो वाजबुल वजूद) या शीर्षकाखाली त्याची वैशिष्ट्यं नमूद केली आहेत. ती भारतीय दर्शन व इस्लाम (तसेच सूफी) दर्शन यांच्या संदर्भात तुलना करण्यास उपयुक्त आहेत.-

| | |
|---|---|
| ''जागृती अवस्था | (हाले बेदारी), |
| विश्वाभिमानी | (मवकिल् जबराईल), |
| नेत्रस्थान | (चश्म मकान), |
| स्थूळ भोग | (वजूद भोग) |
| कर्ममार्ग | (राह शरियत) |
| राजोगुण | (खासीयत हिरसानी), |
| मात्रा आकार | (मंजिल नासुत), |
| ऋग्वेद | (किताब तौरेद), |
| वैखरी वाचा | (जिकीर जली), |
| वित्तेषणाबुद्धिविचार | (शाहादत मोहबत), |
| राहणे पिशाचगती | (मुकाम शैतानी), |
| क्रियाशक्ती | (नफस अमल)'', |

हा 'स्थूल देह' क्षर असून त्याचा चालक आत्मा हा अ-क्षर आहे, तोच ईश्वर आहे व तोच आपण आहोत, असं लक्षणीय विवरण मराठीत व दक्खिनीत केलं आहे -

| | |
|---|---|
| 'ऐस हे स्थूळ देह आकारासी | यैसा यो वाजबुल वजूद।। |
| आले परी नाशवंत | अकल किया।। सयो |
| | नुमा फना।। (नुफजा) |
| याचा चाळक तो आत्मा साक्षी | ईस्का शाहिद विनाषका |
| शाश्वत, तोचि ईश्वर, तोचि आपण | वो ही अल्ला।। वोही आप।। |
| द्वैतरहित | आप येक ही येक'' |

**लिंगदेह**

यानंतर 'लिंगदेहा' चं वर्णन पुन्हा दोन्ही भाषांत (म्हणजे मराठीत व दक्खिनीत) केलं आहे -

| | |
|---|---|
| 'लिंगदेह दुसरे, पंचेवीस | मोमकीनल वजूद दुजा पचिस |
| कळांचे।। | अनासिरो का।। |
| वासनेसि खेळे।। वासनेकरुन | वासना सु खेले।। वासना सुं |
| स्वर्गनिर्कासि येत-जात असे।। | बिहिश्त दोजख आवे - जावे।। |
| शुध्द वासना अंत:करण | खुब वासना दिल्ल |
| होय तरी।। | होवे तो।। |
| श्रीगुरुचे पाउले दृढ धरी।। | पीर के कदम पकडे।। |
| तरि ठिकाणासि पावे।। | वो विशाल कु।। अंवडे।। |

यात 'अंत:करणपंचक (दिल्ल पंज)' 'वायोपंचक (कादिम पंज)' 'ज्ञानेंद्रिय-पंचक, कर्मेंद्रिय-पंचक व विषय-पंचक यांचा तपशील दिला आहे.

**सूक्ष्म देह**

त्यानंतर सूक्ष्म देह 'क्षर' व आत्मा 'अ-क्षर' असून परमात्मा अविनाश असल्याचं विवेचन आहे -

| | |
|---|---|
| ऐसें हे सूक्ष्म देह द (द्) श्याचा भोगी | यो नुमासिफत फना।। |
| याचा साक्षी तो | ईस्का शहिद बिना |
| आपण अविनाश परमेश्वर | सोबका आप अल्ला।। |
| आत्माराम | बिस्मिल्ला हिंरहिमा निरंहीम |

**कारणदेह**

यानंतर 'कारणदेह' ('ममतनल वजूद') पंचकाचा तपशील (मराठीत व दक्खिनीत) देऊन म्हटलं आहे -

| | |
|---|---|
| 'ऐसें कारणदेह जाणिजे | ऐसा ममतनल वजूद जानना।। |
| याचा साक्षी आत्माराम | ईस्का शहिद सा अवला |
| लोकोशणे निरालंबी राहणार।। | बिस्मिल्ला हिंरहिमा नीरंहीम'।। |

**महाकारणदेह**

पुढं 'महाकारणदेहा' (आरिफुल् वजुद) चा विचार येतो. तो अत्यंत महत्त्वाचा असल्यानं मूळाप्रमाणं उद्‌धृत करीत आहे -

| | |
|---|---|
| महाकारण देह | अरिफल वजूद |
| तुर्यावच्छा | हाल हुषारी |
| प्रत्यगात्मा अभिमानी | मवक्कल जबराइल |
| मूध्रिस्थान | मकान सर बुलंदे |
| आनंदा व भासभोग | खुशाल योग खासियत |
| अथर्वण वेद | किताब फुरकान |
| शुद्‌ध सत्त्वगुण | खासीयत कमालीयत |
| परावाचा | सिस्वारवे |
| ज्ञानमार्ग | राह मारिफत |
| सुप्लीनता भुमिका | मंजिले लाहत |
| बुद्‌धि गलित साक्षी | अकल आगाहा |
| निर्गुण मोक्षशण कैवल्यपद | शाहदत शादन |
| | ससूल हे मा ऐ मा |
| | मुकाम सफायंत |

या चारही अवस्था पार केल्यानंतर जो उरतो तो अविनाश परमात्मा, अशा आशयाचं विवरण वरीलप्रमाणं दोन्ही भाषांत केलं आहे, ते असं-

**(मराठी)** - 'हे चारी देह दृश्यादृश्य नाशवंत मिथ्या. या चारी देहास नाशवंत करुन । उरे तोचि अविनाश ऐसा चौ देहाचा विचार

आसे हे चारी देह मिळोन हे स्थूळदेह. हे च्यारी देह-बंधन जे।। येथें जीवासी बंधन जाले।। जे सुख-दुःख भोगणें जाले।। ज्याचे मन स्वरूपी मिळे, त्याचे बंधन तुटले. मोकळा जाला तोचि संसार-बंदीखानापासून सूटला' ।।

**(दक्खिनी)-**

'यो चारी वजूद नुमा।। जो नुमा फना कर पछाने।। ये चारो वजूदोंकु फना कर कर उबरे वोई बुक्का ।। आपे अल्ला ।। ऐसा चारो वजूद का खुलासा. ऐसा यो चारो वजूद मिलकर बाजुबुल वजूद येहि जानो अदबरशाना।। अ-हावाकु येही बंधन हवाल स्थो सुखदुख भोगना जिसकी अ-हवा जतसु मिले, उसका बंद खलास।'

या बंधनातून मुक्ती प्राप्त झाल्यानंतर आपण परमात्मस्वरूप कसे होतो, याचं वर्णन पुढील-प्रमाणं, (प्रथम मराठी स्तंभात नंतर दक्खिनी स्तंभात) केलं आहे -

| | |
|---|---|
| 'सर्वज्ञ।। सर्वसाक्षी।। | दाना।। बीनी |
| तेजोमय प्रकाश।। | नुर बका |
| तोचि आपण परमेश्वर।। | सोही आपे अल्ला।। |
| देहचतुष्टयाचा द्रष्टा तो | |
| पाचवा जाणिजे।। | |
| इति देह-चतुष्टय - विवरण।। | येहि चारो वजुदोका खुलासा' |

यानंतर मुंतोजींनी पुन्हा दोन स्तंभांमध्ये भारतीय दर्शन व इस्लाम / सूफी दर्शन यांच्या पारिभाषिक संज्ञा व त्यांचे पर्याय दिले आहेत. ते फार महत्त्वाचे आहेत. खरं तर ते मूळातुनच अभ्यासायला हवेत, यासाठी या मुंतोजीविषयक प्रकरणाला अविंध पंचीकरणाचं संपूर्ण परिशिष्टच जोडलं आहे. (अभ्यासक / संशोधक यांना मूळ प्रमाण उपलब्ध व्हावं, हा हे परिशिष्ट जोडण्यामागील हेतू आहे.)

या भागातील एका महत्त्वाच्या मुद्याकडे मला या अभ्यासकांचं लक्ष वेधायचं आहे. इस्लाम हा व्दैतमताधिष्ठित धर्म असल्यानं त्यात स्वामी -सेवक संबंध अभिप्रेत आहेत. त्यातील इस्लामी तत्त्वज्ञानात योजिल्या जाणा-या 'खुदा-बंदा' या संज्ञा 'ईश्वर-जीव' या संज्ञांना पर्याय म्हणून दिल्या आहेत व इस्लाम दर्शनातील अनेक संज्ञांचे पर्यायही दिले आहेत पण सूफी मताच्या 'आशक'-'माशुक' या संकल्पना / संज्ञा 'पूज्य पूजक ' यासारख्या पर्यायांनी विशद केल्या आहेत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे 'अहं ब्रह्मास्मि' हा इस्लामला मान्य नसलेला, पण सूफींना मान्य असलेला,

विचार परिशिष्ट पृ. ९ वर उल्लेखिला असून 'अव्दैत' संज्ञेचा 'तौहिद' हा पर्याय दिला आहे. खरं तर सूफींनी 'अन्हल् हक्' हा विचार 'अहं ब्रह्मास्मि' यासाठी पर्याय म्हणून योजिला आहे पण इथं 'हक' ही संज्ञा आढळली तरी 'अन्हल् हक्' आढळत नाही. असं असलं तरी परिशिष्ट पृ. ४ वर 'तोचि ईश्वर। तोचि आपण।' याचा खुलासा 'व्दैतरहित' याचा खुलासा 'वोही अला। वोही आप। आप यकही येक' असा केला आहे. 'व्दैतनिरशण' हा उल्लेख परिशिष्ट प. ९ वर असून 'आत्मा होणे' हा निर्देश अव्दैतसूचक आहे व अव्दैतमतसमर्थक आहे.

### या रचनेचं कर्तृत्व

प्रस्तुत रचनेच्या कर्तृत्वाविषयी साधार व सप्रमाण विवेचन करून तिच्या कर्त्याविषयी निर्णय घ्यायला हवा, असं मला वाटतं.

ही रचना नागेशसांप्रदायिक संत अज्ञानसिद्ध यांच्या सान्निध्यात केली असावी, असा डॉ. ढेरे यांनी तर्क केला असून तो बरोबर आहे असं दिसतं. याला प्रमाण म्हणजे या रचनेच्या धुळे - प्रतीच्या शेवटी पृ. १० वर केलेला पुढील महत्त्वाचा उल्लेख होय, 'इति मत्युंजय कु अज्ञानसिद्ध नागेश पुछाया हक्क।।' या 'दक्खिनी' उल्लेखातील 'मृत्युंजय कु' आणि 'अज्ञानसिद्ध नागेश पुछाया' हे दोन संदर्भ लक्षात घेण्याजोगे आहेत. पण कोण कुणाला विचारीत आहे, कोण उत्तर देत आहे व ते कोणत्या भाषेत देत आहे, हे समजून घ्यायला हवं. 'मृत्युंजय कु' म्हणजे मृत्युंजयांना. 'अज्ञानसिद्ध नागेश पुछाया' म्हणजे अज्ञानसिद्धांनी विचारलेल्या'. यात मी स्वतःच नागेशसंप्रदायाचा, अज्ञानिसिद्धांचा व त्यांच्या साहित्याचा अभ्यासक / संशोधक तसेच अज्ञानसिद्धविषयक प्रबंधाचा मार्गदर्शक असल्यानं एका गोष्टीचा निर्देश करीत आहे. अज्ञानसिद्धांनी अन्य प्रमुख संतकवींप्रमाणं मराठीबरोबरच काही दक्खिनी रचनाही केली आहे पण तिच्यात इस्लामदर्शनाचे तसेच सूफी मताचे विशिष्ट परिभाषिक शब्द व संज्ञा अशा प्रकारे आलेल्या नाहीत.प्रस्तुत रचनेत तर या अरबी - फार्सी-दक्खिनी पारिभाषिक संज्ञांचा जणू पूर ओसंडतो आहे. 'मारेफत,' 'अंबिया' (पैगंबर), नूर, नूर बका, फना, नफस, फुर्कान (फुक्रान), नफस लवामा (नफ्स लव्वामा), फुकरा, पीर, पैगंबरी, रूह, मुरीद, अ-हवा, आशक- माशुक, वजूद, माहित वजूद, अल्ला, हक, खुदा, बंदी, बिस्मिल्ला हिर्रहिमान निरंहीम, राह तरीकत, मोमकिनल वजूद, ममतनल वजूद, आरिफल वजूद, वाजबुल वजूद इ. इ.हे त्यातील काही वानगीदाखल शब्द व संज्ञा. यावरून मुंतोजी बामणी ऊर्फ मुर्तुजा कादरी यांची इस्लामदर्शन व सूफी मत यांच्या सखोल अध्ययनाची, आकलनाची व व्यासंगाची सहज कल्पना येते. त्याचप्रमाणं त्यांच्या भारतीय दर्शनाच्या अध्ययनाची व त्यातील पारंगततेची कल्पना या रचनेतील पहिल्या स्तम्भातील सामग्रीवरूनच येते.

वर मी या रचनेच्या शेवटी दिलेले एक दक्खिनी वाक्य उल्लेखिले आहे. त्याच्या अलीकडे -

'इति मृत्युंजय अज्ञानसिद्ध नागेश पृच्छा निश्चय संपूर्णमस्तु।।' असा संस्कृत भाषेतील निर्देश आहे. त्यावरूनही 'पृच्छा कुणी केली व उत्तर कुणी दिलं', ते स्पष्ट होतं. पृच्छा अज्ञानसिद्धांनी

केली असून 'उकला' आणि 'खुलासा' (हे दोन्ही शब्द मूळातलेच आहेत व ते डॉ. ढेरे यांनीही निर्देशिले आहेत) मृत्युंजय ऊर्फ मुंतोजी बामणी ऊर्फ मुर्तुजा कादरी यांनी केला आहे. मुंतोजींची भारतीय दर्शनातील पारंगतता त्यांच्या अन्य सर्वच रचनांवरून कुणाच्याही लक्षात येईल. इस्लामदर्शन व सूफी मत यांत या भारतीय संकल्पनासाठी कोणते पर्याय आहेत, त्याचप्रमाणं त्यांची दार्शनिक पृष्ठभूमी काय, याचं विशदीकरण करणारी ही मुंतोजींची अनन्यसाधरण रचना आहे. संस्कृत, मराठी, अरबी, फार्सी व दक्खिनी या भाषांतील त्यांची गती थक्क करून सोडणारी आहे, त्याचप्रमाणं ते मराठी मातीशी किती एकरूप झाले आहेत. याचीही साक्ष या रचनेवरून पटते. मुंतोजींनी (मृत्युंजयांनी) हा पारिभाषिक कोश अज्ञानसिद्ध नागेशांच्या सान्निध्यात सिद्ध केला असावा, या डॉ. ढेरे यांच्या उल्लेखावरून ते या रचनेचं कर्तृत्व मुंतोजींचंच आहे, हे ते अमान्य करीत नाहीत, हेही लक्षात घ्यायला हवं. अज्ञानसिद्धांनी मुंतोजीना इस्लाम दर्शनाविषयी वा सूफी मताविषयी का 'पृच्छा' करावी' का विचारावं, या कुतूहलाला वा जिज्ञासेलाही त्यांच्या नागेश संप्रदायाचा भक्कम संदर्भ व आधार आहे. मी यापूर्वीच नागेश संप्रदायाविषयी माझ्या 'नागेश संप्रदाय' या पुस्तिकेत जे विवरण केलं आहे, तिच्यात हा संप्रदाय अनेक धर्मांचा व पंथांचा समन्वय साधणारा 'समावेशक' संप्रदाय आहे, हे विशद केलंच आहे. त्याच्या अनुयायांत हिंदूंप्रमाणंच आलमखानांसारखे मुसलमान आणि मन्मथस्वामीसारखे अनेक वीरशैव धर्मीयही आहेत. (नागेशांना काही इस्लामधर्मीय नसीरुद्दीन चिराग देहलवीही मानतात.) अशा समन्वयवादी नागेशसंप्रदायाचे भाष्यकार अज्ञानसिद्ध यांच्या इस्लाम / सूफी दर्शन - जिज्ञासेचं बीज इथं कुठं तरी गवसतं.

डॉ. जुल्फी शेख यांनी मुंतोजींच्या भाषाज्ञानाविषयी त्याचप्रमाणं त्यांच्या इस्लाम / सूफी दर्शनांच्या ज्ञानविषयी जी विधानं केली आहेत ती अज्ञानमूलक असून अत्यंत दुर्दैवी आहेत, एवढंच मी म्हणेन. ती मूळातूनच उद्धृत करीत आहे:

'ढेरेंनी दिलेल्या पंचीकरण माहितीत त्यांना फारसी - उर्दू भाषा अवगत असावी, असे वाटू लागते पण सर्व ग्रंथ शोधाअंती असे अनुमान लावता येते की, त्यांना उर्दू - फार्सी भाषा अवगत नव्हती कारण त्यांच्या कोणत्याही ग्रंथावर या भाषांची छाप पडलेली नाही. इतकेच काय एक ओवीदेखील फारसीमध्ये आढळली नाही. मुंतोजींनी आपल्या काव्यग्रंथात विशद केलेल्या तत्वानुसार अंदाज बांधता येतो की इस्लामिक शरियत त्यातील तत्वांची ओळख मुंतोजींना नव्हती हे सिध्द होते. [१८] मुंतोजी हे वेदाध्ययनात पारंगत होते हे तितकेचं महत्वाचे'. [१९]

'सूफी संप्रदायाचे अंतरंग' या ग्रंथाचे लेखक डॉ. अलीम वकील म्हणतात, 'सूफी अल्लाहशी तादात्म्य पावण्याची आस धरतात - 'त्या' अवस्थेला पोहोचण्यासाठी साधकाला काही अवस्थांमधून जावे लागते - साधकाला शरीयत आणि तरीकत या अवस्थेतूनच प्रवास करीत 'मारेफत' पर्यंत पोहोचावे लागते'. [२०] इस्लामची पंचतत्त्वे शरीयतमध्ये मूलभूत असल्याचं प्रतिपादनही त्यांनी पुढं केलं आहे मुंतोजींच्या या रचनेत 'शरीयत'च नव्हे तर 'तारीकत' आणि 'मारेफत' या सर्वांचाच

उल्लेख आहे, हे केवळ वर नमुन्यादाखल उल्लेखिलेल्या शब्दसंग्रहावरून आपल्या लक्षात अगदी सहजपणे येतं व या रचनेतील अन्य सूक्ष्म व विस्तारपूर्वक केलेल्या विवरणवरूनच त्यांचा या दर्शनाचाही किती गाढा अभ्यास होता, ते कळतं. त्यावरून डॉ. जुल्फी शेख यांची वरील विधानं मुंतोजींवर अन्याय करणारी आहेत, एवढंच मी म्हणेन. मुंतोजींचं वैशिष्ट्य असं की, अन्य ग्रंथांत भारतीय दर्शन - विवरण करताना त्यांनी अरबी फार्सी - दक्खिनी या भाषांचा स्पर्शही होऊ दिला नाही, हा त्यांचा संयमच म्हणायला हवा.

या रचनेत अज्ञानसिद्धांनी इस्लाम / सूफी दर्शनांच्या पर्यायाविषयी 'पृच्छा' केल्यानं मुंतोजींना त्या भाषांतील संज्ञा / संकल्पना उद्धृत करणं आवश्यक व अनिवार्यच होतं. तेव्हा या रचनेचं कर्तृत्व कुणाचं, याविषयी वाद होण्याचं काहीच कारण नाही. ते मुंतोजींचंच आहे, हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ व स्पष्ट आहे.

### नांदेड - प्रतीचा विचार

डॉ. ढेरे यांनी मृत्युंजय कवीच्या नांदेड येथील गोदातीर इतिहास संशोधन मंडळातील प्रतीचा उल्लेख केला असून तोही महत्त्वाचा आहे. (हीही प्रत डॉ. जुल्फी शेख यांना नांदेडला गेल्यावर उपलब्ध झाली नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे.[२१]) सुदैवानं डॉ. ढेरे यांनी तिचा अन्य तपशील दिला असल्यानं तो मृत्युंजय / मुंतोजीविषयक संशोधनास साहाय्यभूत ठरला आहे. या प्रतीचा लेखक 'तक्तासिंहासन पट्टाधिकारी देवलिंगय्या असून त्यानं या प्रतीचं लेखन ज्येष्ठ वद्य १०, शके १७७३ म्हणजे (इ.स. १८५१) मध्ये पूर्ण केलं आहे'. आपल्या या रचनेविषयी मुंतोजी दक्खिनीत म्हणतात -

'शाह मुतबजी ब्रह्मणी।
जिनमें नहीं मनामनी (मनमानी)।
पंचीकरण का खोज किए।
हिंदू-मुसलमान एक कर दिए।। '

धुळे प्रतीतील रचनेला पूरक अशीच माहिती नांदेड प्रतीत असल्यानं या रचनेच्या अभ्यासास व संशोधनास ही प्रतही अत्यंत उपयुक्त आहे.

## मराठी परिभाषाकोशाचं एक नवं परिमाण

संत एकनाथांच्या काळापासून मराठी भाषेत परिभाषा-कोशांच्या निर्मितीस प्रारंभ झाला. पहिला 'ज्ञानेश्वरी परिभाषा-कोश' एकनाथांनीच सिद्ध केला व पुढं अशा ज्ञानेश्वरी परिभाषाकोशंची परंपराच कशी निर्माण झाली, ते डॉ. मु. श्री. कानडे यांनी एका स्वतंत्र ग्रंथातूनच विशद केलं आहे. हे सारे परिभाषा - कोश ज्ञानेश्वरींविषयक होते. मुंतोजींनी मात्र मराठी कोशवाङ्मयात एक आगळीवेगळी व अत्यंत महत्त्वाची भर टाकली, तिचं योग्य मूल्यमापन आजवर कुणी केलं नाही व मुंतोजींना

परिभाषा - कोश - वाङ्.मयाला वेगळा आयाम देणारे कोशकार म्हणून जे पर्याप्त श्रेय द्यायला हवं होतं, तेही कुणी दिलं नाही.

'याचे स्वरूप छोटेखानी काव्यरचनेचे आहे. हे काव्य मुळात विवेचनात्मक नसून, त्याचे स्वरूप पंचीकरण परिभाषेचा संस्कृत - फारसी कोश अशा प्रकारचे आहे' असं डॉ. जुल्फी शेख [२२] म्हणत असल्या तरी धुळे आणि नांदेड या दोन्ही ठिकाणी त्याची प्रत त्यांना उपलब्ध न झाल्याचा स्पष्ट निर्देश त्यांनी याच ठिकाणी केला आहे. त्यामुळं त्यांच्या मुंतोजींच्या आकलनात एक फार मोठी दरी निर्माण झाली आहे. मुंतोजींचं 'सूफीपण' त्यांना कळू शकलं नाही, असं खेदानं म्हणावं लागतं.

या कोशाची अनेक वैशिष्ट्यं आहेत. महानुभावांनी अन्य धर्म व दर्शनं समजून घेण्याचा प्रयत्न केला होता, हे मी मुरारीमल्ल बासांच्या 'दर्शन-प्रकाश'सारख्या ग्रंथांचं 'महानुभाव साहित्य संशोधनः खंड - १' या ग्रंथातील माझ्या 'पेगाम्बरी मत' या लेखातून विशद केलंच आहे. सूफींच्या काही / संज्ञा महानुभावीय 'तीसा'सारख्या दक्खिनी रचनांत येतात, याचा निर्देश मी 'महाराष्ट्र के महानुभाव साहित्यकारों का हिन्दी साहित्य को योगदान' या माझ्या ग्रंथात केलाच आहे तथापि भारतीय दर्शन आणि इस्लाम / सूफी दर्शन यांच्या पारिभाषिक संज्ञांच्या पर्यायांचा कोश महानुभावांनी केल्याचं माझ्या वाचनात / पाहण्यात नाही. महानुभावांनी अन्य महत्त्वपूर्ण कोशकार्य केल्याचं श्रेय त्यांना अवश्य द्यायला हवं.

मराठीतील परिभाषाकोशांचं महत्त्व मान्य करायलाच हवं पण हे परिभाषाकोश ज्ञानेश्वरीविषयक होते, हे त्यांचं वैशिष्ट्य व मर्यादाही मान्य करायला हवी. मुंतोजींनी मराठी परिभाषाकोशांची व्याप्ती वाढविली, हे या कोशाचं पहिलं महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. हा कोश विशिष्ट मराठी ग्रंथापुरताच मर्यादित नसून दोन वेगवेगळ्या धर्मांच्या व त्यांतील पंथांच्या पारिभाषिक संज्ञांना पर्याय सुचवून त्यांच्या आकलनास साहाय्य करणारा कोश आहे, हे त्याचं दुसरं महत्त्वाचं वैशिष्ट्य होय. त्याच्यामुळं दोन भिन्न धर्मियांमधील परस्पर - सामंजस्याच्या भावनेची अभिवृद्धी होण्यास लक्षणीय साहाय्य झालं, हे त्याचं तिसरं वैशिष्ट्य होय. पंचीकरणाच्या परिभाषेचे पर्याय हा त्यातला गाभा असला तरी 'चहू देहांचा उकला' किंवा 'चारो वजूदों का खुलासा' केल्यावर हिंदू व इस्लाम (तदन्तर्गत सूफी) दर्शनातील शब्दांची - विशेषतः पारिभाषिक शब्दांची - यादी देऊन त्यांचे क्रमवार पर्याय दिले आहेत. ते केवळ पंचीकरणाशी संबद्ध नाहीत. त्या त्या दर्शनाच्या / किमान पर्यायी संज्ञांचे ते संकलन आहे, हे त्याचं चवथं वैशिष्ट्य होय. दोन्ही दर्शनांतील अनेक साम्यस्थलांचं दर्शन घडवून त्यांतील एकात्मतेचं सूचन या रचनेनं केलं आहे, हे त्याचं पाचवं वैशिष्ट्य. अज्ञानसिद्धांना इस्लामविषयी विचारावंसं वाटणं नि मुंतोजींना ते सांगावंसं वाटणं यांत जिज्ञासू व जिज्ञासापूर्ती करणारे हे दोघेही एकात्मतावादी व 'समानधर्मा' (समान प्रवृत्तीचे व मानसिकतेचे) आहेत, याचाही प्रत्यय येत नाही काय?

डॉ. जुल्फी शेख म्हणतात त्याप्रमाणं हा केवळ 'पंचीकरण परिभाषेचा कोश' नाही, त्याचप्रमाणं केवळ 'संस्कृत - फारसी कोश'ही नाही. फार्सीच्या माध्यमातून यात अरबी-तुर्की शब्द आले आहेत. संस्कृत कारणदेह, महाकारणदेह या संज्ञांप्रमाणं तत्सम - शब्दांप्रमाणंच - लाळ, घाम आळस यासारखे तद्भव मराठी शब्दही आहेत. आपकु, सोब (सब), इस्का (इसका), यैसा (ऐसा), पछाने (पहचाने) यासारखे खास दक्खिनी शब्द आहेत. निकी, बदी, दाना, बिना (बीना), दानिस्तं, दोजख यासारखे फार्सी शब्द आहेत. आशक (आशिक), माशुक (मअशूक), जाहिर, इरादत यासारखे अरबी शब्द आहेत. या दृष्टीनं केवळ संस्कृत - फार्सीच नव्हे तर संस्कृत, मराठी, दक्खिनी, फार्सी व अरबी असा पाच भाषांनी सिद्ध झालेला हा कोश आहे. पंचीकरणाचं तत्त्वज्ञान हे जसं त्याचं एक अंग आहे त्याचप्रमाणं 'भाषांचं पंचीकरण'ही यात झालं असल्याचा - भाषिक एकात्मतेचा - सुखद प्रत्यय ही रचना वाचताना आल्याविना राहात नाही.

या रचनेत शब्दांना पर्यायी शब्द किंवा पारिभाषिक संज्ञांना पर्यायी पारिभाषिक संज्ञाच आहेत का? त्यात अलीकडच्या स्तंभात मराठी तर पलीकडच्या स्तम्भात दक्खिनी वाक्यंही आहेत. ती त्यातील समान अर्थ उलगडून दाखवतात.

मराठी भाषेत तरी ही रचना अपूर्व आहे. या दृष्टीनं मुतोजींनी मराठी दर्शन - विचारात व कोशवाङ्मयात घातलेली भर अत्यंत मौलिक स्वरूपाची आहे. एका अर्थानं अनन्यसाधारण आहे. ती मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या - विशेषत : भक्तिसाहित्याच्या इतिहासात नोंदविण्याजोगी निश्चित आहे. पुढं शेख महंमदांनी अशा प्रकारची 'दुचेष्मा' ही कोशरचना केली. यामागं मुतोजींच्या या रचनेची प्रेरणा असावी.

## अन्य रचना

### (४) जीवोद्धरण

आत्मज्ञानाच्या प्राप्तीमुळं आपल्या जीवाचा उद्धार होतो व त्याला मुक्ती मिळते, हे अन्तःसूत्र असलेली मुंतोजींची ही रचना. बाराशे ओव्यांचा हा ग्रंथ मुंतोजींनी नऊ प्रकरणांत विभागला आहे. विवेकनिष्ठा, ज्ञानलालसा आणि गुरुकृपा यांच्या साहाय्यानं साधकाला आपल्या जीवनाचं अन्तिम उद्दिष्ट कसं गाठता येतं आणि जीवा - शिवाची भेट कशी होते, या आपल्या आवडत्या अद्वैतविचाराचंच विवेचन याही ग्रंथात केलं असून त्याचीही हस्तलिखित तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयात उपलब्ध आहे.मुंतोजींच्या ग्रंथांची नावं कशी सार्थ आहेत, याचा प्रत्यय त्यांच्या या रचनेवरूनही येतो.

### (५) स्वरूपसमाधान

मुंतोजींच्या या रचनेतील प्रतिपाद्यही 'जीवोद्धरणा' तील प्रतिपाद्याप्रमाणंच आहे. 'महाराष्ट्र कवी' मधून प्रसिद्ध झालेल्या या रचनेची ओवीसंख्या ३९४ असून तिच्यात 'ब्राह्मणी मुंतोजी'

आणि 'मृत्युंजय' या दोन्ही नाममुद्रा आढळतात. डॉ. ढेरे यांनी ही रचना 'प्रकाशदीपा'एवढी आहे असं म्हटलं असलं तरी 'प्रकाशदीपा'च्या मला उपलब्ध झालेल्या धुळे प्रतीची ओवीसंख्या ४३१ आहे, हे मी त्या संदर्भात केलेल्या विवेचनात निर्देशिलंच आहे. 'स्वरूपा'चं ज्ञान म्हणजे आत्मज्ञान झाल्यावर जी अपूर्व मनःशांती मिळते, तिचं विवरण मुंतोजी या रचनेत करतात. 'प्रकाशदीपाच्या' पहिल्या म्हणजे 'स्वस्वरूप निरूपण' या प्रकरणातील विवेचनाशी हे विवेचन बरंचसं जुळतं. त्यामुळं त्याविषयी पुनरुक्ती करीत नाही.

## (६) अव्दैतप्रकाश

ग्रंथनामावरूनच मुंतोजींच्या या ग्रंथातील प्रतिपाद्याविषयीची कल्पना येईल. तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात या ग्रंथाची दोन हस्तलिखितं आहेत. ग्रंथ चार प्रकरणांत विभागाला असून त्याची ओवीसंख्या ५७८ आहे. 'प्रकाशदीपा'प्रमाणंच या ग्रंथाच्या आरंभीही कवीनं आपण वेदशास्त्रपुराणांचं मंथन करून या ग्रंथाची निर्मिती केली आहे, असं म्हटलं आहे -

'शोधूनि वेदशास्त्र पुराण।
मथन सार तेंचि बोलणी।
जे सर्व ग्रंथी होती देखणे।
ते जाणती चतुर।।५।।'

अविद्या किंवा अज्ञान नाहीसं झाल्यावर आत्मज्ञान होतं. त्यामुळं व्दैतभावाचा अंधकार नाहीसा होऊन अव्दैताचा प्रकाश पसरतो, अशा आशयाचं प्रतिपादन मुंतोजींनी त्यांच्या अन्य रचनांप्रमाणंच इथंही केलं असल्यानं त्याविषयी अधिक विस्तार करीत नाही.

## (६) अमृतानुभव

मुंतोजींचं हे आध्यात्मिक प्रकरण २९० ओव्यांचं असून अमृतानुभवाव्यतिरिक्त त्याच्या 'आत्मानुभव' व 'परमामृत' या दोन अन्य नावांचाही निर्देश कवीनं या रचनेच्या शेवटी केला आहे. तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयात याची सात हस्तलिखितं उपलब्ध आहेत. ही रचना अव्दैतमतविवरणात्मक असून आपण आणि परमात्मा एकरूप झाल्यावर जी अपूर्व अनुभूती येते, तोच 'अमृतानुभव' किंवा शाश्वत स्वरूपाचा परमानंद होय, असा या रचनेतील केन्द्रीभूत विचार आहे. त्यामुळं चिन्मयानंद प्राप्त होतो, यास्तव कवीनं चिन्मयानंदाला वंदन करून या रचनेचा प्रारंभ केला असून त्यालाच शेवटी ही रचना अर्पण केली आहे. हाच विषय मुंतोजींनी आपल्या अन्य रचनांतही वर्णिला आहे कारण तोच त्यांना विशेष प्रिय आहे. त्यामुळं पुनरुक्ती घडणं अपरिहार्यच होतं. असं असूनही ती घडली नाही, असं डॉ. जुल्फी शेख[२३] म्हणतात, याचं आश्चर्य वाटतं. त्यांचं या संदर्भातील विवेचन मला तरी अनाकलनीय वाटलं. त्या म्हणतात, 'ग्रंथमहतीविषयी बोलायचे झाल्यास सर्व ग्रंथात एकसारखेच महिमान ते गातात. विषय सर्वत्र सारखा आहे व वर्णिलेल्या

ग्रंथाचे ग्रंथाधार वेदांत. पुराण असल्यामुळे त्यात त्यांच्याकडून पुनरुक्तीचा दोष घडला आहे, असे वाटत नाही. उलटपक्षी ती योजना त्यांनी व्यक्त केलेले एकटे एकतत्वयोजन योग्य वाटते '.

## (८) अनुभवसार

हे मुंतोजींचं छोटेखानी प्रकरण असून त्याची ओवीसंख्या केवळ ४२ इतकी आहे. तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयाच्या संशोधनपत्रिकेतून ते प्रकाशित झालं आहे. सृष्टिनिर्मितीशी परमात्मतत्त्वाचा संबंध देह आणि आत्मा यांचा संबंध, जीवात्मा नि परमात्मा यांचा संबंध याविषयी मुंतोजींनी या प्रकरणात विवेचन केलं असून सर्वत्र परमात्म्याचं अस्तित्व आहे, याची प्रचीती आपल्यालाही यायला हवी, अशा आशायाचं प्रतिपादन या प्रकरणात केलं आहे. सृष्टीच्या निर्मितीविषयी भारतीय आस्तिक दर्शनांतील चिद्विलासवादाचं प्रतिबिम्ब त्यात उमटलं आहे. पवित्र कुराणातही परमात्म्यानं सृष्टीची निर्मिती केल्याविषयीचं विवेचन आहे. 'अनुभवसारा'चं लेखन करताना मुंतोजींसमोर विश्वनिर्मितीची ही दोन्ही विवेचनं असावीत. 'अनुभवसारा'च्या पुढील अठराव्या ओवीवरून त्यातील मुख्य प्रतिपाद्य विषयाची कल्पना येईल -

'त्यासी सृष्टीची इच्छा झाली।<br>
इच्छाशक्तिपासाव सर्व सृष्टी रचिली।<br>
तेचि महत्व ऐसी बोली।<br>
तियेसी साक्षी तो आत्मा।।'

## (९) गुरुलीला

श्री. गो. का. चांदोरकर यांनी 'महाराष्ट्र-कवि-काव्यसूची'त [२४] आणि महाराष्ट्र-सारस्वतकार वि. ल. भावे यांनी सारस्वताच्या पाचव्या आवृत्तीत [२५] मुंतोजींच्या रचनेचा उल्लेख केला असला तरी ती अनुपलब्ध असल्याचं डॉ. ढेरे यांनीही 'मुसलमान मराठी संतकवी' या ग्रंथात पृ. ३२ वर नोंदविल आहे.

## ग्रंथनामांतून प्रकटणारं साधनेचं प्रयोजन व फलश्रुती

मुंतोजींच्या रचनांचा क्रम त्यांच्या नावांवरून जुळविता येतो व त्यांतून साधनेच्या प्रयोजनापासून फलश्रुतीपर्यंतच्या प्रवासाचं दर्शन घडतं, त्या क्रमानं त्यांनी लेखन केलं, असं यातून मला मुळीच सुचवायचं नाही पण मुंतोजींच्या तत्त्वचिंतनाच्या परिघाची व्याप्ती कसकशी वाढत गेली, याची प्रचीती या ग्रंथनामांवरूनच येते : गुरुलीला, पंचीकरण, सिद्धसंकेत - प्रबंध, जीवोद्धरण, प्रकाशदीप अव्दैतप्रकाश, स्वरूपसमाधान, अमृतानुभव आणि अनुभवसार ही ग्रंथनामंच इतकी बोलकी आहेत की त्यांच्याविषयी वेगळं भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

---

## संदर्भ - टीपा


१. मृत्युंजय, डॉ. जुल्फी शेख, गुरु प्रकाशन, नागपूर, १९९९.

२. भक्तविजय, १६X२६०

३. मृत्युंजय, डॉ. जुल्फी शेख, पृ. १९

४. कित्ता, पृ. १७

५. महाराष्ट्र - सारस्वत, पाचवी आवृती, वि. ल. भावे, डॉ. शं गो. तुळपुळे, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९६३, पृ ७८२

६. कित्ता, पृ. २४९

७. मृत्युंजय, डॉ. जुल्फी शेख, पृ ४९

८. कित्ता, पृ. २४६

९. कित्ता, पृ. २३

१०. कित्ता, पृ २७

११. राजवाडे संशोधन मंदिरातील मराठी हस्तलिखित ग्रंथ व दुर्मिळ ग्रंथांची सूची, सं. द. रा. भट, प्रका. इ. वि. का. राजवाडे सं. मंडळ, धुळे, प्रकाशनकाळ दिलेला नाही, पृ. ४१.

१२. मृत्युंजय, डॉ. जुल्फी शेख, पृ. ५२

१३. कित्ता, पृ. ३४

१४. कित्ता, पृ. ५३

१५. कित्ता, पृ. १५३

१६. कित्ता, पृ. १५७

१७. कित्ता,पृ. ४९ - ५४

१८. अधोरेखन माझे.

१९. मृत्युंजय, डॉ. जुल्फी शेख, पृ. ५२.

२०. सूफी संप्रदायाचे अंतरंग, डॉ. अलीम वकील, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०००, पृ. २९

२१. मृत्युंजय, डॉ. जुल्फी शेख, पृ. ४९.

२२. कित्ता, पृ.४९.

२३. कित्ता, पृ. ४४ : या अवतरणात मी कोणताही बदल केलेला नाही.

२४. महराष्ट्र कवि-काव्यसूची, पुणे, पृ. ३६

२५. महाराष्ट्र - सारस्वत, पृ. २४९.


श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे येथे उपलब्ध झालेली प्रत (श्री. द. शं. जोशी यांनी नकललेली) साभार उद्‌धृत.

(अ धो रे ख न माझं.)

## परिशिष्ट

# हिन्दू-इस्लाम-दर्शन

## (परिभाषा-कोश)

### परिशिष्ट : पृ. १

| | |
|---|---|
| **पंचिकरण प्रमय** | **।। अविंध भाषा।।** |
| ॐ राम | बिस्मिल्ला |
| **चहु देहाचा उकला** | **चारो वजूद का खुलासा** |
| १ स्थूळदेह १ | १ बाजबुल्वजूद |
| १ लिंगदेह २ | १ ममकिनल वजूद |
| १ कारणदेह ३ | १ ममतनल वजूद |
| १ महाकारण ४ | १ अरिफल वजूद |
| ४ | ४ |
| **आवच्छा चारी ४** | **हाल ४** |
| १ जाग्रती १ | १ बेदारी |
| १ स्वप्नावस्छा २ | १ हालखाब |
| १ सुषुप्ती ३ | ३ बेहोसी |
| १ तुर्यावच्छा ४ | ४ हाल होसी |
| ४ | ४ |
| **अभिमानी चार** | **मदकिल ४** |
| १ विश्व १ | १ जबराईल |
| १ तैजस २ | १ इसराफिल |
| १ प्राज्ञ ३ | १ इजराइल |
| १ प्रत्यगात्मा ४ | १ निकाइल |
| | ४ |
| **स्छान ४** | **मकान ४** |
| १ नेत्र १ | १ चष्म |
| १ कंठ १ | १ हलक |
| १ हृदय ३ | १ सीने |
| १ मुध्रिस्छान ४ | १ सिरमकान |
| ४ | ४ |
| **भोग चार** | **भोग ४** |
| १ स्थूळ भोग १ | १ वजुद भोग |
| १ स्वप्न २ | १ वाहमा |
| १ मूर्छना ३ | १ जुलमात |
| १ स्वानंदभोग ४ | १ खुषाली भोग |
| ४ | ४ |

## परिशिष्ट : पृ. २

| | |
|---|---|
| **वेद ४** | **काबाब** |
| (रग्वेद) १ ऋग्वेद - १ (ऋग्वेद) | १ तौरेद |
| १ यजुर्वेद २ | १ इंजिल |
| १ सामवेद | १ जंबूर |
| १ अथर्वणवेद ४ | १ फुर्कान |
| ४ | ४ |
| **गुण ४** | **कजे** |
| १ रजोगुण १ | १ हिरसानी |
| १ सत्वगुण २ | १ जमाली |
| १ तमोगुण ३ | १ जलाली |
| १ श्रुद्ध सत्व ४ | १ कमाली |
| ४ | |
| **मार्ग चार** | **राहा ४** |
| १ कर्ममार्ग १ | १ शरीयत |
| १ भक्तिमार्ग २ | १ तरिकत |
| १ वैराग्यमार्ग ३ | १ हकिकत |
| १ ज्ञानमार्ग ४ | १ मारीफत |
| ४ | ४ |
| **मातृका** | **मनासुत** |
| १ अकार १ | १ दर्मलकुत (१.१) |
| १ उकार २ | १ दर्जबरुतबित |
| १ मकार ३ | १ बिनलाहतजर्कत |
| १ आर्धमात्रा ४ | |
| ४ | |
| **वाचा ४** | **जिकार** |
| १ वैखरी १ | १ नलिमुख बयान बोले |
| १ मध्यमा २ | १ कलबी मन मेधे |
| १ पश्यंती ३ | १ रुहा देख तमाशा देखे |
| १ परा ४ | १ सिरिसवा बाखे |
| ४ | ४ |

| खणि | रोहा |
|---|---|
| १ अंडज | १ रोहा नाकी |
| १ जारज | १ रोहा जवाती |
| १ स्वेदज | १ रोहा संगी |
| १ अुद्‌भिज | १ रोहा जिस्मी |
| ४ | |

## परिशिष्ट : पृ. ३

| स्थूळदेह पंचभूताच पंचेबीस कळाचे २५ | बाजुबुल बजूद पंज अनासिर पंचीस कळाके |
|---|---|
| १ पृथिवी १ | १ खाक |
| १ आप २ | १ आब |
| १ तेज ३ | १ अतश |
| १ वायु ४ | १ बाव |
| १ आकाश ५ | १ हवा |
| ५ | ५ |

हे पंचभूत साहवा आत्मा — यो पंज अनासिर छेचि जात.

| पृथिवपंच | खाक पंज ५ |
|---|---|
| १ अस्ति १ | १ हड |
| १ मांस १ | १ हेडा |
| १ त्वचा ३ | १ रंटा |
| १ नाडी ४ | १ पोष |
| १ रोम ५ | १ बाल |
| ५ | ५ |

| आपपंचक्र | आबपंकज |
|---|---|
| १ लाळ १ | १ लब |
| १ मूत्र २ | १ इराखत |
| १ रक्त ३ | १ लहू |
| १ रेत ४ | १ बिंदु |
| १ घामं ५ | १ खोप |
| ५ | ५ |

| | |
|---|---|
| **तेजपंचक** | **अतश ५** |
| १ क्षुधा १ | १ भूक |
| १ तृषा २ | १ प्यास |
| १ आळस ३ | १ सुस्ती |
| १ निद्रा ४ | १ नींद |
| १ मैथुन ५ | १ भोग |
| ५ | ५ |

## परिशिष्ट : पृ. ४

| | |
|---|---|
| **वायुपंचक** | **बाबपंजगुण** |
| १ चळण १ | १ चलन |
| १ वळण २ | १ हलना |
| १ धावण ३ | १ दौडणा |
| १ प्रसारण ४ | १ सोना |
| १ अकोचन ५ | १ दारद कसीदन |
| ५ | ५ |
| **आकाशपंचक** | **हबापंज** |
| १ काम १ | १ काम |
| १ क्रोध २ | १ घुसा |
| १ शोक ३ | १ गि-या |
| १ मोह ४ | १ प्यार |
| १ भय ५ | १ डर |
| ५ | ५ |
| **हा स्छूळदेह** | **सो यो बाजबूल बजूद** |
| १ जागृती अवस्छा | १ हाले बेदारी |
| १ विश्वाभिमानी | १ मवाकिल् जबराईल |
| १ नेत्रस्छान | १ चेष्म मकान |
| १ स्छूळ भोग | १ वजूद भोग |
| १ कर्ममार्ग | १ यह शरियत |
| १ रजोगुण | १ खासीयत हिरसानी |
| १ मात्रा आकार | १ मंजिल नासुत |
| १ भूमिका गतायाता | १ मंजिल नासुत |
| १ ऋग्वेद | १ किताब तोरेद |

| | |
|---|---|
| १ वैखरी वाचा | १ जिकीर जली |
| १ वित्तेषणाबुध्दिविचार | १ शाहादत मोहबत |
| १ राहणे पिशाचगती | १ मुकाम शैतानी |
| १ क्रियाशक्ती | १ तफस अमरू |

| | |
|---|---|
| ऐस हे स्थूळदेह आकारासी | यैसा यो बाजबुल वजूद।। |
| आले परी नाशवंत ।। | अकल किया।। स यो नुमा फना।। |
| याचा चाळक तो आत्मा साक्षी | (नूफजा) ईस्का शांहिद विनाषका |
| शाश्वत, तोचि ईश्वर, तोचि | वोही अल्ला।। वोही आप।। |
| आपण व्दैतराहित ।। | आप येकही येक।। |

## परिशिष्ट : पृ. ५

| | |
|---|---|
| लिंगदेह दुसरे, पंचेवीस कळांचे।। | मोमकीनल वजूद दुजा पचिस |
| वासनेसि खेळे।। वासनेकरुन | अनासिरो का।। बासनासु खेले |
| स्वर्गनर्कासि येत जात आसे।। | बासनासुं बिहिश्त दोजख आवेजावे।। |
| श्रुध्द वासना अंतःकरण होय तरी।। | खुब वासना दिल होवे तो।। |
| श्रीगुरुचे पाउले दृढ धरी।। तरि ठिकाणासि पावे।। | पीरके कदम पकडे।। वो बिशालकु।। अंबडे।। |

| अंतःकरणपंचक।। | दिल्ल पंज |
|---|---|
| १ अंतःकरण १ | १ दिल्ल |
| १ मन २ | १ वाहम |
| १ बुद्धी ३ | १ अकल |
| १ चित ४ | १ खतरा |
| १ आहंकार ५ | १ खुदी |
| ५ | ५ |

| वायोपंचक | कादिम पंज |
|---|---|
| १ व्यान १ | १ जेजबा |
| १ सम्मान २ | १ भासिकां |
| १ उदान ३ | १ हजम |
| १ प्राण ४ | १ मोमजा |
| १ अपान ५ | १ ददफ |
| ५ | ५ |

| ज्ञानेंद्रियपंचक | यो कारि पंज।। बाजा।। हबा पंज।। |
| --- | --- |
| १ श्रोत्र १ | १ गोशा |
| १ त्वचा २ | १ पोस्त |
| १ चक्षु ३ | १ चेभ |
| १ जिव्हा ४ | १ जुबा |
| १ घ्राण ५ | १ बिनी |
| ५ | ५ |

| कर्मेद्रियपंचक | हबासें नादा ।। याने आदान पंज ।। |
| --- | --- |
| १ वाचा १ | १ गोईदन |
| १ पाणी २ | १ दस्त |
| १ पाद ३ | १ कदम ।। याने पाव ।। |
| १ सिश्न ४ | १ नफस ।। फेर |
| १ गुद ५ | १ फुन |
| ५ | ५ |

## परिशिष्ट : पृ. ६

| विषयपंचक | हिरस पंज बज्ता |
| --- | --- |
| १ शब्द १ | १ शामेया |
| १ स्पर्श २ | १ लामेश |
| १ रूप ३ | १ बासेरा |
| १ रस ४ | १ जायका |
| १ गंध ५ | १ मा बोय याने शामु |
| ५ | ५ |

| ऐसे हे | ऐसा यो |
| --- | --- |
| १ लिंगदेह | १ मोमकीनल वजूद |
| १ स्वप्नावस्छा | १ हाल बेदारी |
| १ तैजसु अभिमानी | १ मबकल इसराफिल (द) |
| १ कंठस्छान | १ हलक मकान |
| १ प्रदिदिक्त भोग | १ भोग वहमे |
| १ सत्वगुण | १ खासियत, कमालियत |
| १ भक्तिमार्ग | १ राह तारिकत |
| १ भूमिका गतायाता | १ मंजिल मुलाकत |

| | |
|---|---|
| १ यजुर्वेद | १ खतरा जमालीयत |
| १ मध्यमा वाचा | १ किताब इजिल |
| १ दारेषण | १ जिकर खलबि |
| १ साक्षी सत्य | १ नफस लवामा |
| १ राहणे व्यापक | १ शहदत वजूद |
| ऐसें हे सुक्ष्मदेह दश्याचा भोगी | यो नुमासिफत फना ।। ईस्का |
| नाशवंता। याचा साक्षी तो | शाहिदबिना सोबका आप अल्ला |
| आपण अविनाश परमेश्वर | बिस्मिल्लारहमानिरहीम |
| आत्माराम | |
| कारणदेह ।। अहःकार ।। | ममतनल वजूद।। जुलमता।। |
| आपण कोण ऐसा।। आपणा | आप कोई ऐसा।। आपकु |
| सज्ञान होत नाही ।। ऐसें हे। | मालूम नहि होता।। ऐसा ये। |
| १ कारणदेह | १ ममतन वजूद |
| १ सुषुप्ति आवस्था | १ इस्का हाल बेहोशी |
| १ प्राज्ञाभिमानी | १ मवकल इजराइल |
| १ हृदयस्थान | १ कुलुब मकान |
| १ मुर्छनानंद भोग | १ |
| १ वैराग्यमार्ग | १ राह हकिकत |

## परिशिष्ट : पृ. ७

| | |
|---|---|
| १ सामवेद | १ किताब जंबूर |
| १ पश्यंती वाचा | १ जिकिर रुहि |
| १ तमोगुण | १ लालीयत |
| १ मकारमात्रा | १ कापि हरफ |
| १ लोकेशण | १ गुहि देखे |
| १ संश्रिलष्टता | १ मंजिल जंबुरत (मंजि जंबुरत) |
| १ मन बुध्दि अहंकार | १ नफल अकल गुमान मुलालक |
| ऐसं कारणदेह जाणिजे | ऐसा ममतनल वजूद जानना । इस्का |
| याचा साक्षी आत्माराम | शाहिद सा अवल बिस्मिल्ला।। |
| लोकेशणे निरालंबी राहणार।। | हिरहिमा नीरहीम।। |
| महाकारणदेह।। ज्ञानाचा ठाव।। | आरिफल वजूद ।। ज्ञानकि जागा।। |

| | |
|---|---|
| स्छूळदेह लिंगदेह कारणदेह | वाजूबुल वजुद ममकिनल वजुद ममतनल |
| या तीन्ही देहास जाणते ते | वजुद तीनो यो वजुदोकु जाणे सो।। |
| १ महाकारण देह | १ अरिफल वजूद |
| १ तुर्यावस्छा | १ हाल हुषारी |
| १ प्रत्यगात्मा अभिमानी | १ मवकलज्जबराइल |
| १ मूध्निस्छान | १ मकान सरबुलंदे |
| १ आनंदावभास भोग | १ खुशालयोग खासियत |
| १ अथर्वणवेद | १ किताब फुरकान |
| १ शुद्ध सत्वगुण | १ खासीयत कमालियत |
| १ परा वाचा | १ खिस्याखे |
| १ ज्ञानमार्ग | १ राह मारिफत |
| १ सुप्लीनता भुमिका | १ मंजिल लाहत |
| १ बुध्दिगलित साक्षी | १ अकल आगाहा |
| १ निर्गुणमोक्षराण कैवल्यपद | १ शाहदत ज्ञादनससूल हैमा<br>ऐमा मुकाम सफार्यत। |
| हे चारी देह दृश्या । ह दृश्य | यो चारो वजूद मुना।। जो नुमाकना |
| नाशवंत मिथ्या ।। या चारी देहास | कर पछोने ।। ये चारो वजूदोंकु |
| नाशवंत करुन । उरे तोचि अविनाश ।। | फना कर - कर उबरे वोहि बक्का ।। |
| ऐसा चौ देहाचा विचार | आपे अल्ला।। |
| असे हे चारी देह मिळोन हे स्छूळदेह | ऐसा चारो वजूद का खुलासा<br>ऐसा यो चारो वजूद मिलकर<br>वाजुबुल वजूद. |

## परिशिष्ट : पृ. ८

| | |
|---|---|
| हे च्यारी देह-बंधन जे।। | येहि जानो अदबर शना।। |
| येथे जीवासि बंधन जाले। | अ-हवाकु येही बंधन हवाल |
| जे सुखदुःख भोगणे जाले।। | जो सुखदुख भोगता |
| ज्याचे मन स्वरूपी मिळे त्याच<br>बंधन तुटले<br>मोकळा जाला तेंचि संसार बंदी<br>खानापासून सूटला।। | जिसकी अ-ह्वा जातसु मिले<br>उसका बंद खलास |
| सर्वज्ञ।। सर्वसाक्षी।।<br>तेजोमय प्रकाश ।। | दाना ।। बिना ।।<br>नुर बका ।। |

| | |
|---|---|
| तोंचि आपण परमेश्वर ।। | सो ही आपे आल्ला |
| देहचतुष्ट्याचा दष्टा तो पाचवा जाणिजे ।। | |
| ईति देहचतुष्ट विवरण।। | येहि चारो वजुदोका खुलासा।। |
| ईश्वर।। जीव।। प्रेम।।ब्रम्ह।। माया।। | खुदा।।बंदा।।ईस्का।।जात।।सिफत।। |
| पूज्य।।पुज्यक।।ज्ञाता।।दृष्टा।। | आशक।।माशुक ।। दाना ।। बिना।। |
| बरे ।। वाईट ।। | नेकी ।। बदी ।। |
| साक्षी ।। कर्म ।। अन्दैत ।। बाह्य | शाहिद ।। शरा ।। तौहिद ।। जाहिर।। |
| अभ्यांतर ।। | बातिन ।। |
| स्वर्ग।।नर्क।।सत्य।।मार्ग।।ऐक्य।।जाणिव | बिहिस्त।।दोजख।।हक।।शहा।।विशाल।।दानाई।। |
| व्दैत।।जाणता।।मन।।आत्मज्ञान।। | दुई।।दानिस्त।।कुलबु।। |
| भक्ति | खुद सिनास ।। जिकिर ।। |
| स्मरण ।। चिंता ।। देवकन्या | दुनियाइहादिनफर।। फिकीर ।। -हच्या ।। |
| ध्यानप्रकाश ।। अंधकार | तफकुरुन्नर ।। जुलमता ।। |
| अमृत ।। वियोग ।। योग | आबज ।। मजम ।। फीराक ।। |
| जमनिक ।। व्यापक | विशालयोग ।। हिजाबा ।। |
| क्षेत्रक्षेत्रज्ञ ।। सत्ता ।। | माहित वजूद ।। मवजूद ।। |
| उकला ।। जीव ।। ब्रह्म ।। | खुलासा ।। अवांह ।। अमर आल्ला |
| परमेश्वर ।। मूलमाया ।। | खुदा ।। सरसिफत ।। |
| महंमाया ।। अविद्या ।। | सिफत ।। गफलत ।। |
| देव ।। मनुष्य | जित ।। इनसान ।। |
| वैकुंठ ।। कैलास ।। | अयमी ।। खुरजा ।। |

**परिशिष्ट : पृ. ९**

| | |
|---|---|
| जीवनमुक्त ।। नित्यमुक्त ।। | अवलिया ।। अंबिया ।। |
| अंतसुख ।। ब्रह्म हरिहर ।। | दरपीर ।। फिरस्ते ।। |
| वेद ।। ऋग्वेद यजुर्वेद ।। | किताब ।। तोरेद ।। जंबूर ।। |
| सामवेद अथर्वणवेद ।। | इजिल ।। फुरकान ।। |
| शास्त्र ।। सूक्ष्म ।। स्थूळ ।। | रिसाल ।। उल्वी ।। सुफली ।। |
| निर्वाण ।। याग ।। | तवकल ।। तसलीमाली ।। |

| | |
|---|---|
| सर्वं ब्रह्मेती | आल्ला जमजम सिफते ।। |
| दृश्य ।। दृष्टा ।। दर्शन | मुंताजरी ।। नजर ।। नाजर ।। |
| अहं ब्रह्मास्मि ।। मिमाझे ।। सुलीन ।। | अनारा।।बगजा।।मनामनी।। |
| वृत्तिलीन ।। आहंकार | सलीम ।। खतरा नफी ।। |
| साधुसज्जन ।। साधुप्रीति।। | खुदपरस्ती ।। खादीमुल फुकरा ।। |
| वस्ती ।। देवी ।। प्रकृती | ह-वल।। फुकरा पैगंबरी।।फिरयनिहस्ता |
| जारखाणी।। अंडज।। | चारोखाणी।।नुहरवा |
| जारज।।स्वेदज।।उद्विज।। | रूह-नाजति।।रुह-सिर्गा।।रुह-जस्मि |
| सिध्दि ।। श्रुब्ध जीव।। | अजमत।।पाक अखाह ।। |
| मळीन जीव।।वाचक | नापाक अर्वा।।मुत्तलीम।। |
| सिष्य साधक | मुरीद तालीब।। |
| व्दैतनिरशण आत्मा होणे।।मिमांसा।। | दुइरान बुकजा।।कहोवशद।।रह किकी।। |
| आत्मज्ञानी ।। वर्णाश्रम अभिमानी।। | किरामिना।। खातिबानी।। साताासिर |
| चित्रगुप्त ।। सत्वगुण।। संवळित परमेश्वर ब्रह्म।। | सुखोद ।। अलिमीए।। |
| सर्वज्ञत्व ।। इच्छा।। | इरादत।। अईग |
| सामर्थ्य ।। जीवन्मुक्त।। | समीफल ।। बसरी।। |
| देखणे ।। बोलणे ।। | नलीम।। अलिमस्त ।। |
| ।। येको देवो सर्वभूतेषुगुढः।। | वलिउलकुलशैना।।अणिकुच देणे |
| सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा।। | लिमल शाहादत ।। अल्ला जमजम |
| सर्वाध्यक्ष सर्वभूताधिवासा।। | सीफत ।। अल्लासुरती नअल्ला |
| साक्षी चेता केवलो निर्गुणश्र्च।। | अनकन मकान।। |

## परिशिष्ट : पृ. १०

| | |
|---|---|
| इदंज्ञात्वा ।। समस्त भूतांना परमेश्वर परब्रह्माभ्यांतरा।। | |
| साक्षित आत्मा।। | |
| सर्व खाल्विद ब्रह्म।। | |
| इति मृत्युंजय अज्ञान सिद्ध नागेश पृच्छा निश्र्चय ।। | इति मृत्युंजयकु अज्ञानसिद्ध नागेश पुछाया हक्क ।। |
| संपूर्णमस्तु ।। | |

# ५. अंबर हुसेन

मुसलमान मराठी संतकवींनी विविध प्रकारचं लेखन केलं तथापि त्यांत गीताटीकाकार हा एकमेव अंबर हुसेन होय. त्याची नोंद जवळपास सर्व मराठी वाङमयेतिहासकारांनी घेतली आहे. प्रा. अ. का. प्रियोळकर[१] यांनी, चारच पृष्ठांत का होईना, 'हुसेनांबरखाना'चा विचार, दहा मुसलमान संतकवींपैकी प्रथम शेख महंमदविषयी करून त्यानंतर लगेच दुस-या क्रमांकावर केला आहे. यावरून प्रा. प्रियोळकरांनी त्याचं महत्त्व जाणलं होतं, हे लक्षात येईल. डॉ. रा. चिं. ढेरे[२] यांनीही 'एकात्मतेचे शिल्पकार' या पुस्तकात संक्षेपानं का होईना, या कवीचा विचार केला आहे, तोही मला महत्त्वाचा वाटतो.

मात्र, वाङ्मयेतिहासकारांनी या कवीवर काहीसा अन्यायच केला, असं वाटतं. त्याच्यावर 'सामान्यत्वाचा शिक्का 'महाराष्ट्र सारस्वता'चे पुरवणीकार डॉ. शं गो. तुळपुळे[३] मारतात, तसेच त्याच्या गीताटीकेला ओवीसंख्येवरून 'समओवी' म्हणणं अधिक बरोबर होईल, असंही ते म्हणतात. याचं कारण गीतेचे ७०० श्लोक आहेत व या गीताटीकेची ओवीसंख्या त्यांच्या म्हणण्यानुसार, ८१६ इतकी आहे. डॉ. ढेरे[४] यांनी तर ही ओवीसंख्या ८७१ असल्याचं नमूद केलं आहे. गणिताच्या दृष्टीनं यापैकी कोणतीही ओवीसंख्या प्रमाण मानली तरीही गीताटीका 'समश्लोकी' किंवा 'समओवी' गीताटीका होईल, असं वाटत नाही. 'ओवीबद्ध गीताटीका' या संज्ञेनं या टीकेचं समर्पक वर्णन करता येईल, असं मला वाटतं. या टीकेच्या विविध वैशिष्ट्यांविषयी व स्वरूपाविषयी मी नंतर सविस्तर विवेचन करणारच आहे. तत्पूर्वी अंबर हुसेन यांच्या काळाविषयी, चरित्राविषयी व त्यांना लाभलेल्या पार्श्वभूमीविषयी आधी विचार करू या.

## अंबर हुसेन, हुसेनी अंबरखान की हुसेन अंबरखान ?

या कवीचा उल्लेख काही ठिकाणी 'हुसेनी अंबरखान' असा आढळतो. डॉ ढेरे यांनी त्यांचा 'हुसेन अंबरखान' असा निर्देश केला आहे. प्रा प्रियोळकर यांनी हुसेन व अंबरखान या शब्दांचे सामासिक रूप 'हुसेनांबरखान' हे योजिलं आहे[५] स्वतः कवी मात्र आपला निर्देश 'हुसेनी अंबरखान' 'हुसेन अंबरखान' आणि 'अंबर हुसेन' असा तीन प्रकारे करतो. पहिल्या अध्यायाच्या पाचव्या ओवीत दुसरा उल्लेख आला आहे.[६] अध्याय - समाप्तीच्या संस्कृत पुष्पिकेत तो आपला उल्लेख 'श्रीमदंबरहुसेन' असा करतो.[७] याच ठिकाणी आपल्या गीताटीकेचा उल्लेख, तो 'अंबरहुसेनी' असा करतो, 'हुसेन अंबरी' किंवा 'हुसेनी अंबरी' असा करीत नाही. शिवाय पहिल्या अध्यायाच्या दहाव्या ओवीतदेखील त्यानं आपल्या टीकेचं नाव 'अंबरहुसेनी' असंच नोंदविलं आहे.[८] जी गीताटीका ज्ञानेश्वरांनी लिहिली ती 'ज्ञानेश्वरी' नि जी अंबरहुसेनांनी लिहिली ती 'अंबर हुसेनी.' या न्यायानं व स्वतः कवीनं नोंदविल्यानुसार त्याचं नाव 'अंबर हुसेन' हेच अधिक स्वीकारार्ह वाटतं. 'अंबर' हे अरबी 'अमीर' या शब्दाचं मराठीकरण होय. फार्सी 'कमर'पासून 'कंवर' अरबी 'इमारी'पासून 'अम्बारी'[९] या शब्दांत जशी स्पर्शागमाची प्रक्रिया घडली आहे तशी 'अमीर' शब्दाचं 'अंबर' या शब्दात रूपांतर होत असताना घडली असावी. यावरून कवीचं मूळ नाव 'अमीर हुसेन' असं असावं.

अंबर (अमीर) हे कवीच्या घराण्याचं ही नाव असावं. त्यानंच आपल्या गीताटीकेच्या पहिल्या अध्यायाच्या ६ व ७ क्रमांकांच्या ओव्यांत म्हटल्याप्रमाणं त्याची घराण्याची परंपरा अशी आहे -

अंबर अंबरखान
|
याकूत अंबरखान
|
हुसेनी अंबरखान (हुसेन अंबरखान / अंबर हुसेन)

या संदर्भातील मूळ ओव्या अशा -

'आधी अंबर अंबरखान । त्याचा पुत्र अंबरखान ।।
त्याचा सुत हुसेनी अंबरखान । असे जगद्वंद्य ।।६।।
हुसेन अंबरखान । या नावांचे अर्थविवरण ।
एकाक्षर निघंटु पाहोन । लिहिलें असे ।।७।।'

अंबर हुसेनखानांचे चरित्रकार व शिष्यसदृश अनुयायी मात्र त्यांचा 'अंबर' असाच जवळीकीनं उल्लेख करतात,असं दिसतं. तंजावरकडील वैद्यनाथ, या समकालीन भाष्यकारानं आपल्या 'अष्टवक्र भाष्याला'ला 'सिद्धान्तचिदम्बरी' हे नाव देऊन त्यांच्याविषयीची श्रद्धा प्रकट केली आहे तर याच भाष्यकारानं अंबर हुसेनांच्या जन्माविषयीच्या प्रकरणाचं नाव 'चिदंबरजयंतीस्तोत्र' असं ठेवलं आहे. या दोन्ही रचनांच्या नावांत 'अंबर' हाही विशेषनामोल्लेख आहे, हे लक्षात घ्यायला हवं.

**घराण्याची हकीगत**

'अंबर हुसेनी' ग्रंथांतर्गत प्रमाणांच्या आधारे या घराण्याच्या केवळ तीन पिढ्यांचीच माहिती उपलब्ध होते. त्यांतील अंबरखान हे अंबर हुसेन यांचे आजोबा नि याकूत हे त्यांचे वडील. अंबरखान यांच्याविषयी डॉ. ढेरे यांनी उपयुक्त माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा इथं साभार उल्लेख करतो. [११]

अंबरखान हा दौलताबादेचा अधिकारी असल्याची दोन - तीन महत्त्वाची प्रमाणं ते देतात :

१) यांतील पहिलं प्रमाण सातारा जिल्ह्यातील चिमणगावच्या दिवाकर घराण्याच्या जोशी - कुलकर्णीपणाच्या वादाच्या निवाड्याच्या इ. स. १६१८ च्या सनदेचं असून ती सनद दौलताबादच्या अंबरखान या अधिका-यानं दिली होती.

२) दुसरं प्रमाण सतराव्या शतकातील संतकवी रमावल्लभदास यांच्या जीवन - चरित्राचं असून त्यात त्यांचे वडील अंबाजीपंत दौलताबादेच्या अंबरखानांचे मुख्य कारभारी असल्याची माहिती मिळते. रमावल्लभदास - शिष्य राघवदास यांनी 'बिरुदावली' नामक प्रकरणात ही माहिती दिली आहे. तिच्यात देवगिरीस 'म्लेच्छ यातीचा राजा' होता. त्याचा प्रधान अंबरखान असून अंबाजीपंत हे त्याचे कारभारी होते, असा उल्लेख आहे.

३) इ. स. १६३३ मध्ये मोगलांनी दौलताबाद जिंकून निजामशाही संपविली, तेव्हा शहाजीराजांनी आदिलशाही सरदार मुरार जगदेवाच्या उपस्थितीत मुर्तुजानामक निजामशहाच्या वारसाचा राज्याभिषेक

केला व मोगलांना हल्ले करून जेर केलं; या वेळी मुरार जगदेवांनी त्यांच्या साहाय्यासाठी अंबरखानाच्या अधिपत्याखाली पाचसहा हजार फौजेची कुमक दिल्याची नोंद इतिहासात आढळते. यावरूनही अंबरखानाचं महत्त्व लक्षात येतं.

'अमीर' या अरबी शब्दाचा अर्थ 'श्रीमंत' असा तर आहेच पण 'सरदार' असाही आहे. अंबर हुसेनांचं घराणं असं सरदारघराणं असावं. त्यांच्या घराण्याचं नाव डॉ. ढेरे म्हणतात त्याप्रमाणं अंबरखान हे नसून 'अमीर' हे असावं व ते सन्मानदर्शक असावं, असं मला वाटतं.

मराठीत 'सरदार मुजुमदार'सारखे शब्दप्रयोग रूढ आहेतच. डॉ. ढेरे यांनी अंबरखानांच आणखी एक वैशिष्ट्य नोंदविलं आहे ते मुसलमान व हिंदू मराठी संतकवींच्या संदर्भात महत्त्वाचं आहे. ते म्हणतात, 'हा अंबरखान दौलताबादेस अधिकारी असताना त्या ठिकाणी चांद बोधले, जनार्दनस्वामी, रमावल्लभदासांचे वडील अंबाजीपंत यांसारखे साधुसज्जन त्यांच्या आश्रयाने नांदत होते. आपली परमार्थसाधना निर्वेधपणे आचरू शकत होते.या वस्तुस्थितीवरून अंबरखानाच्या मानसिक घडणीची कल्पना करता येते.'

त्याचप्रमाणं वर उल्लेखिलेला अंबरखान 'म्हणजेच कालदृष्ट्या विचार करता हुसेन अंबरखानाचा पिता याकुत अंबरखान असावा' हा निष्कर्षदेखील युक्तिसंगतच आहे.गीताटीकाकार अंबर हुसेन हे मुसलमान असल्यानं त्यांचा इस्लामधर्माचा अभ्यास असावाच, तथापि वरील सत्संगामुळं व सामंजस्यपूर्ण वातावरणात वाढल्यामुळं त्यांनी हिंदू धर्माचा व भारतीय तत्त्वज्ञानाचाही सखोल गाढा अभ्यास केला असावा, हे त्यांच्या ग्रंथावरून जाणवल्यावाचून राहात नाही.

## अन्य चरित्रात्मक माहिती

### अ) जन्मतिथी व निर्याणकाळ

वैद्यनाथांच्या 'चिदंबरजयंतीस्तोत्रा'त अंबर हुसेन याची जन्मतिथी मंगळवार ज्येष्ठ शुद्ध ११, शके १५२५ (इ. स. १६०३) शुभनाम संवत्सर' अशी दिली आहे; त्याचप्रमाणं अंबरखान कलियुगातील देवावतार असल्याचंही निर्देशिलं आहे. त्यांच्या निर्याणकालाची माहिती मिळत नाही. त्याचप्रमाणं अन्य चरित्रात्मक तपशील उपलब्ध होत नाहीत.

### आ) गुरुपरंपरा व सांप्रदायिक संदर्भ

चांद बोधले व शेख महंमद यांचा सूफी संप्रदायातील कादरी परंपरेशी असलेला संबंध सर्वज्ञात आहे, त्याचप्रमाणं त्यांचं वारकरी परंपरेशी असलेलं नातंही जनपरिचित आहे. याकुत अंबरखान आणि चांद बोधले यांचे संबंध लक्षात घेता अंबर हुसेन यांचा सूफी संप्रदायाशी काही संबंध वा अनुबंध असावा, असा तर्क केल्यास तो अप्रस्तुत ठरणार नाही पण हा मुद्दा आजवरच्या कुठल्याही अभ्यासकानं वा संशोधकानं मुळीच उपस्थित केलेला नाही. निजामशाहीचा काळ, दौलताबादचा

परिसर, याकूत अंबरखानांचे चांद बोधले, जर्नादनस्वामी, रमावल्लभदासांचे वडील अंबाजीपंत यांच्याशी असलेले संबंध, त्या काळातील हिंदू - इस्लामी परंपरांचं परस्परसामंजस्य इ. बाबींचा विचार अंबरहुसेनांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीच्या संदर्भात व्हायला हवा होता, तो कुणीही केला नाही. वैद्यनाथांसारख्या भाष्यकारांनी त्यांना कलियुगातील (म्लेंच्छ) देवावतार का मानावं व त्याचा तसा उल्लेख आपल्या ग्रंथात का करावा, याचा उकल आपण करायला हवा.

अंबर हुसेन स्वतःच स्वतःला 'जगद्वंद्य' म्हणण्याचं साहस का करतात, याबद्दल कुणालाही निश्चितपणे जिज्ञासा वाटेल. अच्युताश्रम - निवृत्तिनाथांच्या टीका उपलब्ध असतानाही आपणच 'निका ब्रह्मबोध' करीत आहोत'', असं का म्हणावं, त्याचप्रमाणं 'वेदान्यांचा (वेदान्त्यांचा.) शिरोमणी। ब्रह्मज्ञानियांचा मुकुटमणी म्हणौनि हुसेन अंबरखान जनी । प्रसिद्ध असे' ।। १ x ८ ।। असा आपला लौकिक असल्याचं आपल्याच 'अंबर हुसेनी' या ग्रंथात का वर्णन करावं, हे सारे प्रश्न आपण समजून घेतले पाहिजेत व त्यामागील अंबरहुसेनांचं आत्मविश्वासपूर्ण,बहुश्रुत, व्युत्पन्न व्यक्तिमत्त्वही लक्षात घेतलं पाहिजे. तंजावरच्या भागातही त्यांच्या रचनेची प्रभावकक्षा असू शकते व तंजावरच्या सरस्वतिमहाल ग्रंथालयाच्या पोथीशाळेतही त्यांच्या रचनांच्या प्रती (तीन - तीन चार - चार प्रती ) आजही उपलब्ध होतात, हे पाहिल्यावर आपलं मन दौलताबादेपासून तंजी - (तंजावर)पर्यंत प्रवास करू लागतं नि एवढ्या ख्यातकीर्त संतकवींची अन्य चरित्रात्मक माहिती का उपलब्ध होऊ नये, याबद्दल साहजिकच अस्वस्थ होतं. ती उपलब्ध झाली नाही तर त्यांच्या भाष्यग्रंथावरून त्यांची महती शोधण्याचा ते प्रयत्न करू लागतं.

अंबर हुसेनांच्या गुरुपरंपरेचा शोध घेण्याचा किंवा त्याविषयी अनुमान करण्याचा प्रयत्न डॉ. ढेरे यांनी केला आहे[११] पण त्यामुळं फारसं समाधान वाटत नाही. या संदर्भात डॉ. ढेरे यांनी 'अंबरहुसेनी', मधील पुढील ओवीचा विचार केला आहे व तिच्यामधील 'सच्चिदानंद' या शब्दावर लक्ष केंद्रित केलं आहे -

'जेथूनि हे विश्व होतें । जेथे मागुती लय पावतें।
तथा सच्चिदानंद श्रीगुरुते । साष्टांग नमस्कार ।
।। १ x ५ ।।

'सच्चिदानंद' हे अंबर हुसेनांच्या गुरूचं नाव की, 'सत्-चित्-आनंदस्वरूप गुरू', असा डॉ. ढेरे यांना पडलेला प्रश्न अत्यंत स्वाभाविक आहे. अंबरहुसेनांच्या गुरुपरंपरेविषयी काहीच माहिती उपलब्ध नसल्यानं त्याविषयी कुठलाही तर्क करता येणार नाही. डॉ. ढेरे यांनी केशवस्वामी भागानगरकर यांच्याविषयी तर्क केला असला तरी आग्रह धरलेला नाही, हेही योग्यच वाटतं.

अंबर हुसेनांचे गुरू वा त्यांची गुरुपरंपरा यांच्यासंबधी जशी प्रमाणं उपलब्ध होत नाहीत त्याचप्रमाणं त्यांच्या शिष्यपरंपरेविषयीही प्रमाणं उपलब्ध होत नाहीत. केवळ 'चिदंबरजयंतीस्तोत्र'कार

व 'सिद्धान्त चिदंबरी'कार वैद्यनाथ यांचा तसंच 'अंबर हुसेनी'चा त्यांचा 'लेखकु' नारायण यांचा त्यांचे शिष्य म्हणून उल्लेख करता येईल. एवढ्या 'जगद्वंद्य' गुरूंची शिष्यपरंपरा निश्चितपणे मोठी असणार. तिचा भावी संशोधकांनी शोध घ्यायला हवा. आमच्या पिढीनं या संदर्भात जेवढे यथाशक्ती प्रयत्न करायचे, ते केले आहेत.

## 'अंबर हुसेनी' : स्वरूप व वैशिष्ट्यं

ही मुसलमान संतकवीनं केलेली पहिलीवहिली मराठी गीताटीका होय. ज्ञानदेवांचे 'लेखकू' सच्चिदानंदबाबा, त्याचप्रमाणं या टीकेचे निर्माते अंबर हुसेन हे असून त्यांचे 'लेखकू' नारायण हे आहेत. त्यांनी आपला उल्लेख अठराव्या अध्यायाच्या ८५ व्या ओवीत असा केला आहे -

'हुसेनी अंबराचे कृपेनं । लिहिले असे हे नारायणे ।
यांत शुद्ध अबद्ध विचारणें । संतजनी ।।'

-असं म्हणून विनम्र भावही प्रकट केला आहे. पण हा 'नारायण' कोण, त्याचं पूर्ण नाव, त्याचं गाव याविषयी कसलीच माहिती मिळत नाही. तो समकालीन होता, हे सांगण्याची गरज नाही. अंबर हुसेनांविषयी वैद्यनाथांप्रमाणंच त्याला अपार आदर वाटत होता, हेही त्यानं केलेल्या उल्लेखावरून सहज लक्षात येतं.

वर्षभरातच बाळाजी त्रिमलनं इ. स. १६५४ मध्ये 'चंजी'ला म्हणजे तंजावरला या ग्रंथाची प्रतही तयार केल्याचा असा निर्देश आढळतो -

"शके १५७६ जयनामसंवत्सरे । दक्षिणायने शरदृते ।। अश्विन शुद्ध तृतीये
भौमवासरी 'चंजी' मध्ये लिहिले । बाळाजी त्रिमळेन संपूर्ण।।"

यावरून या ग्रंथाची तत्कालीन लोकप्रियता लक्षात येते. ग्रंथाचा लेखनसमाप्तिकाळ अठराव्या अध्यायाच्या शेवटी स्पष्टपणे दिला आहे. त्यावरून अंबरहुसेनांच्या काळाची निश्चिती करण्यासही साहाय्य होतं व ग्रंथान्तर्गत प्रमाणही उपलब्ध होतं. इ. स. १६५३ हा या ग्रंथाचा लेखनसमाप्तिकाळ आहे -

'शके पंधरासे पंचेहातरि । विचय नामसंवत्सरिं । आश्विन शुध्द दशमी सोमवारिं। अंबरहुसनी
टीका संपूर्ण जाली' ।।१८x८६।।

अठराव्या अध्यायांची ही गीताटीका डॉ. ढेरे [१४] यांच्या मतानुसार ८७१ ओव्यांची तर डॉ. स. गं. मालशे [१५] यांच्या मतानुसार ८१६ ओव्यांची आहे. डॉ. ढेरे यांनी तंजावरच्या सरस्वतिमहाल ग्रंथालयातील या ग्रंथाच्या चार हस्तलिखितांपैकी बयाजवार यादींतील वेदान्त वर्ग, अनु - ४९, वर्ग क्र. ३७४ चं हस्तलिखित प्रमाण मानलं असून मलाही ते स्वीकारार्ह वाटलं. 'अंबरहुसेनी'च्या अन्य हस्तलिखितांचे या संग्रहातील क्रमांक ५०, ५१ आणि ५२ असे आहेत कारण या प्रती क्र. ४९ च्याच नकला आहेत, हे प्रा. प्रियोळकर यांनीही नमूद केलं आहे. [१६] प्रा. अ. का. प्रियोळकरांनी

'मराठी संशोधन-पत्रिके'च्या ऑक्टोबर १९५४ च्या अंकात या ग्रंथाचे दोन अध्याय प्रसिद्ध केले असून जानेवारी १९६३ च्या अंकात ९ आणि १८ या अध्यायांतील काही भाग उद्धृत केला आहे. त्यामुळं अभ्यासकांची मोठीच सोय झाली आहे. या हस्तलिखिताचा लेखनकाळ शके १५७६ म्हणजे इ. स. १६५४ आहे.

पहिल्या अध्यायातील पहिल्या १४ ओव्या फार महत्त्वाच्या आहेत. त्यांत मंगलाचरण, गणेश - शारदा - गुरुवंदन याबरोबरच कवीची वंशावळ, ग्रंथनिर्मिति - प्रयोजन, पूर्वसूरींचे (भाष्यकारांचे / टीकाकारांचे) उल्लेख, स्वतःच्या टीकेचं वेगळंपण नि वैशिष्ट्यं इ. कितीतरी बाबी आल्या आहेत. त्या फार महत्त्वाच्या आहेत.

बहुतेक सर्व मुसलमान मराठी संतकवींच्या ग्रंथांचं वैशिष्ट्य त्यांच्या मंगलाचरणांतही लक्षात येतं. शेख महंमद आणि शहामुनी यांच्या अनुक्रमे 'योगसंग्राम' व 'सिद्धान्तबोध' या ग्रंथांचा मला इथं विशेषकरून उल्लेख करायचा आहे व त्या त्या कवीच्या संदर्भात मी त्या त्या ठिकाणी सविस्तर विवेचन केलंच आहे.

ते मंगलाचरणापूर्वी अंबर हुसेन 'श्रीगणेशाय नमः' असं म्हणून भारतीय प्रथेप्रमाणं आधी गणेशवंदन करून ग्रंथलेखनाला प्रारंभ करतात. नंतर गणेश, शारदा आणि गुरू यांना वंदन करताना त्यांनी काय काय म्हटलं आहे, ते बारकाईनं पाहू या. गणेशाला वंदन करताना अंबर हुसेन म्हणतात,

'भेदाभेदाचा आग्रह उदंड । तोचि विघ्नसमूह प्रचंड ।
तेयातें नाशिता जो वक्रतुंड। तया नमस्कारु ।। १ x १।।
जो ब्रह्मादिकांचा स्वामी एक । जया नसे आणिख नायक ।
ऐसा जो सर्वोत्तम विनायक । तया नमस्कारु' ।। १ x २।।

अंबर हुसेन हे इस्लामधर्मानुयायी आहेत. इस्लाम जातिभेद वा स्तरभेद मानीत नाही. या दृष्टीनं 'अंबरहुसेनी'ची ही पहिलीच ओवी अत्यंत बोलकी आहे. इस्लामच्या व हिंदू धर्मांच्या मूळ तत्त्वांत अंबर हुसेनांना काही साम्यस्थळं गवसतात, त्यांपैकी भेदाभेदाला अमान्यता, विषमतेला विरोध, समानतेचा पुरस्कार हे एक - ते ग्रंथारंभी सर्वप्रथमच का यावं, ते आपण नीट समजून घ्यायला हवं. त्यामागील हेतूही लक्षणीय व चिन्त्य आहे.

एकेश्वरवाद हे इस्लामचं प्राणभूत तत्त्व आहे. भारतीय दर्शनांतही अवतारवाद वा अनेक देवतांचे उल्लेख असेल तरी परमात्मा एकच आहे, हा केन्द्रीभूत विचार असल्यानंच -

'जो ब्रह्मादिकांचा स्वामी एक।
जया नसे आणिख नायक।।'

असं अंबर हुसेन गणेशस्तुतीच्या निमित्तानं आग्रहपूर्वक सांगत आहेत.

अज्ञानाचा विनाश व आत्मज्ञानाची प्राप्ती हेही इस्लाम व हिंदू धर्मांचं महत्त्वाचं आध्यात्मिक उद्दिष्ट आहे, ते शारदावंदनात अंबर हुसेनांनी किती सहजतेनं प्रतिपादिलं आहे-

'भक्ती-ब्रह्मानंद देती। अवतार, अज्ञान खंडिती।
ऐसी शारदा सरस्वती। तिये नमस्कारु ।। १ x ३।।

गुरू हा परमात्मस्वरूप असतो, हे भारतीय दर्शन - परंपरा मानते. सूफी संप्रदायातही गुरूचं - 'पीरां'चं, वलींचं, असंच महत्त्व मानलं आहे. परमात्म्यानंच विश्व निर्मिलं. तोच विश्वाचं प्रतिपालन नि संहार करतो, ही कल्पना भारतीय दर्शनाप्रमाणं इस्लाममध्येही आहे. तीदेखील अंबर हुसेन ग्रंथारंभीच परमेश्वरस्वरूप गुरूला वंदन करताना मांडतात -

'जेथूनि हें विश्व होतें । जेथे मागुती लय पावतें।
तया सच्चिदानंद श्रीगुरूतें । साष्टांग नमस्कारू' ।। १ x ५।।

परमात्मा हा विश्वनिर्माता आहे, ही कल्पना भारतीय दर्शनात व कुराणातही आहे. 'अंबर हुसेनी'च्या नवव्या अध्यायाच्या प्रारंभी तेराव्या ओवीत ही कल्पना कवीनं अशी विशद केली आहे -

'माझिया आधारे प्रकृती । प्रसवे चराचर व्यक्ती।
याकारणे सुभद्रापती । जग हे फिरते' ।। ९ x १३।।

सगुणामागील निर्गुण तत्त्व महत्त्वाचं आहे, हा विचार अंबर हुसेन याच अध्यायात आग्रह - पूर्वक मांडतात. इस्लाममधील निर्गुणविचार अंबर हुसेनांच्या विचारविश्वात केंद्रीभूत आहे व तोच भारतीय दर्शनातही त्यांना आढळल्यानं ते त्याचा आग्रहपूर्वक पुरस्कार करतात, हेही इथं समजून घ्यायला हवं -

'मूढ अवगणिती मातें । मनुष्यदेह धरिती यातें।
माझे परतत्त्व न जाणती ते। जें सर्वभूतांचे नियंते।।' (-अंबरहुसेनी, ९ x १३)।।[१०]

## 'समश्लोकी,' 'समओवी' की ओवीबद्ध भाष्यरचना?

याविषयी या प्रकरणाच्या सुरुवातीला काहीसा विचार केला आहे. गीतेच्या ७०० श्लोकांवर ८७१ ओव्यांचं भाष्य, असं या ग्रंथाचं स्वरूप असून त्यावरूनही 'समश्लोकी' किंवा 'समओवी' टीका म्हणून हेटाळता येईल का? शिवाय त्यात अंकगणिताची चूक होईल ती वेगळीच. तिला केवळ 'ओवीबद्ध भाष्यरचना' म्हणूनही भागेल, असं वाटत नाही.

मूळात अंबर हुसेनांना फार मोठी भाष्यरचना करायचीच नाही, हे त्यांच्या 'तात्पर्यार्थ लिहिजे' या पहिल्या अध्यायातील चौदाव्या ओवीतील उल्लेखावरून स्पष्ट होतं. पहिल्या अध्यायाच्या या चौदाच ओव्या आहेत पण त्यांचा उपयोग या गीताटीकाकारानं किती चपखलपणे केला आहे!

ज्ञानदेव जसे 'प्रतिपदी झाडा देईन' अशी प्रतिज्ञा 'ज्ञानदेवी'च्या पहिल्या अध्यायातच करतात, त्याप्रमाणं जणू अंबर हुसेनदेखील १७१ ओव्यांतील प्रत्येक जास्तीच्या ओवीचा मूळ सातशे ओव्यां - बरोबरच झाडा किंवा हिशेब देऊन तिची अन्वर्थकता पटविणार आहेत, असं वाटतं. या पहिल्या अध्यायातील पहिल्या चौदा ओव्यांत मंगलाचरण, गणेश-शारदा-गुरुवंदन, स्वकुळवर्णन, पूर्वसूरींचा, पूर्वभाष्यकारांचा निर्देश, प्रस्तुत टीकेच्या लेखनाचं प्रयोजन, तिची फलश्रुती इ. कितीतरी गोष्टी सांगून जातात. जणू या सा-या गोष्टींची तिथं 'कोंदाकोंदी'च झाली आहे. गणितच करायचं झाल्यास या प्रास्ताविक चौदा ओव्यांवरून सम ओव्यांपेक्षा अधिकच्या १२१ ओव्यांचंही करता येईल.

अंबर हुसेन हे बहुश्रुत आहेत, याची प्रचीती यातील पुढील ओव्यांवरून येते. सातव्या ओवीत 'एकाक्षर निघंटु पाहोन लिहिले असे' असं कवी म्हणतो. त्यानं अच्युताश्रम व 'निवृत्तिनाथादिकां'च्या गीताटीका पाहिल्या आहेत, असा उल्लेख अकराव्या ओवीत आहे, तर

'भाष्य शंकराचार्यांचे । आणि व्याख्यान श्रीधरस्वामींचे।
पाहोनिया भगवद्गीतेची । टीका महाराष्ट्र भाषेतें करिजे' ।। (१ x १३)।।

-असं म्हणून 'शांकरभाष्य' नि 'श्रीधरी टीका' यांचाही ते निर्देश करतात.

यापूर्वी दहाव्या शतकात भारतात आलेल्या अल्बेरूनी या अरब विद्वानानं अरबी भाषेत गीतेवर अनुवादात्मक भाष्यग्रंथ लिहिला होता. त्यानंतरचा 'महाराष्ट्र भाषे'तला हा एका मुसलमान भाष्यकाराचा पहिलाच प्रयत्न.

अंबरहुसेनांची बहुश्रुतता जशी त्यांच्या लेखनातून प्रकटते त्याचबरोबर त्यांचा आत्मविश्वासही प्रकटतो. काही वेळा तो विनयाचंही सीमोल्लंघन करीत असल्याचं जाणवतं. त्याचा 'सुत हुसेनी अंबरखान असे जगदवंद्य' ।। १ x ६।। असं म्हणताना या कवीला संकोच वाटत नाही; एवढंच नव्हे तर 'वदान्यांचा (वेदान्त्यांचा) शिरोमणी' आणि 'ब्रह्मज्ञानियांचा मुकुटमणी म्हणौनि आपण जनी प्रसिद्ध आहोत', असंही तो मोकळेपणानं पहिल्या अध्यायाच्या सातव्या ओवीत सांगतो. 'निका ब्रह्मबोध' व्हावा यासाठी 'उपकारार्थ सर्व लोकां' आपण ही टीका लिहिली आहे, असं अंबर हुसेन पहिल्या अध्यायाच्या दहाव्या ओवीत सांगतात. आपण जो गीतार्थ सांगत आहोत, त्याबद्दल कुणाला 'वसवसा' (शंका) असल्यास त्यानं 'अभिधानकोश' पाहून निर्णय करावा, असंही त्यांनी ठामपणे सांगितलं आहे. (१ x ९)

अंबर हुसेनांच्या विवेचनपद्धतीची एक-दोन उदाहरणं इथं देतो. त्यातील पहिलं उदाहरण पहिल्या अध्यायातील अर्जुनाला पडलेल्या कुलक्षयाच्या व वर्णसंकराच्या विवेचनेचं आहे -

'कुलक्षण जालिया जाण। कुलधर्मनाशती पुरातन।
धर्म नाशलिया कुल संपूर्ण । अधर्म जितितो।।
अधर्म व्यापिले कुल म्हणौन। कुलस्त्रिया दुष्ट होती जाण।
स्त्रिया दुष्ट असतां संपूर्ण । वर्णसंकरू होय।।
नरकात पाडितो संकर । कुलघ्नी आणि कुल साचार।
यांचे पडती पितर । पिंडोदकेंरहित ।।
कुलघ्नांचियां दुरितिं। वर्णसंकराते करिति।
जातिधर्म लुप्त होती । आणि शाश्वत कुलधर्म' ।। १ x ४०.४३।।

दुसरं उदाहरण दुस-या अध्यायातील आत्मानात्मविवेकाचं आहे (२ x ४०-४८) पण विस्तार-भयास्तव ते देत नाही.

भगवद्गीतेला युद्धाची पार्श्वभूमी आहे. या अनुषंगानं अर्जुनाच्या मानसिक अवस्थेचं व व्यथेचं तसंच आनुषंगिक प्रसंगांचं थोडक्यात पण रेखीव चित्रण करण्यात अंबर हुसेन यशस्वी झाले आहेत. त्यांचं संवादलेखनही परिणामकारक वाटतं व त्यातून प्रभावी व्यक्तिरेखा प्रकटतात.

प्रवाही व रसाळ भाषाशैली हे अंबर हुसेनांच्या कवित्वाचं वैशिष्ट्य असून त्यांची मार्मिक दृष्टान्तयोजनाही आपलं लक्ष वेधते. गीतेचा 'तात्पर्यार्थ' समर्थपणे संक्षेपात वर्णन करणारी व्युत्पन्न टीका म्हणून मराठी वाङ्‌मयेतिहासात या गीताटीकेची नोंद करता येईल.

---

## संदर्भ - टीपा

१) मुसलमानांची जुनी मराठी कविता, मराठी संशोधन मंडळ प्रकाशन, मुंबई, १९६५ पृ. १३ - १६
२) एकात्मतेचे शिल्पकार, डॉ. रा. चिं. ढेरे, मंजुल प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. ३८ - ४५.
३) महाराष्ट्र - सारस्वत, पुरवणी, पाचवी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६३, पृ. ८३०.
४) एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ४२.
५) कित्ता. पृ. ३८
६) मुसलमानांची जुनी मराठी कविता, पृ. १३
७) मराठी संशोधन-पत्रिका, ऑक्टोबर १९५४, पृ. ९.
८) कित्ता, पृ. १२ व १६.
९) कित्ता, पृ. १०.
१०) फार्शी - मराठी कोश, डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन, भा. इ. सं. मंडळ प्रकाशन, पुणे १९२५ पृ. ५
११) एकात्मतेचे शिल्पकार, ३९ - ४०.
१२) अंबर हुसेनी, १ x ११
१३) एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ४१.
१४) कित्ता, पृ. ४२.
१५) मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, खंड १, सं. डॉ. स. गं. मालशे, म. सा. परिषद, पुणे, प्रकशन, १९८२, पृ. १७८.
१६) मराठी संशोधन-पत्रिका, ऑक्टोबर १९५४, पृ. ९.
१७) मुसलमानांची जुनी मराठी कविता, सं. प्रा. अं. का. प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६५, पृ. १६.

---

# ६. चांदसाहेब कादरी
## ( चांद बोधले )

सोळाव्या शतकातील संतकवींमध्ये चांद बोधले यांचा आवर्जून उल्लेख केला जातो. बहुतेक सर्व मराठी वाङ्मयेतिहासकारांनी त्यांची व त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्याची तसंच त्यांनी निर्माण केलेल्या शिष्यपरंपरेची नोंद केली आहे, संत एकनाथांचे गुरू चांद बोधलेच होते, असा उल्लेख शेख महंमदांनी केला आहे. त्याचं विवरण या ग्रंथातील शेख महंमदविषयक प्रकरणात केलं आहे. श्री. वा. सी. बेंद्रे यांनी 'तुकाराममहाराजांचे संतसांगाती' ' डॉ. रा. चिं. ढेरे' आणि डॉ. ब्रह्मानंद देशपांडे' यांनी चांद बोधले यांच्याविषयी आपापली अभ्यासपूर्ण मतं मांडली आहेत. संतकवी चांद बोधले यांना वारकरी व सूफी परंपरेत मोठी मान्यता आहे. तेव्हा त्यांच्याविषयी कुठलाही पूर्वग्रह वा अभिनिवेश न बाळगता तसंच वस्तुनिष्ठ प्रमाणांच्या आधारे विचार व्हावा, असं मला वाटतं.

महिपतींच्या 'भक्तविजय' व 'संतविजय' या ग्रंथांत चांद बोधले यांचा उल्लेख आला आहे. जनार्दनपंतांनी एकनाथांना आपल्या गुरूच्या दर्शनाला नेले व हे गुरू यवन होते, अशा आशयाच्या दोन कथा 'भक्त विजया'च्या चाळीसाव्या अध्यायात आल्या असून त्यांचा आधार ही श्री. बेंद्रे ' यांनी घेतला आहे.

महिपतींचा हा उल्लेख असा -

'जनार्धन म्हणे एकनाथा । आमुचे स्वामी वोळखीं आतां ।
ते अविंध बैसोनि अश्वापरुता । आला अवचित त्या ठाया ।। ७६ ।।'
एकरूप देखता दृष्टी । एकनाथ जाले भयभीत पोटीं ।
प्रत्यक्ष यवन दिसतो दृष्टी । असत्य गोष्टी मज वाटे ।। ७७ ।।
विशाळा डोळे, आरक्त नयन । हाती शस्त्र, अश्व वाहन ।
सान्निध येऊनि उतरला जाण । मग केले जनार्दनें नमन त्यासीं' ।। ७८ ।।

डॉ. ढेरे ' यांनी चांद बोधले म्हणजे सूफीच्या कादरी शाखेचे संत सय्यद चांदसाहेब कादरी हे होते, हे पुढील सविस्तर विवेचनात स्पष्ट केलं आहे, ते मूळाप्रमाणे साभार उद्धृत करतो -

'शेख महंमदाने 'योगसंग्रामा'त आपल्या गुरूचा स्पष्ट उल्लेख केला आहे-
ॐ नमो जी श्रीसद्गुरु चांद बोधले । त्यांनी जानोपंता अंगीकारिलें ।
तानोबाने एका उपदेशिले । दास्यत्वगुणे ।। १५-१ ।।

हाच संबंध त्याने एका अभंगातही पुढीलप्रमाणे स्पष्ट करून सांगितला आहे -

धन्य चांद बोधले । त्यांनी जानोपंता लोधले ।
त्यांच्या शेषे धाले । एकोजनार्दन ।।
केली भागवत-टीका । उद्धार विश्वलोकां ।
तेच दिसे सायेका । स्वामीपाशीं ।। १६ ।।

या दोन्ही अवतरणांतून शेख महंमद आणि जनार्दनस्वामी हे गुरुबंधू होते, ही वस्तुस्थिती उघड आहे. त्यांचा संबंध असा मांडून दाखविता येईल -

महंमद गौस
|
राजे महंमद
|
चांद बोधले
|
जनार्दनस्वामी — शेख महंमद
|
एकनाथ

पारंपरिक समजुतीप्रमाणे जनार्दनस्वामींचे गुरू श्रीदत्तात्रेय होत. परंतु अनेक ऐतिहासिक पुराव्यांनी ही गोष्ट स्पष्ट होत आहे की, जनार्दनस्वामींचे गुरू पौराणिक दत्तात्रेय नसून, दत्तावतारी समजले जाणारे सत्पुरुष चांद बोधले हेच होत. ते गुरुपरंपरेने सूफी साधू असल्याने सूफी वेशात म्हणजे मलंगवेशात राहत असत. नाथांच्या पारंपरिक चरित्रात मलंगवेशाने दर्शन देणा-या दत्तात्रेयाचा जो उल्लेख येतो, तो दत्तात्रेय म्हणजे हे मलंगवेशात वावरणारे दत्तावतारी साधू चांद बोधलेच होत. नाथांचे एक चरित्रकार कृष्णदास जगदानंदनंदन यांनी आपल्या 'प्रतिष्ठानचरित्र' या ग्रंथात स्पष्टपणे म्हटले आहे की-

एकनाथासी करीतां बोध । तंव आला चांदबोध ।
चंद्रशेखर महासाधू । अवतार प्रसिद्ध दत्तात्रयाचा ।। (प्र. च. २-६७) ।।

नाथांच्या परंपरेतील अनेक सत्पुरुषांनी हा वस्तुस्थिती मान्य केलेली आहे. स्वतः शेख महंमद चांद बोधल्यांना नमन करताना 'तुम्ही महावरिष्ठ दिगंबरु', 'जय जय सद्‌गुरू दिगंबरा' अशा शब्दांत चांद बोधल्यांचे दत्तावतारित्व सूचित करतो.

शेख महंमदाला परमबोधाचा अधिकारी बनविणारे हे चांद बोधले मोठे प्रभावशाली साधू होते. त्यांचा निजामशहावर अत्यंत प्रभाव होता.

शेख महंमदाने आपल्या गुरूला 'अजमतेचे धनी' म्हणजे 'सिध्दीचे स्वामी' म्हटले आहे. या प्रभावामुळेच पुढे निजामशाहीत चांद बोधले आणि त्यांचा शिष्यपरिवार यांना विशेष प्रतिष्ठा लाभलेली दिसते. जनार्दनस्वामींनी बांधलेली चांद बोधल्यांची समाधी देवगिरीच्या पायथ्याशी आजही आहे. चांद बोधल्यांनी सूफी साधना आणि सूफी वेश स्वीकारलेला असल्याने ते हिंदू असूनही त्यांचे समाधिमंदिर दर्ग्याच्या स्वरूपात आहे.'

डॉ. ब्रह्मानंद देशपांडे यांनी या दोन्ही अभ्यासकांच्या विरोधात मत मांडलं आहे. त्यामुळं चंद्रभट आणि चांद बोधले (चांदसाहेब कादरी) असे या प्रश्नाचे दोन दृष्टिकोन निर्माण झाले.

शेख महंमदाच्या 'योगसंग्रामा'चा व अन्य रचनांचा (दक्खिनी रचनांसहित) मी जो सूक्ष्म अभ्यास केला आहे तो या संदर्भात कृपया पाहावा. तो केल्यानंतरच मी चांद बोधले यांच्याविषयी हे विवेचन करीत आहे.

'योगसंग्रामा'त व आपल्या अन्य रचनांत शेख महंमद चांद बोधले (चांदसाहेब कादरी) यांचा उल्लेख करतात. त्यांच्या 'सिजरा-जदि-कादरी'ला तर प्रमाण मानायलाच हवं. त्यातही हा उल्लेख आढळतो. तो अभ्यासकांना उपलब्ध व्हावा म्हणून शेख महंमदविषयक प्रकरणात मूळातून उद्धृत केला आहे. शेख महंमदांचा भारतीय दर्शनांप्रमाणंच 'तसव्वुफ'चा (सूफी तत्त्वज्ञानाचा) कसा व्यासंग होता व ते ती परंपरा कसे मानत, याची प्रमाणं त्यांच्या लेखनात आढळतात व त्याविषयी ही मी त्या प्रकरणात विचार केला आहे. गौस महंमद -राजे महंमद- (शेख महंमदांचे वडील)- चांद बोधले (चांदसाहेब कादरी) - शेख महंमद अशी एक शाखा व परंपरा तर निश्चितच आहे. चांद बोधले-जनार्दनस्वामी-एकनाथ ही दुसरी शाखा व परंपरा आहे. तिचा अन्वयार्थ काही अभ्यासकांना वेगळ्या प्रकारे लावावयाचा असल्यास त्यांचं ते मत प्रतिपादिण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे पण त्यामुळं शेख महंमदांची कादरी परंपरा नाकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

चांद बोधले यांनी काही अल्पस्वल्प स्फुट अभंगात्मक लेखन केलं आहे. ते म. म. द. वा. पोतदार यांच्या संग्रहातील बाडात आहे. ते मला उपलब्ध होऊ न शकल्यानं मी त्याचं विवेचन करू शकलो नाही.

---

## संदर्भ - टीपा

१. तुकाराममहाराजांचे संतसांगाती, वा. सी. बेंद्रे,
मौज प्रकाशन, मुंबई. १९५८, पृ. ५८-६१.

२. एकात्मतेचे शिल्पकार, डॉ. रा. चिं ढेरे,
मंजुल प्रकाशन, पुणे. १९९४, पृ. ८०-८२.

३. तीन शोध निबंध, डॉ. ब्रह्मानंद देशपांडे,
परिचय प्रकाशन, औरंगाबाद, १९८२, पृ. २८-३०.

४. तुकाराममहाराजांचे संतसांगाती, पृ. ६०.

५. एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ८०-८१.

# ७. शेख महंमद

मुसलमान मराठी संतकवींमध्ये शेख महंमद हे अग्रेसर होत. 'ज्ञानाचा एका, नामयाचा तुका आणि कबीराचा शेका' या वारकरी संप्रदायात प्रचलित असलेल्या लोकप्रिय उक्तीतील 'शेका' म्हणजे संतकवी शेख महंमद हे होत. संतनामावळ्यांत आणि मराठी वाङ्मयेतिहासात शेख महंमदांचा उल्लेख आवर्जून केला जातो, त्याचप्रमाणं मोरोपंतांच्या 'सन्मणिमाले'तील शेख महंमदांचा पुढील उल्लेखही त्यांचे बहुतेक अभ्यासक नेहमी करतात–

'तारिती न कीर्तीच्या, जो न लये । त्या मुसल-मानवा नावा ।
हर्षे सेख महंमद भगवज्जन । मुसलमान मानावा' ॥ ८० ॥

संतचरित्रकार दास गणू यांनी शेख महंमदांचं चरित्र लिलिलं आहे. प्रा. अ. का. प्रियोळकर, श्री. वा. सी. बेंद्रे, डॉ. रा. चिं. ढेरे व डॉ. भीमा मोदळे यांनी शेख महंमद व त्यांचं साहित्य या-विषयी केलेला विचार उपयुक्त आहे. श्री. वा. सी. बेंद्रे यांचं या संदर्भातील ऋण विशेषकरून उल्लेखायला व मान्य करायला हवं. त्यांनी शेख महंमदांचं चरित्र, त्यांचं घराणं, त्यांची वंशपरंपरा व साहित्य याविषयी ज्या आस्थेनं लेखन केलं, तिचाही इथं आवर्जून निर्देश करायला हवा. त्यांनी दोन खंडांमध्ये या संतकवीचं साहित्य संपादून प्रसिद्ध केलं, हे त्यांचे थोर उपकार आहेत. त्यांतील पहिल्या खंडात शेख महंमदांच्या 'योगसंग्रामा'चं संपादन केलं असून दुस-या खंडात त्यांच्या अन्य कवितेचं संपादन केलं आहे. त्यांनी हे मौलिक कार्य केलं नसतं तर पुढच्या काळा तील अभ्यासक/संशोधकांना ही मौलिक सामुग्री कशी लाभली असती ?

## शेख महंमदांची जीवनगाथा

सुदैवानं शेख महंमदांच्या चरित्राविषयी विविध अभ्यासक/संशोधकांमध्ये बरीचशी एकवाक्यता आढळते. या संतकवीनं आपल्या लेखनातच स्वतःविषयीचे काही महत्त्वाचे उल्लेख केलेले असल्यानं अनेक ग्रंथान्तर्गत प्रमाणंही उपलबध झाली आहेत. याशिवाय 'चकनामा', 'सिजरा-जदि-कादिरी' इ. ऐतिहासिक प्रमाणंही शेख महंमदांच्या चरित्रावर आधारभूत प्रकाश टाकतात. डॉ. ढेरे म्हणतात त्याप्रमाणं 'त्यांच्या चरित्राची निखळ ऐतिहासिक साधनं अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहेत'[1], हे खरं असलं तरी जी उपलब्ध आहेत, ती फार मोलाची आहेत.

शेख महंमदांचं मुलाण्याचं घराणं मूळचं मराठवाड्यातल्या धारूरचं. त्यांचे वडील राज महंमद हे धारूरच्या किल्ल्याचे हवालदार होते. शेख महंमद धारूरलाच जन्मले. नंतर ते दौलताबादेस राहिले असावेत. हा प्रदेश चांद बोधले यांच्या प्रभावकक्षेतील असून राज महंमद हेही या प्रभावकक्षेत होते. अनेक ठिकाणी शेख महंमदांच्या वडिलांचा उल्लेख अभ्यासकांनी 'राजेमहंमद' असा केला आहे. स्वतः शेख महंमद 'राज महंमद' असाही उल्लेख करतात.

'योगसंग्रामा'च्या तिस-या प्रसंगाच्या पन्नासाव्या ओवीत हा उल्लेख आहे-

'याति गोरे राज महंमद पिता । सगुण पतिव्रता फुलाई माता' ।।

राज महंमदांची कबर धारूरला आहे. श्रीगोंदा येथील शेख महंमदांचे वंशज राज महमंद (पत्नी फुलाई) - शेख महंमद -दावलजी (लाऊजी)- हकीमजी - बालबाबा - मंगलबाबा - हफीजबाबा अशी परंपरा सांगतात.

मंगलबाबानंतरची आजवरची परंपरा कमालबुवा- रंगोबुवा - कबीरबुवा - गुलाब - हुसेन कमालबुवा शब्बीर अमीन अशी आहे. आजची पिढी ही अकरावी पिढी आहे, असं सांगतात.

## सूफींची कादरी परंपरा

शेख महंमदाच्या सूफी परंपरेवर 'सिजरा-जदि-कादिरी' या प्रकरणामुळ फार महत्त्वाचा प्रकाश पडतो. या प्रकरणाचा डॉ. ढेरे व अन्य अभ्यासकांनी जाता जाता उल्लेख केला असला तरी त्याचा बारकाईनं अभ्यास करायला हवा, असं मला वाटतं. हे महत्त्वपूर्ण प्रकरण श्री. वा. सी. बेंद्रे यांनी शेख महंमदबाबा श्री गोंदेकर यांच्या 'कविता-संग्रहा'च्या दुस-या भागात पृ. १२३-१२४ वर प्रसिद्ध केलं आहे. हे प्रकरण २९ ओव्यांचं असून इस्लाम धर्मविषयीच्या प्रारंभिक उल्लेखात हजरत इमाम हसन-हुसेन यांची नावं चौथ्या ओवीत दिली आहेत.

'तंत रबुल (रब्बुल्)आलमीन ।
बयेतळ (बैतल्) मुकदस ।
जलु अला ।। १ ।।

काळन नबि रीसाल तपना ।
सलला (सल्ले आला) आहे (आलैहे)
सलम (वसल्लम्) ।। २ ।।

इमामे मसरक वैल (वल्) मगरब
आसुदुलाहिल गालिब
आमीरुल मोमीनीन
आली इबने आबु तालिब ।। ३ ।।

इमामे हसन इमामे हुसन सहि ।
देसत करबला
रजीअला हो ताला अनहु ।। ४ ।।'

एकविसाव्या ओवीपासून एकोणतिसाव्या ओव्यांपर्यंतची शेख महंमदांची कादरी परंपरा तपशीलानं दिली आहे, ती इथं उद्धृत करतो कारण श्री. वा. सी. बेंद्रे यांचा हा ग्रंथही आता दुर्मिळ झाला असून त्याबरोबरच हे शेख महंमदांचं चरित्रविषयक मौलिक साधन काळाच्या उदरात गडप होण्याची दाट शक्यता आहे-

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद अबु सहीद मुबारक मुखर मिरजा अला हो ताला अनहो रसीद ।। २० ।।

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद अबदुला कादर जिलानी अल हुसैनी बैल हुसैनी

शहिदेद संतकलबला रजी अला हो ताला अनहो रसीद ।। २१ ।।

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद अबदुल रजाक ताजोदिन कादरी रजी अला हो ताला अनहो रसीद ।। २२ ।।

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद महंमद गंबस ग्वालेरी कादरी रजी अला हो ताला अनहो रसीद ।। २३ ।।

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद राजे महंमद कादरी रजी अला हो ताला अनहो रसीद ।। २४ ।।

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद चांदसाहेब कादरी रजी अला हो ताला अनहो रसीद ।। २५ ।।

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद महंमदसाहेब कादरी रजी अला हो ताला अनहो रसीद ।। २६ ।।

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद लाडजी ( दावलजी ? ) सायेब कादरी रजी अला हो ताला अनहो रसीद ।। २७ ।।

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद हाकीमसायेब कादरी रजी अला हो ताला अनहो रसीद ।। २८ ।।

इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत

सयेद बालासायेब कादरी रजी अला हो ताला अनहो रसीद ।। २९ ।।

या विवरणात सैयद अब्दुला कादर जिलानी - सयेद अब्दुल रजाक ताजोदिन कादरी - सयेद्र महंमद गंबस ग्वालेरी कादरी - सयेद राजे महंमद कादरी - सयेद चांदसाहेब कादरी - सयेद महंमद-साहेब कादरी - सयेद लाडजी ( दावलजी ? ) सायेब कादरी - सयेद हकीमसाहेब कादरी अशी सूफी पंथाच्या कादरी शाखेची परंपरा दिली आहे. यातून सैयद चांदसाहेब कादरी (ऊर्फ चांद बोधले) यांचा व शेख महंमदांचा गुरुपरंपरेतील संबंध स्पष्ट होतो. यातील सयेद महंमदसाहेब कादरी म्हणजे शेख महंमद.

'योगसंग्रामा'च्या पंधराव्या प्रसंगाच्या प्रारंभी शेख महंमदांनी आपल्या गुरूला वंदन करून त्यांनी जाणोपंतांना (जनार्दनस्वामींना) उपदेशिलं आणि जाणोबानं संत एकनाथांना उपदेशिलं, ही आपल्या गुरुबंधूची परंपराही या शब्दांत दिली आहे-

'श्रीनिर्विकाराय नम : ।। श्रीगणेशाय नम : ।।'
ॐ नमो जी चांग बोधले । त्यांनी जानोपंता अंगिकारिलें ।।
जाणोबानें एका उपदेशिलें । दास्यत्वगुणें ' ।। यो. सं. १५ X १ ।।

याशिवाय याच प्रसंगात त्यांनी आपल्या गुरूचा आणखी एक उल्लेख चौथ्या ओवीत केला आहे -

'सत् चांद बोधल्याचे कुळी शेक ।
महंमदांनी चर्चिला विवेक ' ।।

डॉ. ढेरे ज्या 'सिजरा-जदि-कादिरी' चा संदर्भ देतात, त्यात ते चांदसाहेब कादरी यांचा उल्लेख करतात आणि मुसलमान परंपरेतील पुढील कादरी शिष्यांचा निर्देश करून मध्येच 'चांदसाहेब कादरी म्हणजे हिंदू साधू चांद बोधले होत. हा चांद बोधलेच शेख महंमदाचा गुरू होय,' असं म्हणतात, यात एक तार्किक विसंगती जाणवते. डॉ. ढेरे यांचं मूळ विधान असं-'

'कादिरी गुरुपरंपरा' ( 'सिजरा-जदि-कादिरी' ) या प्रकरणामध्ये शेख महंमदाची गुरुपरंपरा ' 'अब्दुल कादर जिलानी - सय्यद अब्दुल रजाक ताजोदिन कादरी - सय्यद महंमद गौस ग्वाल्हेरी कादरी - सय्यद चांदसाहेब कादरी- सय्यद महंमद साहेब कादरी (शेख महंमद ) अशी दिलेली आहे..... अब्दुल कादर जिलानीचा प्रशिष्य सय्यद महंमद गौस हा भारतात प्रचारार्थ आलेला पहिला कादरी सूफी प्रचारक होय. ग्वाल्हेर हे त्याच्या प्रचाराचे केंद्र होते. ग्वाल्हेर येथेच तो इ. स. १५१७ मध्ये मृत्यू पावला. तेथे त्याची कबर आहे. ग्वाल्हेर निवासामुळेच त्याला 'ग्वाल्हेरी' असे विशेषण प्राप्त झाले. शेख महंमदांचा पिता राजेमहंमद हा महंमद गौसचा शिष्य होता. पिता हाच शेख महंमदाचा परमगुरू होय. राजे महंमदाचा शिष्य चांदसाहेब कादरी म्हणजे प्रख्यात हिंदू साधू चांद बोधले होय. हा चांद बोधलेच शेख महंमदाचा गुरू होय.'

चांद बोधले यांचा आणखी एक उल्लेख डॉ. ढेरे यांनी याच ठिकाणी केला आहे, तो असा – 'ते (चांद बोधले) परंपरेने सूफी साधू असल्याने मलंगवेशात राहत असत.' सूफी परंपरा मुसलमानांची असून तिच्यात अधेमध्येच चांद बोधले (चांदसाहेब कादरी) हे हिंदू कसे ? ते सूफी परंपरेप्रमाणं मलंगवेशात का राहत ? या परंपरेतले सर्व मुसलमान व मधलेच चांदसाहेब कादरी तेवढे हिंदू कसे ? संपूर्ण 'सिजरा-जदि-कादिरी' प्रकरण अभ्यासल्यास त्यात असा एकही अपवाद आढळत नाही. तेव्हा या प्रश्नांचा अंतर्मुख होऊन विचार करायला हवा व त्यांतील ऐतिहासिक सत्य व

तसंच तार्किक सुसंगती शोधायला हवी म्हणजे वस्तुस्थितीवर प्रकाश पडेल. ती लक्षात घेतल्यावर चांद बोधल्यांची एक शिष्यशाखा हिंदू होती, हे डॉ. ढेरे [४] यांनी निर्देशिल्याप्रमाणं मान्य करायला काहीच हरकत नाही -

महंमद गौस
|
राजे महंमद
|
चांद बोधले
|
जनार्दनस्वामी — शेख महंमद
|
एकनाथ

डॉ. ढेरे [५] यांनी चांद बोधले यांच्या संदर्भात आणखी काही तपशील दिला आहे, तोही त्यांच्या सूफी परंपरेवर चांगला प्रकाश टाकतो -

'शेख महंमदाने आपल्या गुरूला 'अजमतेचे धनी'[६] म्हणजे 'सिद्धींचे स्वामी' म्हटले आहे. या प्रभावामुळे पुढे निजामशाहीत चांद बोधले आणि त्यांचा शिष्यपरिवार यांना विशेष प्रतिष्ठा लाभलेली दिसते. जनार्दनस्वामींनी बांधलेली समाधी देवगिरीच्या पायथ्याशी आजही आहे. चांद बोधल्यांनी सूफी साधना आणि सूफी वेश स्वीकारलेला असल्यामुळे ते हिंदू असूनही त्यांचे समाधिमंदिर दर्ग्यांच्या स्वरूपात आहे.'

यावर वेगळे भाष्य ते काय करायचं !

## भौगोलिक परिसर

शेख महंमदाची जन्मभूमी मराठवाडा ही होती व कर्मभूमी मुख्यत्वेकरून मराठवाड्यालगतचाच अहमदनगर जिल्हा ही होती, काही प्रमाणात ती कर्नाटक, तेलंगण, आंध्रप्रदेश हीही असावी, असं श्री. या. सी. बेंद्रे [७] यांनी 'शेख महंमदाच्या कवितासंग्रहा'च्या दुस-या भागात प्रकाशित केलेल्या चरित्रपर गीतओवीच्या आधारे म्हणता येतं. तिचा कर्ता अनामिक असल्याचं खुद्द श्री बेंद्रे यांनीच निर्देशिलं आहे. 'सिजरा-जदि-कादिरी' (क्र. ३२२) नंतर लगेच क्र. ३२३ वर ही रचना त्यांनी हेतुतः प्रकशित केली आहे. तो भाग पुढं जसाच्या तसा उद्धृत करीत आहे-

'ॐ चरित्रपर-अनामिक
धन्य तो परमात्मा । परात्पर सिमा ।
चतुर खणी उत्तमा । लक्ष चौ-यांशी ।। १ ।।
चराचर नांदती । नामघोष करिती ।
चौदा भुवने उत्पत्ति । दहा खंड क्षेत्र ।। २ ।।
जन्मभूमिका धारूर । वाहेरे रूई नगर ।
कडेवलीत भिंगार । जुनेर देश ।। ३ ।।
दौलताबाद बेदर । तेलंगण इंदूर ।
बीड भीमानगर । कर्णाटक ।। ४ ।।
उत्तरेसी दक्षिण । पूर्व पश्चिम ईशान्य ।
आग्नेय नैरूत्य । अष्टदिशा ।। ५ ।।
वडाळी सुरवडी । देऊळगांव श्रीगोंदा प्रौढी ।
कोरेगांव रासिन प्रौढी । अनंतगांव ।। ६ ।।
निशिदिनी दोन । कथा करिती ज्ञानी ।
सगुण-निर्गुण-ध्यानी । शेख महंमदा ।। ७ ।।
(गीतओवी पोत. १-३) - ३२३'

यांत मराठवाड्यातील धारूर, बीड, वहिरे,रुईनगर, दौलताबाद ; पुणे जिल्ह्यातील जुनेर (जुन्नर), श्रीगोंदे, रासिन, (राशिन) आंध्र प्रदेशातील भागानगर (हैद्राबाद), इंदूर (इंदूरबोधन-निजामाबाद) ; कर्नाकटातील बेदर (बिदर), त्याचप्रमाणं तेलंगन (तेलंगण)- कर्णाटक, (कर्नाटक) इ. प्रदेशविशेषांची (राज्यांची) नावंही येतात त्यांचा जन्म धारूर (जि. बीड) इथं झाला तर निर्याण श्रीगोंदा (जि. अहमदनगर) इथं झालं, हे सर्वमान्य आहे. तथापि पुणे विद्यापीठाच्या इतिहास बिभागास एका चेकोस्लोवाक विद्यार्थ्यानं-डॉ. दुशान यांनी - पीएच्. डी.-साठी सादर केलेल्या शेख महंमदविषयक प्रबंधात ते मध्य प्रदेशातील इंदूरहून आले होते, अशा प्रकारची चुकीची विधानं केली असल्यानं मुद्दाम हा तपशील दिला आहे. (त्यानं तर शेख महंमदांची सूफी परंपरा व तिचा प्रभावदेखील अमान्य केला आहे. या प्रबंधाचा मीही एक परीक्षक होतो व मी माझ्या अभिप्रायात त्यास सप्रमाण विरोध केलाच आहे.) या ओवी-गीतातील इंदूर म्हणजे तत्कालीन निजामशाहीतील इंदूरबोधन (किंवा आजचं निजामाबाद) होय, हे मी यापूर्वीच निर्देशिलं आहे.

## आख्यायिका

शेख महंमदाविषयीच्या अनेक आख्यायिका सांगितल्या जातात व त्या त्यांच्या ग्रंथांच्या काही संपादकांनीही दिल्या आहेत. त्यांत त्यांच्या घराण्यातील पशुहत्येच्या (मुलाण्याच्या) व्यवसायामुळं त्यांच्या मनावर झालेला परिणाम व करुणेमुळ झालेलं त्यांचं हदयपरिवर्तन याविषयीची आख्यायिका लक्षात घेण्याजोगी वाटते. या घराण्यानं पुढं हा व्यवसाय सोडला व शेख महंमदांचे वडील राजे महंमद हे धारूरच्या किल्ल्याचे हवालदार झाले, याविषयी यापूर्वी उल्लेख केलाच आहे.

## शेख महंमदांचा काळ

(१) सुदैवानं शेख महंमदांच्या जन्मकाळाविषयी व निर्याणकाळाविषयी फारसे वाद नाहीत. त्यांचा जन्म इ. स. १५७५ मध्ये झाला असून त्यांचं निर्याण इ. स. १६७४ मध्ये झालं,[८] असा निष्कर्ष डॉ. मोडळे यांनी आपल्या प्रबंधात काढला आहे.

(२) शेख महंमदांच्या श्रीगोंदे येथील दर्यातील फलकावर पुढील माहिती नोंदविली आहे–

'शेख महंमद वली

जन्म : १५४८-१६१८

मूळचे नाव - शेख महंमद राजमहंमद

राहण्याचे ठिकाण - पुंडा बाहिरा (आष्टी )'

(३) डॉ. ढेरे[९] त्यांच्या निर्याणकाळावरून त्यांचा काळ ठरवितात. ते 'योगी असल्याने त्यांना प्रदीर्घ जीवन लाभले होते' असं ते म्हणतात. इ. स. १५९५ च्या सुमारास ते श्रीगोंद्याला स्थिर झाले, इ. स. १६४५ त्यांनी 'योगसंग्राम' लिहिला आणि १६६० च्या फाल्गुन शुद्ध नवमीला त्यांचं निर्याण झालं, अशी कालविषयक महत्त्वाची माहिती ही डॉ. ढेरे यांनी दिली आहे.

(४) मालोजीराजे भोसले यांचा 'चकनामा'[१०] हेही शेख महंमदांचा काळ ठरविण्याचं एक महत्त्वाचं साधन आहे. त्यातील महत्त्वाचा भाग असा. [त्यात हिजरी सन १००५ (इ. स. ऑगस्ट १५९६ ते जून १५९७ ) असा कालनिर्देश आहे.]

### चकनामा

ब ।। मखीखत महाबाबा शेख महंमद दुरूवेष मोकादम मौजे चांभारगोंदे यांसी मालोजीराजे भोसले व बालाजी कान्हेर दिवाण यांनी सन १००५ हिजरी यामध्ये आपण मोकादम समस्त दाही जण कसबे चांभारगोंदे मजकूर याजपासून पाच चाहूर जमीन ..... त्यामधून बारा बिघे जमीन इनाम दिला आहे. तुम्ही आमचे गुरू व आपण तुमचे शिष्य आहो म्हणोन पाच चाहूर खरेदी जमिनीतून बारा बिघे तुम्हास इनाम मुकरर दिल्हा असे' .....

(५) समर्थसाम्प्रदायिक जयरामस्वामी यांची भेट, रामीरामदास (समर्थ रामदास?),[११] तुकाराम महाराजांचं कीर्तन चालू असताना श्रीगोंद्याहून आग विझविल्याची चमत्कारसदृश आख्यायिका किंवा लोकसमज इ. चाही शेख महंमदांच्या कालनिश्चितीस उपयोग होतो.

वरील प्रमाणांच्या आधारे, विशेषतः 'चकनामा' व 'योगसंग्रामा'चा लेखनसमाप्तिकाळ लक्षात घेता शेख महंमद हे शिवकालीन संतकवी होते, या निष्कर्षाप्रत आपण येतो. 'चकनाम्या' चा काळ लक्षात घेता डॉ. मोडळे यांनी ठरविलेल्या इ. स. १५७५ या शेख महंमदांच्या जन्मसनाबद्दल मात्र अधिक विचार करायला हवा. 'महाराष्ट्र-सारस्वता' चे पुरवणीकार डॉ. शं. गो. तुळपुळे[१२] शेख महंमदांचा काळ शके १४८२ (इ. स. १५६०) ते शके १५८२ (इ. स. १६६०) मानतात व त्यासाठी त्यांनी सप्रमाण विवेचन केलं आहे, तेही लक्षात घ्यायला हवं.

## शेख महंमदांची शिष्यपरंपरा

शेख महंमदांचे शिष्य श्रीगोंदा, अलिबाग, जालना, बार्शी, बेलापूर व मुंबई-पुण्याच्या परिसरात असल्याची माहिती श्रीगोंद्याचे 'योगसंग्राम'च्या पारंपरिक प्रतीचे संपादक श्री. विरचंद देसाई[१] यांनी प्रस्तावनेत दिली आहे. मुधा, पांगुळ, अजम, दावलजी, हाकीम, दयालदास हे त्यांचे प्रमुख शिष्य. त्यांपैकी काहींनी शेख महंमदांच्या आरत्या लिहिल्या आहेत.

## शेख महंमद आणि विविध धर्मसंप्रदाय

शेख महंमदांची एक महत्त्वपूर्ण रचना 'संतनामावळी' ही आहे. तिच्याकडे अभ्यासकांचं फार दुर्लक्ष झालं आहे. श्री. या. सी. बेंद्रे[२] यांनी ती 'कवितासंग्रहा' च्या दुस-या भागाच्या प्रस्तावनेत प्रसिद्ध केली आहे.

'जये जये आरती पीर पैगंबरा । गौसे कुतुबा वलया रूसी अठयासी सहस्रे' असा तिचा प्रारंभ आहे व ही 'संतनामावळी' २३ ओव्यांची आहे. तिच्यात अगणित धर्मांच्या व धर्मसंप्रदायांच्या संतांची नावं आली आहेत. त्यांत सूफी, नाथ, नागेश, वारकरी, दत्त, वीरशैव (जंगम), जैन इ. अनेक संतांचे उल्लेख असून ते सामाजिक व सांस्कृतिक संदर्भातही अभ्यासण्याजोगे आहेत. सूफींच्या संदर्भातील हाफीज, सारिक, मनसूर, काजी महंमुद जैना, गरीब नवळ (नवाज), हजरत मीरा, कादीरा जाहीरा, सेक फरीद, फातिमा, इभराइम हरूणी इ. लक्षात घेण्याजोगी आहेत. मराठी संतनामावळीत ही नावं येणं हेही एकात्मतेचंच निदर्शक होय.

शेख महंमद मूळचे सूफी संप्रदायातलेच. ते महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाशी विशेष-करून एकरूप झाले. ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीचा त्यांच्यावरील प्रभाव लक्षणीय आहे. त्याचप्रमाणं नाथसंप्रदायातील योगविचाराचा व पंचीकरणाचाही आहे, याची प्रचीती त्यांच्या विविध रचनांतून येते. जयरामस्वामी वडगावकराशी त्यांचा असलेला स्नेह त्यांची समर्थ संप्रदायाशी किती जवळीक होती, याचा निदर्शक आहे. दत्तसंप्रदायाशी त्यांचा थोडा फार संबंध असावा. आपल्याला अभिप्रेत असलेलं सूफीमत आणि वारकरी संप्रदायातील अद्वैतमत तसंच नाथसंप्रदायाची योगसाधना या सर्वांचाच संगम व समन्वय त्यांच्या लेखनात आपल्याला जाणवतो. आपल्या लेखणीनं आणि वाणीनं त्यांनी सूफी आणि वारकरी संप्रदायांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार केला व त्याला शिवकालात उदंड प्रतिसाद मिळाला.

## शेख महंमदांचं साहित्य

शेख महंमदांच्या साहित्यात विपुलता आहे नि विविधताही आहे. मराठीप्रमाणंच त्यांनी 'दक्खिनी'तही लेखन केलं आहे. त्यांच्या या साहित्यावरून त्यांचा मराठीप्रमाणंच संस्कृत, अरबी, फार्सी, दक्खिनी भाषांचा व्यासंग जाणवतो.

त्यांच्या संपूर्ण रचनेत 'योगसंग्रामा'चं स्थान सर्वश्रेष्ठ आहे. तो शेख महंमदांचा ग्रंथराज आहे. त्यांचं स्वरूपदर्शन यानंतर घडविलंच आहे, 'पवनविजय' ही त्यांची त्रिखंडात्मक रचना. तिच्यात

'तत्वसार' 'पवनविजय' व 'काळज्ञान' यांचा समावेश होतो. 'निष्कलंक प्रबोध' हीही त्यांची तत्त्वविवरणात्मक रचना.

त्यांची अभंगरचना विविधांगी आहे. 'भक्तिबोध,' 'आचारबोध,' भारुड, विपुल अभंगरचना (यातील आजही बरीचशी अप्रकाशित आहे) याशिवाय आरत्या, 'गायका'-'मदालसा'सारखी त्यांची स्फुट रचना आहे.

'दुचेब्मा' हा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा परिभाषाकोश. तो मुख्यत्वेकरून अरबी-फार्सी व संस्कृत-मराठी या भाषांत आहे. मराठीप्रमाणंच शेख महंमदांनी लक्षणीय अशी दक्खिनी रचनाही केली आहे.

शेख महंमदांच्या या साहित्यसंपदेचा तपशीलवार विचार यानंतर केला आहे. त्यातून त्यांच्या लेखनाच्या विविध वैशिष्ट्यांचा प्रत्यय येईल.

## (१) योगसंग्राम

**'योगसंग्रामा'च्या प्रती / संपादनं इ.**

यासंबंधी पुढील माहिती उपलब्ध होते-

१. योगसंग्राम, शेख महंमद-संग्रह, श्रीगोंदे, इ. स. १७५० (नक्कल)
२. योगसंग्राम, सं. शि. सि. बागळे, प्र. इंडियन प्रिंटिंग प्रेस, गिरगाव, इ. स. १८८५.
३. योगसंग्राम, रामतत्व प्रकाशन, बेळगाव.
४. योगसंग्राम, प्र. दामोदर सावळाराम आणि मंडळी, मुंबई.
५. योगसंग्राम, राघळबाबा मठ, श्रीगोंदे (अपूर्ण)
(८-९, १३ ते १८ पूर्ण, १०-११-१२ (अपूर्ण)
६. योगसंग्राम, भा. इ. सं. मंडळ, संग्रह, पुणे, (यात अठरावा प्रसंग नाही. इ. स. १८२० नंतरची नक्कल).
७. योगसंग्राम, बडोदे, ओ. इन्स्टि. लायब्ररी, बाडांक १०५, इ. स. १७९३.
८. योगसंग्राम, सं. वा. सी. बेंद्रे, प्र. पी. पी. एच्. बुक स्टॉल, मुंबई.
९. योगसंग्राम, सं. डॉ. रा. चिं. ढेरे, प्र. वरदा बुक्स, पुणे, १९८१.
१०. योगसंग्राम, सं. विरचंद दलिचंद देसाई, प्र. सुभाष विरचंद देसाई, श्रीगोंदा, १९७३.

यातील शेवटची क्र. १० ची प्रत विवेचनासाठी स्वीकारली आहे. ही प्रत आद्यन्तयुक्त अठरा प्रसंगांची व परिपूर्ण प्रत असून पारंपरिक व स्थानिक प्रत म्हणून.मला ती अधिक महत्त्वाची व लक्षात घेण्याजोगी वाटली. या.प्रतीला श्री. वि. द. देसाई यांची सात पृष्ठांची प्रस्तावना असून तिच्यामध्ये श्रीगोंदे, शेख महंमद, त्यांची गुरु-शिष्यपरंपरा, त्यांच्या वंशाची व वंशजांची माहिती, त्यांचं लेखन याविषयी परंपरेनं उपलब्ध असलेली उपयुक्त माहिती दिली आहे.

## योगसंग्राम : स्वरूपदर्शन

### प्रसंग १-

शेख महंमद 'अध्याया' साठी 'प्रसंग' ही संज्ञा योजितात. या प्रसंगाची ओवीसंख्या शंभर आहे. त्यातील मंगलाचरण अत्यंत महत्वाचं आहे. भारतीय ग्रंथलेखनप्रथेनुसार प्रथम गणेशवंदन केल्यावर ईश्वराची जी स्तुती केली आहे, तिच्यापासूनच शेख महंमदांच्या वेगळ्या दृष्टिकोणाची प्रचीती येते. त्यातील परमेश्वराच्या स्वरूपाचं हे वर्णन आहे-

'ॐ' नमो जि अव्यक्त रामा । परात्पर मेघःश्याम
ब्रह्मादिकां न कळे महिमा । अविनाश म्हणवूनियां ।।
दो व्यासाक्ष निज कल्पतरू । कोटि मयंकाहूनी प्रकाश थोरु ।
तेथ वेदभेदशास्त्राचा विचार । पावों न शके ।।
वो मन वाचे अगोचरु । ज्याचे मन त्यासि साक्षात्कारू ।।
येरांस टकमक विचारू । सद्‌गुरूविण' ।। १ X १ – ३ ।।

या ईशस्तवनात शेख महंमदांनी जी परतत्वप्रशंसा केली आहे, ती त्यांच्या स्वतःच्या इस्लामधर्मांच्या परतत्त्व-संकल्पनेशी व भारतीय आस्तिक दर्शनांतील संकल्पनेशी जुळते. (त्या अवतरणातील अधोरेखन माझं आहे.) परमात्मा हे तत्त्व अव्यक्त, अविनाश व अगोचर आहे पण ते जाणून घेण्यासाठी मन हे एक महत्त्वाचं साधन असून त्याचा उपयोग कसा करावा, यासाठी सद्‌गरूचं मार्गदर्शन आवश्यक आहे, असं शेख महंमद म्हणतात. आत्मा हा योद्‌धा आहे, या रूपकाचा मागमूस या प्रसंगात लागत नाही; मात्र परमात्मा या अन्तिम सत्याप्रत जाण्याच्या मनरूपी साधनाचा इथं अवश्य उल्लेख आहे. या दृष्टीनं योगसाधनेच्या/योगसंग्रामाच्या 'पूर्वतयारी' चा हा भाग आहे, हे मानायला हरकत नाही.

यानंतर सरस्वति-वंदन, सद्‌गुरुवंदन, माता-पिता-वंदन (यात ओघानं आलेली मातृपितृसेवेची पुंडलीकाची समयोचित कथा) इ. विषय आहेत पण त्यानंतर योगेश्वर व साधकेश्वर यांना वंदन का ? तर योगेश्वरांनी योगसाधना करून मनोविग्रहाच्या साहाय्यानं परतत्वाशी एकरुपता साधते व साधक ती करू इच्छितात म्हणून योगेश्वर व साधकेश्वर हे इथं शेख महंमदाचे आदर्श आहेत, म्हणून त्यांना वंदन केलं आहे, तेही सहज वा अकारण केलेलं नाही, हे लक्षात घ्यायला हवं. याचप्रमाणं ज्या माध्यमातून शेख महंमदांना हे भाष्य व तत्वविवेचन करायचं आहे ते माध्यम काव्याचं असल्यानं त्यांनी सर्वच 'श्याहाण्णव कुळी' च्या कवीश्वरांना वंदन केलं आहे कारण तेही त्यांचे आदर्श आहेत. इथं 'श्याहाण्णव कुळी' हे शब्द यासाठी महत्त्वाचे की त्यांतून कोणत्याही विशिष्ट जातीचे वा वर्णांचेच कवीश्वर अपेक्षित नसून सर्वच जातिवर्णांचे कवीश्वर अपेक्षित आहेत. वर्णजातिविषयक समतावादी दृष्टिकोणाचं सूचन इथं कवीनं केलं आहे, त्याशिवाय-

'साही दर्शनांचे साधक । यावेगळे सम-विषम लोक ।
नमस्कारुनि मागितली भीक । ब्रह्मविद्येची ' ।। १ X ६२ ।।

(अधोरेखन माझं)

केवळ षड्दर्शनांचे साधकच नव्हे तर त्यावेगळे कोणतेही ('सम-विषम') लोक, ज्यांनी ब्रह्मविद्या आत्मसात केली आहे, त्यांच्याकडूनही ती मिळावी, ही अपेक्षा शेख महंमद व्यक्त करतात. ज्यांनी ही साधना पूर्ण करून 'जीवन्मुक्तस्थिती' प्राप्त केली, त्या 'मनुष्यदेही देवपणें' मिरविणा-यांचा आदर्शही कवीपुढं आहे. (१ X ६०)

जे केवळ 'शब्दज्ञानी' आहेत व त्याच्या बळावर जनलोकांना ठकवितात त्यांना कवी वंदन करीत नाही तर ज्यांनी ब्रह्मस्थिती अनुभवली आहे, त्या सद्‌गुरूंना ते वंदन करतात व त्यांची आज्ञा या ग्रंथाच्या लेखनासाठी मागतात -

'दांडाइत डफगाण्याची एकचि अति ।
दाटोन खवळोन कळी करिती ।
परि ते नेणति ब्रह्मस्थिति । स्वयें अनुभवे ।।
दृष्टांत डांकुलता हिंसा करी ।
शब्दज्ञानें ठकी नरनारि ।
तैसी कीर्तनाची भरोउभरी । किरवें धरुनिया' ।।

(१X६७-६८)

या स्तवनात 'अल्ला'चं ही स्तवन शेख महंमद करतात, हे डॉ. ढेरे, शेख महंमदाचे अभ्यासक डॉ. मोदाळे, वाङ्‌मयेतिहासकार किंवा अन्य कुणीही का सांगत नाही, याचं आश्चर्य वाटतं. पहिल्या प्रसंगाच्या बावन्नाव्या ओवीत हे स्तवन आलं असून नारायण व अल्ला यांत ते अभेद कसा मानतात, ते स्पष्ट केलं आहे.

'श्रीकारि ॐ नमो जी नारायण ।
'या अल्ला' म्हणती यवन ।
यावेगळी अनेक स्तवनें । साही दर्शनांची ।।'

(अधोरेखन माझं)

आपण ब्रह्मस्थिती प्राप्त करण्याविषयीचं शास्त्र किंवा विज्ञान या ग्रंथात सांगत आहोत, ही कवीची भूमीका 'बोले शेख महंमद विज्ञान' (१ X ५८) यासारख्या प्रतिज्ञेवरून ग्रंथारंभापासून स्पष्ट असून तीच 'योगसंग्रामा'च्या पुढील सतरा प्रसंगांत उत्तरोत्तर विशद केली गेली आहे. आपलं नेणतेपण किंवा अज्ञान नाहीसं कसं होईल व ज्ञानविज्ञानाची गोडी कशी लागेल, याचा ध्यास त्यांना लागला आहे. जनकल्याणासाठी ते हे लेखन करीत आहेत, ही त्यांची या पहिल्याच प्रसंगातील भूमिका त्यांच्या ग्रंथाच्या लेखनाचं प्रयोजन स्पष्ट करते -

'पाहे रुचि जाणे रुचिलागुन । तेथे मनाचे होय अ-मनपण ।
ते विकारविरहित बरवेपण । पंचमा वागवतील' ।। (१ X ८२)

(अधोरेखन माझं)

कृपा, चैतन्या, महदा, अविद्या व निद्रा या त्या 'पंचमा' होत. त्यांचं वर्णन कवीनं यापुढं केलं आहे.

तुम्ही 'निजयोग विवेकाचे घास मुखात घातल्यावर' तेणे प्रेमबोध उल्हास । होईल मातें ।।१X९९।। असं म्हणून ते या ग्रंथाची अपेक्षित फलश्रुती सांगून पहिला प्रसंग संपवितात.

## प्रसंग २

हा प्रसंग एकशे चार ओव्यांचा आहे. त्यातील गणेशवंदनानंतर लगेच 'श्रीनिर्विकाराय नमः' असं शेख महंमद का म्हणतात, ते यापूर्वीच्या प्रसंगाच्या मंगलाचरणाच्या संदर्भावरून सहज लक्षात येईल. हिंदूधर्मविचाराबरोबरच इस्लामधर्मविचाराचा सूफी पदर इथं व अशा प्रकारच्या विवेचनात पुढं अनेक ठिकाणी जाणवेल. त्याकडे मात्र अभ्यासक/संशोधकांचं काहीसं दुर्लक्ष झालं आहे. सर्वच आस्तिक धर्मग्रंथांत प्रारंभी सृष्टिरचनेविषयी व तिच्या कर्त्याविषयी विवेचन केल्याचं आढळतं. वेद, कुराण व बायबल यांची प्रमाणं इथं देता येतील. पवित्र कुराणात पहिल्या सू-यांत ईश्वरेच्छेनं विश्वनिर्मिती झाल्याचं विवेचन आहे. भारतीय दर्शनातील चिद्‌विलासाचा व पंचीकरणाचा सिद्धान्त या संदर्भात लक्षात घ्यायला हवा. दुस-या प्रसंगात पंचीकरण - विचार प्रारंभीच अशा प्रकारे आला आहे-

'पंचमहाभुतें सबळ सगुण । त्यांचे हे पंचवीस गुण विकारण ।।
त्यामाजि शक्ति घेती अवतरण। कल्पनेसंगे पंचमहद्‌भुतांची लक्षणें ।
कवण कवणापासूनि निर्माण । कैसे जोडले पंचवीस गुण ।
स्थळा करी मज' ।। २x३x४।।

पाच शक्तींचा विचार पहिल्या प्रसंगाच्या शेवटी सांगितलाच आहे, त्याचं सूत्र धरून शेख महंमद म्हणतात -

'शक्ति पाच महद्‌भुतें जाण। ऐसी झाली ईश्वरापासून।
खेळ आरंभावयालागोन । इच्छा इच्छियली' ।।२x१५।।

विश्वनिर्मितीच्या कल्पनेशी इस्लाममधील 'जहूर' (शेख महंमदांच्या शब्दात 'जोहर') ची कल्पनाही कवीनं दुस-या प्रसंगाच्या सहाव्या व सातव्या ओव्यांत मांडली आहे, तिचा उल्लेख आजवर कुणीही केला नाही. भारतीय दर्शन व इस्लामदर्शन यांचा समान्तर प्रवाह या ग्रंथात कसा वाहत आहे, याकडे कुणी लक्ष का वेधलं नाही ?

या पृथ्विलोकावर आदम व हव्वा (अँडम व ईव्ह) ईश्वरानं निर्मिले, याविषयी इस्लाम व ख्रिस्ती धर्मात विवरण आढळतं. शेख महंमदांनी हा विचार दुस-या प्रसंगातील 'ईश्वरेच्छे'च्या उल्लेखानंतर लगेच सोळाव्या व सतराव्या ओवीत प्रतिपादिला आहे. मुसलमानांत गुरूला 'पीर' म्हणतात, त्याचप्रमाणं 'बावा'ही म्हणतात. 'गुरु म्हणजेच पीर' हा विचार 'योगसंग्रामा'त पुढं आलाच आहे. यासंबंधी काही अभ्यासकांनी उल्लेख केला आहे तथापि त्याचबरोबर दुस-या प्रसंगात पाचव्या ओवीत आलेला 'सद्‌गुरु बावा' हा उल्लेखही लक्षात घ्यायला हवा. या गुरूच्या आज्ञेनुसार शेख महंमद या ग्रंथाची निर्मिती लोकोद्‌धारासाठी करतात.

'म्हणे हे विश्वलोक मनचि साजे। ते तारावे गा ।
ईश्वरा वोजें । यालागि ग्रंथ करी' ।। २x२१

(अधोरेखन माझे)

हिरण्यकश्यपू दुष्ट होता तथापि त्याला प्रल्हादासारखा भक्तीच्या साहाय्यानं स्वतःचा उद्‌धार करुन घेणारा पुत्र लाभला, याविषयीची पौराणिक कथा शेख महंमद इथं अकारण देत नाहीत.

कुणालाही आपला उद्धार करून घेण्याचा अधिकार आहे, हा विचार त्यामागं असल्यानं वर्ण-जातिभेद अमान्य करून आध्यात्मिक समतेचा पुरस्कार करण्याचा त्यांचा हेतू आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेप्रमाणं कर्मसिद्धान्ताचीही अडचण ते मानीत नाहीत, हे पुढील ओव्यांवरून (अनुक्रमे) लक्षात येईल -

'पाचपरीस पाच प्रतिमा । या वेगळ्या अनेक यातिमहिमा ।
हे सांगा कवणिया कामा । सुफळ वचनें' ।। २x८१।।
'यालागिं जगीं भूषणाचा डांगोरा । तो जाणिजे कर्मखोडा ।।
भावभक्तिचा बोध निवाडा । होऊं नेदी कांही' ।। २x६०।।

सद्‌गुणांचं महत्त्व वर्णन करुन मानवमात्रांत साधू हा जसा सद्‌गुणांनी श्रेष्ठ तसाच पक्षात 'हुमा' पक्षी श्रेष्ठ (ही इस्लामी संकल्पना), गजात ऐरावत श्रेष्ठ तर नागांत वासुकी; पण कुणालाही आपला उद्धार करून घेता येतो म्हणून चारही शक्तींचा विचार करून आपण अविद्या, निद्रादींवर विजय प्राप्त करून 'आपण आपणाते विसरले' अशी 'उन्मनी' अवस्था कृपा, चैतन्या, महदा यांच्या साहाय्यानं प्राप्त करण्यास सिद्ध व्हावं, अशी प्रेरणा दुस-या प्रसंगाच्या शेवटी कवीनं दिली आहे. हीच शेख महंमदांची 'ज्ञान-विज्ञान-मांडणी.'

## प्रसंग ३

या प्रसंगात एकशे दहा ओव्या आहेत. यातील मंगलाचरणानंतर 'श्रीनिर्विकाराय नमः' म्हटलं असून ईश्वराच्या 'अविनाश'त्याचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणं सिद्ध-वंदन केलं आहे. योगमार्ग हा सिद्धांचाच मार्ग असल्यानं कवीनं इथं सिद्धांना वंदन करणं हे औचित्यपूर्ण आहे. या प्रसंगात चारही शक्तींचा निवाडा करून आत्मज्ञानाची प्राप्ती करणं कसं महत्त्वाचं आहे, हा विचार पुन्हा लोकमानसावर ठसविला आहे. 'स्वरूपीं लय लागे सावकाश। ब्रह्मानंदे बोध उल्हास' (३x९९) हे 'गुह्य' (रहस्य) सांगणं, हा या प्रसंगाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

सृष्टिनिर्मितीचा यापुर्वीच्या प्रसंगातील संदर्भ लक्षात घेऊन या लोकातील विविध नाती व पूर्वजन्म इ. विषयीही कवीनं विचार केला आहे. आत्मा जेव्हा 'जीवात्मा' होतो, त्यावेळी वडील, आई, बहीण, पुत्र, पत्नी, इ. नाती निर्माण होतात, ती भौतिक नाती होत. स्थूल-सुक्ष्मकारण-महाकारण इ. या खोलवर विचार केल्यास आत्म्याचं खरं नातं परमात्म्याशीच आहे आणि तो तर निराकार आहे, पुरातन आहे, याचं 'आत्मज्ञान'आपल्याला होणं आवश्यक आहे. हा विचार या प्रसंगात प्रतिपादिला आहे. त्यासाठी 'तन-मनासि होय एकाग्र' (३x६५) असं मार्गदर्शनही शेख महंमदांनी केलं आहे. 'जे कोणी ऐकतील या ग्रंथासी । ते समूळी उद्धरावे' ।। (३x६०)

पुनर्जन्माची चर्चा करताना कवीनं स्वतःच्या कुळाचा तपशीलही थोडक्यात दिला आहे. जीवाला पंचमहाभूतं ग्रासतात त्यावेळी त्यांच्याशी संग्राम करून 'अद्वैतें उठविलें द्वैताचें ठाणें ' ही साधनेतील (३x१०९) ही परमोच्च अवस्था साधकानं प्राप्त करावी, अशी प्रेरणाही कवीनं दिली आहे.

प्रसंग ४

या प्रसंगाची ओवीसंख्या एकशेतीन आहे. याच्या मंगलाचरणातही प्रथम गणेशवंदन व त्यानंतर 'निर्विकार' परमेश्वराला वंदन केलं आहे. ॐ कार हे विश्वनिर्मितीचं आदिकारण असून आत्मा हा मुळात अत्यंत पवित्र व अविनाश आहे, हा विचार या प्रसंगाच्या प्रारंभीच मांडला आहे. त्यानंतर पुरुष आणि प्रकृती यांचा विचार शिव आणि शक्ती यांच्या माध्यमातून सांगितला असून शिव-शक्ती यांच्यामधील भांडणाचंही वर्णन केलं आहे. विवेचनातील अनुसंधान न सोडता, आत्मा देह धारण करतो त्यावेळी देहाचे विकार त्यावर सावट आणण्याचा प्रयत्न करतात पण तो 'अविनाश' असल्यानं शुद्धच राहतो, याविषयी विवरण केलं आहे -

'मग आत्मा शब्द बोले कोवळे ।
तुमच्यानें विकार - विषय - डोहाळे ।
परी सुख-दु:ख ते मज न कळे।
अविनाश म्हणवूनी ' ।। ४x१३ ।।

आपल्या उद्धारासाठी व योगसाधनेसाठी पावित्र्याची / शुचित्वाची आवश्यकता आहे, यासाठी

'अशुचे शरीरी शुच आचरावें ।
निज नामातें हृदयी धरावें ' ।। ४x२० ।।

असं शेख महंमद म्हणतात. स्वत:चाच दाखला देऊन ते म्हणतात,

'शरीर जें नामे रंगले मुसलमान ।
तें शरीर पूजिले पीर म्हणोन ।
मृत जाल्या चाले महिमान।
यालागि शुभ आचारावें ' ।। ४x२२ ।।

यासाठी मी पुढं 'पुण्यपुरुषार्थाचं' स्वरूप विशद करतो, असं म्हणून शेख महंमदांनी विस्तारानं चांगला 'शिष्य' ('सत्शिष्य') व 'अशिष्य' म्हणजे वाईट शिष्य यातील भेद सांगितला आहे. खरं तर त्यांनी 'अशिष्या'चीच लक्षणं अत्यंत बारकाईनं व विस्तारानं सांगितली असून त्यातून अशुचित्वाचं (किंवा ज्ञानदेवांच्या शब्दांत 'आसुरी संपत्ती'चं-अपप्रवृत्तीचं-वर्णन केलं आहे. त्यातून सत्प्रवृत्ती कोणत्या, यांचं सूचन झालं आहे. त्यांची ही समाजनिरीक्षणं अत्यंत मार्मिक व मौलिक असून त्यातून कोणती उदात्त जीवनमूल्ये-शेख महंमदांच्या शब्दांत 'पुण्यपुरुषार्थ'-जोपासावीत, याचं मार्गदर्शनही मिळतं. ही उदात्त जीवनमूल्यं म्हणजे जीवनादर्शच होत. या प्रसंगाच्या साण्यिसाव्या ओवीपासून ब्याण्णव क्रमांकाच्या ओवीपर्यंत त्यांनी 'अशिष्या' ची लक्षणं वर्णन करताना समाजातील या अपप्रवृत्तींवर कठोर प्रहार केला आहे. समाज प्रबोधनकार या नात्यानंही 'योगसंग्रामा' च्या चवथ्या प्रसंगातील हे विवेचन अत्यंत लक्षात घेण्याजोगं आहे. डॉ. ढेरे, शेख महंमदविषयक संशोधन

करणारे डॉ. भीमा मोदळे यांच्या या प्रसंगाविषयींच्या विवेचनात याचा आढळ होत नाही म्हणून इथं त्याची मुद्दाम नोंद केली व दखल घेतली आहे. डॉ. ढेरे व डॉ. मोदळे म्हणतात त्याप्रमाणं या पहिल्या चार प्रसंगांत तर योगसंग्रामाचं रूपक कुठंही नाही. रूपक आहे ते पुढं सतराव्या-अठराव्या अध्यायात. आत्मा हा योध्दा आहे, इ. कल्पनाही त्यातच आहेत.

जीवनातील अपप्रवृत्तींचं चित्रण करण्यापूर्वी व उदात्त जीवनमुल्यांचं दर्शन घडविण्यापूर्वी शेख महंमदांनी योगसाधना करण्यासाठी काय पूर्वतयारी करायला हवी, याचा विचार मांडताना म्हटलं आहे -

'जैसा तप्त लोहाचेंनि संगे । पावक दुःख पावे अष्टहि अंगे,
तैसा आत्मा देहाचेंनि संगे । पापें पिडों पाहे ।।
पहा बावनकसी सोनें। नग करितां डोके जालें उणें ।
तैसा तुम्ही आत्मा ओळखा खुणे । देहासंगे हीन जाला' ।।(४x२४-२५)।।

या प्रसंगाचा समारोप करतांना, आतापर्यंत अधमाचा विचार केला, आता 'उत्तम सांगतो तैसे' (४x९३) असं म्हणून सत्शिष्यांची लक्षणं अत्यंत संक्षेपात 'आतां या सच्छिष्यांचा काळ' म्हणून (ओवी-क्रमांक ९५ पासून ओवी क्रमांक १०० पर्यंत) सांगितली आहेत. त्यापूर्वी ९४ क्रमांकाच्या ओवीत ते स्वधर्माचा व त्यातील सद्गुरूचा -मीरा-पीर जाहिर यांचा-उल्लेख करुन हे पीर जनकल्याणार्थ कसे झटले, तेही सांगतात -

'ऐका, भिसमिल्ला अल्ला हो अकबर ।
टिका धरा भावभक्तिचा अंकुर ।
एवं बोलते हजरत मिरा परी जाहिर ।
दीनोद्धरणालागी ।।

हे उल्लेख एकाही अभ्यासकानं/संशोधकानं/मराठी वाङ्मयेतिहासकारानं करू नयेत, याचं आश्चर्य वाटतं. आपलं 'सूफीपण' टिकवूनही भारतीय दर्शनपरंपरेशी एकरूप झालेल्या शेख महंमदांचं हे वैशिष्ट्य अनुल्लेखानं टाळण्याजोगं खासच नाही, उलट त्यांनी घडविलेल्या एकात्मतेच्या शिल्पाचं हे एक तेजस्वी अंग आहे.

**प्रसंग ५**

या प्रसंगाची ओवीसंख्या एकशेसोळा आहे. पूर्वीच्याच प्रसंगाप्रमाणं याचाही प्रारंभ 'श्री गणेशाय नमः' आणि 'श्रीनिर्विकाराय नमः'नंच झाला आहे, त्यातील मर्म अभ्यासकांच्या लक्षात आलंच असेल. भारतीय दर्शन व इस्लामदर्शन (तसंच सूफीमत) यांना अभिप्रेत असलेलं परतत्त्वाचं (ईश्वराचं)-निर्गुणत्व/निराकारत्व यांचा निर्देश शेख महंमदांना इथं करायचा आहे. यानंतरच्या ओवीतील नमन 'मूलबंधा'च्या अनुषंगानं योगसाधनेचं सूचन करतं -

'ॐ नमो विवेक-दौत मैस लेखणी ।
तुमच्याने लिहिली अक्षरवाणी ।
त्रिवेणी दोतींत सत्राविचे पाणी।
घातले मूळबंधें ' ।।

कोरा कागद तो शून्याकार ।
अनुभव - लेखणी जाहिर ।
वर मांडिले क्षर - अक्षर।
आत्मप्रचीतीनें' ।।५४१-२।।

या साधनेची फलश्रुती पुढच्या ओवीत सांगितली आहे. प्रत्येक प्रसंगातील साधनेचा एक एक टप्पा अनुसंधान राखून गाठला की अपेक्षित ध्येय सिद्ध होते व साधना पूर्ण होते, असं आश्वासन शेख महंमद ग्रंथाच्या पूर्वार्धातच देतात -

'संपल्या प्रसंगाचा चतुष्ट । अनुसंधान धरिलें चोखट ।
श्रोत्यानें पातावें निकट निकट । उदार चित्तें ।।
जो काही पाहो नेणे अद्यापवर । कासेस लागे होउनिया उदार ।
तर तो पैलथडी पावेल साचार । एकविधपणें' ।।५४३-४।।

ही साधना पूर्ण करायला त्याला सदगुरू साहाय्य करील आणि तो 'बुडों नेदी' (५४६). यामुळं सद्गुरूचं किती महत्व आहे, ते लक्षात येतं.

शेख महंमदांनी तत्कालीन परिस्थिती व समाज पाहिल्यावर त्यांची मोठी अडचण झाली. 'सदगुरू तुमचे पारखीपुढें । मी तवं झालो असें भ्रमिष्ट वेडें' अशी आपली स्थिती झाल्याचं शेख महंमद सांगतात. वेगवेगळ्या धर्मपंथांतले 'गुरू' म्हणवणारे काहीजण ख-या अर्थानं 'सदगुरू' कसे नसतात, याविषयी त्यांनी प्रखर टीका केली आहे. त्यात स्वतःच्या इस्लामधर्मातील काही उदाहरणंही दिली असल्यानं ही टीका किती निःपक्षपाती आहे, याचा प्रत्यय येतो. या टीकेचं स्वरूप 'पाखांडखंडना'त्मक व प्रबोधनपर आहे. ती विघातक नसून विधायक आहे. त्यातील काही उदाहरणं पुढं देतो -

'अवगुणी साही दर्शनांची सोंगे ।
पाखंड्यांनी घेतील अनेगें' ।। ५४५५।।

-अशी दुःस्थिती समाजात निर्माण झाल्याचं चित्र त्यांना पाहायला मिळतं. अनुरागी चित्तवृत्ती नसलेले जटाभस्मधारी जोगी त्यांना दिसतात. काही योगी

'ठायींचेंच अंगी अविद्येचे वारे । वरी भांग पिऊनी बरळती अनाचारें ।
जनांत योगी म्हणवुनी महामारे । नाना तरंगे फुंदती ।। (५४६२)
काही जण तंत्रमंत्रे जन ठकती काळतोंडे.।
घरोघर गोसावी म्हणवूं लागले ।
स्वयें भ्रष्ट पवित्रातें भ्रष्टूं लागले' ।। (५४५८)

खरा मुलाणा, फकीर नि जितेंद्रिय योगी कोण, ते शेख महंमद या शब्दांत सांगतात-

'अहंकार-टोणगा अक्कल-सुरी । विवेकें कापून भक्षण करी ।
उन्मनी - मशिदींत नमाज गुजारी । त्या बोलिजे मुलाणा।।

फकीर तो, जो राग विषयां सांडवला ।
श्वासनिश्वासें नित्य आठवी अल्ला
देखोन पळे बाष्फळ गलबला
एकांत - सुख भोगी ।।
....जितेंद्रिय आवरुन एकला ।
सदा सावध अव्यक्ती गुंतला ।
मार्गी विहंगम मीनाचे लागला ।
तो संन्यासी पवित्र ।। (५x८२-८६)

या विषयाकडून शेख महंमद मूळ ग्रंथाच्या विषयाचं अन्तःसूत्र मांडायला विसरत नाहीत. 'ज्यास ईश्वराचें ज्ञान होईल। त्यासि ईश्वर सत्य दिसेल।' असं म्हणून ते मनातील संग्रामाकडे वळतात. बाह्य जगातील संग्रामांपेक्षा हा अंर्तमनातील संग्रामच खरा संग्राम आहे, या विचाराचं ते असं प्रतिपादन करतात -

'बाहेर उदंड झुंजले, झुंजती । त्यांचे पवाडे कीर्ति केल्या, करिती ।।
परी मजला त्या नश्वर वाटती ।। एका ईश्वरकीर्तीविण ।।
स्वयें अंतरी झुंझोन झुंजल्याची कीर्ती ।।
कोठे ऐकिली नव्हती । हे मज अनसुट संधि गवसली पुर्ती ।।
स्वयें कीर्तीन कीर्ति कीर्तावया' ।।५x११०-११।।

हा 'स्वानुभव' 'आत्मप्रचीती' घेण्याची प्रेरणा शेख महंमद प्रसंगाच्या शेवटी देतात.

## प्रसंग ६

एकशेएकचीस ओव्यांच्या या प्रसंगाच्या प्रारंभीही कवी गणेशाला व निर्विकाराला वंदन करुन 'जीव-अक्षर बावन मातृकांना' वंदन करतो. अक्षरांनी शब्द निर्माण झाले व शब्दांनीच सर्व विश्व कसं व्यापलं, याचं, शब्द-महिमा-वर्णन करणारं, विवेचन (शेख महंमदांच्या शब्दांत 'शब्दांचे विधान') या प्रसंगातील सदुसष्टाव्या ओवीपासून अट्ठ्याण्णवाव्या ओवीपर्यंत आलं असून ते मराठी वाङःमयात केवळ अपूर्व आहे. गुरु उपदेश व मार्गदर्शन करतात तेही या शब्दांतूनच, आत्मज्ञानही कसं प्राप्त करावं, ते शब्दाच नाही का सांगत ? हे सांगून शेख महंमद पुन्हा विषयानुसंधानाकडे वळतात. प्रकृतिपुरुष-लक्षण सांगून 'मनासंगे चंचळता मोठी । प्रकृति वासनेची ' (६ x ११३) हे लक्षात घ्यावं, निग्रहानं त्यावर निर्यत्रण ठेवायला हवं, (म्हणजे साधना करता येईल व संग्रामात विजय प्राप्त करता येईल) याचं सूचनही या प्रसंगाच्या शेवटी केलं आहे.

## प्रसंग ७

शंभर ओव्यांच्या या प्रसंगात नेहमीप्रमाणं वंदन करून ईशस्तुती केली आहे. तो आपला पिता आहे, त्याचा विसर कधी पडू देऊ नये कारण तोच विश्वातील प्राणिमात्रांचा पालनकर्ता, भरण-पोषणकर्ता आहे, तो दयाळू/कृपाळू असून तोच आपला उद्धारकर्ता आहे, अशा ओशयाचं

प्रतिपादन केलं आहे. (पवित्र कुराणातील ईशस्तुतीतही हाच विचार आहे.) साधनेत ईशकृपेचं महत्त्व आहे म्हणून ही ईशस्तुती या प्रसंगात आली आहे, हे तिचं एक प्रयोजन असलं तरी या प्रसंगाला कवीच्या जीवनचरित्राचाही एक स्पर्श आहे. शेख महंमदांना तीनदा नागानं दंश केला असून ते त्यातून वाचले असल्यानंही त्यांना ईशवंदन करावंसं वाटणं स्वाभाविक आहे. काही अभ्यासकांनी सर्पदंशाच्या घटनेचा उल्लेख केला असला तरी ही घटनासंगती, शेख महंमदांविषयी ज्यांनी ज्यांनी विवेचन केलं, त्यांपैकी कुणीच दाखविली नाही. यातून कवीचे दोन्ही हेतू साध्य झाले आहेत.

## प्रसंग ८

शंभर ओव्यांच्या या प्रसंगाच्या प्रारंभी नेहमीप्रमाणं श्रीगणेश-श्रीनिर्विकार वंदन केलं असून त्यानंतर अलक्ष्य, अगोचर, अव्यक्त परमात्मतत्त्वाला वंदन केलं आहे. साधनेत केवळ ग्रंथज्ञान महत्त्वाचं नाही तर 'अनुभूती' महत्त्वाची आहे, या विचारावर लक्ष केंद्रित केलं आहे. त्यामुळं हा प्रसंगही मूळ प्रतिपाद्याशी अनुसंधान साधणारा आहे-

'चारी वेद ईश्वरापासून झाले । परी ईश्वरास नेणतां काळवंडले।।' (८X३)

यासाठी परमेश्वराची अनुभूती आपणच साधना करून घ्यायला हवी -

'मन जिव्हा जाणे षड्रसांची चवी । तैसाचि पाहिजे स्वयें अनुभवी ।।' (८X८)

या प्रसंगात पढिक वैदिक पंडित आणि ज्याला आत्मप्रचीतीचा प्रत्यय आला आहे असा साधू यांतील भेद वर्णन करून साधूचं मोठेपणं वर्णिलं आहे -

'वेदी बोलोन शब्दकळा । दवडिली असे भेदाची माळा।।
सोहंप्रेम निजसुखाचा जिव्हाळा । नेणती आत्मतत्वें' ।। (८X२३)

'शब्द बोलणे जितुका वेदांत । अनुभव-चर्चा तो सिद्धान्त ।
या दोहींविरहित बोधांत । स्वयें साधू असतील ।।' (८X३०)

आपलं मत स्पष्ट करण्यासाठी शेख महंमदांनी या प्रसंगात असंख्य दृष्टान्त दिले आहेत.

याच प्रसंगात त्यांनी दांभिकांवरही टीका केली असून 'भाव' आणि 'अ-भाव' यांतील भेद विशद केला आहे. आपण भाविक असूनही 'अविंध', 'म्लेंच्छ' म्हणून आपला जो उपहास होतो, त्याविषयी ईश्वराशी हृदयसंवाद साधला आहे -

'शेख महमद विनवी आनंदकंदा ।
तुवां मज म्लेंच्छ केलें परमानंदा ।
विटाळ भाउन म्हणती अविंधा ।
विप्र शुद्ध मातें' ।। ८X८३ ।।

'माझा विटाळ का भासविसी ?' असा प्रश्न विचारूनही

'मज जनाकुन 'विटाळसें' म्हणविले ।
ईश्वरा हें बहुत बरवें केले ' ।। ८ x ६।।

असं ते म्हणतात, तेव्हा

'बरें देवा कुणबी केलों ।
ना तरि दंभें असतों मेलों !'

या तुकोबांच्या उद्गारांचा आठव झाल्याशिवाय राहत नाही. भक्तीत जातिधर्मभेदाचा प्रश्नच कुठं उद्भवतो ? असं म्हणून ते जे दृष्टान्त देतात, त्यांतील एक दृष्टान्त तर चक्क चोखोबांचंच स्मरण करून देतो -

'इक्षुदंड काळा वाकुडेपणें । गोडी काळी-वाकुडी नाहीं जाणे ।
तैसें माझें मन गोड भाविकपणें । निर्गुणा तुझे ठायीं' ।। ८ x १२ ।।

याप्रमाणं शेख महंमद 'तैसा माझा भाव ईश्वरीं ।' असा स्वत:च 'निर्वाळा'ही करून हा प्रसंग संपवितात -

'ऐसी सद्गुरु ईश्वरी । भक्तीची प्रेमकळा ।
स्वयें शेख महंमद केला निरवाळा ।
ऐकोन ईश्वरमूर्ती प्रवळा ।
साक्षात्कारें डुल्लती' ।। ८ x ९९ ।।

## प्रसंग ९

एकशेनऊ ओव्यांच्या या प्रसंगात शेख महंमदांनी एक वेगळाच विषय मांडला आहे. वरकरणी तो विषयानुसंधान साधणारा आहे की नाही, असा आभास होतो पण खरं तर त्यातही त्यांनी अनुसंधान साधलंच आहे. संतसाहित्यात हा विषय म्हणजे एका अर्थानं 'नवलाव' च आहे. शेख महंमद जशी ईशस्तुती करतात, त्याचप्रमाणं ईश्वराचे तथाकथित दुर्गुणही वर्णितात.

'मी तुझी खोडी काढतो आहे' असं ते स्पष्टपणे देवालाही बजावतात-

'नवव्या प्रसंगाची नवलाव गोडी ।
'ईश्वराचे कर्तृत्वी काढिली खोडी' ।। ९ x ३ ।।

- असं म्हणून आम्ही भक्तांनीच तुझे अवगुण लपविले आहेत, अशी भूमिका घेतात. तू आम्हाला जीवत्व देऊन वेगळं केलं नसतंस तर 'द्वैत' तरी का निर्माण झालं असतं नि आमचे पुढचे प्रश्न तरी का निर्माण झाले असते ? अशा प्रकारे किती तरी उदाहरणं देऊन त्यांनी आपली ही भूमिका विशद केली आहे, त्यात 'व्याजस्तुती'हा अलंकार आढळतो. वरकरणी ही ईश्वराची निंदा वाटते पण ख-या अर्थानं ती त्याची स्तुतीच असते. शिवाय त्यातूनही त्यांची (शेख महंमदांची)

समतेची, एकात्मतेची, सामाजिक न्यायाची, विषमतेच्या विरोधाची भूमिका प्रकट झाली आहे. त्यातील वानगीदाखल एक दोन उदाहरणं देतो -

– 'एका चर्माची अनेक बाहुली । एक उदकरंगे रंगली ।
अनेक आवरणांचि नावे ठेविली । जनास दावावया' ।। ९ x ११ ।।

– 'घडीव प्रतिमांसि जन रिझविले ।
स्वयें झकलीं म्हणसी ' ।। ९ x २१ ।।

– 'मूर्खांचिया माथां शिंग नाही दिधलें।
हे निर्गुणा तुवां बरवें केलें ' ।। ९ x २८ ।। इ. इ.

मी विश्वाचा पसारा एवढा वाढविला खरा पण 'मी जालों जालेपणावेगळा', 'ऐसा स्वयें मी माझेपणावेगळा' (९ x ७०, ८०) असं देव शेख महंमदांशी संवाद करताना सांगतो, त्या वेळी ते देवाची क्षमा मागतात. या संवादात देव, 'ऐसे असंख्यात बुडाले, बुडतील ! 'कलियुग बुडावयाचें साल । पापें होतील नान परींची' ।। ९ x ५२।।

असं सांगून ईश्वरा शेख महंमदांना या काळातही आपलं कर्तव्य पार पाडून जनोद्धार करायला सांगतो. समाजात किती प्रचंड 'पाखांड' झालं आहे, याचं या संदर्भात शेख महंमदांनी केलेलं वर्णन त्यांनी केलेल्या सूक्ष्म समाज-निरिक्षणाचं नि समाजचिन्तनाचं द्योतक आहे, त्यातून समाजातील अपप्रवृत्तींवर प्रखर प्रकाश पडतो (९ x ८२ - ९९), हा या प्रसंगातील समाजप्रबोधनाचा भाग आहे पण त्याची हवी तशी दखल अभ्यासकांनी घेतलेली नाही.

समाजाचं हे स्खलन पाहून ईश्वरादेशानुसार कवी 'जाळीन अविद्येच्या अनाचारा',(९ x १०४) अशी प्रतिज्ञा करतो व तीही ग्रंथाच्या विषयाच्या अनुषंगानं औचित्यपूर्णच आहे. ग्रंथाच्या विविध ' प्रसंगातील ही संगती, हा क्रम व ही तर्कसंगतता आजवरच्या अभ्यासकांनी का मांडली नाही, ते कळत नाही. ती लक्षात यावी, यासाठीच 'योगसंग्रामा'तील प्रसंगांचं आवश्यक तिथं काहीशा विस्तारानं व तपशीलानं मी विवरण केलं आहे. अशा प्रकारचं हे विवरण प्रथमच होत असल्यानं शेख महंमदांच्या साहित्याच्या आकलनास व मराठी भक्तिसाहित्याच्या विवेचन-विश्लेषणास ते उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.

नववा प्रसंग संपवितानाही शेख महंमद अवधान न सोडता दहाव्या अध्यायात जे विवेचन करणार आहेत, त्याचं सूत्र 'पुढती अवतरणी करी प्रबोध'। (९ x १०६) या शब्दांत मांडतात. या प्रसंगाचीही 'तुम्ही विवेकें घ्यावी चवी,' हे त्यांचं आवाहन प्रसंगोचित आहे.

## प्रसंग १०

पंच्याणव ओव्यांच्या या प्रसंगात शेख महंमदांनी गुरूच्या मार्गदर्शनानं योगसाधनेचा एकेक टप्पा कसा गाठावा, ते सांगितलं आहे. त्यांतील सुरवातीचा टप्पा ध्यानाचा आहे. या प्रसंगाच्या प्रारंभी नेहमीची दोन वंदनं असून त्यानंतर भावभक्तीच्या अक्षरांना, ओळींना, चरणबंदांना नमन केलं आहे, तेही आगळंवेगळं आहे. योगप्रक्रियेचा केंद्रबिंदू मन असल्यानं 'चित्त मनेंसि एकाग्र'करून साधनेस प्रारंभ केला आहे. (१० x ४).

'बैसो जातां ध्यानीं । तो अनेक तरंग उठती मनीं ।' (१० x १७)

हेही स्वाभाविकच नाही का ? पण याबर गुरूनं चांगला उपाय सांगितला आहे आणि तो स्पष्ट करण्यासाठी शेख महंमदांनी भोव-याचा चपखल दृष्टांतही दिला आहे -

'ऐक खुण सांगतो, तुजजवळी ।
भोवरा टाकून आसुडे जे जाळी ।
तों फिरो लागे आपल्याजवळी ।
तैशा वृत्ति आवराव्या' ।। १० x २२ ।।

अशा प्रकारचे कितीतरी दृष्टांत या प्रसंगात इतस्ततः विखुरले आहेत. त्यांतून एका योग्या-प्रमाणंच प्रतिभावंत कवीचंही दर्शन घडतं. विस्तारभयास्तव हा सर्व तपशील टाळला आहे.

'अखंड करीन सोहं उच्चारु ।
मागुता नको गा हा गर्भ घोरु ।
जन्ममरणाचा मज ।।'

अशी वृत्ती निर्माण होते, याला कारण -

'सोहंजप थोर स्वहिताची वाणी !' (१० x ७८-७९).

ही साधना करताना सद्गुरू 'नको धरू जनाची लाज' हे सांगायलाही विसरले नाहीत. पुढच्या अकराव्या प्रसंगातील विवेचन साधनेस उपयुक्त असून त्यामुळं 'जन्म-मरणाविण ठाणे होईल' असं सांगून शेख महंमद साधकाचा आत्मविश्वास वाढवितात. ( १० x ९५)

## प्रसंग ११

एकशेनऊ ओव्यांच्या या प्रसंगातील पहिली दोन नमनं नेहमीप्रमाणंच आहेत, आणखीही बरीच नमनं आहेत. नेत्र, कर्ण, कर, चरण, हृदय या सर्वांनाच यासाठी नमस्कार केला आहे की, त्यांच्या माध्यमातून साधना करता येते, भक्ती करता येते. याशिवाय केलेली अन्य नमनंही लक्षणीय

आहेत. मागील प्रसंगातील ध्यान-विचारात ' चित्तवृत्तिनिरोधा'ची संकल्पना आहेच. याही प्रसंगात ती संकल्पना अधिक दृढमूल केली असून षड्विकार कसे नष्ट करावेत, यावर भर दिला आहे -

'अहं काम, क्रोध घालावे दहनी ।
कल्पना मुरगाळूनी' ।। ११ x ३० ।।
'जो कल्पना पुष्पाची करी कळी ।
वासनागंध तयेमाजी मुरगाळी ।
तो जाणिजे महायोगीराज बळी ।
यमा-इंद्रास नाकळे' ।। ११ x ३२ ।।

सतराव्या अध्यायापूर्वी 'योगसंग्रामा'चा उल्लेख नाही, असे या ग्रंथात शेख महंमदांचे काही अभ्यासक का म्हणतात, ते कळत नाही. या प्रसंगाच्या नव्वदाव्या ओवीत तर कवीने प्रत्यक्ष गुरूला संग्राम करण्याविषयीची अनुज्ञा मागितली आहे, ती अशी-

'शेख महमद म्हणे सद्‌गुरू राजा ।
मजला द्यावी आज्ञा संग्रामकाजा ।
ही दैवतें भुतें मारीत बोजा ।
देहसंगे लागली जीं ।।'

हा संग्राम 'आपुलियात आपण'च करायचा आहे, त्यासाठी देवता-स्मरण आवश्यक आहे. त्यामुळं शौर्यानं संग्राम करता येईल व 'देहाभिमानाची बंधनं' गळून पडतील, असं म्हटलं आहे ; पण या ईश्वरस्मरणातही शेख महंमद अल्ला व हरी हे एकच होत, त्यांपैकी कुणाचंही नामस्मरण हे ईश्वरनामस्मरणच होय, हे सांगून ते सर्वधर्मसमभाव प्रकट करतात -

'आता अल्ला म्हणा वो तुम्ही वाचे ।
हरी म्हणता तुमचे काय वेंचे ?
हरी अल्ला न म्हणतील ते काचे ।
अघोरी जाणावे ।।
ऐका हरी अल्ला जरी दोन असते ।
तरी ते भांडोभांडोच मरते ।
वोळखा काही ठाय उरों न देते ।
येरून येराचा पै' ।। ११ x ९४-९५) ।।

आपण जे विवेचन करीत आहोत त्यात एक सूत्र आहे, अन्तःसूत्र आहे, याचं भान नि अवधान शेख महंमदांना सतत आहे. त्या अनुसंधानाच्या संदर्भात ते बहुधा प्रत्येक प्रसंगाच्या शेवटी

जाणीवपूर्वक निवेदन करतात. योगसाधनेचा एक एक टप्पा कसा गाठावा, एक एक अवस्था कशी साधावी, याचं विवरण यामुळंच या 'प्रसंगा'तून - म्हणजे अध्यायातून - येतं व त्याची युक्तिसंगतताही आपल्याला जाणवल्यावाचून राहत नाही. अकराव्या प्रसंगाचा हा शेवट पाहा –

'प्रसंग अकरावा समाप्त करून । कथितों बाराव्याचें अनुसंधान ।
वक्ता ध्येय-ध्याता निरसुन । शेख महंमद गुरू स्तवीं ।।
ग्रंथाभितरी शेख महंमद । बोलेकरून अबोल्याचा छंद ।
उत्तम बोलणियाचाही प्रबंध । बोल बोलविला असे' ।।
(११ x १०८-९).

## प्रसंग १२

एकशेपाच ओव्यांच्या या प्रसंगाचा प्रारंभ अन्य प्रसंगांप्रमाणंच केला असून त्यानंतर विषयानुषंगानं व योगसंग्रामाच्या / योगसाधनेच्या अनुषंगानं शिवाला व अगम्य ध्यान मुद्रेला वंदन केलं आहे. च्यौऱ्यांशी लक्ष योनींचा 'स्थूळ आधार' जो ईश्वर त्यालाही वंदन केलं आहे. त्याची प्राप्ती साधनेच्याद्वारा करून देणाऱ्या सद्गुरूविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. सद्गुरुवंदन करताना पुन्हा पूर्वी एकदोनदा शेख महंमदांनी आपले गुरू 'हजरत मीरां पीर जाहिरू' यांचा असा उल्लेख केला आहे, तो शेख महंमदांच्या अन्य अभ्यासकांनी व मराठी वाङ्मयोतिहासकारांनी का केला नाही, याचं आश्चर्य वाटतं. यामुळं त्यांचा सूफी परंपरेतील अनुबंध अधिक स्पष्ट होतो, हे लक्षात घ्यायला हवं –

'प्रणिपात केला जय जय जी सद्गुरू ।
आज हजरत मिरा पीर जाहिरू ।
त्याचे कृपेनं रत्नांचा सागरू ।
सिध्द ग्रंथ आरंभिला' ।। १२ x ५ ।।

यातील 'योगसंग्राम' हा 'सिद्धग्रंथ' आहे, हा उल्लेख मला महत्त्वाचा वाटतो.

'साधना करताना चित्त-मनेंसि होऊनिया उदार ।
हा धरिला पाहिजे दृढ निर्धारू । एकविध समस्तेंसी ।।'
(१२ x ३)

ही 'योगसंग्रामा'ची पूर्वसिद्धता आवश्यक आहे. या मार्गात अहंकार नि पाखंड हे दोन्ही आडवे येतात. 'अहंकाराची वित्पत्ति' (१२ x २५) नि 'पाखंडाचि निखंदनी' (१२ x ६) केली आहे. 'पाखांडखंडना'च्या निमित्तानं शेख महंमदांनी केलेलं समाजाचं सूक्ष्मनिरीक्षण, तद्विषयक चिंतन, धर्म व श्रद्धा यांच्याविषयीचे अपसमज, या निमित्तानं समाजात पसरलेल्या अपप्रवृत्ती

यांवर प्रखर टीका करून समाजाचं केलेलं प्रबोधन अत्यंत महत्त्वाचं व चिन्त्य आहे. या प्रसंगातील सहाव्या ओवीपासून ८३ व्या ओवीपर्यंतचा मोठा भाग या विषयानं व्यापला आहे. अनेकदैवतवाद, दांभिकपणा, नवससायास, वारांविषयीच्या शुभ-अशुभ कल्पना, भ्रामक विचार या सर्वांवरच शेख महंमदांनी झोड उठविली आहे. आपल्या धर्मातील कुप्रथांवर किंवा अंधश्रद्धांवरही ते टीका करतात. नवसाविषयीच्या एका दाखल्यावरूनही त्यांच्या या 'पाखंड-निखंदनी'ची कल्पना येईल -

'नवस केलिया जरी पुत्र जाले ।
व्याघ्र-सिंह नवसेंविण जन्मले ।
चौऱ्यांशीचे दुःखसुख-सोहळे ।
जाले नवस केल्याविण' ।। १२ x ९० ।।

बुद्धिप्रामाण्य व विवेकनिष्ठा हे 'पाखंडाचि निखंदनी' चं अधिष्ठान असून भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग यांचा समन्वय यात साधला आहे.

अहंकार नाहीसा करून, विपरीत धर्मकल्पना वा उपासना-कल्पना बाजूला सारून सर्वसामान्य समाजालाही (योग-) साधनेला किंवा योग्य उपासनेला प्रवृत्त करण्याचा शेख महंमदांचा हेतू या प्रसंगातील विवेचनात स्पष्ट होतो.

## प्रसंग १३

शंभर ओव्यांच्या या प्रसंगात आपण जे विवेचन करणार आहोत, त्याविषयी बाराव्या प्रसंगाच्या शेवटी असं म्हणून अनुसंधान साधलं आहे -

'प्रसंग केला बारावा समाप्त ।
तेरावा आइकें सांगिजेतील देवता ।
द्रवेल शेख महंमद वक्ता ।
श्रोत्यांचे श्रवणीं' ।। १२ x १०५ ।।

बाराव्या प्रसंगातील 'पाखांडखंडना'चाच विस्तार याही प्रसंगात केला आहे. तिसऱ्या ओवीपासून ८३ क्रमांकाच्या ओवीपर्यंत अत्यंत विस्तारानं, अनेक उदाहरणं देऊन, 'अविद्येची' लक्षणं सांगून शेख महंमद 'विकल्पा'च्या - म्हणजे विपरीत कल्पनांच्या-अनेक पदरांचं तपशीलवार व रेखीव चित्रण करतात व त्यांतून 'संकल्पा'चं महत्त्व आपल्या मनावर ठसवितात-

'जंव्हा आपण कल्पनेसीं मारावें । तंव्हांच त्या मरणाला पाहावें ।
सांहंतत्त्व तैसें वोळखावें । निजीं मरोनिया' ।। १३ x ९८ ।।

अशा प्रकारे 'निजसुखाची प्रेमबोध-गोडी' आपण चाखावी, असं शेख महंमद या प्रसंगाच्या शेवटी म्हणतात.

## प्रसंग १४

एकशेएकतीस ओव्यांच्या या प्रसंगाच्या प्रारंभी दोन नेहमीची वंदनं झाल्यानंतर क्षुधाहरण करणाऱ्या अन्नाला व शरीराचं रक्षण करणाऱ्या व त्याला आच्छादणाऱ्या वस्त्राला नमन केलं आहे. त्यापूर्वी तेराव्या प्रसंगात लक्ष्मीमुळं व चौदा विद्यायुक्त भाषांमुळं जीवन संपन्न होतं म्हणून त्यांना नमन केलं आहे. ही नमनं लौकिक जीवनाशी व त्यातील सुखांशी ही संबद्ध आहेत, यावरून त्यांचं वेगळेपण लक्षात येईल.

बाराव्या-तेराव्या प्रसंगातील संकल्पसमर्थन व विकल्पखंडन यांचं सूत्र याही प्रसंगात आहेच. यावरून शेख महंमदांना समाजातील अनाचार कसा बघवत नाही व तो नाहीसा करावा, यासाठी त्यांच्या मनाला केवढी तळमळ लागून राहिलेली आहे, ते लक्षात येतं.

'समाप्त प्रसंग चौदावा । तोडिल्या पाखंड- अविद्येच्या डावा' ।। १४ x १२७ ।। या प्रसंग-समाप्तीवरून त्यातील विवेचनाची सहज कल्पना येईल. त्यात एक वेगळा व मुद्दाम उल्लेखिण्याजोगा भाग हा की, आत्मज्ञानालाही गर्व होणं योग्य नाही, तोही त्याच्या साधनेत व या संग्रामात अपकारक ठरतो, ही महत्त्वाची सूचना प्रारंभीच शेख महंमदांनी दिली आहे –

'आत्मज्ञात्याचे ठायी गर्व, मीपण । जें जाणिजे उघडीच नागवण' ।। १४ x ३ ।।

## प्रसंग १५

' ग्रंथ चालिला निजबोधें ' असं चौदाव्या प्रसंगाच्या शेवटी एकशे एकतिसाव्या ओवीत सांगून ग्रंथातील विविध 'प्रसंगा'तून साधनेचं / संग्रामाचं अन्तःसूत्र कसकसं प्रवाहित झालं आहे, ते शेख महंमदांनी सांगून आपलं विषयावरील 'अवधान' पक्कं असल्याची ग्वाही दिली आहे. ' मग प्रेमबोधाचा तत्त्व-ठसा उमटला ग्रंथीं ' असं चौदाव्या प्रसंगाच्या त्रेचाळिसाव्या ओवीत सांगून पुढे बारा ते चौदा या प्रसंगातील प्रतिपाद्यामधील सूत्र ते उलगडून सांगतात –

'प्रसंग बारावा संपल्यावरी । तेरावा संपला धरूनी उरी ।
चौदाव्याने आरंभिली संग्रामहरी । शेख महंमद वचनें ।।'

( १४ x ४४)

एकशे सोळा ओव्यांच्या पंधराव्या प्रसंगात प्रथम 'श्री निर्विकाराय नम :' असं नमन असून त्यानंतर गणेशवंदन आहे. त्यानंतर सद्‌गुरू चांग (चांद बोधले) यांना वंदन करून चांद बोधले-जाणोपंत (जनार्दनस्वामी) अशी आपली गुरुपरंपरा सांगितली आहे. (१५ x १-७) शेख महंमद कोण आहेत, कुठले आहेत, त्यांची परंपरा कोणती, असं कुणी विचारील, यासाठी ही माहिती दिली आहे-

'कोठील पुसा कोणाचा कोण । यालागी प्रगटलें ।'

।। १५ x ७ ।।

या प्रसंगातही विकार व अहंकार त्याचप्रमाणं 'पाखंड'कसं नाहीसं करावं, याविषयी विवेचन केलं आहे. त्यातही योगसंग्राम-सूत्र आहेच. वासना हेच दु:खाचं मूळ आहे, तिच्यामुळं देहात विकार निर्माण होतात. यासाठी वासना समूळ नाहीशी करावी, असं विवेचनही या प्रसंगात केलं आहे. त्याचप्रमाणं 'आधी मारावा मूळ अहंकार । मग मनावरी होऊनी स्वार। निजपद जिंकावें' ।। १५ x ४० ।। अशी हा 'संग्राम' जिंकण्याची गुरुकिल्ली सांगितली आहे.

या प्रसंगात यापूर्वीच्या तीन-चार प्रसंगातील 'पाखांडखंडन' आलंच आहे, त्यात कोकणातील वागजाई, भद्राई, डांकीण, भुतांचे पुजारी वीर यांच्यावर तसंच नवस-सायास, चेटूक, जारणमारण विद्या इ. वर टीका करून समाजाचा धर्मविषयक दृष्टिकोण व समाजजीवन निकोप आणि शुद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. हे 'जनाचे पाषांड' आहे असं त्याना वाटतं (१५ x ८). त्यांनी मुरळीची प्रथा आणि काही तथाकथित हरिदास यांच्यावरही प्रहार केला आहे. हे 'पाखांडखंडन'ही शेख महंमद फार विस्तारपूर्वक करतात. (१५ x ११-२७).

' साधुत्वावेगळे जें आचरण । तें पाषांड जाणा संपूर्ण ' ।। १५ x २८।।

असा पाखंडाविषयीचा आपला निर्णयही ते रोखठोकपणे देऊन टाकतात. याशिवाय समाज-जीवनातील व्यभिचारादी अपप्रवृत्तींवर प्रखर टीका करून ते समाजाचं प्रबोधन करतात ।। १५ x ५५-६३ ।। आणि समाजाला शुचित्वाविषयी असा उपदेश करतात –

'यालागी हृदय शुच करा । परमार्थ शोधावा खरा ।
भावभक्तीसी दृढ धरा । सदगुरू सेवुनिया' ।। १५ x ६४ ।।

परमात्मा आणि साधू यांत भेद नाही, यासाठी आपण साधूंच्या पाऊलखुणांच्या आधारे साधनेची (योगसंग्रामाची) वाटचाल करावी, अशा आशयाचं मार्गदर्शन शेख महंमदांनी या प्रसंगाच्या शेवटी केलं आहे.

## प्रसंग १६

एकशेचौदा ओव्यांच्या या प्रसंगाच्या प्रारंभी गणेशवंदनानंतर बारा राशी, पंधरा तिथी व सात वार यांना वंदन केलं आहे. 'बद्धमुक्त' 'मुक्तबद्ध' आणि 'नित्यमुक्त' यांच्याविषयी विवरण करून पुन्हा इंद्रियविकार, त्यांचा मनावरील परिणाम व पर्यायानं साधनेवरील परिणाम, मनावरील नियंत्रण याविषयी पुन्हा विवरण केल्यानं 'विवरलेंचि विवरावें' या समर्थ रामदासांच्या लेखन - पद्धतीचा प्रत्यय येतो. तोच विचार पुन:पुन्हा सांगितल्यानं तो जनमानसावर ठसतो, ही लोकशिक्षकाची भूमिका त्यातून प्रकटते. याशिवाय अनावश्यक कर्मकांडावरही या प्रसंगात टीका केली आहे. मुसलमान म्हणून आपण ही टीका करीत नाही, ज्या ज्या धर्मात अनिष्ट प्रवृत्ती आढळतात, त्या सर्वांवरच जनहितासाठी आपण प्रहार करतो. हिंदूचे 'सद्गुरु' व मुसलमानांचे 'पीर' हे सत्पुरुष असून ते समाजाला योग्य ऐहिक व पारमार्थिक मार्गदर्शन करतात, असंही शेख महंमद म्हणतात -

'मुसलमानात होऊनिया पिरु। मराठियांत म्हणती सद्गुरु।
तोचि तारील हा भवसागरू। येर बुडोन बुडविती' ।। १६ X ५७ ।।

पुढील सतराव्या व अठराव्या प्रसंगात प्रत्यक्ष 'योगसंग्राम' असल्यानं त्याची भक्कम (मानसिक) सिद्धता त्यापूर्वीच्या या सोळाव्या प्रसंगात करणं आवश्यक आहे. आणि म्हणूनच वरील विवेचन अनेक अर्थांनी 'प्रसंगोचित' आहे, असं वाटतं.

या प्रसंगातील शेख महंमदांचं आत्मनिवेदनही लक्षात घेण्याजोगं आहे. आपल्यावर टीका करणारांना त्यांनी यात उत्तरही दिलं आहे -

'अविंध यातीस निपजलों । कुराण-पुराण बोलों लागलों ।
सिद्ध - साधकांस मानलों । स्वहित स्वहितागुणें ।।
ज्याला नवाजिता ईश्वर । त्याचा शोधू नये कुळाचार।।' (१६ X ६५ - ६६)

त्यांनी श्रोत्यांनाही या संग्रामास सिद्ध होण्याचं व स्वहित साधण्याचं आवाहन केलं आहे-

'आहिकी श्रोते नमस्कारिले । प्रसंग सोळा संपूर्ण केले ।
सत्राव्यांत संग्राम आरंभिले । आधारिं गुण नमूनिया ।।
शेख महंमद बोले निर्मळ । मी तो असे सद्गुरूचा लाडिवाळ।
तुम्ही अष्टांह अंगे होऊनिया निश्चळ । स्वहित करावें' ।। (१६ X ९५ - ९६)

'हा ग्रंथ करून सद्गुरूनें । शेख महंमद वाढविले भूषण' असं म्हणून प्रसंगसमाप्तीच्या वेळी समाधन व्यक्त केलं असून एका परीनं ग्रंथमहिमाही वर्णिला आहे.

## प्रसंग १७

सतरा आणि अठरा हे दोन प्रसंग म्हणजे 'योगसंग्रामा'चे कलशाध्याय होत. त्यांत 'योगसंग्रामा'तील प्रत्यक्ष रूपक आलं आहे पण डॉ. ढेरे, डॉ. मोदळे, मराठी वाङ्मयेतिहासकार या सर्वांनीच या दोन प्रसंगांतील शेख महंमदांनी इस्लाम / सूफी दर्शनाची भारतीय दर्शनाशी घातलेली सांगड उलगडून दाखवली ,नाही. असं का घडलं असावं, हा प्रश्न अंतर्मुख करणारा आहे. वस्तुत: धार्मिक अभिसरण, परस्परसामंजस्य व एकात्मता यांच्या संदर्भात हा भाग फार महत्त्वाचा आहे. मराठी भक्तिसाहित्य-चळवळीत व वाङ्मयेतिहासात याची अवश्य नोंद घ्यायला हवी.

दोनशेचाळीस ओव्यांच्या सतराव्या अध्यायाचा प्रारंभच किती वेगळा आहे -

'श्रीगणेशायनमः । जल्ले जलालहु अल्ला गनि प्यारा ।
जयजय जी जयवंत नरा । विश्वव्यापक निज परमेश्वरा रहिमान साचा' ।।
अव्वल समजो एक बिस्मिल्ला । मग सहस्त्रनामें विश्व व्यापला ।
बंदगी करो छोडो गलबला । सद्‌गुरु सेवूनियां ।।
सच्चा पीर कहे मुसलमान । मऱ्हाठे म्हणविती सद्‌गुरू पूर्ण ।
परि दोन्हीत नाहीं भिन्नत्वपण । आखों खोल देखो भाई ।।
छप्पन्न भाषा - वचन - प्रकार । करीती एक अल्लाकी जिकिर।
भाषण भाषता करती किरकिर । किल्लाफ पकडकर।।
वोळखा किल्लाफ कुफरकी निशाणी। तेणें ईश्वर गोंविला भांडणी ।
स्वहित करील आत्मज्ञानी । पीरके मेहरसु' ।। १७ X १ - ५ ।।

(अधोरेखन माझं).

त्यातून इस्लाम / सूफी दर्शनाच्या महत्त्वपूर्ण संकल्पना व्यक्त होतात.)

या संग्रामातील आत्मा हा योद्धा असून तो अहंकाराशी युद्ध करीत आहे. हा संग्राम 'अंतरीचा संग्राम' आहे. अव्दैताऐवजी व्दैत भासणं ही विपरीत कल्पना आहे. त्यामुळे सृष्टीत भिन्नत्व दिसतं. यासाठी अहंकाराचा विनाश केला की आपण ईश्वराशी एकरूप होतो. यासाठी हा 'संग्राम' करणं व तो जिंकणं आवश्यक आहे., हे जनसामान्यांना कसं कळणार ? यासाठी 'जड - मूढ तारावया उपकार । तिही ग्रंथ केला ' ।। १७ X ९ ।। -असं ग्रंथनिर्मिति - प्रयोजन शेख महंमद प्रथमच सांगतात. 'मी-तू' पण गुरुत्वी विरल्या' मुळं 'शेखमहंमदपण लोपून विश्वात तदाकार' झाल्यानं ते गुरूच्या माहात्म्याचं स्मरण करतात, त्याला वंदन करतात व त्याला 'पुसोन संग्रामाचा विचार', त्याचा निरोप घेतात-

'मही कडासन प्रबळ । चौदा भुवनं धरिलें स्थूळ।
अंतरी संग्राम मांडिला प्रबळ । सावध श्रोते परियेसा ।।
जेणें घातले पद्‌मासन । सत्य केले मूळ आकोचन ।
एकवीस स्वर्गांचे मैदान । अवलोकिले ।।
मग पद्‌मासनापुढे । वज्रासन दिसले देव्हडें ।
सिध्दासन सांधिले गाढे । योगसंग्रामालागीं ।। १७ X ३६ - ३७।।

(अधोरेखन माझं. या योगातील पारिभाषिक संज्ञा आहेत.)

हा संग्राम श्रोत्यांनाही 'बयाजवार' (तपशीलवार) सांगायचा असल्यानं तो समर्थपणे व्यक्त करता यावा, यासाठी शेख महंमद सरस्वतीची प्रार्थना करतात नि चारी वेदांचंही स्मरण करतात. स्वतःचा या संदर्भात विनयानं निर्देश करताना ते म्हणतात -

'मी नेणे कुशलता व्युत्पत्ति । संस्कारी पंडित हांसती ।
शुध्द भाषा नेणें मी ।।
मी यातीचा म्लेंच्छ । संस्कार नेणें मऱ्हाठीस ।
बोल ठेविती कवित्वास । कुशल ज्ञानी ।।
नाही पाहिलें शास्त्रपुराण । बोलें नाही शिकलों साळसूद वचन ।
तुझें तूंचि करी यो वर्चन । ईश्वरसामर्थ्य ।।' १७ X ५० - ५१ ।।

सरस्वतीचा आशीर्वाद घेतल्यावर पुढं संग्रामाचं वर्णन केलं आहे. अहंकार हा प्रमुख शत्रू असल्यानं त्याचा निःपात करणं आवश्यक होतं. ही प्रक्रिया शेख महंमदांनी जनसामान्यांसाठी किती सोपी केली आहे पाहा -

'तुम्ही भक्तीचें शील करा हो । करी खड्ग घेऊनिया भावो ।
त्वरित उठावें ।। १७ X ६९ ।।

मग योगसंग्रामाच्या प्रक्रियेस प्रारंभ कसा झाला, ते सांगतात -

'नाभिहुनि चढविला पवन । हृदयीं ओळखिलें ऐका मन' ।। ११ X ६९ ।।

'जेव्हा हे मन चढे त्रिवेणी । तेव्हा सहज समाधी बैसे लोचनीं ।
जिकडेतिकडे पाहे स्वरूपावांचुनि । दुजें अनु ना भासे ।।
मग बाहिजे अंतरीं निज । दिसे भासे ब्रह्मबीज ।
सहज समाधी लागे सहजीं सहज । चहू अवस्थांमाजी ।
या अष्टदळवेगळें ज्याचें मन । तो असे भ्रमिष्ट पिसा याहून ।
अविद्या अवलक्षण । स्वभाव सहज त्याचें' ।। (१७ X ८९ - ९१)

यानंतर मनावर स्वार होऊन आत्मा निघतो. अहंकाराशी प्रखर झुंज देऊन तो त्याचा शिरच्छेद करतो. विकल्प - संकल्प यांच्याशीही त्याचा संघर्ष होऊन त्यांना तो जिंकतो. अहंकाराच्या सैन्याचाही तो पराभव करतो. आत्मा, दंभ, मोह, काम, क्रोध, मत्सरादी अहंकाराच्या सरदारांनाही पराभूत करतो.

अहंकाराच्या स्त्रिया सती जातात इ. प्रसंगांचं वर्णन कवीनं पुढं केलं आहे. अशा प्रकारे 'आत्मा राऊला यश' आलं त्यानंतर तो ब्रह्मांडशिखराकडे जायला निघाला. या घटनेनं हा प्रसंग समाप्त होतो.

## प्रसंग १८

'योगसंग्रामां'चा हा शेवटचा अध्याय सर्वांत मोठा असून त्याची ओवीसंख्या तीनशेसत्तावीस आहे. आत्मा 'तेजियावर' (मनरूपी अश्वावर) स्वार होतो त्यानंतर यौगिक प्रक्रियांचे योगाच्या परिभाषेत विवरण केलं आहे. त्यावरून शेख महंमदांची या क्षेत्रातील तसंच इस्लाम / सूफी दर्शनांतील विलक्षण गती लक्षात येते. त्यांतील काहींचा निर्देश करतो. त्यातील यौगिक परिभाषा अधोरेखित केली आहे -

'<u>उर्ध्वगति</u> विहंगमाची वाट । <u>पश्चिम</u> पंथे दीर्घ नीट ।
पुढे <u>मीनमार्ग</u> कपाट । मुंगीच्या डॉळिया येवढी वाट ।
<u>ओट मातृका</u> <u>सहस्रदळ</u> नीट । तेथे तेजी उभा केला ।।' (१८ X २१ - २३)

पुढं 'आत्मारावो' संदेहगड जिंकतो मग -

'निश्चळ चालिले उर्ध्वगहन । पश्चिम पंथे जाऊन ।
साधिलें काज ।। १८ X २४।।

त्यानंतर तो त्रिकुटशिखरावर चढतो व तिथं त्याला 'अनुहात' (अनहद) नाद ऐकू येतो. मग तो ब्रह्मानंदी सामावतो, ब्रह्मरंध्रातून पार गेल्यावर सहजसमाधीची अवस्था प्राप्त होते. पिंड - ब्रह्मांडाचं ऐक्य होतं. अशा प्रकारे हा योगसंग्राम पूर्ण होऊन 'आत्मारावो' 'योगेश्वरराणा'होतो-

'तेथे मज याती ना कुळ । पाहतां मूळ नाही डाळ ।
अनेग रूपांहूनी निर्मळ । स्वरूप माझें ।।
तेथे मी जोगी ना फकीर । जंगम ना दिसे कलंदर ।।
संन्यासी ना दिगंबर । माझा मी एकलेपणें ' ।। १८ X ४९-५०।।

यानंतर तो हरिनामस्मरण करतो आणि म्हणतो -

'हक ला इलाहा इल्लाल्ला । हजरत महमंद रसुलल्ला ।
या दोन्ही चरणांत पाहिजे ओळखिला । ईश्वरविश्वरूपे ।। (१८ X ६७)

पुढं इस्लामदर्शनानुसार कवी यावर भाष्यही करतो -

'लाइला' याची टीका अवधारा । नामरूपावेगळा ईश्वर स्मरा ।
तेणें शीघ्र भवनदीचा फेरा । चुकेल बापा ।।
मुसलमान कहे, 'जिकिर बुखानद' । मऱ्हाठे म्हणती, 'कथेचा आनंद' ।
परि दोन्ही भाषांचा भेद । ईश्वर अल्ला जाणे ।।
ईश्वर म्हणजे विश्वंभर । दगडाचा नोहे ओळखा जाहिर ।
ज्यापासून असंख्य अवतार । रामकृष्णादि जन्मले।।
अल्ला म्हणजे अलीफ न्यारा । वाहना हि निशिदिनीआधारा ।।
एकला जीव प्यारा । गुफर रहीम ।। १८ X ६८ - ७१ ।।

इस्लामदर्शनाच्या या भागाचा डॉ. ढेरे, डॉ. मांदळे वा मराठी वाङ्मयेतिहासकार कुठलाच उल्लेख करीत नाहीत.

या ग्रंथाचं वाचन केल्यानं 'निजगुजाचं वर्म' कळेल व द्वैताचे (श्रम व भ्रम) नाहीसे होतील, अशी फलश्रुती कवीनं सांगितली आहे.

ग्रंथसमाप्तीच्या वेळी शेख महंमदांनी श्रोत्यांना पुढील विनंती केली आहे -

'मी यातीहीन साबडें । बोलो नेणें धडफुडें ।
श्रोते करावें वाडेंकोडें । लाडिवाळ म्हणउनिया' ।। १८ X ३११।।

याशिवाय ग्रंथसमाप्तीचा लेखन-काळ इ. तपशीलही कवीनं दिला आहे -

'पार्थीवनाव संवत्सर । ते दिवशी ग्रंथ केला जाहिर ।
शुध्द पूर्णिमा सोमवार । गुरुग्रहण पूर्ण होतें ।।
शुध्द श्रावणमास पाडवा । अधिक पहिल्या सोमवाराचा ठेवा ।
पूजा बेलपत्री सदाशिवा । नामघोषे ब्रह्मानंदे ।।
... ते दिवशी ग्रंथ संपला ।।' (१८ X ३१८-२०)

या संग्रामाचा शेवटही किती आनंददायक आहे-

हा ऐसा ब्रह्मांडनायक आदिपुरुष । ब्रह्मरसाचा आत्मकळस ।
ऐसा तो महातेजाचा प्रकाश । योगियाहृदयी वसतसे । (१८ X ३२६)

## २. पवनविजय

शेख महंमदांच्या 'तत्वसारा'तील प्रतिपाद्याचे दोन विभाग आहेतः एकूण ९० ओव्यांच्या 'पवन विजया'च्या या पहिल्या खंडाचा पहिल्या ६८ ओव्यांचा एक विभाग असून दुसरा विभाग ६९ ते ९० हा बावीस ओव्यांचा आहे. यातही पहिल्या विभागातील पहिल्या पाच ओव्यांत अव्यक्त, अविनाश परमात्मतत्त्व, सरस्वती व गुरू यांना वंदन करून 'ज्ञानता (सा)रा वदेन' अशी एकाच चरणाची ग्रंथाची प्रस्तावना केली आहे.

हा ग्रंथ गुरु - शिष्य - संवादात्मक असल्यानं पहिल्या खंडाचा पहिला विभाग प्रश्नांचा असून दुसरा विभाग या प्रश्नांच्या उत्तरांचा आहे. 'अथा तो ब्रह्मजिज्ञासा' हा या पहिल्याच विभागातील प्रश्नांचा प्रेरणस्रोत आहे. हे प्रश्न पारलौकिकापासून लौकिकाचा व लौकिकापासून पुन्हा पारलौकिकाचा प्रवास करतात. तुम्ही - आम्ही सर्वसामान्य माणसं जेव्हा जीवनाचा गहन अर्थ शोधू लागतो तेव्हा आपण जिचा एक छोटासा घटक आहोत, ती जीवसृष्टी, चराचर, विश्व नि विश्वनिर्मितीमागील चैतन्य, निर्गुण, निर्विकार ब्रह्म याविषयी आपल्या मनात जिज्ञासा निर्माण होणं स्वाभाविक आहे. म्हणून 'निर्गुण ब्रह्म ते कवण?' हा पहिला प्रश्न पडणं हे सयुक्तिकच नव्हे तर क्रमप्राप्तही आहे.

हा पहिला प्रश्नच एवढा जटिल आहे की त्यातूनच अन्य किती तरी प्रश्न निर्माण होतात - नव्हे, प्रश्नांची एक मालिकाच निर्माण होते.

हे प्रश्न जसे भारतीय परंपरेतील सर्वसामान्य माणसाला पडताहेत, त्याचप्रमाणं शेख महंमदांसारख्या इस्लामधर्मीयालाही-सूफींच्या कादरी परंपरेच्या अनुयायालाही-पडताहेत. असा या ग्रंथाकडे पाहण्याचा आणखी एक दृष्टिकोण मनात बाळगल्यास, या प्रश्नांच्या प्रस्तुततेत आणखी भर पडते आणि या खंडाच्या दुसऱ्या विभागातील उत्तरांशी त्यांचा मेळ घालताना भारतीय दर्शनप्रणालीबरोबरच सूफी दर्शनप्रणालीचा अनुबंध साधता येतो. शेख महंमदांनी भारतीय पंचीकरणाशी मेळ साधणारे 'मुसलमानी पंजीज' हे आध्यात्मिक प्रकरणही लिहिले आहे, हा महत्त्वपूर्ण संदर्भ 'तत्त्वसारा'चा विचार करताना अत्यंत उपयुक्त ठरेल, असं मला वाटतं. हा विचार अद्यापपावेतो कोणत्याही मराठी संशोधकानं मांडलेला नाही, हेही येथे नम्रपणे नमूद करावंसं वाटतं. इस्लाम हा परमेश्वराचे निर्गुणत्व व निराकारत्व मानणारा व सगुणत्व व साकारत्व न मानणारा धर्म आहे, हेही इथं लक्षात घ्यायला हवं. त्या दृष्टीनं शेख महंमदांनी केलेली प्रश्नांची मांडणी व त्यांच्या उत्तरांचा अन्वयार्थही लक्षात घ्यायला हवा.

यांतले प्रमुख प्रश्न असे आहेत. परतत्त्व (ब्रह्म) हे जर 'अक्षर' आहे तर त्यास क्षरत्व कसं प्राप्त होतं ? (ओ.क्र.६) ते स्वयंभू आहे, त्याला आया(वा)गमन नाही, उदयास्त नाही, जागृती-सुषुप्ती नाही तर मग तर मग द्वैत (जीवात्मा वेगळा व परमात्मा वेगळा हा भेद) तरी कसं संभवतं ? निर्गुण ब्रह्म जर विविध अवतारांच्या रूपानं सगुण, साकार होत असेल तर त्या सगुणत्वाचं लक्षण कोणतं ? (क्र. १४)

हे निर्गुण ब्रह्म जर सर्व घटांत व्यापून असेल तर त्यांत 'व्दितीयत्व' किंवा 'द्वैत' आहे, असं नाही का म्हणता येणार ? (क्र. १५) ईश्वरानंच जर माया निर्मिली असेल तर त्यांत बंधु-भगिनीचं नातं कसं मानता येईल ? (क्र. १७). मुळात हा देव आहे तरी की नाही ? (क्र. १७). जीवात परमात्म्याचा अंश आहे की नाही ? मग 'परमात्मा तो कवण ठायी ?' असल्यास तीर्थाटन-जप-तप केल्यानं तो या देहातंच असल्याचा प्रत्यय कसा काय येतो ? (क्र. १९)' हे देव रूपासी आले कोठून' (क्र. २०) ज्यांना आकार लाभला ते सारेच नष्ट होणार असतील तर मग त्यांतला आत्मा कसा नष्ट होत नाही ? ('आकारा आले ते सर्वही नासे । निराकार केवी प्रकाशे' ?) (क्र.२१) कोठे प्रकटला ऊंकार ? विस्तार कोठे, कैसा जाला ?' (क्र.२७) ईश्वर जर असा प्रकट होत असेल 'ईश्वरी विस्तार असे की नसे?' (क्र. ३१) यांतल्या कोणत्या विकारात देव आहे नि जीवाला किती विकार आहेत ? मग 'कोणती अवस्था देवा'ची नि कोणती अवस्था जीवाची ? (क्र. ३२) 'जीव' आणि 'शिव' कोण व कसं आहेत ? ब्रह्मी जीव भिन्न की अभिन्न ' ? (क्र.३४) 'या ब्रह्मांडास आधार असे की नसे ? ' (क्र.३४) ब्रह्म 'केवळ' व निर्गुण' असून माया 'दिसाळ' (भासात्मक) आहे, असं म्हणण्यास मूळ आधार कोणता ? (क्र. ३५).

विश्वनिर्मितीचा उलगडा करताना शून्यापासून ॐकार, त्यापासून आकाश, त्यापासून पवन म्हणजे वायू, त्यापासून अग्नी (तेज), मग आप (जल) आणि त्यापासून पृथ्वी वा विश्व असा हा पंचमहाभूतांच्या साहाय्यानं झालेला उत्पत्तिक्रम आहे. पंचमहाभूतांपासून २५ गुण झाले. ब्रह्मांडाचीही अनेक चक्रं झाली. (हे सर्व वाचत असताना हा प्रश्न विचारणारा शिष्य 'अज्ञ' आहे की 'सर्वज्ञ'? असा प्रश्न आपल्याला पडतो पण पुढं त्यानं विचारलेल्या प्रश्नांचं महत्त्व लक्षात घेता या प्रश्नमालिकेतील सुसंगती व युक्ति-संगतता चांगल्या प्रकारे जाणवते. हा शिष्य विचारतो- 'ज्या महाशून्यापासून ही सारी निर्मिती झाली ते कसं ओळखायच ? त्याचं ज्ञान झालं की जन्म-मृत्यू यांच्यापासून सुटका होते. या शून्याला 'रूप ना रेखा'. (क्र. ४४) ते कसं आहे, हे अनुभवी गुरूलाच माहीत असल्यानं ते त्याच्या मुखातूनच ऐकायला हवं कारण हे ज्ञान म्हणजे गहन अध्यात्म ('अध्यात्म महाखोली') आहे. (क्र. ४२) ते तत्त्वज्ञान कळलं की मुक्ती मिळते'. यासाठी गुरूला शिष्यानं पुढं प्रश्न विचारले आहेत, ते असे: '''अजपा' म्हणजे काय ? ते कोण ? त्याला प्रमाण काय ? (क्र. ४५) 'कवण जपे या जाप ?' (क्र. ४६). 'हा कोणे ठायीं कैसा उठे ? कैसा कथवा कोठे उमटे ?'' (क्र. ४७) यासाठी शेख महंमदांनी एक हिंदी पदही दिले आहे-

'अजपा जपो । शून्य मन धरो ।
पंचइंद्रिय हाट- निग्रह करो ।
ब्रह्मज्ञान निर्मो होम काया ।
महादेव कहे, 'पार्वती, वंदो सद्गुरुपाया'। (क्र. ४८)

कमलकलिकेत चार चंद्र (चंद्रामृताची तळी) असतात. जिथं योगिनी क्रीडा करतात, ते स्थान कोणतं ? आत्म्याचं क्रीडामंदिर कुठं आहे ? 'कारण'-देह ज्यातून निर्माण झाला, ते महाकारण कोणतं ? (क्र.५०) जिथून ब्रह्मा-विष्णू-महेश निर्माण झाले, 'तो कर्ता कवण ?' (क्र. ५३).

शेख महंमद इस्लामधर्मीय आहेत, हा संदर्भ लक्षात घेतल्यास त्यांच्या या प्रश्नाला भारतीय दार्शनिक आयामाबरोबरच वेगळा आयामही प्राप्त होतो.

'रुद्र होयोनी संहार करी । विष्णु होऊनी प्रतिपाळिता जरी ।
ब्रह्म होयोनी सृष्टी करी । तो सूत्रधारी कवण जी सद्गुरु ? ।। ५४।।
जो सर्वांसी सदा वसे । तेज सर्वत्री व्यापिले असे ।
ते सदाशिव प्रकाशे । हे प्रत्यक्ष कैसे ? ।। ५५।।'

-अशा प्रकारच्या प्रश्नांची मालिका यापुढंही चालते. या सर्वांमागं ते परतत्त्व आहे आणि ते समजून घेणं आवश्यक आहे. हे 'तत्त्वसार' कळलं म्हणजे जीवनाचं रहस्य कळतं नि आपण त्या तत्त्वाशी एकरूप होण्यासाठी साधना कशी करावी, याचा मार्ग सापडतो-

'इति श्रीतत्त्वसार जाणा । महावाक्ये अध्यात्मपणा ।
संपूर्ण स्वरूपी विवंचना । सर्व साध्यसाधना स्मरावे मनी ।। ७१ ।।'

'तत्त्वसार', 'पवनविजय' व 'काळज्ञान' या तिन्ही खंडांत एक सूत्र व क्रम आहे, याचं भान कवीला सतत आहे-

'पहिले खंडीचा विचार । दुसरे खंडींचा 'पवनविजय' साचार ।
तिसरे खंडी 'काळज्ञानेश्वर' । हा क्षराक्षराचा विचार सांगितला असे ।।
पहिले खंडी क्षराक्षर । दुसरे खंडी इडा-पिंगळा यांच्या तत्त्वाचे प्रकार ।
काळज्ञान निराकार सांगितला सद्‌गुरुराये ।। ८८-८९ ।।

'पवनविजय' हा दुसरा खंड ४१२ ओव्यांचा असून तो 'शिवस्वरोदया' चा अनुवाद असावा, असं मत अनेकांनी मांडलं आहे. 'शिवस्वरोदया'चं अधिष्ठान त्याला असलं तरी त्याला समश्लोकीचं रूप वा तो केवळ अनुवाद असल्याचं मला जाणवलं नाही. नाडीशानाचा शेख महंमदांचा व्यासंग त्यातूनही जाणवतो. या 'पवना'वर नियंत्रण प्रस्थापित करून त्याला कसं जिंकावं, याची प्रक्रिया या खंडात आहे. हा खंड औरंगाबादच्या एकनाथ संशोधन मंदिराचे अध्यक्ष व माझे स्नेही दादासाहेब बापट यांनी संपादून प्रसिद्ध केला असून त्याला माझी प्रस्तावना आहे. तिच्यामध्ये मी हा विचार मांडला आहे.

'काळज्ञान' हा तिसरा खंड अपूर्ण असून तो ७० ओव्यांचा आहे. त्यात काळ म्हणजे मृत्यूविषयीचं ज्ञान आपल्याला कसं होऊ शकतं, यासंबंधी विवरण केलं आहे. त्यातून तत्कालीन लोकसमजुतींवर प्रकाश पडतो.

हे तिन्ही खंड मिळून एक स्वतंत्र रचना होते. तो केवळ 'शिवस्वरोदया'चा अनुवाद असता तर त्यात समकालीन सामाजिक जीवनाचं प्रतिबिंब उमटलं नसतं. शेख महंमदांचं स्वतंत्र अस्तित्व व वेगळेपणही त्यात जाणवतं, तेव्हा शेख महंमद केवळ 'शिवस्वरोदया'चे अनुवादक आहेत, असं म्हणणं अन्यायकारक ठरेल.

---

## ३. निष्कलंक-प्रबोध

शेख महंमदांची ही एक फार महत्त्वपूर्ण रचना आहे. काही मराठी वाङ्मयेतिहासकार तिचा फक्त नामोल्लेख करतात, इतकी ती दुर्लक्षित आहे. (१) 'एकात्मतेचे शिल्पकार' या ग्रंथात सुप्रसिद्ध संशोधक डॉ.रा.चिं.ढेरे यांनी एकच परिच्छेद याविषयी लिहिला आहे, तो असा-

''निष्कलंक प्रबोधा'त शेख महंमदाने आचाराच्या बाह्यावडंबरावर आघात करून परमार्थाचे मर्म विशद केले आहे. 'पाणी प्याल्याविण न वजाय तान ।तैसे नव्हे ज्ञान प्रचीतीविण ।।' अशा प्रतीतिगौरवानेच या ग्रंथाचा प्रारंभ झाला आहे. क्षुद्र देवतोपासना, त्या उपासनेचे अमंगळ रूप,

मठस्थ अनाचारात रंगलेले महानुभाव, जन्मजात श्रेष्ठत्वाची वृथा कल्पना, इत्यादि विषयांवरील शेख महंमदांचे विवेचन परखड आहे. जन्मजात ब्राह्मण्याच्या कल्पनेचा निरास करून 'कल्पना मुंडिती ते ब्रह्मरूप' हा उदात्त विचार मांडताना त्यांनी 'निबंध उपनिषदां'चा जो हवाला दिला आहे, तो बहुतेक 'वज्रसूचिकोपनिषदा'विषयी असावा, असे वैचारिक साम्यावरून वाटते. या वाटण्याचा आणखी एक आधार असा आहे की, 'वज्रसूचिकोपनिषदा' वर अभंगभाष्य रचणाऱ्या बहिणाबाईशी शेख महंमद समकालीन असून, बहिणाबाईच्या परमार्थाला प्रारंभापासून सक्रिय उत्तेजन देणारे जयरामस्वामी हे शेख महंमदाचे सांगाती होते''.[१६]

(२) महाराष्ट्र साहित्य परिषदेनं १९८२ साली प्रकाशित केलेल्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासात (खंड २, भाग ४) डॉ.स.गं.मालशे[१७] यांनी त्याविषयी पुढील विवेचन करून शेख महंमदांना काहीसा न्याय दिला आहे.'आचारातील दिखाऊ बडेजावावर टीका करून परमार्थाचे मर्म स्पष्ट करणारा हा ग्रंथ आहे. यात क्षुद्र देवतांची उपासना, उपासनेचे अमंगळ स्वरूप महानुभावात शिरलेला अनाचार, जन्मजात श्रेष्ठत्वाची वृथा कल्पना, यांवर टीका केली आहे. 'शेख महंमदांची स्फुट रचना-कवितासंग्रह, भाग २' यात ती समाविष्ट झाली आहे.

त्यात समाविष्ट न झालेली आणखी काही रचना 'मराठी संशोधन पत्रिके'त डॉ. मोरजे यांनी प्रसिद्ध केलेली आहे- (म.सं.प.,व.१५, अं.२-३, जाने-एप्रिल १९६८).उत्कट भक्तीबरोबर सामाजिक रूढ परंपरेतील दोषांची त्याला जाणीव असून त्यांबद्दल या रचनेत एतद्विषयक चीड व्यक्त होताना दिसते. त्याच्या भाषेत काव्याचा विलास नाही पण तडफ आणि जोरकसपणा आहे. वेळप्रसंगी ती उघडीनागडी व्यक्त होते. अनिष्ट प्रथांवर हल्ला करीत असता ग्राम्य शब्दांचा वापरही होतो. शेख महंमद बहुश्रुत असून त्याने नामस्मरणाचे महिमान सर्वोपरी मानले आहे. जयरामस्वामी वडगावकर, माणकोजी बोधले, बहिणाबाई आदि संत शेख महंमदाचे समकालीन ठरतात.'

(३) प्रा. अ. का. प्रियोळकर[१८] यांनी १९६५ साली 'मुसलमानांची जुनी मराठी कविता' या पुस्तिकेत लहानशी पण चांगली नोंद घेतली आहे. 'निष्कलंक-प्रबोधा'त 'ब्राह्मण कोण ?' हे सांगताना शेख महंमदांनी 'भूदेव... ब्राह्मण नव्हे'हा त्यातील भाग उद्‌धृत केला आहे.

(४) शेख महंमदांविषयी पुणे विद्यापीठास १९९८ साली पीएच्.डी साठी प्रबंध सादर करणारे डॉ.भी.वि.मोदळे[१९] यांनी याविषयी काय म्हटलं आहे, ते पाहा-

''निष्कलंकप्रबोध'हा शेख महंमदांचा अपूर्ण ग्रंथ समजला जातो परंतु त्याला ग्रंथ न म्हणता स्वतंत्र प्रकरण म्हणावे लागेल. कारण ग्रंथाच्या दृष्टीने पारंपरिक अशी ग्रंथाची मांडणी दिसून येत नाही. एकूण ३०० ओव्यांच्या या प्रकरणाची सुरुवात मात्र शेख महंमदांनी मंगलाचरणाने न करता सरळ विषयाला सुरुवात केली आहे. त्या दृष्टीनेही परंपरा टाळलेली दिसते. असे का घडावे, ते कळत नाही. 'निष्कलंकप्रबोधां'चा जो' भाग उपलब्ध आहे, तो सर्वस्वी आचार - आचारणुकीतील युक्तायुक्तता सांगण्यात खर्ची पडला आहे. 'निष्कलंकप्रबोधा'चे हस्तलिखित उपलब्ध नसल्याने

त्याच्या संपादित आवृत्तीवरच समाधान मानावे लागते. 'निष्कलंक-प्रबोध हा ग्रंथ बराच मोठा असावा', असे मत श्री. वा. सी. बेंद्रे यांनी 'निष्कलंक-प्रबोधा'च्या संपादित आवृत्तीच्या शेवटी मांडले आहे. 'निष्कलंक-प्रबोधा'च्या मांडणीचा विचार करीत असताना ज्या ठिकाणी नाममुद्रा येते, त्या ठिकाणी अभंग संपतो असं अनुमान लावल्यास एकूण ३४ अभंगाचे व एकत्रित ३०० रचनांचे हे प्रकरण आहे. एकूण दररोजच्या व्यवहारातील आचारआचरणूकीवर चर्चा हाच या प्रकरणाचा हेतू असावा, असे म्हणण्यास वाव आहे. आचारधर्म सांगण्याच्या हेतूने ही रचना झाली असावी. ज्ञानेश्वरांच्या हरिपाठाची व रामदासाच्या आचार धर्म - कथनाची या ठिकाणी आठवण होते.''

## 'निष्कलंकप्रबोधा'चं स्वरूप

या सर्वच अभ्यासकांबद्दल आदर व्यक्त करूनही त्यांपैकी काही अभ्यासकांनी शेख महंमदांच्या या रचनेला पुरेसा न्याय दिला नाही, असं म्हणावं लागतं. काहींनी ती मूळात काळजीपूर्वक वाचली आहे की नाही, याबद्दलही मनात शंका येते कारण त्यावरील बऱ्याच प्रतिक्रिया (आचारधर्मविषयी परखड टीका इ.) समान आहेत व त्या तशा असणं स्वाभाविक आहे. पण त्यातील अनेक महत्त्वाच्या बाबी दुर्लक्षितही राहिल्या आहेत. पहिला प्रश्न या रचनेला 'ग्रंथ' म्हणायचं की 'प्रकरण' (तत्त्वविवरणात्मक प्रकरण)? विविध अभंगबंधांचा एकेक गट करून ती एकत्र करून ही रचना सिद्ध झाली आहे. अशा अभंगबंधांनीच संत नामदेवांचं त्रिखंडात्मक 'ज्ञानेश्वर-चरित्र' सिद्ध झालं आहे. त्यांतील नियोजन अधिक सुसूत्र आहे कारण त्याला ज्ञानदेव-चरित्रातील प्रसंगांचा कालानुक्रम व पार्श्वभूमी आहे. हे मान्य करूनही अभंगबंधमुक्त रचनांचा पूर्वादर्श शेख महंमदांसमोर नव्हता, असं नाही. शेख महंमदांचं वैशिष्ट्य हे की ते अशा आकृतिबंधांच्या फार आखीवरेखीव चौकटी तशा फारशा मानत नाहीत. 'योगसंग्रामा' सह त्यांच्या अनेक रचनांचे दाखले देऊन हे मांडता येईल. हा लोककवी पढीक पंडित नाही (तथापि तो बहुश्रुत नाही, असं मात्र मुळीच नाही.) स्वतःची अशी खास आविष्कार-पध्दती शोधण्याचा ध्यास या मनाला लागला आहे, हे त्यांच्या 'भक्तिबोध' व 'आचारबोध' यासारख्या प्रकरणांतूनही दिसून येतं. 'आचारबोध' या प्रकरणाचं 'निष्कलंकप्रबोधा'शी आशयदृष्ट्या अधिक साम्य आहे, हे मान्य करूनही 'निष्कलंक-प्रबोधा'त त्यापलीकडे जाण्याचा प्रयत्न शेख महंमद कसा करतात, हे समजून घ्यायला हवं.

प्रथम त्या रचनेला ग्रंथ म्हणून अकारण संबोधायचं, मग 'अपूर्ण ग्रंथ' म्हणून त्याची वासलात लावायची व तोही नसल्यानं ते 'प्रकरण' आहे या निष्कर्षाप्रत यायचं, यातील तार्किक विसंगती सहज लक्षात येईल, तीनशेहून काही अधिक ओव्यांचं हे तत्त्वविवरणात्मक प्रकरण आहे, हे त्याविषयीच्या आकृतिबंधासंबंधीचं निदान या रचनेवरून सहज वरवर नजर फिरविली तरी लक्षात येणं अवघड नाही आणखी थोडी बारकाईनं नजर फिरविली तर तिच्यातील अन्य सूक्ष्म वैशिष्ट्येही नजरेत भरतील, अशीच आहेत.

शेख महंमद हे 'परप्रकाशित' कवी असून दुय्यम प्रतीचे कवी आहेत, त्यांनी मूळ कशाचा न कशाचा तरी अनुवाद, अनुकरण इ. केलं असून ते परप्रभावित आहेत, हे सांगण्याचा सोस वा ध्यास (की अट्टाहास ?) काही अभ्यासकांनी अकारण घेतला. आहे. मूळ २९ अभंगबंधांच्या तीनशे ओव्यांमध्ये 'निबंधउपनिषदा'चा हवाला शेख महंमदांनी दिला नसून त्याव्यातिरिक्त श्री. मांदळे यांना उपलब्ध झालेल्या ३० ते ३४ या अभंगबंधांतील ३४ व्या बंधात तो आढळतो : त्याचं वैचारिक साम्य बहिणाबाईच्या 'वज्रसुचिकोपनिषदा'शी असावं कारण बहिणाबाई यांनी त्यावर अभंगभाष्य लिहिलं आहे, इतका दूरान्वयाचा संबंध जोडून शेख महंमद परप्रभावित कसे आहेत, हे सूचित करून त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचं व प्रतिभेचं श्रेय अमान्य करण्याची आवश्यकता नाही, कारण बहिणाबाईंना जयरामस्वामीपासून सक्रिय उत्तेजन लाभलं, हे स्वतः या अभ्यासकांनीच मान्य केलं असून जयरामस्वामी हे शेख महंमदांचे स्नेही, सांगाती होते, हेही त्यांनी मान्य केलं आहे. ज्या बहिणाबाईंना जयरामस्वामींपासून प्रेरणा लाभली, त्याच बहिणाबाईपासून शेख महंमदांना ही लेखन-प्रेरणा लाभली असावी, हा तर्क कितपत सुसंगत आहे, हे वाचकांनीच ठरवावं. बरं, 'निष्कलंकप्रबोधतील' काही अभंगबंधांचे विषयच [उदा. महानुभाव महंतांचं आचरण (क्र. १०)], सलामऐवजी दंडवत करण्यावर टीका (क्र. ८), 'मोगलाचा तोरा,' 'ब्राह्मण के लिया। नटौन अवगळया मोगल दिसे' (क्र. ३) हा विचार, ब्राह्मणांवर व तथाकथित पंचस्नानादी कर्मकांडावर टीका (क्र. १५, १६), 'गाईकाप्यांचे बंद, धरितील इतर । होती त्याचे चाकर असोनी गुरू' किंवा 'पोटिस्तें बहुत, पर्वण्या भटांच्या' (क्र. ३३) हे समकालीन समाजस्थितीचे उल्लेख मूळ 'वज्रसूचिकोपनिषदा'त असतील काय ? वाघे, भुतं, मुरळ्या, विश्वाच्या वोवळ्या। त्यासी खेळत, भक्तें भोगुनी ।। शेवडे, स्वप्निक, डौरकार मोहे। खसीहीन नरवटे, छत्तीस पाखंडी।।' हे समकालीन समाजाच्या अंधश्रध्देविषयीचे उल्लेख हेही मूळात कसे असणार ? शिवाय ते बहिणाबाईपासून शेख महंमद घेतील, हेही असंभाव्य अनैतिहासिक व अनावश्यक असंच आहे. शेख महंमदांविषयी प्रबंध- लेखन करणारे डॉ. मोदळे हेही या प्रभावकक्षेतून वाचले नाहीत. त्यांना 'निष्कलंकप्रबोध' वाचताना ज्ञानेश्वरांच्या हरिपाठाची व रामदासांच्या आचारधर्मकथनाची आठवण होते. म्हणूनच प्रबंधाच्या निष्कर्षात त्यांचं कवित्व हे 'परप्रकाशी कवित्व' आहे, हे सांगण्यासाठी हा सारा खटाटोप आहे. ज्ञानदेव व समर्थ यांच्याविषयी व त्यांच्या लेखनाविषयी शेख महंमदांना आदर नव्हता, असं कोण म्हणेल? पण ही प्रबंधलेखकाची वैचारिक (?) धाटचाल शेख महंमदांच्या स्वकर्तृत्वावर सावट टाकणारी ठरत आहे, याचं भान या अभ्यासकांना राहिलं नसावं, असं वाटतं. 'मध्ययुगीन मराठी वाङ्मयात संतकवी म्हणून शेख महंमदांना दुय्यम स्थानच लाभलं आहे, असं म्हणणं क्रमप्राप्त आहे' हे प्रबंधलेखकाचं मत वरील विचारांची मांडणी व क्रम लक्षात घेता सुसंगतच आहे, असं आपल्यालाही म्हणणं क्रमप्राप्त आहे. बरं, या प्रकरणात केवळ वर उल्लेखिलेल्या बाबीच आहेत का ? या अभंगबंधांतील प्रतिपाद्य विषयांचा तपशील पाहिल्यास सत्य काय आहे, यावर स्पष्ट प्रकाश पडेल.

| अभंगबंध क्र. | | - | प्रतिपाद्य |
|---|---|---|---|
| १. | (ओ. १-११) | - | नामस्मरणानं लाभणारी तृप्ती |
| २. | (ओ. १२ - १९) | - | साधुवंदन |
| ३. | (ओ. २० - ३०) | - | नरदेहाचा सदुपयोग |
| ४. | (ओ. ३१ - ४०) | - | महानुभावांच्या आचारधर्मांवर टीका |
| ५. | (ओ. ४१ - ५२) | - | ज्ञानशूर होऊन उदास व्हावं, हा उपदेश |
| ६. | (ओ. ५३ - ६०) | - | नामस्मरणाचं माहात्म्य |
| ७. | (ओ. ६१ - ७०) | - | आचारभ्रष्टता (विशेषत:काही महानुभाव |
| ८. | (ओ. ७१ - ८०) | | महंतांची) |
| ९. | (ओ. ८१ - ९०) | - | अंधश्रध्दांवर/कुप्रथांवर/ तथाकथित शब्दज्ञानी पंडित यांच्यावर टीका. |
| १०. | (ओ. ९१ - १००) | - | पंडित/महात्मे (महानुभाव) यांच्या आचरणावर टीका. |
| ११. | (ओ. १०१ - ११०) | - | साधु-लक्षण |
| १२. | (ओ १११ - १२०) | - | |
| १३. | (ओ. १२१ - १३०) | - | स्वहित न जाणणाऱ्या दुर्जनांवर टीका. |
| १४. | (ओ. १३१ - १४०) | - | 'व्यतिरिक्त' संज्ञेद्वारा आत्म्याचं आद्यन्तविरहित स्वरूप - विवरण. |
| १५. | (ओ. १४१ - १५०) | - | सर्वोत्तम स्नान - वाग्स्नान |
| १६. | (ओ. १५१ - १६०) | - | 'पाच आंघोळीपेक्षा तत्त्वशांती महत्त्वाची', आचारांवर टीका, षड्विकारांवर भाष्य. |
| १७. | (ओ. १६१ - १७०) | - | नरदेहाच्या सदुपयोगाचं महत्त्व |
| १८. | (ओ. १७१ - १८०) | - | नरदेह लाभूनही त्याचा स्वहितासाठी उपयोग न करणारांवर टीका. |
| १९. | (ओ. १८१ - १९०) | - | अहंभान जाळून प्रबोधनंद मिळविण्याविषयी उपदेश |
| २०. | (ओ. १९१ - २००) | - | साधूंचा उपहास करणाऱ्या दुर्जनांवर टीका. |
| २१. | (ओ. २०१ - २१०) | - | अवतारसंकल्पनेवर टीका, निर्गुणत्व-पुरस्कार |
| २२. | (ओ. २११ - २२१) | - | 'धर्मी' व 'अधर्मी' यांतील भेद |
| २३. | (ओ. २२२ - २३०) | - | भक्ती, श्रध्दा, लीनता यांचं महत्त्व. ['साधू 'सद्वस्तू' दाखवील'] |
| २४. | (ओ. २३१ - २४९) | - | आदर्श नातेसंबंधांचं विवरण |
| २५. | (ओ. २५० - २६०) | - | भोंदुबुवांवर टीका. |
| २६. | (ओ. २६१ - २७०) | - | संत हेच मायबाप |
| २७. | (ओ. २७१ - २८०) | - | परमार्थ, संतलक्षण |
| २८. | (ओ. २८१ - २९०) | - | दुर्जनांवर टीका, संत विवेक जागवून स्वानंदबोध करतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| २९. | (ओ. २९१ - ३००) | - | परमार्थबुध्दीनं चौमुक्तींचा लाभ होतो : संतोपदेश. |
| ३०. | (ओ. १०) | - | अहिंसा-महिमा, धर्मातील हिंसेवर टीका |
| ३१. | (ओ. १०) | - | 'स्वयें ब्रह्म असोनी 'मी देह' म्हणती,' ज्ञानविवेकाचं महत्त्व. |
| ३२. | (ओ. १०) | - | प्रतिमांवर टीका |
| ३३. | (ओ. ११) | - | पोटभरू भटांच्या पर्वण्यांवर टीका |
| ३४. | (ओ. १५) | - | 'खरा ब्राह्मण कोण'? तथाकथित ब्राह्मणत्वावर टीका. |

## 'निष्कलंकप्रबोधा'चं निर्मितिप्रयोजन

वरील विवेचनावरून हे लक्षात येईल की शेख महंमदांच्या या प्रकरणाच्या निर्मितीचं प्रयोजन 'समाजप्रबोधन' हेच आहे. त्याचा 'प्रबोध' या शब्दाच्या द्वारे या प्रकरणाच्या शीर्षकात स्पष्टपणे निर्देशही केला आहे. हे प्रबोधन कुणा एका अनामिक चरित्रकारानं म्हटल्याप्रमाणें, श्री. वा. सी. बेंद्रे यांनी उल्लेखिल्याप्रमाणं किंवा डॉ. मोदळे" म्हणतात त्याप्रमाणं केवळ 'आचारआचारणुकीतील युक्तायुक्तता, त्याज्यात्याज्यता सांगण्यात खर्ची पडलेलं' नाही. कर्मकांडरूपी अनावश्यक धार्मिक आचार, काही महानुभावीय महंतांचे आचार व सनातनी पुरोहितांचे (शेख महंमद 'भट' व 'ब्राह्मण' हा उल्लेख करतात) आचार हा जसा या टीकेचा एक भाग आहे, त्याचप्रमाणं दुर्जनांवर टीका हाही भाग आहे,'धर्मी' 'अधर्मी' यांतील भेद आहे. त्यात भोंदू बुवांवर प्रहार आहेत, अवतार-कल्पनेवर व प्रतिमांवर टीका आहे, असं करता करता आचारपावित्र्याबरोबर विचार-पावित्र्याचंदेखील सूचन आहे. यातून ते तत्त्वचिन्तनाकडे ही आपल्या वाचकांना नेतात. म्हणूनच 'ब्रह्मा'चं मूळ निर्गुण स्वरूप, ते आपल्या देहातही आहे याचा शोध घेण्याचा विचार, ज्ञान-विवेक यांची महत्ता, तथाकथित ब्राह्मण्यावर टीका व 'खरा ब्राह्मण' कोण, याची व्याख्या, 'चौमुक्ती' कशा प्राप्त कराव्या यासाठी परमार्थबुध्दीची आवश्यकता, षड्विकारांवरील नियंत्रणाचा त्यासाठी होणारा उपयोग, अशा प्रकारे करावयाचं नरजन्माचं सार्थक-अशा प्रकारचं तत्त्वविवेचनही करतात. याचा विचार म्हणजे आचार-विचारांतील शुचितेचा समन्वय, याविषयी कुणीही अभ्यासक फारसं लक्ष केन्द्रित करीत नाही, याचं आश्चर्य तर वाटतंच पण त्यामागं उपेक्षाबुध्दी तर नसावी, अशी शंकाही येते, 'जीवन निष्कलंक होण्यासाठी केलेलं समाजप्रबोधन' अशी या प्रकरणाची व्याख्या केली तर ती सयुक्तिकच ठरणार आहे. त्यासाठी अभंगबंध हे अत्यंत उपयुक्त असं माध्यम आहे. अभंगबंध जसा स्वाभविक आकृतिबंध व आकार घेतील तसा शेख महंमदांनी त्यांना घेऊ दिला त्यांत त्यांचा फटकळपणा, परखडपणा व 'पाखांडखंडना'चा दृष्टिकोण काहीसा वरकरणी कटु वाटला तरी त्यामागील सात्त्विक भूमिका जनहिताच्या कळवळ्याची निश्चितच आहे. त्यातून कवीनं निकोप, निर्मळ समाजमनाची जडणघडण साधण्याचा प्रयत्न केला आहे. हा संतकवी वरकरणी फणसासारखा खडबडीत वाटला तरी त्यातील सात्त्विक भावांचे गरे मात्र रसाळ नि मधुरच आहेत. स्वयंप्रकाशी निषकलंक शेख महंमदांचा तुम्हा - आम्हालाही निष्कलंक करण्याचा हा एक स्वयंभू प्रयत्न !

## ४. भक्तिबोध

कोणत्याही धर्मांचे वा पंथाचे दोन विभाग असतात : एक विभाग असतो तत्त्वचिंतनाचा तर दुसरा विभाग असतो हे तत्त्वचिंतन प्रत्यक्ष आचरणात कसं आणायचं नि साधना कशी करायची, याविषयीचा पहिल्या भागाला आपण त्या त्या धर्माचं / पंथाचं 'तत्त्वज्ञान' म्हणतो तर दुसऱ्या विभागाला त्याचा 'आचारधर्म' अशी संज्ञा आपण योजतो.

शेख महंमदांची 'भक्तिबोध' आणि 'आचारबोध'ही प्रकरणं या दृष्टीनं लक्षात घ्यायला हवीत. ती परस्परपूरक आहेत. उपासकानं/साधकानं/भक्तानं एवढी दोन प्रकरणं वाचली तरी त्याला सहज साधना/उपासना/भक्ती करता यावी, असं या दोन्ही प्रकरणांचं शेख महंमदांच्या मनातील निर्मिति-प्रयोजन असावं, असं वाटतं. ही दोन्ही प्रकरणं श्री. या. सी. बेंद्रे यांनी 'शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर यांच्या कविता-संग्रहा'त अनुक्रमे ५ व ६ या विभागांत संपादून प्रसिद्ध केली आहेत.

यांतील 'भक्तिबोधा'चं विषयवार वर्गीकरण करून त्यांनी अभ्यासकांना मोठीच सोय उपलब्ध करून दिली आहे- शेख महंमदांवर प्रबंध लिहिणारे डॉ. भीमा विठ्ठल मोदळे यांनी यांतील प्रत्येक अभंगावर एक-एक वा दोन-तीन ओळींचा आशय देत बसण्याचं यांत्रिक काम करण्यापेक्षा विश्लेषण करून शेख महंमदांची भक्तिविषयक भूमिका त्यांतून कशी प्रकटते, याविषयी विवेचन केलं असतं तर या संतकवीच्या भक्ति-कल्पनेवर अधिक चांगला प्रकाश पडला असता. तसं करण्याचा प्रयत्न मी या ग्रंथात करीत आहे.

या प्रकरणाचे पुढील उपविभाग आहेत. (शेख महंमदांनी एकूण १२ उपविभागांत हा विषय चर्चिला आहे). त्यांचा तपशील असा --

| | | | |
|---|---|---|---|
| १) | भक्ताभक्त | ... | (क्र. ६५ ते ७२) |
| २) | योगी | ... | (क्र. ७३ ते ७६) |
| ३) | साधू-असाधू | ... | (क्र. ७७ ते ८८) |
| ४) | भावभक्ती | ... | (क्र. ८९ ते ९६) |
| ५) | मामभक्ती | ... | (क्र. ९७ ते १०५) |
| ६) | पंचतत्त्वे | ... | (क्र. १०६ ते १०८) |
| ७) | द्वैताद्वैत | ... | (क्र. १०९ ते ११५) |
| ८) | विवेक | ... | (क्र. ११६) |
| ९) | स्वानुभव | ... | (क्र. ११७ ते १२४) |
| १०) | आत्मज्ञान | ... | (क्र. १२५ ते १४०) |
| ११) | ब्रह्मज्ञान | ... | (क्र. १४१ ते १४३) |
| १२) | कूट | ... | (क्र. १४४ ते १५१) |

यांचं विभाजनही मी पुन्हा दोन प्रमुख विभागांत करतो :

(अ) भक्तिविषयक विवरण (१ ते ५) आणि

(आ) तत्त्वविवरण (६ ते १२)

या दोन्ही विभागांत एक आंतरिक असं नातं आहे, सूत्र आहे. त्यांतून शेख महंमदांची तात्त्विक भूमिका जशी अभिव्यक्त होते त्याप्रमाणं भक्तिविषयक भूमिकाही. अशा प्रकारे प्रथम भक्तिविषयक भूमिकेचं विवेचन करून किंवा ती स्पष्ट करून मग अभिप्रेत असलेलं तत्त्वज्ञान सांगण्यात काही तर्कसंगती आढळते का ? निश्चितपणे आढळते, असं म्हणावं लागेल. प्रथम शेख महंमद विविध उपासकांचा वेध घेतात ; यांत साधू आहेत, भक्त आहेत, योगी आहेत. पुढं ते 'अभक्त' नि 'असाधू' यांचाही वेध घेतात. तो कशासाठी बरं ? यात शेख महंमद प्रचलित भक्तिकल्पना तावून-सुलाखून काढतात आणि खरी भक्तिकल्पना कोणती, यावर समाजाचं लक्ष केंद्रित करतात. प्रथम नकारात्मक भूमिका स्पष्ट झाली की मग तिच्यातून सकारात्मक भूमिका अधिक प्रभावीपणे मांडता येते, हे शेख महंमदांचं एक वैशिष्ट्यपूर्ण विचारसूत्र असून ते निश्चितपणे युक्तिसंगत आहे. ज्ञानाचा दंभ माजविणारे 'अभक्त' असतात, भोंदू, मुरळ्या, सटवीचे भक्त यांना 'भक्त' म्हणू नये, त्यांना ऋद्धिसिद्धीची पदं देऊ नयेत, असं शेख महंमद म्हणतात. परमात्मा निर्गुण असताना देवीचे नवस करून ती प्रसन्न झाली, असं म्हणणारेही शेख महंमदांना खरे भक्त वाटत नाहीत. "जे स्वतःच भ्रष्ट आहेत, ते 'भक्त' कसे", असा प्रश्नही इथं शेख महंमद उपस्थित करतात. 'भलत्याच' जातीचा भक्त झाला तर त्याचा अंत पाहणारे 'अभक्त' होत, असं त्यांना वाटतं. खरे साधू व भोंदू साधू यांत भेद करायला हवा, असा टीकेचा प्रहार करून ते 'पाखांडखंडनही' करतात. जे साधू स्वतःच अविद्येनं बावरलेले असतात ते आपल्या शिष्यांना कसला उपदेश नि मार्गदर्शन करणार ? त्यांचे शिष्यदेखील 'चेटकी' असतात, अशांना समाजानं थारा देऊ नये. ज्यांचं आचरण पवित्र आहे, "ज्याच्या मनात खरा भक्तिभाव आहे, 'अंतरी तत्त्वकळा' आहे व वाचेत 'निजनाम' आहे, तोच साधू व भक्त होय", अशी व्याख्या ते करतात. इथं 'योग्या'ची लक्षणं सांगून त्यांत खऱ्या उपासकाचं दर्शन कसं घडतं, तेही शेख महंमद सांगतात. भावभक्ती हे केंद्र मानून उपासना कशी करावी, याविषयीचा सुगम भक्तिमार्ग शेख महंमदांनी 'भक्तिबोधा'त प्रतिपादिला आहे. ही भक्ती केल्यानं कोणतं फळ प्राप्त होतं ? हे फळ असतं आत्मज्ञानाच्या व ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीचं. त्याचा विचार करण्यासाठी पंचतत्त्वाचं (पंचमहाभूतांचं) विवरण, त्यातून विवेकाच्या साहाय्यानं शोधावयाचं आपल्यामधील चैतन्यतत्त्व, त्यामुळं लाभणारी आत्मप्रचीती व त्यापुढं होणारी आत्मज्ञानाची व ब्रह्मज्ञानाची वाटचाल - या क्रमानं शेख महंमदांनी जे तत्त्वविवेचन केलं आहे ते पूर्वार्धातील भक्तिविचारास पूरक असंच असून त्यामुळं नितळ भावाधिष्ठित भक्तिकल्पना व तिचं फलित, असं या प्रकरणाचं सुस्पष्ट व स्वच्छ स्वरूप आपल्यासमोर प्रकटतं.

ग्रामीण शब्दकळेच्या व प्रतिमांच्या द्वारा आपली भक्तिकल्पना विशद करणं नि त्यांच्याच साहाय्यानं आपल्याला अभिप्रेत असलेलं अद्वैत तत्त्वज्ञान, सुलभीकरण करून, विशद करणं, ही

शेख महंमदांची 'देशी' शैली याही प्रकरणात प्रतिबिंबित झाल्याविना राहात नाही. त्याची काही वानगीदाखल उदाहरणं -

१) उसाअंगी खरड-कांटे । भीतरी साखरेचे सोट (टे)।। (क्र. १३३)

२) ताडावरील मोहोळ । पाण्यामध्ये दिसे ।
तैसा ईश्वर असे । जगदाकारी ।। (क्र. १३०)

३) शेण आणि घृत । धेनू प्रसवत ।
गोचिडाला प्राप्त । अशुद्ध होय ।। (क्र. १०९)

४) निर्गुण म्हणों नये । आकार निराकार ।
टीका ऐका चतुर । दृष्टांतेसी ।।
काळी, तांबडी गाई । दूध ते पांढर ।
आकार निराकार । म्हणो नये ।।

शेख महंमदांच्या भक्तिविषयक तत्त्वज्ञानावर विविध मतांचा प्रभाव आढळतो. त्यांतील प्रमुख प्रभाव अद्वैतमताचा आहे. निर्गुण, निराकार परमात्मा हा त्यातील केंद्रबिंदू हिंदू व इस्लामधर्मांतही आहे. इस्लाम सगुणोपासक धर्म नाही पण हिन्दू धर्मांत निर्गुणापासनेबरोबरच सगुणोपासनाही रूढ आहे. या दोन्ही मतांचा समन्वय साधण्याचा शेख महंमदांचा प्रयत्न लक्षणीयच म्हणायला हवा -

'आत्मज्ञान' विभागात (क्र. १३६), ते म्हणतात -

'ज्यासी रूप नाही रेखा । तो अव्यक्त माझा सखा ।
भावभक्तीचिया सुखा । साहाकारिला ।।'

याच विभागात त्यांनी 'निर्गुणत्वा'चा विचार असा मांडला आहे -

'आम्ही निर्गुणपुरीचे वाणी ।
वस्तु आली घ्या वा कोणी ।।
(-आत्मज्ञान, क्र. १३१)

'राम नाही, कृष्ण नाहीं ।
शून्याच्या आनंदी, शून्य होई ।। (कूट क्र. १५१)

परमेश्वराचं सर्वव्यापित्व हिंदू व इस्लाम या दोन्ही धर्मांत आहे. हिंदुधर्मातील ही कल्पना ते या शब्दांत व्यक्त करतात -

'चराचर व्यापुनी । उरता त्रिभुवनी ।
ओळखती ब्रह्मज्ञानी । गोविंदा रामा ।।' (क्र. १४३)

त्यामुळंच ते विविध धर्मियांच्या ठायी एकत्व व समत्व पाहतात आणि म्हणतात, -

'आम्ही जातीचे ब्राह्मण । आमचे सोयरे मुसलमान ।।' (क्र. १४९).

'नामस्मरण' हा हिंदू व इस्लाम या दोन्ही धर्मांतील समान दुवा आहे.

'भक्तिबोधा'तील पाचवा भाग (क्र. ९७ ते १०४), हा शेख महंमदांनी नाममहिम्यासाठीच योजिला आहे. सुलभ, सुगम उपासना-पध्दती हेच त्यामागील प्रयोजन आहे. ज्या संतकवीनं 'योगसंग्रामा' त गहन योगचिकित्सा केली आहे तोच संतकवी जनसामान्यांसाठी सुगम भक्तिमार्गाचाच पुरस्कार का करतो, यामागील शेख महंमदांची लोकशिक्षकाची भूमिका समजून घ्यायला हवी. तथापि तो अन्तिम सत्याच्या निर्गुणत्वाचं नि निराकारत्वाचं भान कधीच विसरत नाही, याचंही भान आपण ठेवायला हवं.

'मध्यशेवटाविण नाहीं पाठपोट ।
स्वयंभ घनवट शुन्यापरते 'हे द्वैताद्वैत' ।। (क्र. १११)

या विभागातील अन्तःसूत्र नाममहिम्यामागंही दडलं आहे.

'भक्तिबोधा' च्या दुस-या विभागात पंचतत्त्वं (पंचीकरण), विवेक, आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान, स्वानुभव, द्वैताद्वैत, कूट हे उपविभाग असून त्यांतही उपासनेच्या वाटेवरील व तिच्या फलश्रुतीच्या विविधावस्थांचं चित्रण केलं आहे. त्यांतून शेख महंमदांना अभिप्रेत असलेलं अद्वैतमत प्रकटलं आहे.

---

## ५. आचारबोध

शेख महंमदांच्या 'आचारबोध' या प्रकरणाचं श्री. वा. सी. बेंद्रे यांनी केलेलं अकरा विभागांतील वर्गीकरण मला अत्यंत योग्य व तर्कसंगत असंच वाटतं. चांगले विचार कसे असावेत, याविषयी ते 'भक्तिबोधा'त जसं विवरण करतात, त्याचप्रमाणं चांगले आचार कसे असावेत, याविषयी ही 'आचारबोधा'त विवरण करतात. श्री. बेंद्रे यांनी दिलेले विभाग असे –

१) नरदेह
२) जन्म-मरण
३) यातिश्रेष्ठत्व
४) यवन
५) सोवळे-ओवळे
६) तीर्थ-व्रते
७) दुष्ट - दुर्जन
८) पाखंडी
९) स्त्रैण
१०) संचित आणि
११) आचारबोध

त्यांतही मला पुढील चार प्रमुख विभाग विशेषकरून जाणवतातः

(अ) नरदेह, जन्म-मरण

(आ) यातिश्रेष्ठत्व, यवन, सोवळे-ओवळे, तीर्थ-व्रतं,

(इ) दुष्ट-दुर्जन, पाखंडी, स्त्रैण

(ई) संचित, आचारबोध.

हे सारे विभाग आपल्या लौकिक जीवनाशी व त्यातील आचारसरणीशी संबंद्ध आहेत. आपल्याला नरदेह प्राप्त होतो व मग जन्म आणि मृत्यू यांचं चक्र सुरू होतं.

हे जीवन जगताना हिंदू धर्मियांना ज्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा स्वीकार करावा लागतो, तिच्यामधील उच्चनीचत्वाच्या व वर्णश्रेष्ठत्वाच्या-कनिष्ठत्वाच्या कल्पना व विषमता स्वीकारावी लागते. अन्या संतांनी जसा या व्यवस्थेला व तिच्यातील विषमतेला विरोध केला आहे, तसाच विरोध शेख महंमदही करतात. आध्यात्मिक व सामाजिक समतेचा पुरस्कार करून समाजातील सर्व स्तरांच्या घटकांना समान लेखण्याची भूमिका शेख महंमदांनी अत्यंत परखडपणे स्वीकारली असून तिची प्रचीती 'यातिश्रेष्ठत्व' विषयक विभागात सातत्यानं येते. स्वतः शेख महंमद हे मुसलमान असल्यानं त्यांनी केलेलं 'आचारबोधा'तील, 'यवन' विषयक विवेचन तर अधिकच प्रत्ययकारी झालं आहे. हिन्दू-मुसलमान ही सारी परमेश्वराचीच लेकरं, त्यामुळं त्यांच्यात भेदाभेद कशासाठी ? ही देखील त्यांची विविध धर्मांतील एकात्मतेची भूमिका विशेष करून लक्षात घेण्याजोगी आहे.

'विश्वरूप एक । भिन्न भिन्न लोक ।
वोळखा साइक । उत्तम कनिष्ठ' ।। ८ ।।

वर्णव्यवस्थेतील उच्चनीचतेच्या कल्पनेतून सोवळ्या-ओवळ्याची कल्पनाही विषमतेला पोषक ठरू लागली, हे लक्षात घेऊन शेख महंमदांनी त्यावरही कडक टीका केली आहे. 'आचारबोधा'त ते स्पष्टपणे म्हणतात -

- 'शुच, सोवळी, हीन याती । नेणें विटाळ वित्पत्ति ।।'
- सोवळे-बोवळे भाविती । लटिक्या व्युत्पत्ती ।
शेख महंमद बोलती ।।'

एवढंच नव्हे तर यापूर्वीच्या 'यवन' विभागात आपण मुसलमान आहोत, हे ठीकच झालं कारण यात 'विटाळ' व सोवळ्याओवळ्याचा ताप नाही, असं ते म्हणतात -

'बरवा जालों मुसलमान । नाहीं विटाळीं आठवण ।।
होतो भटेसी मुलाणा । अभिमान जातो पतना ।।'

शेख महंमद सोवळ्याओवळ्याप्रमाणं व्रतवैकल्यं आणि तीर्थयात्रा यासारख्या कर्मकांडावरही टीका करतात.

'काय करील गोदा-काशी ? वायां कष्टतील अपेशी' असा प्रश्न विचारून ते तीर्थयात्रेचे कष्ट करण्याऐवजी घरच्या घरीच भक्ती करायला सांगतात. त्यामुळं तीर्थ नि स्वतः हरीच तुमच्या घरी येईल, असं ते म्हणतात :

मन-कल्पना विधवा करा ।
हरि, तीर्थ येती घरा ।।'

असं विधान करण्याचं साहसही शेख महंमद जनहिताच्या कळवळ्यापोटी करतात. 'तीर्थ पवित्र आहेत, याला प्रमाण काय' ? असा परखड प्रश्न विचारण्याचं धाडस शेख महंमद त्या काळात, स्वतः मुसलमान असूनही, करतात ; यात कुठल्या अन्य धर्मांवर टीका करण्याचा हेतू नसून जनसामान्यांना ख-या भक्तिमार्गाचं दर्शन घडविणं हाच आहे –

'गया गौतमी काशी, कुर्कटाच्या दासी ।
ऐशा प्रत्यक्षासी प्रमाण काय ? '

'पृथ्वीची पापे । तीर्थजळी फिटती ।
तीर्थ धुयटती । साधूचरणी ।।'

असं म्हणून ते तीर्थांपेक्षा सत्संग कसा महत्त्वाचा ते सांगतात.

दुष्ट, दुर्जन, पाखंडी, स्त्रैण व स्वार्थी प्रवृत्तीचे लोक यांच्यावर प्रहार करून ते समाजातील कुप्रवृत्तींचा निषेध करतात. हे त्यांनी केलेलं समाजप्रबोधन होय.

'उपसंहार' हे या ग्रंथातील प्रकरण समारोपात्मक आहे.

---

## ६. भारुडं

शेख महंमदांच्या प्रमुख रचनांतून त्यांचं महत्त्व व माहात्म्य जसं जाणवतं तसंच त्यांच्या स्फुट लेखनातूनही. 'योगसंग्रामा' विषयी मराठी वाङ्मयेतिहासकार फार तर एखादा पाच-सात ओळींचा परिच्छेद लिहितात. (व त्यातही कुणा पूर्वसूरींची पुनरावृत्तीच आढळते) पण त्यांच्या स्फुट रचनेंविषयी अत्यल्पही लिहिलं जात नाही. शेख महंमदांनी आपल्या भारुडांनी मराठी भारूड-वाङ्मय किती समृद्ध केलं, याची केवळ वानगी कळावी व या अत्यंत दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्वाच्या विषयावर काहीसा प्रकाश पडावा, ही प्रस्तुत विवेचनामागील अपेक्षा.

'भारूड' ही रूपकात्मक रचना होय. वाच्यार्थ व लक्ष्यार्थ ही तिची द्विविध अंगं. यांतील लक्ष्यार्थ म्हणजे सूचितार्थच महत्त्वाचा असतो, तोच भारुडाचा 'परमार्थ' किंवा 'परम अर्थ' असतो. हा 'परम अर्थ' ही परमार्थमयच असतो ! भारुड हे काव्यात्म असतं नि नाट्यात्म असतं. त्यातून लोककथा, लोकगीत, लोकसंगीत, लोकनृत्य इ. लोकसंस्कृतीचे स्रोतही पाझरत-झरत असतात. त्यातून लोकसंवाद साधायचा असतो नि लोकप्रबोधनही करायचं असतं.

हे माध्यम अत्यंत प्रभावी आहे, याची जाणीव नामदेवांसारख्या संतांना झाली म्हणून मराठी वाङ्मयाच्या आदिकालातही भारुडांची निर्मिती झाली. पुढं संत एकनाथ नि शेख महंमद यांनी ती समृद्ध केली.

भारुडांसाठी निवडलेले विषय व निवडलेल्या व्यक्ती यांचा इथं आवर्जून उल्लेख करायला हवा. ही निवड अत्यंत साक्षेपी व चोखंदळ आहे. एकनाथांनी भारुडांसाठी निवडलेले विषय व्यक्ती आणि शेख महंमदांनी निवडलेले विषय नि व्यक्ती यांतही लक्षणीय साम्य आढळतं. कोण कोण आहेत या व्यक्ती ? यांत समाजातील विविध स्तरांतील लोक आहेत. तेली आहेत, नापिक आहेत, 'वणजारा'-हाटकरीही आहेत. लोकसंस्कृतीचे उपासक वासुदेव आहेत. ( शेख महंमदांच्या वासुदेवाविषयीच्या तीन-तीन रचना आहेत.) जोगी आहेत, 'महात्मा' (महानुभाव) आहेत नि 'पांगुळ'ही आहे. विषयाच्या नि भारूडासारख्या माध्यमाच्या निवडीतील साम्यावरून- देखील ही दोन मनं कसा समांतर प्रवास करीत होती, याचं मनोज्ञ दर्शन घडतं.

शेख महंमदांचा 'वासुदेव' समाजाला जागं करतो आहे, सावध करतो आहे– सा-या 'लहानथोरांना' सावध करीत आहे. (संतांचं आवाहन हे समाजातील सर्वांसाठी असतं, याची ही गर्भित सूचना होय. संत भेदभाव करीत नाहीत, सर्वांना समान मानतात ; म्हणूनच ते त्यांना वेळीच सावध करतात.) वासुदेवाचं स्वागत सारेच करतात, असं नाही, काही जण त्याला टाळतात-देखील व स्वतःचं हित पाहात नाहीत –

'एक आइकोनि अडकती दारें ।
कोणी न ये निज भिक सामोरे ।।'

मात्र असं असले तरी हा वासुदेव मात्र त्यांचं हित साधण्यासाठी-

' त्रिकाल चुकवुनी करितो फेरा।।'

सा-यांना त्याचं सांगणं एकच आहे -

'भावे भजा, सांडा अहंकारा ।
शरण रिघा सद्‌गुरु - माहेरा ।।'

तो त्यांना 'आरते सोडून परते' जागण्यासाठी म्हणजे लौकिकात पार अडकून न पडता पारलौकिक वाटचाल कशी करायची, ते समजावून सांगत आहे. 'साधुसंतांचे चरणी लागा' असं कळवळून म्हणत आहे. क्षमा नि दया यांच्यासारख्या चिपळ्यांच्या साहाय्यानं 'अनहद' नाद, ऐकण्याचा संदेश देत आहे. त्यांच्यामधला 'विवेक' जाणवत आहे. त्यामुळं आपण परमात्मा यांतील द्वैत नाहीसं होऊन 'अद्वैत' निर्माण होईल. जिवा-शिवाची भेट होईल व आपलं आयुष्य सार्थकी लागेल. हे सारं साध्य करण्याचा अत्यंत सोपा उपायही हा वासुदेव सुचवितो. हा उपाय आहे नामस्मरणाचा. ('विवेक अक्षर नाम गाऊं सती' हे शेख महंमदांचं या संदर्भातील वचन). त्यांचा आणखी एक महत्त्वाचा उपदेश असा –

'त्यजा मी-तूं पण । धरा क्षमा-शांति ।
नका जाणिवेची अहंमती ।
ऐका वासुदेवाची विनंती ।।'

या भारुडातून शेख महंमदांनी विरक्ती, अहंभावाचा त्याग, दया-क्षमा-शांती यांच्यासारखे जीवनादर्श, विवेकाचं माहात्म्य, ईशनिष्ठा ; नाममहिमा इ. किती तरी महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष वेधले आहे.

'शीघ्र जागा रे पहिला पहारा ।
दीप आहे तो करा, बारा सारा ।।
ना तरी पडेल चौ-यांशी अंधारा ।
शेख महंमद वासुदेव खरा ।।'

वासुदेवाच्या या शब्दचित्रातून त्याचं विचारविश्व व भावविश्व तर प्रकट होतंच पण ते जनमानसातही संक्रमित होत जातं.

त्यांचा 'नापिक' 'भादरणी' करता - करताच विवेकाचा विचारही सांगून जातो. तो पतितांची अंतरं भादरून त्यातील पाप-वासना नाहीशी करतो. विषयादी विकारांची नखं कापून टाकतो. त्याच्या हाती 'वैराग्याची कातरी' आहे. शेख महंमदांचं हे भारूड वाचताना सेनामहाराजांच्या अभंगांची नि त्यांतील प्रतिमा-दृष्टांतांची आठवण व्हावी, इतकं त्यात साम्य आहे.

त्यांचं 'तेली' हे भारूडही लक्षात घेण्याजोगं आहे. ते लहान असूनही किती आशयगर्भ आहे, ते पाहा –

'हरि दुर्बळ तुझा तेली । सद्गुरूने कृपा केली ।
औट हात रोविला घाणा । तत्त्वे लाट फिरे जाणा ।
तीळ कल्पना-वासना । शांति वोहोळुनि घाणा ।
माया - विषय रगडिले । भाव - तेल निवडिलें ।।'

शेख महंमदांचा उल्लेख न करता संत जगनाडेमहाराजांचा हा अभंग आहे, असं सांगितलं तरी त्यावर कुणाचाही सहज विश्वास बसेल. जगनाडेमहाराज तुकोबांच्या चौदा टाळक-यांपैकी - शिष्यांपैकी पहिले होते.

शेख महंमदांचा 'वणजारा' हा एका गावाहून दुस-या गावी बैलावर गोण्या भरून नेऊन माल विकणारा गावाकडचा व्यापारी आहे. मन-पवन हे त्याचे बैल. आपल्या मुठीनं तो त्यांचा गर्व-गुमान थोपवितो. हेतुबुद्धीची वेसण तो या बैलांना लावतो. त्यांच्या गळ्यात संकल्प - विकल्पांच्या घंटा असून त्यांचे नाद निनादत असतात. (साधनामार्गात - विकल्पानं संघर्ष होऊन साधकाचा बुद्धिभेद होण्याची शक्यता असते अशा वेळी मनःशांती ढळू न देता ईश्वरावर निष्ठा ठेऊन त्याची

भक्ती करायला हवी, साधना करायला हवी.) यासाठी या बैलांना 'शांतीने शृंगारिले' असं शेख महंमद म्हणतात. दया, क्षमा यांच्या चवरी त्यांच्यावर ढाळून मायेनं त्यांना वळवावं (म्हणजे मन सन्मार्गी लागतं). अशा वेळी त्याला सद्‌गुरुरुपी सौदागर (व्यापारी) भेटतो -

'पुजूनी गुरूधन्या । नामें भरिल्या गोण्या ।
परतोनि आलो पेण्या । निळारंभा ।
तळी उन्मनीची हाट । सिद्‌धसाधकांची पेठ ।
तराजू बळकट । जत-तत्त्व सानंद ।
जोखून शेख महंमद । देतो भाविकाला ।।'

या भारुडात शेख महंमदांचा योगाभ्यासदेखील किती सहजपणे प्रकटला आहे ! ते त्रिकूट-मीन-मार्ग, सिद्‌ध-साधक, संकल्प-विकल्प, उन्मनी या योगातील पारिभाषिक संज्ञा किती सहजपणे वापरतात! 'स्वानंद' या संज्ञेतून त्यांना समाधीच्या अपूर्व सुखाची अनुभूती वर्णावयाची आहे. 'योगसंग्रामा'सारखा व 'पवनविजय'सारखा योगविषयक ग्रंथ लिहिणारे शेख महंमद यातून स्वाभाविकपणेच डोकावतात, याची प्रचीती आपल्याला इथं आल्याविना राहात नाही.

शेख महंमदांचा 'जोगी' हा प्रत्यक्ष परमात्माच आहे. तो जणू जोग्याचं रूप घेऊन जगात लोकांच्या उद्‌धारासाठी प्रकट झाला आहे. निजलेल्यांना तो उठवितो आहे. जागं नि सावध करतो आहे -

'जगीं जागे जयवंत जोगी ।
निजवी, उठवी जगा लागी ।
नर-नारी नव्हे सौभागी ।
सर्व भोगूनी तो अभोगी ।।'

यातला शेवटचा चरणच शेख महंमद आपल्याला कोणत्या जोग्याबद्दल सांगणार आहेत त्याची कल्पना देतो व त्यातील लक्ष्यार्थ/सूचितार्थ वा 'परम अर्थ' स्पष्ट करीत जातो. यासारखंच एकनाथांचं 'पाखरू' हे भारूड आहे. यातलं 'पाखरू' म्हणजे निर्गुण परमात्मतत्त्व होय. हे पाखरू राईएवढं असलं तरी त्याच्या इवल्याशा नेत्रांत आकाश सामावून घेण्याची क्षमता आहे. अशी तत्त्वविरणात्मक भारुडं कूटात्मतेच्या पातळीवर जातात कारण मुळात प्रतिपाद्याचं तत्त्वज्ञानच अंतिम सत्याविषयीचं व अत्यंत संश्लिष्ट आहे. या अंतिम सत्याची कूट रूपकात्मता पुढील चरणांत व्यक्त होते-

'चराचर खाणीवाणी पाळी । त्याचा दास चंद्रमौळी ।
लक्ष चौ-यांशी न्याहाळी । ऐसी ज्याची ब्रीदावली ।।'

या जोग्याची शिष्या (संतकवीच्या शब्दात 'चेली') 'माया' आहे. ती जन्मली नसतानाही 'बावन-पंचवीस बाळं व्याली' आणि ती खाऊन ती वांझपणे मिरविली', हे सांगताना शेख

महंमदांना मायेचं खोटेपण, तिचा आभास, तिजविषयीचा भ्रम स्पष्ट करायचा आहे. 'ब्रह्म सत्य, जगन्मिथ्या' या शंकराचार्यांच्या उक्तीचा आठव इथं होतो.

'भोगी चौदा भुवने उंच । सप्त पाताळाही नीच ।
उदरी दहा खंडे नाच । भोगी अभोगाची रुच ।।'

या वर्णनावरून चराचरातील परमात्मतत्त्वाची-म्हणजे या भारुडातील जोग्याची व भोग्याची- व्याप्ती कळते.

त्याच्या दासी 'मुक्ति, रिध्दी, सिध्दि' या आहेत. त्याच्या गळ्यात माळा कशाच्या ? -तर 'तारांगण, रवि, शशी' यांच्या ! हे सारं शेख महंमद तुम्हा-आम्हाला कशासाठी सांगताहेत ? या जोग्याला जो भजतो, त्याच्यासाठी मग रात्रही नसते नि दिवसही नसतो. ('शेख महंमद वंदी त्यासी । तेथे नाही दिन-निशी ।') हे अंतिम सत्य आपण जाणून घेऊन आपलाही उद्धार करून घ्यायला हवा, ही प्रेरणा ते जनमानसाला देतात.

वासुदेवाचं रूपक तर शेख महंमदांना इतकं भावलं की त्यांनी ते दक्खिनी हिंदीतही लिहिलं. त्यातील परिभाषा सूफी संप्रदायाची आहे. भारतीय दर्शन नि सूफी तत्त्वज्ञान यांतील साम्यस्थळं प्रतिपादण्याचा हा प्रयत्न 'अभूतपूर्व'च म्हणायला हवा. यांतील 'हक' ही सूफी संज्ञा परमात्मतत्त्वाचा बोध करणारी आहे.

'पांगूळ' हा विषय आपल्या भारूड-लेखनासाठी नाथांनीही निवडला नि शेख महंमदांनाही. रूपक मांडण्याची या दोन्ही संतकवींची शैली मात्र वेगवेगळी आहे. शेख महंमदांचा 'पांगूळ' प्रारंभीच 'धर्म जागो म्हणतसे । सोऽहंबोधाच्या हरुषे ।।'

त्यावरून त्यांना धर्मप्रबोधन कसं व का करायचं आहे, ते लगेच स्पष्ट होतं. हा धर्म 'जागणार' कसा नि 'सोऽहं बोध' म्हणजे 'अहं ब्रह्मास्मि' हे तत्त्व कळणार कसं ? त्यासाठी नामस्मरण हा सोपा उपाय कसा आहे, तेही शेवटच्या

'शेख महंमद धर्म जागो ।
नित्य हरिनाम उच्चारी ।।'

या चरणावरून स्पष्ट होतं. हरी व अल्ला यांत ते अभेद मानतात व त्याविषयीचे अनेक अभंग त्यांच्या अभंगगाथ्यात आहेत.

शेख महंमदांचं भारूड - विश्व अत्यंत संपन्न आहे. रूपकात्मतेच्या माध्यमाचा उपयोग त्यांनी उपदेशासाठी, तत्त्वविवरणासाठी व धर्मप्रबोधनासाठी केला आहे.

त्यात हेतुतः समाजाच्या तळागळातल्या तेली, हाटकरी, नापिक या व्यक्ती निवडल्या व त्यांना या विश्वात मोलाचं स्थान दिलं. त्यांचं आणखी एक वैशिष्ट्य हे की हे सारं करताना ते ज्या मातीतून आले तिची ग्रामीण शब्दकळा व ग्रामीण प्रतिमासृष्टी यांचंही भान ठेवायला ते विसरत नाहीत. त्यांचा तेली 'घाणा' रोवतो, तोही 'औट हाताचा' तो 'तीळ-कल्पना वोहळून' या

घाण्यातून भाव (भक्तिभावरूपी)-तेल काढतो. 'बणजारा'सारख्या भारुडात त्याचे 'ढवळे पोवळे' बैल आहेत आणि उन्मनीचा 'हाट' म्हणजे बाजार आहे. त्याचा 'तराजू' बळकट असून त्याला जत-सत ही दोन 'परडी' आहेत. तो सानंद 'जोखून' देतो आहे. 'आशा -बोराटी' (आशेचे काटेकुटे) यासारख्या कितीतरी प्रतिमा 'कैकाय' सारख्या त्यांच्या भारूडात आढळतात.

शेख महंमदांची ग्रामीण शब्दकळा व त्यांची ग्रामीण प्रतिमासृष्टी हा स्वतंत्र संशोधनाचा विषय असून त्याविषयी मी सविस्तर विवेचन या प्रकरणात अन्यत्र केलं आहे. देशीकार लेण्याला आणखी काही देखणे साज शेख महंमदांच्या या ग्रामीण शब्दकळेमुळं व प्रतिमासृष्टीमुळं लाभले. मराठीसारख्या लोकभाषेला चक्रधरस्वामी-ज्ञानदेव-नामदेवांनी धर्मभाषेचं स्थान व वैभव मिळवून दिलं, त्यात शेख महंमदांनीही चांगली भर टाकली. शेख महंमदांचं भारूड - विश्व हे असं समृद्ध नि संपन्न आहे. 'भारूडकार' म्हणून शेख महंमदांना मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात स्थान न दिल्यानं शेख महंमदांवर एक प्रकारे अन्यायच झाला आहे. या इतिहासाचं पुनर्लेखन करताना तो होणार नाही, अशी अपेक्षा आता तरी करावी काय ?

---

## ७. दक्खिनी रचना

संत नामदेवांपासून तुकोबा-निळोबा-बहिणाबाईपर्यंत अनेक वारकरी व अन्य संप्रदायांच्या संतांनी 'दक्खिनी' मध्ये लेखन केलं आहे. शेख महंमदही याला अपवाद नाहीत. श्री वा. सी. बेंद्रे यांनी या दक्खिनी लेखनाचा 'हिंदुस्थानी कवीत' नावाचा स्वतंत्र (आठवा) विभाग 'शेख महंमदबाबांच्या कवितासंग्रहा'च्या दुस-या भागात प्रसिद्ध केला आहे. पृ. ११२ पासून पृ. ११८ पर्यंत या ग्रंथात ही रचना आढळते. दक्खिनी रचना ही फार्सी-मराठी अशी संमिश्र असते. या रचनेतील फार्सीबहुलतेमुळं अनेक (जवळजवळ सर्वच) अभ्यासकांचं [ (कदाचित्) फार्सीचा व इस्लामधर्म व सूफी पंथ यांचा अभ्यास नसल्यामुळं वा अन्य काही कारणांमुळं) फार दुर्लक्ष झालं आहे. शेख महंमदांविषयी काही लेखकांनी याकडे ढुंकूनही न पाहता, एका अर्थानं, घोर उपेक्षाच केल्याचं मला जाणवलं. पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागात शेख महंमदांविषयी पी एच् डी. साठी प्रबंध सादर करणा-या चेकोस्लोव्हाकियाच्या दुशान नावाच्या एका अभ्यासकानं तर शेख महंमदांचा नि सूफी संप्रदायाचा अन्योन्य संबंधच नसल्याचं सूचित करून, त्यावर सूफी तत्त्वज्ञानाचा व इस्लामधर्माचा कुठलाही प्रभाव नसल्याचं विवरण करून, प्रबंधाचा उत्तरार्ध पूर्वग्रहदूषित दृष्टीनं रंगविला आहे. (त्या प्रबंधाच्या परीक्षणात ही बाब मी आवर्जून नोंदविली आहे.)

शेख महंमदांची ही 'दक्खिनी' कविता त्यांचा विशिष्ट दृष्टिकोण समजून घेण्यास फार उपयुक्त असल्यानं तिचा आजवर कुणीही न केलेला, तपशीलवार विचार करणं मला प्रस्तुत वाटतं. या दृष्टिकोणातून शेख महंमदांच्या 'योगसंग्रामा'दी अन्य रचनांवर कोणता प्रभाव पडला, तेही लक्षात येईल. श्री बेंद्रे यांनी सात भागांत ही रचना विभागली आहे-

(१) वासुदेव (२) लळीत (३) नसिहतनामा (४) पंजीज मुसलमानी (५) आरती (६) स्फुट कविता आणि (७) दोहोरे

यांतील 'नसीहतनामा' व 'पंजीज मुसलमानी'चा जाता जाता उल्लेख शेख महंमदांचे काही अभ्यासक करतात पण सूक्ष्म अध्ययन केल्याशिवाय त्यांचं महत्त्व कळणार नाही.

**'पंजीज मुसलमानी'** या रचनेत इस्लामधर्मांची पाच मूलभूत तत्त्वं सांगितली आहेत : ती आहेत कलमा, नमाज, रोजा, जकात व हज .'सुनो मुसलमानी का चीज माना' असं सांगून मुसलमानी (इस्लाम) धर्मांचा 'माना' म्हणजे 'अर्थ' ते समजावून सांगतात-मुसलमान कोणत्याही गोष्टीचा प्रारंभ करताना 'बिस्मिल्ला' व 'अल्हम्दो लिल्ला' म्हणतात. **'नसिहतनाम्या'**चा प्रारंभ शेख महंमद बिसमिला । अल्ला हो अकबर'नं करतात तर 'पंजीज मुसलमानी' चा प्रारंभ 'आधी 'अल्हम्दे लिल्ला' म्हणा ना''नं झाला आहे. यामुळं आपल्या मनातील 'कुफराना' (अश्रद्ध भाव) नाहीसा होतो आणि 'अद्वैतबोध' होतो, असं शेख महंमद म्हणतात.

'ला इल्ला कलमा आवल चीज । इल्लल्ला वोळखा 'पे ब्रह्मबीज' असं सांगून ते 'अव्वल कलम्यां'चं महत्त्व वर्णन करतात. ईश्वर एक असून हजरत महंमद हे त्याचे प्रेषित आहेत हे त्यांनी यापुढील 'महमद रसुलला । रसुलल्ला कूं समजो । स्वहितालागीं ।।' या चरणात सांगितलं आहे

इस्लामचं दुसरं तत्त्व 'नमाज' (शेख महंमदांच्या शब्दांत 'निमाज'). त्यांचे 'सुन्नत' आणि 'फर्ज' हे दोन भागही त्यांनी बारकाव्यानं वर्णिले आहेत. नमाज पढण्यापूर्वी हस्तपाद-प्रक्षालन करतात. 'गुस्ल' आणि 'वुजू' (वजू) असं त्यांना म्हणतात. 'दुयेम चीजे बुजू गुसल निमाज । सुनत फरजा । अविनाशापासी।।'

'सियेम' म्हणजे तिसरी गोष्ट 'रोजे' त्यामुळं नरकवास चुकतो, असं सांगून ते पुढं 'जकात' (दान) या चवथ्या '(चहाराम') तत्त्वाकडे वळतात. त्यानंतर 'पंचवा चीज मके हाज करना.' 'मग सांडुनि विषयांचा कुफराना । भिष्त (स्वर्ग)-म्यान जोग करना । 'युगानुयुगीं ।।' ईश्वराचं भय मनात बाळगावं व त्याच्या इच्छेनुसार वागावं म्हणजे त्याची आपल्यावर कृपा होते, हा इस्लाममधील विचारही 'पंजीज मुसलमानी'च्या शेवटी आला आहे-

'शेख महंमद भये भिती । सद्गुरुकृपा जाली पुरती ।

सोऽहं बोधें प्रकाश- ज्योती । अल्ला के मेहरसुं ।।'

'भक्तिबोध' व 'आचारबोध' या शेख महंमदांच्या मराठी लेखनाप्रमाणंच 'नसीहतनामा' ही दक्खिनी रचनाही बोधपर वा उपदेशपर आहे. 'नसीहत' म्हणजे 'उपदेश' या रचनेचासुद्धा फार बारकाईनं विचार करायला हवा कारण तिच्यात सूफी तत्त्वज्ञानातील 'जिकीर' (जिक्रः ईश्वराचं वर्णन), 'तसबी' (तस्वीहः नामस्मरणमाला, जपमाळ), हक (अन्तिम सत्य), आखर (आखिरत् = पारलौकिक अन्तिम ध्येय, पारलौकिक जग), इमान (ईमान = परमेश्वरावरील श्रद्धा), 'पीरों की यारी' या संज्ञांबरोबर इस्लामच्या कुफुर (कुफ्र) हलाल-हराम (विधि-निषेध) कुर्आन (कुराण), दोजख (नरक), भिश्त (बहिश्त = स्वर्ग), बदअमल (कुकर्म), नेकी, यकिन (यकीन = ईश्वरावरील विश्वास), पाक, परहेजगार (पवित्राचरण) अशा किती तरी संज्ञा येतात. 'बिसमिल्ला अल्ला हो अकबर' नं या 'नसीहतनाम्या'चा प्रारंभ होतो व 'हक ला इलाह इल्लाहाल्लाहो । महंमद रसुल्लल्ला' हो इस्लामधर्मांची सूत्रंही यात गोवली आहेत. आचार - विचारांच्या पावित्र्यावर यात भर दिला आहे.

'पंजीज मुसलमानी' व 'नसीहतनामा' हे लेखन नावावरून इस्लामधर्म-विवरण करणारं वाटतं पण शेख महंमदांचा 'वासुदेव' ही हेच करतो. 'हाजी गा गाजी कुरान पढे । नबी रसुल के उफती ।। हलाल हक समजेगा । वोही अल्ला का प्यारा' ।। असं हा वासुदेव म्हणतो. इस्लाममधील 'शरा' ही महत्त्वपूर्ण पारिभाषिक संज्ञाही या वासुदेवाच्या मुखी आहे. 'दरूद' पठण करणं हे मुसलमानाचं एक महत्त्वपूर्ण धार्मिक कार्य. त्याचाही उल्लेख या प्रकरणात आढळतो.

असं हे इस्लामधर्माचं माहात्म्य ('अजब चीज मुसलमानी') शेख महंमद वर्णितात. शेवटी आपली सूफींची कादरी परंपरा शेख महंमदांनी आवर्जून वर्णिली आहे. तिची नोंद कुणी घेतल्याचं मला आढळलं नाही

''गौरा खुतुब पीर वली । चली आई बुन्याद ।।
मिरां कादर खानवा(जा)दे । बोले शेख महंमद ।।''

(कवितासंग्रह, पृ. १११)

ईश्वर, प्रेषित हजरत मुहंमद ('नबी'), हजरत मीरां पीर विप्र - शुद्र असा भेदभाव न करता सर्वांचा उद्धार करतात, असं शेख महंमद पुढील 'लळीता'त सांगतात-

'सलाम मोहमद । नबी सादात । विप्रां - शुद्रां देतो हा अशीर्वाद ।।
आबिल -काबिल ये दोन्हो भाई । कबि धनिकाला निर्गुण सोई ।।
शेख महंमद जनजाहीर । हजरत मीरां पीर जग उद्धार ।।'

(-कवितासंग्रह, पृ. १११)

शेख महंमदांनी गणेशाचं व विठ्ठलाचं मराठी स्तोत्र लिहिलं, त्याचप्रमाणं दक्खिनी आरतीही लिहिली आहे. ती आहे अल्लाची ! 'श्री. वा. सी. बेंद्रे यांनी कवितासंग्रहा'च्या पृ. ११३-११४ वर अशा ३ आरत्या दिल्या आहेत. त्यांत अल्लाचं स्तवन व इस्लामधर्माच्या परंपरेचा तपशील अशा दोन्ही गोष्टींचा समन्वय झाला आहे.

शेख महंमदांचा इस्लामचा अभ्यास नव्हता किंवा त्यांच्यावर सूफी तत्त्वज्ञानाचा/परंपरेचा प्रभाव नव्हता, असं म्हणणा-या तथाकथित संशोधकांबद्दल आता काय म्हणावं ? **'हिंदुस्तानी कवित'**मधील स्फुट रचनेतही याचा पदोपदी प्रत्यय येतो-

'दोन्हों आख्यांका एकीच देखता।
दो भाषी वर्णिला एकचि जाणा ।।'

(-कवितासंग्रह, पृ. ११५)

हे एकात्मतेचं सूत्र तसंच त्यातील समन्वयाचा अन्तःस्रोत या लेखनातून कसा खळाळून वाहतो आहे ! विस्तारभयास्तव अधिक तपशील द्यायचं टाळलं आहे. जिज्ञासूंनी तो मूळातूनच वाचावा.

---

## ८. परिभाषा-कोश: 'दुचेश्मा'

इस्लामी/सूफी तत्त्वज्ञान व भारतीय तत्त्वज्ञान यांचा 'परिभाषा-कोश' यापूर्वी मुंतोजी बामणी यांनी नागेशसाम्प्रदायिक भाष्यकार अज्ञानसिद्ध यांच्या 'पृच्छे'वरून सिद्ध केला होता, त्याविषयी मुंतोजीविषयक प्रकरणात विवेचन केलंच आहे व त्या प्रकरणाच्या परिशिष्टात तो कोशही दिला आहे. मुंतोजी हे मुर्तुझा कादरी म्हणजे सूफींच्या कादरी शाखेचेच होते. शेख महंमदही त्याच शाखेचे. ते 'योगसंग्रामा'दी रचनांसाठी व अभंगलेखनासाठी प्रसिद्ध होते. त्यांनीही परिभाषा-कोशाची रचना केली, याविषयी मराठी वाङ्मयेतिहासात नोंद आढळत नाही. त्यांच्या अभ्यासकांचंही याकडे थोडंफार दुर्लक्षच झालं आहे तथापि श्री. वा. सी. बेंद्रे यांनी संपादिलेल्या शेख महंमदांच्या 'कवितासंग्रहा'च्या दुस-या भागात (पृ. १३० ते१३३) या 'परिभाषा-कोशा'चं संपादन केलं असून शेख महंमदांच्या या मौलिक भाषिक व तत्त्वज्ञानविषयक कार्याची नोंद केली आहे.

'दुचेश्मा' म्हणजे दोन नेत्र. 'दू-चष्मह्' हे फार्सी शब्द आहेत. दोन्ही नेत्रांनी एकच दृश्य दिसतं त्याप्रमाणं इस्लामच्या वा सूफी तत्त्वज्ञानाच्या आणि भारतीय दर्शनाच्या आकलनानं समान अध्यात्माचा बोध होतो, असा एकात्मतावादी विचार शेख महंमदांना यातून सूचित करायचा आहे. मुंतोजीच्या व शेख महंमदांच्या 'परिभाषाकोशा'त ब-याच बाबतीत साम्य आढळेल व काही बाबतीत वेगळंपणही आढळेल. ते लक्षात यावं व या दोन्ही परिभाषाकोषांची तुलना करता यावी म्हणून तो इथं श्री. वा. सी. बेंद्रे यांनी संपादिलेल्या वरील ग्रंथातून आद्यन्तासह संपूर्ण उद्‌धृत करीत आहे. मुंतोजींनी 'वजूद' चे चार प्रकार दिले आहेत व ते महत्त्वाचे आहेत, ते यात आढळत नाहीत. मात्र जिकीर, फिकीर, विसाल, अशक-माशुक, पीर-मुरीद, सुदी, अनसर, खुदा-बंदा, वसालत, दिनदुनया, हक, अजमत हे सूफी दर्शनातील सारे लक्षणीय शब्द त्यात आहेत.

या कोशातील पहिल्या स्तम्भात इस्लाम/सूफी दर्शनातील संज्ञा असून दुस-या स्तम्भात भारतीय दर्शनातील पर्यायी संज्ञा आहेत, इस्लामी संज्ञा अरबी-फार्सी या भाषांतील असून दुस-या स्तम्भातील शब्द/संज्ञा संस्कृत/मराठी आहेत. मुंतोजींप्रमाणंच मराठी परिभाषा-कोश-वाङ्मयातील शेख महंमदांचं हे योगदान मौलिक व महत्त्वाचं असून त्यातील एकमेकांचा धर्म समजून घेण्याची परस्पर-सामंजस्याची भावना निश्चितपणे आदरणीय आहे. मुसलमान मराठी संतकवी मराठी मातीशी किती एकरूप झाले होते, याचाही यातून प्रत्यय आल्याविना राहत नाही.

शेख महंमदांचा 'दुचेश्मा' असा आहे. तो संपूर्ण जसाच्या तसा इथं उद्‌धृत करीत आहे -

## श्रीसद्‌गुरु शेख महंमद

## 'दु चे श्मा'

| | |
|---|---|
| जलालियत । | तमोगुण ।।१।। |
| कमात्मियत । | शुद्ध सत्वगुण ।।२।। |
| **मकान चार ।** | **स्थाने चार ।।** |
| चशम मकान । | नेत्रस्थान ।।१।। |
| हलक मकान । | कंठस्थान ।।२।। |
| कतब मकान । | हृदयस्थान ।।३।। |
| सिरे मकान । | मूर्धिस्थान ।।४।। |
| **भोग चार** | |
| सुरत दीदनी । | **स्थूळ भोग ।।१।।** |
| वहमा । | कल्पना प्रविक्रम ।।२।। |
| नीद । | निराचंद मुर्छनी ।।३।। |
| खुशआनी । | आनंदावभास भोग ।।४।। |
| नासूत दर मलकूल । | अकशे उकार |
| मलकूत दर जबरुत । | मकाशे ॐकार |
| लाहूत दर नासूत । | ॐकार अहमेव |
| अकलोम गुद सबदरी । | अहमात्मा साक्ष |
| **अनसर पंज ।** | **पंच महाभुतें ।।** |
| खाक । | पृथ्वी ।।१।। |
| आब । | आप ।।२।। |
| आतश । | तेज ।।३।। |
| बाद । | वायू ।।४।। |
| हवा । | आकाश ।।५।। |
| **हवासें दस १० ।** | **इंद्रिये दहा १० ।।** |
| शिनवाई | श्रोत्र ।।१।। |
| जसम | त्वचा ।।२।। |
| बिनाई | चक्षु ।।३।। |
| चेंशिदन | जिव्हा ।।४।। |
| बोईदन | प्राण ।।५।। |
| गोईदन | वाचा ।।६।। |

| | |
|---|---|
| हस्त । | पाणी ॥७॥ |
| पाद । | पाद ॥८॥ |
| केर । | शिस्न ॥९॥ |
| कून । | गुद ॥१०॥ |
| दिल । | अंतःकरण ॥१॥ |
| वहम । | मन ॥२॥ |
| अकल । | बुध्दि ॥३॥ |
| कतरा । | चित्त॥४॥ |
| खुदी । | अहंकार ॥५॥ |
| नजर । | प्राणदृश्य ॥६॥ |
| नजर नाजिर । | दृश्य दृष्टा ॥७॥ |
| खुदा बंदा । | ईश्वर जीव ॥८॥ |
| जात सिफत । | माया ब्रह्म ॥९॥ |
| नफी इसबत । | नित्यानित्य ॥१०॥ |
| दाना बिना । | ज्ञाता द्रष्टा ॥११॥ |
| शाहीद । | साक्ष ॥१२॥ |
| शरा सलूक । | कर्म निःकर्म ॥१३॥ |
| तोहिद । | अद्वैत । |
| भिहिश्त दोजख । | स्वर्ग निरय । |
| वसालत । | ऐक्य । |
| दुई । | द्वैत । |
| दानाई-नादानगी । | ज्ञान-अज्ञान । |
| खुदशिनास । | आत्मज्ञान । |
| जिकीर, फिकीर । | स्मरण, विवेक । |
| तफदूर । | विचारणा । |
| मुकर्बा । | ध्यान । |
| नूर । | प्रकाश । |
| जुलुमात । | अंधःकार । |
| फीरा का विसाल । | योग-वियोग । |
| दरफीर । | अहं ब्रह्मास्मिन । |
| गंजे । | पुर्ण । |

| | |
|---|---|
| अला जमे जामी सीफत । | सार्ध ब्रह्मेति । |
| मना, मणी । | मी, माझें । |
| सलीमी सुलीन कतरानफी । | वृत्तिलीन / तल्लीन । |
| खुदपरस्ती । | अहंकारी । |
| खदिमुल फुकरा । | साधुभजन । |
| हवल फुकरा। | साधु-प्रीती । |
| पैगंबरी खास्त । | देवता प्रकृति । |
| किरावून खास्त । | असुरी प्रकृति । |
| अजमत । | सिद्धी । |
| पाक अरवा । | शुद्ध जीव । |
| नापाक अरवा । | मलीन जीव । |
| पीर-मुरीद । | गुरु-शिष्य । |
| मुतकल्लीम । | वाचक । |
| तालब । | साधक । |
| मुराद । | साध्यें । |
| दुई बगुजार । | आत्मज्ञान-निरसन । |
| यकशव । | अद्वैत आत्मा होणें । |
| हकीकी । | आत्मज्ञानी । |
| मीजाजी । | वर्णाश्रम-अभिमानी । |
| किरमुन कातेबिन । | चित्रगुप्त । |
| सातों सित्फ खुदा । | सप्तगुण । |
| सबलीत । | ईश्वर । |
| आलेन । | सर्वज्ञ । |
| इरातद । | ईशत्व । |
| कुदरत । | सामर्थ्य । |
| हयुंत । | जीवन । |
| समीयुल। | ऐकणें । |
| बसीरुन । | देखणें । |
| मुतकल्लेमुन । | वाचक, बोलणें । |
| औजूद मौजूद । | क्षेत्र-क्षेत्रज्ञ । |
| खुलासा । | उकल। |

| | |
|---|---|
| आशक माशुक । | पूज्य पूज्यक। |
| इश्क । | प्रेम। |
| नेकी बदी । | पापपुण्य । |
| हज । | तीर्थभ्रमण । |
| जाहेर बातीन । | अंतरबाहिर । |
| हक राह । | सत्यमार्ग। |
| कुलमन अंलेहफान । | यदृष्टं तं नष्टं । |
| तात । | भक्ति। |
| दीनदुनिया । | इह पर । |
| हुश । | देवकन्या। |
| दरखे तुबा । | कल्पवृक्ष । |
| अमिया । | अमृत । |
| हिजाब जीवनीफ । | मोहित व्याप। |
| अमर । | सत । |
| जिया । | जीव । |
| अल्ला । | ब्रह्म । |
| खुदा । | परमेश्वर। |
| सीर सित्फ । | माया । |
| असर सित्फ । | अविद्या । |
| जिन इनस । | देवमनुष्य । |
| अरश । | वैकुंठ । |
| भीष्त । | स्वर्ग। |
| औलियां अंबियां । | हरिहरब्रह्मादिक । |
| **किताब चार ।** | **वेद चार ।** |
| तौरयत । | ॠग्वेद । |
| जबूर । | यजुर्वेद । |
| इंजील । | सामवेद। |
| फुर्कान । | अथर्ववेद। |
| रिसाले । | शास्त्रें । |

# शेख महंमदांचं 'ग्रामीण'त्व आणि त्यांची प्रतिमासृष्टी

महाराष्ट्रातील बहुतेक मुसलमान संतकवी या मराठी मातीतच जन्मले नि इथल्या खेडोपाड्यांतच वाढले. त्यामुळं त्यांच्यावर कृषिजीवनाचा / ग्रामजीवनाचा फार मोठा प्रभाव असल्याचं आढळतं.

शेख महंमदांवर तर तो विशेषच जाणवतो. हा प्रभाव त्यांच्या ग्रामीण शब्दकळेतून व प्रतिमासृष्टीतून ज़ाणवल्याविना राहात नाही. तथापि हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय असून ग्रामीण मराठी साहित्याच्या निर्मितीलाही या संतकवीचा हातभार कसा लागला, याचं रेखीव चित्र त्यातून उमटतं. या ग्रंथात त्याच्या सविस्तर विवेचनाला वाव नाही तरी काही वानगीदाखल उदाहरणं देतो -

**शब्दकळा**

सेंडगळ, ताट, तिव्हाडा, पवाडा, सुईन, कादली, घोंगडी, पाथरवट, परडी, कंदोरी, पैस, खांडूक, सेंदाड, बिब्बा, चेटके, चिलम, गुडगुडी, सिदोरी, कानडा, हाट, वाण, बुका, अठरापगड, मसिद, कोस, सिकलकर, निमाप, दारसिना, दिवटी, काहली, मडके, कांट्या-बोराट्या, किरवा, मोट, पखाल इ. कितीतरी उदाहरणांतून शेख महंमदांच्या ग्रामीण शब्दकळेची प्रचीती येते तर शेकडो उदाहरणांतून त्यांची ग्रामीण प्रतिमासृष्टी साकार होते. केवळ 'योगसंग्रामा'तीलच ही काही उदाहरणं पाहा -

**प्रतिमासृष्टी**

१) सरजे अंकुश डफावर लाऊन । हाटोहाट उमगती भांडणें ।
जैसे पिसाळले श्वान । किंवोनि झडा घालितसे ।। १ x ६६ ।।

२) केळीजवळी लाविल्या बोरी । वारीयानें हालतां सर्वांग चिरीं ।
तैसी या जनाची संगत नव्हे बरीं । साधुजनांलागी ।। १ x ७७ ।।

३) उदकें भरिली असे विहिर । मोटेवेगळें न निघे बाहेर ।
तैसें पुसल्याविण गुणविचार । काय सांगावे तुजप्रति ? ।। ३ x ८ ।।

४) गाजराचा गि-हाईक भेटला । त्याशीं जर केळ्यांचा हाटा उघडिला ।
तरी आपणासच मुर्खवाद आला । बोल कवणास नाही ।। ३ x १२ ।।

५) हिरवे चर्म रंगल्या झालें मोल । नाव पावले मोट-पखाल ।
शुच उदकामाजी शिरे होऊनी डौल । तैसे हरिरंगी रंगावे ।

६) तापले लोखंड ऐरणीवर । मांस म्हणऊनि झेपावली घार ।
निखार लागताचि पळे दूर । तैसें विषय पहा हो ।। ४ x ३९।।

७) जैसें सुने शेत खाऊनियां पाखरें । आपण उडोनि जाती एकसरें ।
पिसोट्या देखोनि धनि चिंता करे । दुःखे रडे-फुंदे ।। ४ x ३२।।

८) कांट्या-बोराट्यांनी बन भरिलें । लाविल्याविण आपणचि निघाले ।
तैसे जनाचे विजन असे जाले । सद्‌गुरूस नेणतां ।। ५ x १४।।

९) मेथी कोथिंबीर सायासें लाविली ।
तांदुळजा घोळ बिदीस उगवली ।
तैशी दुर्जळी सृष्टी असे भरली ।
गुणाइत सायासे ।। ५ x १५।।

१०) पाहा एरंडी भरली असे तैलें ।
तीस काय करितील मोग-याची फुलें ?
ऐसे जे संचितानें असेल सांडवलें ।
त्यासि प्रयत्न नाहीं ।। ५ x ३६।।

११) खाटिकाची सुरी, मांगाची भाली ।
राजाची फिरंग उंच पदी मिरवली ।
जिराल्या पाण्यानें ती नाहीं आली ।
तैसा स्वयें सद्‌गुरू ।। ५ x ५०।।

१२) झाकले मुष्टीनें शेत पेरितां ।
बीज मागुतें कुळऊन झांकिता ।
बहुत पेरून थोडेंसें सांगतां ।
मग ते उदंड पिके ।। ८ x ८०।।

९) जैसा पॅड धरूनि फिरे घाणा ।
तेल जाऊनी पडे आणिकाच्या भाणा ।
तैसे झाले असें शास्त्रगणा ।
स्वयें चावि निजभक्त घेती ।। ८ x १८।।

-अशी उदाहरणं किती म्हणून द्यावीत ?

## समाजप्रबोधनकार शेख महंमद

आपल्या संतांचा दृष्टिकोण बाराव्या-तेराव्या शतकापासूनच धर्मप्रबोधनाबरोबर समाजजागरण करण्याचा, जनसामान्यांचं प्रबोधन करण्याचा होता. मध्ययुगीन मराठी संतसाहित्याच्या आदिकाळात यादवकालात याची स्पष्ट प्रचीती येते. समाजात जे जे हिणकस आहे, त्यावर प्रखर झगझगीत प्रकाश टाकून समाजाला सन्मार्ग दाखविण्याचा निर्भय प्रयत्न श्रीचक्रधरस्वामी व ज्ञानदेव-नामदेव यांच्यासारख्या महापुरुषांनी जनहिताच्या तळमळीनं केला. समाजाची मानसिकता बदलण्यास तो कारणीभूत ठरला. प्रतिगामी विचारांचा त्याग करून समाज पुरोगामित्वाच्या खुणांचा शोध स्वकाळात घेऊ लागला. तेरावं शतक हे महाराष्ट्रात विवेकनिष्ठा, बुद्धिनिष्ठा या विचारांचा पुरस्कार करणारं शतक होतं. त्यामुळं महाराष्ट्राच्या जनसामान्यांच्या मानसिकतेत परिवर्तन होऊ लागलं, ही घटना शुभसूचकच आहे. याचा प्रभाव उत्तरकालीन मराठी संतसाहित्यावर पडल्याविना राहिला नाही.

संतकवी शेख महंमदही याला अपवाद नव्हते.

विवेकनिष्ठा व बुद्धिनिष्ठा यांचं अधिष्ठान त्यांच्या रचनेला व कार्याला लाभलं होतं. अशा वेळी कबीराची वाणी जशी प्रखर होते व समाजातील अहितकारक प्रवृत्तींवर ती तुटून पडते तसाच प्रत्यय शेख महंमदांच्या बाबतीतही आल्याविना राहत नाही. वस्तुतः परधर्मीय असल्यामुळं त्याचा विपरीत अर्थ लावून त्यांचं कार्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न होणं अशक्य नव्हतं. ती तथाकथित प्रस्थापितांची स्वाभाविक प्रतिक्रियाच होती व अशी प्रतिक्रिया होणं संभवनीय आहे याची खूणगाठ आधी मनाशी बांधूनच त्यांनी लेखनास आत्मविश्वासानं प्रारंभ केल्याचं जाणवतं. अशा वेळी त्यांची वाणी तुकोबांच्या वाणीप्रमाणं फटकळ होणंही स्वाभाविकच आहे. कबीराच्या अशा फटकळ वाणीला व वृत्तीला 'सधुक्कडी बानी' असं सार्थ म्हटलं आहे.

धर्मविचार हा क्लिष्ट न होता अत्यंत सोपा झाला की जनसामान्य त्याकडे सहज आकर्षित होतात, याची जाणीव शेख महंमदांसारख्या समाजाचं मानसशास्त्र नेमकेपणानं अभ्यासिलेल्या संतांना कशी बरं नसणार ? या मराठी मातीतच ते जन्मले व या मातीचा गंध व तिची विविध रूपं त्यांनी अनुभवली-न्याहाळली आहेत. अत्यंत बारकाईनं न्याहाळली आहेत. त्याविषयी सखोल चिंतन करून त्यांनी या समाजाच्या अभ्युदयात कोणकोणत्या बाधा येतात, याचाही सूक्ष्म विचार, सूक्ष्म चिंतन केलं. त्यातून त्यांची पाखांडखंडनात्मक, रूढीवाद व कुप्रथा यांच्या विरोधातली, पांडित्याच्या निरर्थक गर्वावर प्रहार करणारी, जाती-जातींतील, धर्मा-धर्मांतील विषमतेची विषवल्ली समूळ उपटून काढणारी विचारसरणी जडतघडत गेली. तिचं प्रतिबिम्ब त्यांच्या समग्र रचनेत उमटलं आहे. त्या सर्वांचा विचार इथं करणं अशक्य आहे पण 'योगसंग्राम' या त्यांच्या प्रमुख ग्रंथाच्या आधारे त्यांची प्रबोधनात्मक, पाखांडखंडनविषयक भूमिका सहज विशद करता येईल. त्यांची हीच भूमिका त्यांच्या अन्य लेखनातही असल्यानं त्यांची एतद्विषयक ठाम मतं आपल्याला

या विवेचनावरून लक्षात येतील. मराठी वाङ्मयेतिहासकारांनी या ग्रंथकाराकडे व त्याच्या या पुरोगामी भूमिकेकडे दुर्लक्ष करून व अनुल्लेखानं ती टाळून या संतकवीवर फार मोठा अन्याय केला आहे, असं म्हटलं तर ते अप्रस्तुत ठरू नये.

शेख महंमदांचा काळ सोळावं-सतरावं शतक असा आहे. तेराव्या शतकातल्या या स्फुल्लिंगांवर नाथांसारख्या संतांनी आपल्या शतकात फुंकर मारून तें निखारे तेवत ठेवले व या काळात शेख महंमदांनीही स्वकीय व परधर्मीय यांचा विरोध पत्करून हे कार्य पुढं नेटानं नेलं. या कार्याचा छोटासा आलेख इथं अशा प्रकारे काढता येईल.

जनसामान्यांचं धर्मप्रबोधन करायचं म्हटलं की गीर्वाणभाषेच्या माध्यमाचा अडसर आलाच. ज्यांना ती कळत नव्हती, त्यांनी धर्माचा विचार कसा करावा ? त्याचं आचरण कसं करावं ? स्वार्थपरायण पुरोहितत्व आपल्या या गीर्वाणवाणीच्या वारशावर जगत होतं. धर्म हा त्यांच्या मुखातूनच व गीर्वाणवाणीतूनच प्रतिपादिता येतो, असं त्यांचं ठाम मत होतं. या मताला छेद देण्याचा प्रथम प्रयत्न श्रीचक्रधरस्वामी आणि संत ज्ञानदेव यांनी समर्थपणे केला व मायबोलीला धर्मभाषेचं स्थान प्राप्त करून दिलं. हे ज्ञानभांडार खुलं झाल्यानं तथाकथित प्रस्थापित अस्वस्थ झाले असणं व त्यांनी या प्रक्रियेमध्ये खंड पाडण्याचा प्रयत्न केला असणं संभवनीय होतं. त्याच काळात नव्हे तर पुढं शेख महंमदांच्या सोळाव्या-सतराव्या शतकांतही त्याचं सुस्पष्ट प्रतिबिंब शेख महंमदांच्या लेखनात- विशेषतः 'योगसंग्राम'सारख्या त्यांच्या प्रमुख भाष्यात्मक रचनेत-उमटलं आहे. (आधारासाठी मी श्रीगोंद्याचे विरचंद दलिचंद देसाई यांची प्रत, पारंपरिक व स्थानिक प्रत, प्रमाण म्हणून मानली आहे. संदर्भातील अंक त्यातूनच दिले आहेत.) शेख महंमद म्हणतात, 'आपण भिन्नधर्मीय असून मराठी-सारख्या मायबोलीतून हे लेखन करतो, याचा दुःस्वासही काही पंडितांनी केला पण आपण बधलो नाही'-

'ऐरणीवरी ठेवूनिया हिरा । घणावरी पिटील अवधारा ।
परि तेणं सांडिले नाही धीरा । सुतेजपणे मिरवे ।' ।। ६ x २० ।।

प्रस्थापित समाजानं ज्याला उकिरड्यासारखं मानून बाहेर टाकलं पण त्याचंच खत होऊन त्यातून ऊस निर्माण झाला, हा त्यांचा दृष्टांत समर्पक व पुरेसा बोलका आहे -

'अमंगळ म्हणउन बाहेर टाकिलें ।
तें 'उकरडा' ऐसे नाव पडलें ।

खत म्हणउन काळींत मेळविलें ।
इक्षुदंड नांव साखर पावलें ।।' ६ x ३०-३१ ।।

भाषापंडितांचं गर्वहरण शेख महंमदांनी अशा मार्मिक शब्दांत केलं आहे –

'छपन्न भाषा असे प्रकट बोली ।
कोणासच चार भाषा बोलतां आली ।
तो म्हणे मजसारिखी नव्हे खोली ।
गर्व मरे जगीं' ।। ७ x ७० ।।

जे स्वतःला 'पंडित' नि 'विद्‌वान' म्हणवतात, तेच भ्रष्ट आचरणाचे व जगाला ठकविणारे असले तर त्यांच्या पोकळ ज्ञानाचा काय उपयोग ? त्यांचा शेख महंमदांना सात्त्विक संताप वाटतो. 'पंडित' म्हणविण्याची यांना लाज कशी वाटत नाही. असा परखड सवाल ते करतात –

'आपणास पंडित म्हणवणें । मद्य-मांसाचें भक्षण करणें ।
जगत्रय ठकिले भोंदू चांडाळपणें । मूर्ख, हीन, मूढ म्हणती ।। १३ x ११ ।।

भक्ती ही नितळ असावी, तिच्यामध्ये दांभिकता नसावी. या संदर्भात ढोंगी साधूंविषयी ते काय म्हणतात, पाहा -

'सांडोनिया आत्मज्ञानाची चक्रें ।
लोखंडाची वागविती अपवित्रें ।
यावेगळी अनेग शस्त्रें ।
ते कैसे 'साधू' म्हणावे ?' ।। ५ x ६१ ।।

खरा आचार्य, जोगी, संन्यासी, काजी, मुलाणी, फकीर कोण, हे ते यासाठीच तपशीलात सांगतात. त्यावरून खोटे आचार्य, जोगी, संन्यासी, फकीर इ. यांच्यावरही प्रकाश पडतो.

त्यांतील काहींचा उल्लेख करतो –

**संन्यासी** - 'जितेंद्र आवरून येकला । सदा सावध ।
अव्यक्ती गुंतला । मार्गी विहंगम मीनाचे लागला ।
तो संन्यासी पवित्र ।। ५ x ८६ ।।

**जोगी** - 'अधोर्ध्वतापें काग वैराग्यें ।
कुंडलिनीचे माया गुणरंगे ।
जो एक योगी निवे अष्टांगे ।
तो तत्त्व जोगी खरा ।। ५ x ८८ ।।

**फकीर -** फकीरपणाचा दावीना तोरा ।
स्वयें वाटा बुजविल्या तेवीस तेरा ।
प्रेमाचा अंमल, लागली सहज मुद्रा ।
सत्य फकीर जिंदा ।। ५ x ८४।।

**काजी -** काजी तो ज्यास सांगितल्याविण कळे ।
मुनसोफी करितां चित्त न तरळे ।
सम-विषम तुळाधार न्याहळे ।
लांच न घे म्हणउनी ।। ५ x ७९।।

यावरून परधर्मीयांतीलच नव्हे तर स्वधर्मियांतील अनिष्ट प्रवृत्तींवरही शेख महंमद समान टीका करतात ; भेदभाव करीत नाहीत, हे सहज कळेल.

धर्म म्हणजे मंत्रतंत्र व धर्म म्हणजे कर्मकांड अशी जी चुकीची समीकरणं निर्माण झाली त्याला शेख महंमदांचा विरोध आहे. अशा वेळी त्यांची भाषाही फटकळ अभंगांच्या भाषेसारखी कठोर होते -

'रांडे सांडे आळसी झाले भांडे ।
तंत्रे-मंत्रे जन ठकती काळसोंडे ।
महाडुळ जन्म घेतील दुतोंडे ।
मनुष्य-देह सरल्या ।। ५ x ५६।।'

मंत्रतंत्रांप्रमाणं नवससायासांसारख्या व अनावश्यक व्रतांसारख्या अंधश्रध्दांवर ते टीका करतात-

'आणिक ऐका नवसाचें वेड । देवतेमुढे थावरिती बगाड ।
जैसे श्वान फोडी कोरडें हाड । तदन्यायें जन भजत असे' ।। १२ x ७६।।

'मूर्ख नवस करूत देवतांप्रती । म्हणे आम्हा द्यावी धनधान्य संपत्ती ।
ऐसेंच मूर्ख वेळोवेळां बोलती । उग्र व्रत धरूनियां' ।। १२ x ८०।।

बळी देणे, गळ टोचणे यासारख्या चुकीच्या रूढींवरही ते तुटून पडतात व खरी भक्ती कशी करावी ते समाजाला समजावून सांगतात. सोळाव्या-सतराव्या शतकात शेख महंमद देवदासी नि मुरळ्या, बिजवरास मुलगी विकणं या प्रथांविरुद्ध आपलं मत नोंदवितात व अंधश्रद्धा निर्मूलनाचा तसंच समाजप्रबोधनाचा प्रयत्न करतात, ही गोष्ट लक्षणीय नाही का ?

'ज्या मुरळ्या करिती अनाचार । चालविता अुन्मताचे घरचार ।
त्यास म्हणती लावी भंडार । आपलेन हातें' ।। १४ x ५१।।

वर्णभेद व जातिभेद मानणारे लोक समाजात विषमतेची विषवल्ली पेरतात, तेही शेख महंमदांचा टीका-विषय झाले आहेत -

'धर्म जागी वेधला तरूवर । सांगितल्या नामाचा करी उच्चार ।
दृष्टी नाही देखिलें लहानथोर । काळें काय गोरे सें ? ' ।। ८ x २५।।

एका परमेश्वरानंच या सा-यांना निर्माण केलं आहे ना ?

'एका चर्मांची अनेक बाहुलीं । एक उदकरंगे रंगलीं ।
अनेक आवरणांची नावें ठेविलीं । जनास दावावया' ।। ९ x ११।।

हे शेख महंमदांचं निरीक्षण किती मार्मिक आहे ! ते चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळं निर्माण झालेल्या सामाजिक विषमतेवर प्रखर प्रकाश टाकीत नाही का ?

अनेकदैवतवादामुळं समाजाचा बुद्धिभेद होतो. देव एक नसून अनेक आहेत, अशी त्याची धारणा होते व त्यातून त्या त्या देवतांचे अभिनिवेशी संप्रदाय निर्माण होतात. यामुळंही समाज दुभंगत दुभंगत जातो, यासाठी अशा कितीतरी देवताविषयी त्यांनी 'योगसंग्रामा' च्या पंधराव्या प्रसंगात त्यांनी आपली प्रतिकूल प्रतिक्रिया नोंदवून समाजाला एकेश्वरवादाचं महत्त्व समजावून सांगितलं आहे. यातील एका देवतेचा वानगीदाखल उल्लेख –

'भद्राई, लावावे आपुले बळी । तुला नैवेद्य करील तूपपोळी ।
म्हणे, मज पाव वो तदाकाळीं । कोंबडे-कोंबड्या मारीन' ।। १५ x १५।।

चेटकासारख्या जारणमारण विद्या व त्याविषयीची समाजातील अंधश्रद्धा यावरही शेख महंमद पंधराव्या-सोळाव्या शतकात तुटून पडतात, यावरूनही त्यांच्या बुद्धिप्रामाण्याची साक्ष पटते डंखीण, जखीण याचप्रमाणं भुताखेतांसारख्या अंध्दश्रद्धांना त्यांनी विरोध केला आहे. 'योगसंग्रामा'च्या पंधराव्या प्रसंगात त्यांनी यासंबंधी विस्तारपूर्वक विवेचन केलं असून अशा गोष्टींपासून समाजाला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला आहे –

'मग धावती गोडदेशा । नाना परी चेटकें शिकती परियेसा ।
म्हसके होऊनी येती देशा । जन झकवावयाला ।

चेंडेचापडें जड्याबुट्या कुसळणे । शिकोनी अधर्मी गोविले अज्ञानें ।
त्यांनी दुपत्याचा नाश करणें । सुकर होउनि उसने देती' ।। १५ x १६-१७।।

समाजमानसावर सुसंस्कार करण्यासाठी व त्याला अपप्रवृत्ती, अंधश्रद्धा, भाबडेपणा, आंधळी भक्ती व अज्ञान यापासून वाचविण्यासाठी, डोळस भक्तीची व विवेकनिष्ठ जीवनदृष्टीची अभिवृद्धी करण्यासाठी या श्रेष्ठ संतकवीनं आपली वाणी व लेखणी झिजविली. त्यानं जसं समाजाचं प्रबोधन केलं, त्याचप्रमाणं धर्मप्रबोधनही केलं. वाईट रूढींना विरोध करण्याचं साहस दाखविलं. उदात्त जीवनादर्शांचं आपल्या साहित्यातून विवरण केलं व आपल्या परीनं आदर्श समाजाच्या जडणघडणीला मोलाचा हातभार लावला.

## शेख महंमदांचा एकात्मतावाद

### पार्श्वभूमी

सूफी संप्रदायाचे अनेक मुसलमान संतकवी मध्ययुगीन महाराष्ट्रात होते. इस्लामधर्मीय असूनही ते महाराष्ट्रातील वारकरी, नागेश, महानुभाव, दत्त, नाथ साम्प्रदायिकांशी, इतकंच नव्हे तर वीरशैव व जैनधर्मीय संतांशीही एकरूप झाले होते. त्यांच्या साहित्याचा संक्षिप्त आलेख मी १९८५ साली दिलेल्या आकाशवाणीच्या लाड व्याख्यानमालेत रेखाटला होता. याविषयी यापूर्वी उल्लेख केलाच आहे. संतकवी शेख महंमद यांचा या संदर्भात अग्रक्रमानं उल्लेख करायला हवा. पंधरावं-सोळावं शतक हा शेख महंमदाचा काळ लक्षात घेता त्या काळाची दोन प्रमुख आव्हानं होती. बहमनीकाळाच्या आगमनाबरोबर या दोन सांस्कृतिक आव्हानांना आपल्या संतांना सामोरं जावं लागलं. स्वधर्म व स्वसंस्कृती यांचं रक्षण हे एक आव्हान होतं तर बाहेरून आलेल्या इस्लामधर्माशी, त्याच्या अनुयायांशी, त्याच्या संतांशी व इस्लामी संस्कृतीशी कशा प्रकारचे संबंध प्रस्थापित करायचे ? त्या संस्कृतीशी संघर्ष करायचा की त्यांच्याशी सामंजस्य प्रस्थापित करायचं ? हे दुसरं आव्हान तर महाराष्ट्रातील सूफी संतांसमोरही होतं. मध्ययुगीन महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास पाहिला तर या उभय पक्षांनी संघर्षाऐवजी समन्वयाची व सामंजस्याचीच भूमिका घेतली असं आढळतं. संत एकनाथ व शेख महंमद या भूमिकेची महाराष्ट्रातील आदर्श प्रतीकं होती. एकनाथ बाजीगर, सिद्दी, फकीर, दरवेश यासारखी भारुडं, 'हिंदू-तर्क-संवाद' सारखे संवाद नि 'अकलगिरी'सारखी (दखिनी) प्रकरणं का लिहितात व त्यांत कोणती भूमिका मांडतात यावरून हे सहज स्पष्ट होईल. त्याचबरोबर शेख महंमद हे जवळपास नाथांचे समकालीन असलेले सूफी संतकवी. ते वारकरी संप्रदायाशी इतके समरस व एकरूप का होतात व आपल्या 'योगसंग्राम' या ग्रंथात व अभंगादी अन्य वाङ्मयात कोणती भूमिका घेतात, ते लक्षात घेतलं की या दोन्ही संतांच्या विचारसरणीमधील साम्यस्थळं सहज टिपता येतात. या संतांप्रमाणंच अन्य मुसलमान संतांनी व अन्य महाराष्ट्रीय धर्मसांप्रदायिक संतांनी यापुढेही घेतलेल्या सामंजस्याच्या भूमिकेमुळं महाराष्ट्रात एकात्मतेच्या विचाराला गती मिळायला फार मोठं सहाय्य झालं. वारकरी संप्रदायाशी शेख महंमद, महानुभाव संप्रदायाशी शहामुनी, नागेश संप्रदायाशी अलमखान, समर्थ संप्रदायाशी शेख तुराब ('तुरुत वली') किती समरस व एकरूप झाले ! ही तर काही प्रातिनिधिक उदाहरणं पण अशी किती तरी उदाहरणं देता येतील. या संशोधनासाठी मी हा बृहद् संशोधन-प्रकल्प हाती घेतला आहे.

शेख महंमदांनी या एकात्मतेचा विशेष पुरस्कार केला. त्यांनी व एकनाथांनी जणू सांस्कृतिक ऐक्याच्या स्तम्भाचा पायाच रचला.

### एकात्मतेच्या खुणा

शेख महंमदांच्या साहित्यात या एकात्मतेच्या खुणा कुठं कुठं आढळतात. याचा लहानसा आलेख अिथं रेखाटायचं मी मनाशी योजिलं आहे.

हिन्दू व इस्लाम हे दोन्ही धर्म ईश्वराचं अस्तित्व मानणारे आस्तिक धर्म आहेत, हे या एकात्मतेमागील प्रमुख सूत्र आहे. ईश्वरतत्त्व मूलतः निर्गुण आहे, निराकार आहे, हे सर्व भारतीय आस्तिक दर्शनं मान्य करतात, त्याचप्रमाणं इस्लामधर्मही मान्य करतो. एकेश्वरवादही या सर्वांना मान्य आहे. विश्वनिर्मिती, विश्वातील प्राणिमात्रांची निर्मिती नि परमात्मतत्त्व यांचा अन्योन्य संबंधही ते मान्य करतात.

विश्वातील सर्व प्राणिमात्रांचं कल्याण हीच सर्व भारतीय दर्शनांची व इस्लामची भूमिका आहे. उदात्त जीवनमूल्यं नि पवित्र आचार-विचार यांच्याद्वारा साधना करून आपण अभ्युदयाची-पारलौकिक कल्याणाची-वाटचाल करावी, याबाबतीतही भारतीय आस्तिक दर्शनं व इस्लामधर्म यांच्यामध्ये एकवाक्यता आहे. इतकी साम्यस्थलं असताना, काही अन्य मतांतर असली तरी, आपण सर्वच इथं सामंजस्यानं जीवन व्यतीत करू शकू, आपापल्या धर्मानुसार साधना करू शकू, त्यासाठी संघर्ष करण्याची काहीच आवश्यकता नाही, ही एकात्मतेची भावना या संतांनी लोकमानसात रुजवली. ईश्वरतत्त्व एकच आहे, कुणी त्याला 'अल्ला' म्हटलं तर कुणी 'ईश्वर', कुणी त्याला गणेशाच्या रूपात पाहिलं तर कुणी दिगंबराच्या रूपात. कुणी रामाच्या, कुणी विठ्ठलाच्या, कुणी कृष्णाच्या. या सगुण संकल्पनेमागं मूळ निर्गुण-निराकाराची संकल्पनाअसल्यानंच शेख महंमदांना आपल्या 'योगसंग्रामा'च्या प्रसंगाच्या व (अध्यायांच्या) प्रारंभी गणेशाला (प्रसंग १ ते ५) दिगंबराला (प्र. ३, ४) वंदन करताना संकोच वाटत नाही. कारण त्यात शेख महंमदांना निर्विकार ईश्वरतत्त्वच जाणवतं. पाचव्या प्रसंगाच्या (अध्यायाच्या) प्रारंभी तर ते 'श्री गणेशाय नम :' म्हणता म्हणताच पुढे 'निर्विकाराय नमः' असंही म्हणतात. पंधराव्या प्रसंगातही ते 'श्रीनिर्विकाराय नमः'नंच प्रारंभ करतात. आठव्या प्रसंगात ते 'अगम्य अगोचर'परमेश्वराला तर सातव्या प्रसंगात ते 'सर्वोत्तम' परमेश्वराला वंदन करतात.

## ईश्वर-अल्ला एकच

नावं वेगळी असली तरी ईश्वर एकच आहे, ही साम्यवादी भूमिका शेख महंमद या शब्दांत मांडतात-

''आता 'अल्ला' म्हणेणा वो तुम्ही वाचे ।
'हरी' म्हणतां तुमचे काय वेंचे ?
हरी, अल्ला म्हणतील ते काचे ।
अघोरी जाणावे ?।।

ऐका हरी अल्ला जर दोन असते ।
तरी ते भांडोभांडोच मरते ।
बोळखा काही ठाव उरों न देते ।
येरून येराचा पै.।।''

(-योगसंग्राम, संपा. वि. द. देसाई, श्रीगोंदेकर, ११ x ९४-९५)

या दृष्टीनं त्यांचे अनेक अभंगही लक्षणीय आहेत. त्यांतील वानगीदाखल एक अभंग देतो, तो दक्खिनी हिन्दीत आहे-

" हमारी जिकीर पडें, तुम्हारी जिकिर 'कथा'।
दोन्हो का माना एक लालाहि समजेना ।।
तुम जावे कासी, हम जावे मक्का ।
खिलाफ नही बैठ, कुफुर काहेके ?
हम कहे 'अल्ला', तुम कहो 'देवा'।
समजेबिन झुटा पराया दावा ।।
तुम्हे कहे 'राम', हम कहे 'रहिमान'।
दोन्हो बिचारो एक खुनमान ।।
एकयी मनसुं एक समजेना ।
शेख महंमद कहे दानाबिना ।।"

(-'शेख महंमदबाबा यांचा कवितासंग्रह,'

सं. वा. सी. बेंद्रे, क्र. २९८ पृ. १६६)

**'पीर' आणि 'सद्गुरू'**

शब्द वेगळे असले तरी 'पीर' म्हणजे सद्गुरू व 'सद्गुरू' म्हणजेच पीर, असा विचारही शेख महंमद मांडतात. दोघांमधलं गुरुत्व एकच आहे, दोघंही समाजाला सन्मार्ग व पारमार्थिक उन्नतीची वाटच दाखवितात, असं त्यांना वाटतं -

'सच्चा 'पीर' कहे मुसलमान ।
म-हाठे म्हणविती 'सद्गुरू' पूर्ण ।
दोन्हींत नाही भिन्नत्वेपण ।
आखो खोल देख भाई ।।' (-योगसंग्राम, १७ x ३)

वेगवेगळ्या संज्ञा / भाषा योजिल्यानं मूळ तत्त्व वा संकल्पना बदलत नाहीत, हा विचार त्यांनी फार्सी, मराठी, कन्नड या भाषांच्या उदाहरणानं स्पष्ट केला आहे -

'फारसीत 'आब बियाद'।
'पाणी मागे' म-हाठा नेणें भेद ।
तेथे प्रवर्तल अनुवाद ।
देखा समजेविण ।
तान्हेला कानडु म्हणे 'निर्कुड' (नीर कुड) ।
मुसलमान म्हणे 'केव करता गडबड' ?
दुभाशानें दोहींस करून मूद ।
नीर पाजिलें परियेसा !"

(-योगसंग्राम, १७ x ६-७),

## दार्शनिक साम्य

या दृष्टीनं भारतीय दर्शन आणि इस्लामदर्शन यांतील परिभाषा / संज्ञांमधील साम्य दर्शविणारं 'दुचेश्मा' ( = दोन डोळे) हे शेख महंमदांचं संपूर्ण प्रकरणच अभ्यासण्याजोगं असून, ते. वा. सी. बेंद्रे यांनी संपादिलेल्या त्यांच्या 'कवितासंग्रहा'त समाविष्ट केलं आहे, त्याचा आजवर कधीच तपशीलवार विचार झाला नाही; तो या ग्रंथात यापूर्वी तपशीलानं केलाच आहे.

याच शेख महंमदांनी 'योगसंग्राम', 'पवनविजय' आणि 'निष्कलंकप्रबोध' हे महत्त्वपूर्ण भारतीय दर्शन - विवेचनात्मक ग्रंथ लिहिले आहेत व भारतीय 'पंचीकरणा'शी साम्य दाखविणारी 'मुसलमानी पंजीज' सारखी प्रकरणं लिहिली आहेत. याचाही यापूर्वी निर्देश केलाच आहे.

(-'कवितासंग्रह', संपा. बेंद्रे, पृ. १३३).

हे लक्षात घेतलं की इस्लामधर्माच्या मूलतत्त्वांप्रमाणंच भारतीय दर्शनांचा त्यांचा व्यासंग कसा होता व या दोहोत त्यांना कसं साम्य जाणवलं, याची प्रचीती येते.

हे सारं शेख महंमद कशासाठी करतात ? विविध धर्मीयांतील भेदाभेद मिटवून त्यांच्यामध्ये परस्पर - सामंजस्य प्रस्थापित करण्याची त्यांची एकात्मतेची तळमळ निश्चितपणे यामागं दडली आहे. संत एकनाथांच्या 'हिंदु-तुर्क-संवादा'च्या लेखनामागील प्रेरणादेखील हीच आहे. पंधराव्या-सोळाव्या शतकांतील संतकवींचे हे प्रयत्न निकोप व समंजस जनमानस घडविण्याच्या दृष्टीनं किती विधायक व मोलाचे होते, याची यावरून कल्पना येईल.

---

## संदर्भ - टीपा


१. एकात्मतेचे शिल्पकार, डॉ. रा. चिं. ढेरे, मंजुल प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. ७७.

२. शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर यांचा कवितासंग्रह, भाग २, सं. वा. सी. बेंद्रे, प्र. पी. पी. एच् बुकस्टॉल, मुंबई, १९६१, पृ. १२३ - २४.

३. एकात्मतेचे शिल्पकार, पृ ७९ - ८०.

४. कित्ता, पृ. ८०

५. कित्ता, पृ. ८१

६. 'अजमत' म्हणजे श्रेष्ठत्व, मोठेपण, माहात्म्य.

७. शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर यांचा कवितासंग्रह, भाग २, सं. वा. सी. बेंद्रे, प्र. पी. पी. एच्. बुकस्टॉल, मुंबई, १९६१, पृ. १२४.

८. संतकवी शेख महंमद, डॉ. भीमा मोदळे, अप्रकाशित प्रबंध, पुणे विद्यापीठ, १९९८, पृ. २१.

९. एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ८७

१०. संतकवी शेखमहंमद : एक चिकित्सक अभ्यास, डॉ. भीमा मोदळे, १९९८ अप्रकाशित प्रबंध, पुणे विद्यापीठ, पृ. २९४.

११. एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ९२.

१२. महाराष्ट्र - सारस्वत, भावे - तुळपुळे, पाचवी आवृत्ती, १९६३, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ८३१.

१३. शेख महंमदमहाराजलिखित 'योगसंग्राम', सं. व प्र. विरचंद दलिचंद देसाई, श्रीगोंदा, १९७३, प्रस्तावना, पृ. ५.

१४. शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर यांचा 'कवितासंग्रह' भाग २, सं. वा. सी. बेंद्रे, प्रस्ता. पृ. २५, २६, २७.

१५. सार्थ 'पवनविजय' सं. श्री. ग. बापट, प्र. एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद २००४, 'शिवस्वरोदय' आणि पवनविजय : एक अनुबंध.

१६. एकात्मतेचे शिल्पकार, डॉ. रा. चिं. ढेरे, १९९४, मंजुल प्रकाशन, पुणे, पृ. ९४.

१७. मराठी वाङ्मयाचा, इतिहास, खंड २, भाग १, सं डॉ. स गं. मालशे, म. सा. परिषद प्रकाशन, पुणे पृ. ६१९ - २०.

१८. मुसलमानांची जुनी मराठी कविता, प्रा. अ. का. प्रियोळकर, मुं. म. ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पृ ९-१०.

१९. 'संतकवी शेख महंमद : एक चिकित्सक अभ्यास', डॉ. भीमा मोदळे, १९९८, अप्रकाशित प्रबंध, पुणे विद्यापीठ, पृ. ३४ -३५.

२०. शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर यांचा कवितासंग्रह, सं. वा. सी. बेंद्रे, पृ. ४२.

# ८. दोन गुरुबंधू

## (१) बाजीद पठाण

महिपतींच्या 'भक्तलीलामृता'च्या ४१ व्या अध्यायात बाजीद पठाण या संतकवींचा उल्लेख आढळतो. डॉ. अ. ना. देशपांडे, डॉ. सं. ग. मालशे आदि मराठी वाङ्‌मयेतिहासकारांनी ही या संतकवींच्या कार्यांची नोंद घेतली आहे. 'संतनामावळयांत'ही त्यांचा आवर्जून उल्लेख येतो. यावरून त्यांची लोकप्रियता व संतमान्यता आपल्या ध्यानी येते. त्यांच्या काळाच्या संदर्भात शक १६०४ (इ. स. १६८२) एवढीच माहिती मिळते, त्यावरून ते सतराव्या शतकातील असावेत, असं अनुमान करता येतं.

ते केशवस्वामी भागानगरकर यांचे शिष्य होते. यावरूनही या कालनिश्चितीस आधार लाभतो. ते आपल्या लेखनात स्वतःचं नाव न योजिता आपल्या गुरूचं नाव नोंदवीत, अशी त्यांची आगळीवेगळी गुरुनिष्ठा ! त्याविषयी महिपती म्हणतात, 'पदपदांतरें रचिली फार । पदी स्वामींचा अभंग घातला वर । जनांत प्रशंसा वाढली फार । साक्षात्कार जाहला'।।

ते विजापूरच्या आदिलशाहीत एका सुभ्याचे अधिकारी होते. मराठीत काही पदं आणि दक्खिनीत पाचशे 'साक्या' असं त्यांचं लेखन आहे. त्याच्या पुढील दक्खिनी साकीत नामस्मरणाचा व विरक्तीचा उपदेश केला आहे-

"भज मन तो राम कें बैठता कामो ।<br>
दिनो चारका रंग मिलेगा खाकमो ।<br>
गले तुलसीकी माल, सुमरन शामको ।<br>
एकहि बेर भोजन आपके हातको ।।"

'नाममुद्रा' न उमटविण्याची एक वेगळीच प्रथा या संतकवीनं निर्माण केल्यानं त्यांच्या साहित्याचं संशोधन करताना अडचणी निर्माण होणं स्वाभाविक आहे.

## (२) शहाबेग ऊर्फ शांबेग

बाजीद पठाणांचे गुरुबंधू शहाबेग हे होते. त्यांचे गुरु केशवस्वामी हे होते. त्यावरून शहाबेगांचा काळ सतरावं शतक हाच असावा असं अनुमान करता येतं. ते पदकार होते. त्यांच्या पदांचं बाड हेदराबादचे श्री. श्री. वा. नाईक यांच्या संग्रहात आहे. बाजीद पठाण यांच्याप्रमाणंच यांचीही गुरुनिष्ठा लक्षणीय आहे. गुरू हे 'भव-अंतक' असतात, ते परमेश्वररूपच असतात, त्यांच्या सत्संगात आपण राहावं आणि त्यांची कृपा प्राप्त करावी, यामुळं आपला उद्धार होतो व आपल जीवन सार्थकी लागतं , अशा आशयाचा हितोपदेश शहाबेगांनी आपल्या लेखनातून केला आहे. त्यांच्या पदांत त्यांची नाममुद्रा तर असतेच पण आपले गरू केशवस्वामी यांचाही आदरपूर्वक उल्लेख केलेला असतो. वानगीदाखल त्यांचं एक लोकप्रिय पद देतो -

'काळापासून सोडवी पाहे।
तोचि सखा, बंधु, बाप, माय ।
ब्रह्मादिका दुर्लभ ज्याचे पाय ।
पायी राहिल्या भय काय जी ?
केशवस्वामी केवळ सौख्यराशी ।
मनोभावे शरण रिघा त्यासी ।
पदोपदी सहज जोडे काशी ।
म्हणे शाबेग समाधी अनायासी ।।'

बाजीद पठाणांप्रमाणंच शहाबेग यांचीही रचना संशोधक - अभ्यासकांची वाट पाहात आहे.

# ९. आलमखान

आलमखान हे नागेशसंप्रदायाचे एक प्रमुख संतकवी. 'अल्लंखान', 'अलमखान' या दोन्ही नावांनी ते परिचित आहेत. अल्लंखान या नावाची वीरशैव संत अल्लंप्रभु या नावाशीही गल्लत होते. जिथं आलमखानांची 'कबर' आहे त्या करळी गावी व जिथं 'प्रतीकात्मक 'मजार' किंवा कबर' (डॉ. आवळीकर' व डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या शब्दांत अनुक्रमे 'समाधी' व 'प्रसादसमाधी') आहे, त्या मुगळी या गावी अजूनही अनेकदा अल्लंखानांचा 'अल्लंप्रभू' असा चुकीचा उल्लेख केला जातो. अल्लंप्रभू हे प्रख्यात कन्नड संतकवी होते. मुगळी या गावाचा 'जॉर्ज मुगळी' हा उल्लेख कसा चुकीचा आहे, ते डॉ. आवळीकर यांनी 'कवि अलमखान : थोडी चरित्रपर माहिती' या आपल्या लेखात स्पष्ट केलंच आहे ' व डॉ. ढेरे यांनी तेच मत स्वीकारलं आहे.' तथापि मी प्रत्यक्ष मुगळीनिवासी श्री. विश्वास मुगळीकर (अभियंता) यांना भेटलो, त्या वेळी त्यांनी या गावाचं नाव 'जाजन मुगळी' असल्याचं सांगितलं, त्याचबरोबर आलमखानाच्या प्रतीकात्मक कबरीचं जे छायाचित्र त्यांनी मला दिलं, त्यामागं हा मजकूर आहे - 'नागनाथ यांचे शिष्य अल्लंप्रभू उर्फ आलमखान यांची मौ. जाजनमुगळी येथील मजार. मूळ समाधी मौ. कराळी, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद येथे आहे. निरंजनमहाराज व अल्लंप्रभू हे एकदम जवळचे मित्र होते व त्यांची दोघांची समाधी जवळजवळ आहे. मौ. जाजनमुगळी, ता. बसवकल्याण, जि. बीदर'.

निरंजनमहाराजांच्या समाधीच्या छायाचित्राच्या मागंही श्री. विश्वास मुगळीकर यांनी या गावाचा जाजनमुगळी असाच उल्लेख केला आहे. निरंजनमहाराज कुलकर्णी मुगळीकर हे 'नागेशलीलामृता'च्या ३४ व्या अध्यायात निर्देशिलेले भागोजी कुलकर्णी (वडवाळसिद्ध नागनाथ यांचे शिष्य) यांचे बंधू होते.

## आलमखानांचं चरित्र

भानजी त्रिंबक यांच्या 'नागेशलीलामृता'तील ३९ वा अध्याय 'आलमखान अख्यान' हाच आलमखानांच्या चरित्राचा एकमेव आधार असून त्याचा सर्वप्रथम उपयोग डॉ. आवळीकर यांनी केला. नंतर डॉ. ढेरे यांनी केला. त्याचा आशय थोडक्यात असा -

विंध्याद्रिपलीकडील महापूर हे आलमखानांचं गाव. चार भावांत ते सर्वांत धाकटे. विरक्त प्रवृत्तीचे. चुकून त्यांचा बाण भावजयीच्या घड्याला लागला व तो फुटल्यानं आलमखान फार लज्जित झाले व ते महापूर सोडून दक्षिणेकडे येऊन रानावनात राहू लागले. राम नावाच्या राजावर (किंवा राजाच्या अधिका-यावर) शत्रूनं हल्ला केला. त्यातून त्याला आलमखानांनी बाचविलं, त्यामुळं तो त्यांचा शिष्य झाला व त्यानं सन्मानानं आलमखानांना कल्याणीला आपल्या प्रासादात नेलं. तिथं संन्याशाच्या रूपानं वडवाळसिद्ध नागनाथांनी त्यांना दर्शन दिलं व 'तुवां ईश्वरपरायण। केलेंसि काव्य पावन । तरीं तू पावसी समाधान । हेंचि खुण सांगो आलो ।।' [३]

असं सांगून त्यांना काव्यलेखनाची प्रेरणा दिली. 'रामनृपती'नं दिलेल्या सरंजामासह आलमखान वडवळला गेले व तिथंच नागेशदर्शनार्थ ठाण मांडून बसले. सरंजामादी परत केला. तेव्हा

'नागेश वैद्यराजें । मग दूर करुनि मायारोग ।
दिव्योषधी कृपा सुरंग । देवोनि निरोग पैं केला
संन्यासी : कृपेकरून । समाधानी केला अलंखाना ।
अक्षय बाणले तें समाधान । न्यून पूर्ण न होय ।।'[४]

त्यानंतर ते मुगळीला येऊन राहिले. तिथं त्यांचे 'समधर्मा' म्हणजे नागेशानुयायी भागूजी कुलकर्णी होते.

नागेशांच्या आदेशानुसार याच काळात आलमखान भक्तिकविता लिहू लागले व भक्तिमार्गाचा प्रसार करू लागले. त्यांच्या संतत्वाची ख्याती पसरू लागली. कल्याणी हे गाव मुगळीजवळच पंधरा - सोळा मैलांवर आहे. तेथील 'दस्तगीराचे फकीर' त्यांना त्रास देऊ लागल्यावर तापलेली बेडी पायात घालून आलमखानांनी जो चमत्कार दाखविला, त्यामुळं त्यांचं महत्त्व त्या फकिरांनाही कळलं, अशी आख्यायिका 'नागेशलीलामृता'च्या 'अलमखान अख्याना'त आहे. मुगळीला आपली जीवनयात्रा पूर्ण करावी, यासाठी त्यांनी अपेक्षिलेली जमीन न मिळाल्यानं ते करळी (आजचं कारळं गाव) गेले व तिथं त्यांचं निर्याण झालं. त्यांची 'मजार' नागेशसंप्रदायाचे अनुयायी अगजीमहाराज यांच्याशेजारीच आहे.

डॉ. आवळीकर व डॉ. ढेरे यांनी याविषयी माहिती दिलेली नाही. मुजुमदार - प्रियोळकरांनी आलमखानाचा जो उल्लेख केला आहे, त्यात त्यांचे गुरू नागेश हे होते व नागेशांनी आलमखानांना उपदेश दिल्याचा उल्लेख केला आहे पण हा उपदेश परोक्ष की अपरोक्ष, हा वादविषय असल्यानं डॉ. आवळीकर [५] यानीं हा प्रश्न वेगळ्याच प्रकारे सोडविला आहे. ते म्हणतात, वडवाळसिद्ध नागेश व अलमखान यांच्या काळात अंतर आहे पण त्यावरून गुरुशिष्यसंबंध नाकारावयाचे कारण नाही कारण ब-याच उत्तरकालीन असलेल्यांना कलादृष्ट्या आधींच्या व्यक्तींनी गुरुपदेश केल्याची उदाहरणे थोडीथोडकी नाहीत' खरं तर आलमखान हे नागेशशिष्य होते कीं नव्हते, हा वादविषय असण्याचं कारण नाही पण आलमखानांचा काळ कोणता, हा खरा प्रश्न आहे. त्याला इथं स्पर्श होत नाही. आलमखान हे उत्तरकालीन होते, एवढं फार तर डॉ. आवळीकरांच्या या विवेचनावरून म्हणता येईल व ते विधान तर गृहीतच धरायला हवं. आलमखान किती उत्तरकालीन होते, याचा शोध घेणं महत्त्वाचं आहे. मी पुढं जाऊन मुगळीच्या संदर्भात केलेल्या विवेचनावरून तेथील निरंजनमहाराज व आलमप्रभू यांची अनुक्रमे समाधी व प्रसादसमाधी (मजार) जवळजवळ आहे, अशी माहिती मिळते, त्यामुळं ते समकालीन असावेत, एवढाच तर्क करता येतो. शिवाय आलमखानाची मूळ कबर (मजार) करळी इथं असल्यानं 'प्रसादसमाधी' ही नंतरची/उत्तरकालीन आहे, हेही लक्षात घ्यावं लागतं. या निरंजनमहाराजांचा निर्देश मराठी वाङ्मयेतिहासात उपलब्ध होत नाही,

(एच) १६७-१०

त्यामुळं आलमखानांचा जन्मसन व निर्याणसन धूसर होऊ लागतो. 'नागेशलीलामृता'चे ४० अध्याय आहेत व त्यांतील एकूणचाळिसावा अध्याय म्हणजे 'अलमखान अख्यान' आहे. यावरून आलमखानांचा काळ मुंतोजींच्या काळाइतका-म्हणजे बहमनी राजवटीच्या -ऱ्हासकालाइतका-मागं नेता येणार नाही. त्याचबरोबर आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती ही की, भागूजी कुलकर्णी हे नागेशभक्तही आलमखानांचे स्नेही होते. त्यांच्याविषयीही 'नागेशलीलामृता'त एक अध्याय आहे पण त्याचा क्रमांक चौतिसावा आहे. दोन समकालीनांचा विचार करताना अध्यायांमध्ये एवढं अंतर पडण्याचं कारण काय ? यावरूनही आलामखान वाङ्‌मयेतिहासकारांना ('महाराष्ट्र-सारस्वत' कारांना) वाटतात तितके उत्तरकालीन मात्र नसावेत.

ज्या अर्थी 'दासविश्रामधामा'त त्यांचा निर्देश आहे, त्या अर्थी सतरावं शतक आणि आलमखान यांचा अनुबंध जुळू शकतो. दस्तगीरांच्या फकीरांचा आलमखानांच्या चरित्रातील निर्देश लक्षात घेता हा काळ फार फार तर सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या अखेरपर्यंत नेता येऊ शकेल.

## आलमखानांची कविता

आलमखानांची पदं हस्तलिखित स्वरूपात गुलबर्गा जिल्ह्यातील श्रीगोविंदराजबाबा महाराज संस्थानात, लातूरजवळील किल्लारीच्या परिसरात, सोलापूर जिल्ह्यातील वडवळ - मोहोळच्या आसमंतातील नागेशसाम्प्रदायिकांच्या बाडांत तसंच धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिराच्या बाडांक* ३७६ व ११५२ मध्ये उपलब्ध होतात. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या हस्तलिखित-संग्रहातही काही पदं आहेत.[१] नागेशसाम्प्रदायी व माझे जुने स्नेही श्री. नागनाथ गुंडूबुवा कुरडे यांनी 'श्रीनागनाथांचे अभंग' या संग्रहात आलमखानांची दोन पदं प्रसिद्ध केली आहेत. अज्ञानसिद्धांचे वंशज नागेशसाम्प्रदायी कै. शंकरराव मोहोळकरशास्त्री हेही माझे स्नेही होते. त्यांचे सुपुत्र श्री. वि. शं. मोहोळकर यांनी 'नागेशदर्पणा'त (उपलब्ध असलेली) आलमखानांची पदं प्रकाशित करून एक महत्वाचं कार्य केलं आहे. असं असूनही संतकवी म्हणून आलमखानांना जी प्रतिष्ठा वा मान्यता मिळायला हवी होती, ती आजवर फारशी मिळालीच नाही. या ग्रंथाच्या निमित्तानं या संतकवीच्या कवितेचं विवेचन करण्याचं भाग्य लाभलं, याचा मला मनस्वी आनंद वाटतो.

आलमखानांच्या कवितेचा विचार करणं हा माझे स्नेही कै. डॉ. पंडित आवळीकर[१] यांच्या 'कवि अलमखान : थोडी चरित्रपर माहिती' या लेखाच्या लेखनाचा हेतूच नसल्यानं आलमखानांच्या कवितेविषयीची उपेक्षा करणं योग्य ठरणार नाही तथापि माझे दुसरे स्नेही व ज्येष्ठ संशोधक डॉ. रा. चि. ढेरे[६] यांच्याकडून तशी अपेक्षा करणं अनुचित ठरणार नाही. त्यांनीही हुसेन अंबरखांनांनंतर तिस-या प्रकरणात आलमखानाविषयीच्या आख्यायिकात्मक चरित्रावरच अधिक लक्ष केंद्रित केलं असून आलमखानांच्या कवितेच्या वाट्याला उणीपुरी चार पृष्ठे आली आहेत. त्यांच्या हाती आलमखानांची केवळ पंधराच पदं लागली असल्याचांची त्यांना हे शक्य झालं नसावं पण त्या पदांचंही त्यांनी सूक्ष्म वा सविस्तर विवेचन केल्याचं दुर्दैवानं जाणवलं नाही. 'स्वानंदाच्या लोटात

बुडालेला हा आलमखान नागनाथांच्या संपर्कामुळे आपले यवनपण हरवून मराठी महात्मतेच्या महासागरात एक बिंदुले होऊन राहिला आहे. त्याची स्मृती आम्हाला वंद्य आहे'[९], असं म्हणून त्यांनी आदरभाव व्यक्त केला आहे. त्यामुळं आलमखानांची कविताही बिंदुल्यासारखीच असावी, असं वाटणं स्वाभाविक आहे. तशी ती नसून विविधांगी व अनेकपदरी कशी आहे, ते पुढील विवेचनावरून लक्षात येईल.

नागेशसाम्प्रदायिक व संतकवी अज्ञानसिद्धयांचे वंशज श्री. वि. शं. मोहोळकर यांनी 'नागेशदर्पण' या ग्रंथात आलमखानांची ३२ पदं प्रसिद्ध केली आहेत.[१०] त्यांचा साभार उल्लेख करीत आहे. किल्लारी (जि. लातूर) येथून मला माझे विद्यार्थी व तेथील प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. नोगजा यांनी आलमखानांची पदं ब-याच वर्षापूर्वी मिळवून दिली होती पण ती आज मजकडे उपलब्ध नाहीत. भूकंपामुळं किल्लारीची प्रचंड वाताहत झाल्यानं नंतर तिथं आलमखानांच्या कवितेचा धांडोळा घेऊनही काही उपयोग झाला नाही. त्यामुळं 'नागेशदर्पणा'तील साहित्याच्या आधारेच आलमखानांच्या कवितेविषयी विवेचन करणं भाग आहे. मराठवाड्यातील उमरग्याजवळील करळी-मुगळीच्या परिसरात तसंच सोलापूरजवळील वडवळ-मोहोळच्या परिसरात मौखिक परंपरेनंही जतन करून ठेवलेलं आलमखानांचं बरंच साहित्य (म्हणजे यापेक्षाही अधिक कविता) निश्चितपणे उपलब्ध होऊ शकेल, असा मला विश्वास वाटतो कारण या सा-याच भागात आलमखान हे 'संतकवी' म्हणून ख्यातनाम होते.

आलमखानांनी स्वतंत्र ग्रंथरचना केल्याचा निर्देश मात्र कुठंच आढळत नाही. केवळ 'पदकार' म्हणूनच आलमखानांचा विचार करणं आवश्यक आहे तथापि त्यांच्या पदसंग्रहाचं मोठं स्वतंत्र बाडही उपलब्ध होत नाही. त्यांच्या पदांना श्री. मोहोळकर यांनी 'अभंग' म्हटलं असलं तरी ख-या अर्थानं आलमखानांची कविता पदांच्या रूपातच अवतरते.

## न हरवलेलं 'यवनपण'

नागेशसंप्रदायात एक प्रवाह सूफींचाही असावा. या संप्रदायाचे मुसलमान अनुयायी नागेश हेच नसीरुद्दीन चिराग देहलवी होते असं मानतात, हे डॉ. रा. चि. ढेरे[११] यांनीही मान्य केलं आहे.

या संप्रदायाचे एक वीरशैव अध्वर्यू श्री. खर्गेमहाराज यांनी प्रसिद्ध केलेल्या नागनाथांच्या पदसंग्रहात कुराणातील, तसेच सूफी तत्त्वविवरण करणारी दक्खिनी व उर्दू पदं असल्याचं मी पहिलं होतं.

आलमखान उत्तरेकडून दक्षिणेत आले, हे डॉ. आवळीकर व डॉ. रा. चि. ढेरे भानजी त्र्यंबक यांच्या 'नागेशलीलामृता' च्या ३९ व्या अध्यायाच्या आलमखान - आख्यानाच्या आधारे मानतात. तथापि त्यांच्यावर काही सूफी मताचा वा परंपरेचा प्रभाव असावा, असा उल्लेख आजवर कुणीही का करू नये, याचा उलगडा होत नाही.

'नागेशदर्पणा' तील[१२] क्र ८ चं आलमखानांचं पदच यावर प्रकाश टाकतं -

'कीर्तन केले हो मुगळी गावी । श्रोते मिळाले विरक्त निस्पृही ।।१।।
आलमखानबाबाचे संप्रदायी । ज्या बाबासी नागोबा उपदेशिले ।।२।।
खानजी कष्टता तो शुद्ध -हदयी । नसरूद्दीन नागोबा भाले गोसावी ।।३।।
लय लक्षयोगी झाला अनुभवी । मडळी त्याची तैसीच ।।४।।'

यात आलमखानांनी नसीरुद्दीन व नागोबा ही दोन्ही नावं सलग वापरली आहेत. आलमखान 'बाबाचे सांप्रदायी' आलमखान आणि सूफीसंप्रदाय त्याचप्रमाणं 'तसव्वुफ' (म्हणजे सूफी तत्त्वज्ञान) यांचा किती घनिष्ट संबंध होता, हे त्यांच्या या पदावरून[१३] स्पष्ट होईल. हे विवेचन मराठी भाषेत प्रथम होत आहे-

'मेरा राग - बिन मोरी रायल । उड गया भूस जालम । रह गये चावला ।।१।।
न था थान, न था मकान । आपहि जल्लोजलाल ।।२।।
पाच - पचिस गैब सलाये । इसका वजुद बाजिबुल ।।३।।
पचीस कला मुमकिनल वजुद । खुदी कतरा आकल ।। वहां मदिल ।।४ ।।
हाल बेहोसी । जुलमाती देखो इसकी किसमत । मुमतनुल ।।५।।
आरिफल वजुद जात सुभागी । नुर पर नुर का भरजाला ।।६।।
आलमखान फकीर प्रभु अविनासी । वकामे हो गये वासिल ।।७।।

या पदातील 'जल्लो जलाल' 'नूर', 'फकीर', 'वासिल', 'बेहोसी', 'खुदी' या शब्दांकडे मी वाचकांचं लक्ष वेधतो. इस्लामदर्शनात तसंच सूफी मतात त्यांचं विशेष महत्त्व आहे. 'जल्लो जलाल' हा शब्द ईश्वरासाठी वापरला जातो. 'नूर' म्हणजे (आत्म्याचा) प्रकाश. 'खुदी' म्हणजे स्व-रूपाचं यथार्थ ज्ञान, आत्मबोध, अरबी 'वस्ल्' म्हणजे मीलन. (देव व भक्त यांचं मीलन) 'वासिल' हा शब्द त्यापासून सिद्ध झाला. 'फकीर' हा शब्द तुम्हा - आम्हाला परिचित असला तरी 'दस्तगीराचे फकीर'[१४] कसे वेगळे असतात याविषयी डॉ. आवळीकर व डॉ. ढेरे यांनी 'डिक्शनरी ऑफ इस्लाम'च्या आधारे केलेलं विवेचनही लक्षात घ्यावं.

सूफी तत्त्वज्ञानात - 'तसव्वुफ'मध्ये - 'वजूद' (म्हणजे अस्तित्व) याचं विशेष महत्त्व असून हे 'वजूद' चतुर्विध आहेत. मुंतोजींच्या 'अविध पंचीकरणाचा' म्हणजे परिभाषाकोशाचा विचार करताना खुद डॉ. ढेरे यांनीच त्यांचा उल्लेख केला आहे[१५] ते असे आहेत:

(१) वाजबुल वजूद (२) ममकिनल वजूद

(३) ममतनल वजूद (४) आरिफल वजूद

त्यांचा निर्देश आलमखानांनी या पदातील क्रमानं कडवं ३, ४, ५ व ६ मध्ये सूफी पंथीय तत्त्वज्ञानाच्या क्रमानुसारच केला आहे. असा उल्लेख करणारे आलमखान हे मुंतोजी नंतरचे दुसरे मुसलमान संतकवी होत.

## नाथसंप्रदायाचा प्रभाव

आलमखान हे स्वतःच योगी असल्यानं त्यांच्यावर योगशास्त्राचा तसंच हे शास्त्र ज्यांनी समाधीचं उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी स्वीकारलं, त्या नाथसंप्रदायाचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव आढळतो. योग-विवरण करणा-या त्यांच्या पदांची संख्या लक्षणीय आहे, याचा प्रत्यय 'नागेशदर्पणा'तील आलमखानांचा पदसंग्रह वाचताना येतो. त्यातलं पहिलंच पद वानगीदाखल देतो-[१६]

'आगम्य पंथ गुरूचा पाहता आकळ रे ।
आगम्य पंथ गुरूचा पाहता नाकळ रे ।। ध्रु।।
इडापिंगलामध्ये सुषुम्ना घाट उलंघोनि त्रिकुटाचा ।। १ ।।
सिद्ध साधु गुप्तद्वार गेले तो मार्ग अनादि मीनाचा ।। २ ।।
अष्टदलकमल भेदुनि माथा चढोनि सहस्त्रदलाचा ।। ३ ।।
भ्रमरगुंफा घनदाट जेथे मेळा चोहो शुन्याचा ।। ४ ।।
पिंड-ब्रह्मांड निरसूनि दोनी भेद खंडला जीवाशिवाचा ।। ५ ।।
जेथे कांही नाही तेथे आपणचि व्हावं आत पुरला ज्ञप्तीचा ।। ६ ।।
आलंखान साक्षी स्वस्वरूपाचा प्रसाद नागेशाचा' ।। ७ ।।

या पदात आपल्या गुरूच्या 'आगम्य' पंथाचं विवरण केलं आहे. इडा, पिंगला, सुषुम्ना या नाड्यांचाही निर्देश केला आहे. अष्टकमलदल, सहस्त्रदल, भ्रमरगुंफा, पिंड-ब्रह्मांड, जिवाशिवाचा अभेद हे तर नाथसंप्रदायातील परवलीचे पारिभाषिक शब्द. त्या सर्वांचा मुक्त वावर या पदात आढळतो. क्र. २१ च्या पदात स्थूल-देह, लिंगदेह, कारणदेह, महाकारणदेह, तुर्यावस्था इ. संज्ञा मुंतोजींच्या सर्व रचनांची, त्याचबरोबर नाथसांप्रदायिक योगाधिष्ठित साधनेची तसंच पंचीकरण विचाराची आठवण करून देतात. क्र. १३ चं 'तारिसी आम्हा नागनाथा' हे पदही या दृष्टीनं चिन्त्य वाटतं.[१७]

'कासी आम्हासी गुरूमूर्ती' या क्र. ७ च्या पदातही 'मार्ग उफराटा मीनाचा' 'उदक सत्रावीचा' याबरोबरच 'आत्मलिंगा'चा जो उल्लेख आहे, तो वीरशैवांच्या षट्स्थलसिध्दांतासी जवळीक साधतो.[१८]

स्थूल मानानं आलमखानांच्या कवितेची (किंवा पदसंग्रहाची) वर्गवारी विषयानुषंगानं अशी करता येईल -

१) तत्त्वविवरणपर २) उपदेशपर ३) गुरुमाहात्म्यपर ४) आध्यात्मिक अवस्थांचं चित्रण करणारी ५) रूपकात्म ६) कूट आणि ७) 'पाखांडखंडन'पर किंवा समाजप्रबोधनपर.

### (१) तत्त्वविवरणपर पदं

याविषयी वर विस्तारानं विचार केलाच आहे. नागेशसंप्रदाय हा सर्वसमावेशक व समन्वयात्मक संप्रदाय असल्यानं त्याचं प्रतिबिंब आलमखानांच्या तत्त्वविवरणपर पदांत पडणं स्वाभाविक होतं.

यामुळं त्यांत सूफी, नाथ, वीरशैवादी मतांचं विवेचन केलं आहे. त्यावर सर्वाधिक प्रभाव नाथसंप्रदायाचा व त्यातील योगविचाराचा पडला आहे. एतद्विषयक पदांची संख्याही अधिक आहे.

(२) उपदेशपर पदं

यांत आलमखानांनी स्वमनाला केलेला परमार्थपर बोध आहे, तो जनमानसासाठीही आहे. स्वतः आलमखान वीतरागी असले तरी जनसामान्यांना मात्र प्रपंच करता करता परमार्थ साधावा, असा प्रपंच-परमार्थ-समन्वयक उपदेश केला आहे. स्वतः योगी असून आलमखानांनी जनलोकांना मात्र भक्तीचा सुगम मार्ग अवलंबिण्याचा उपदेश केला आहे. त्यातून त्यांचा लोकहिताचा कळवळा प्रकटतो -[१९]

'नरदेह जातो रे, जातो हातोहाती ।
काही एक करा रे, करा गुरुभक्ती ।। १ ।।
आयुष्य मोलाचे, मोलाचे रे मुढा ।
अंती होसील होसील रे, काळाचा वरपडा ।। २ ।।
पुत्र-कलत्र, कलत्र, नोहे रे आपुले ।
वाया भुलले, भुलले रे, मोक्षपदा चुकले ।। ३ ।।
ज्योती असता, असता रे, ठेवाठेवी करी ।
ज्योती मावळल्या मावळल्या रे, पडसिल अंधःकारी ।। ४ ।।
विचार विवेक, विवेक रे, वैराग्य धरारे ।
मन हळु हळु, हळु हळु रे, स्वरूपी लावावे ।। ५ ।।
सबाह्य अंतरी अंतरी रे, स्वसाक्षी आत्माराम जाण ।
नागेश परिपूर्ण परिपूर्ण रे, बोले आलमखान' ।। ६ ।।

'मन हा बहुरंगी । चालक तिही जगी' । या पदाचं विवरण डॉ. ढेरे यांनी व महाराष्ट्र-सारस्वत-पुरवणीकार यांनी केलंच आहे.[२०]

'जागा जागा रे गुरुबोधी । निरसुनि उपाधी' हे 'नागेशदर्पणा'तील क्र. १२ चं पदही या संदर्भात उल्लेखिण्याजोगं आहे.[२१] त्याचप्रमाणं क्र. ३२ चं (शेवटचं) पद[२२] 'स्वरूपी जागा हो निर्वाणी । सप्रेम अंतःकरणी' ।। हे पद आलमखान आत्मसंवादाकडून लोकसंवादाकडे कसे जातात, याचा मनोज्ञ प्रवास चित्रित करतं. त्यांच्या उपदेशपर पदांत नाममहिमाही वर्णिला आहे, त्यावरून ते सुलभ भक्तिमार्गाचे पुरस्कर्ते होते, हे स्पष्ट होतं.

(३) गुरू माहात्म्यपर पदं

आलमखानांच्या गुरुमाहात्म्यपर पदांची संख्याही विपुल आहे. भारतीय दर्शनात जसं गुरूचं महत्त्व वर्णिलं आहे तसं (नागेशसंप्रदायाप्रमाणं) सूफी संप्रदायातही वर्णिलं आहे.

गुरू हा परमार्थाची वाट दाखविणारा मार्गदर्शक असल्यानं आलमखान वेळोवेळी त्याचा महिमा वर्णितात.

'नागेशदर्पणा'तील केवळ गुरुमाहात्म्यपर पदांच्या क्रमांकांची नोंद इथं करतो –

१, २, ४, ७, ९, १५, १६, १९, २५, २७, २८, २९.

यांतील पहिले चरणदेखील त्या पदांच्या गाभ्याचं दर्शन घडवितात –

'आगम्य पंथ गुरूचा पाहता आकळ रे ।। ( पद १ )

- आज मोठा आनंद झाला ।
  मज भेटला गुरुराय ।। ( पद २)
- कासी आम्हासी गुरुमूर्ती ।। (पद क्र. ७)
- गुरुराज दया केली ।
  अंतरकळा दाखविली ।। ( पद ९)
- तुझे स्वरूप गरुराया ।
  पाहता निरसली माया ।। ( पद १५)
- देणे गुरुरायाचे ।
  पावन पतिताचे ।। ( पद क्र. १६)
- नमो नमो नमो गुरुवर्या ।
  आनंत विभू कृपानिधी । करी मज दया ।। ( पद १९)
- या गुरूसी काय बा द्यावे ?
  आम्ही कशाने उतरायी व्हावे ? ( पद क्र. २५)
- सद्गुरु दातारा, कृपेच्या सागरा । ( पद क्र. २८)

भारतीय परंपरेतील गुरू आणि सूफी परंपरेतील 'पीर' यांचं महत्त्व सारखंच आहे.

## (४) आध्यात्मिक अवस्थांविषयक पदं

वस्तुतः यांचं स्वरूप त्रिविध आहेः (अ) विरक्ती नि शरणागती (आ) ईशप्राप्ती होत नसल्याबद्दल मानसिक संघर्ष आणि (इ) साधनेची साक्षात्काररूपी फलश्रुती, यांतील पहिली व तिसरी अवस्थाच आलमखानांच्या पदांत दिसते. तिचं प्रत्येकी एकेक उदाहरण पुढं देतो, त्यावरून आलमखानांच्या आध्यात्मिक वाटचालीचं किंवा पारमार्थिक प्रवासाचं दर्शन घडेल –

पहिल्या अवस्थेत आलमखानांनी केलेला 'धावा' असा आहे –

'भक्ताची लाज राखी, देवा । हरी रे केशवा ।
अखंड करितो तुझा धावा । पाव रे माधवा ।। ध्रु ।।

आठवे अवतारी अवतारला । कंस वधीला ।
का गा बाणासुर मर्दिला । पुतना शोषिला ।। १।।
पांडव रक्षीले लाख जोहरी । मुनीजन तारी ।
द्रोपदी गांजीली सभेमाझारी । वस्त्रे पुरवी हरी ।। २ ।।
भक्ताचा कैवारी होसी । तू हृषीकेशी ।
विदारी हिरण्यकस्यपासी । राखी प्रल्हादासी ।। ३।।
भक्ताची बहु आवडी । अत्यंत गोडी ।
धर्मादारी उच्छिष्ट काढी । त्याची धूतसे घोडी ।। ४ ।।
ऐसे कोटयानुकोटी भक्तजन । तुज ध्याती जाण ।
ऐसे बोलतो आलमखान । गुरुकृपा पूर्ण' ।। ५।।

(पद क्र. २२)[२३]

यावरून आलमखान 'धावा' हा काव्यप्रकार कसा हाताळतात, याचीही कल्पना येते.

त्यांच्या साधनेची साक्षात्कारात झालेली फलश्रुती पुढं दिलेल्या पदांसारख्या रचनेत प्रकट झाली आहे-

'आज मोठा आनंद झाला माय ।
माझा मज भेटला गुरुराय ।। ध्रु ।।
कूर्मदृष्टी करिता अवलोकन ।
तेणे गेले मनाचे मनपण ।। १।।
दृष्टा-दृश्य-दर्शन एक झाले ।
मी-तूंपण सहज मावळले ।। २ ।।
खिन्न झाली त्रिपुटी जया ठायी ।
तेचि भरले दिसे अंतर्बाह्यी ।। ३।।
स्वानंदाचा भरपूर लोट झाला ।
तत्क्षणी आलमखान बुडाला' ।। ४ ।।

(पद क्र. २)[२४]

साक्षात्काराच्या अवस्थेचं आणखी वेगळं वर्णन त्यांच्या पंधराव्या पदात आलं आहे. विस्तार-भयास्तव त्यातील थोडाच भाग उद्धृत करतो[२५]

'चिन्मय चिद्रूप घनदाट । पाहता दिसे लखलखाट ।।
त्यातूनि करावी वाट । मीनमार्गासी नीट ।। ३ ।।
स्वयंज्योति प्रकाश । अलक्ष्य रूप अविनाश ।।
काय करू विलास । संतजन लोकास ।। ४।।
नागेशकृपे वरदान । आलमखान संतचरण ।।
सबाह्य ब्रह्म परिपूर्ण । मन हे झाले उन्मन' ।। ५ ।।

साधकाच्या जीवनातील दुस-या अवस्थेचं-मानसिक संघर्षांचं-(त्याला डॉ. रा. द. रानडे 'आत्म्याची काळोखी रात्र' म्हणतात) दर्शन मात्र आलमखानांच्या पदांत घडत नाही. वीतराग, शरणागती या अवस्थेनंतर ते साधनेच्या अन्तिम फलश्रुतीचं म्हणजे साक्षात्काराचंच प्रत्ययकारी चित्र आपल्या पदांत रेखाटतात.

## (५) कूट रचना

साधनेच्या अन्तिम बिंदूपर्यंत पोहोचलेले आलमखान कधीकधी कूट भाषेतही बोलू लागतात. संत एकनाथांच्या कूटात्म रचनेशी त्यांचीही रचना जवळीक साधू लागते की काय, असं वाटू लागतं, अशा कूट पदांची संख्या फार नाही, ती एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहे. आलमखान कधी कधी आपल्या या लोकगीतसदृश रचनेलाच 'उमान' किंवा 'हुमान' म्हणजे कोडं असं म्हणतात. वानगीदाखल त्यातलं एक 'हुमान' पाहू या-[२६]

'इच्छा मूळ ऑकार त्रिगुणाचे ढोली । तेथे व्याली पाच कोल्ही ।
एकेकाची पाच-पाच झाली । पाच पंचे पंचवीस पिल्ली ।। १ ।।

कोल्ह्याचे पोटी सिंह जन्मला । नवल गोष्ट केव्हढी रे ।
टिवटिवी डोईवर घेऊन उडे रे ।

एकवीस स्वर्गांच्या उतरंडी रे । तळी या पाळी हंस ।
बैसला गगन बांधिला दरडी रे ।। २ ।।

आकाश-पोकळी पांगुळ नाचे रे । आंधळ्याने देखिले साचे रे ।
बहि-या कानी मुका सांगे गोष्टी । हासत बोलिका नाचे रे ।। ३।।

वाघाचे वाड्यात असे एक गाय रे । मदन पोळाची माय रे ।
दाताविण तिने वाघासी गिळीले रे । आपुला वाडा आपण खाय रे ।। ४।।

मांझे उमान इतरा नेणे । साधु-सज्जन जाणे रे ।
नागेश वरदकृपेची बोली । आलमखान म्हणे रे' ।।५।।

चौदा क्रमांकाचं 'तुज वाणिये मन माझे संबोध । आहो, संबोध' हे पदही कूटात्म आहे. ते फार मोठं असल्यानं इथं देत नाही. जिज्ञासूंनी ते मूळातूनच पाहावं.[२७]

या कूटात्म पदांचं वैशिष्ट्य असं की, त्यांना लोकगीताचा बाज आहे आणि त्यात कुटात्मताही शिगोशिग भरली आहे. कूटात्म रचनेतील क्लिष्टता जाणवू नये, यासाठी आलमखानांच्या प्रतिभेनं घेतलेली ही दक्षता !

(६) रूपकात्म रचना

हेही आलमखानांच्या प्रतिभेचं एक वेगळं, मनोहर दालन नि वळण. तत्त्वविवेचन करताना अध्यात्मात रमणारे आलमखान मूळ परमार्थसूत्र न सोडता रूपकात्म रचनेतही रमतात. अशी पदं थोडी असली तरी ती लक्षवेधी आहेत. प्रपंचाच्या मायापाशात जीव कसा गुंतत गुंतत जातो, हे आलमखान या पदात घोसला (कोसला), मृगजळ नि मधाचं पोळं या विविध रूपकांद्वारे किती प्रभावीपणे मांडतात; त्यावरून त्यांच्या समृद्ध प्रतिमासृष्टीची सोनेरी जरतारी किनार आपलं मन वेधून घेते.[२८]

'घोसल्याने सायास मांडिला । घरा बांधिला । आंत गुंतूनि मेला ।
ते परी तुज गत होईल । जीव जायील । गुरू भज रे गव्हारा ।। १।।
मृगजळ देखूनि नयनी । धावे हरिणी ।
तेथे न मिळे पाणी । ते परी ।। २।।
साक्षेपे आक्षेपे रक्षिती । मध बांधिती ।
अंती कोणी एक भक्षिती ।। तेपरी. ।। ३ ।।
नागेशकृपेची बोली । मज पावली ।
आलमखाना कळली ।। ते परी ।। ४ ।।
धेनू वळा रे वासना' ।[२९]
(पद क्र. १८).

हे त्यांचं वासनेवरील रूपकही अत्यंत प्रत्ययकारी आहे.

धेनू, दावे, वळू, गोवारी किंवा घोसला, पोळं यासारख्या ग्रामीण प्रतिमांचा विचार करता आलम-खानांच्या भावविश्वातील कृषिजीवनाचा व ग्रामजीवनाचा 'देशी' स्पर्शही आल्हाददायक वाटतो.

(७) पाखांडखंडनपर व प्रबोधनात्मक पदरचना

आलमखान हे समाजविन्मुख नव्हते तर समाजसन्मुख होते, याच्या खुणा त्यांच्या उपदेशपर पदांत आढळतात. याच समाजसन्मुखतेमुळे त्यांनी समाजातील अपप्रवृत्तींवरही हल्ला चढविला आहे. जेव्हा परमार्थाच्या क्षेत्रातही दांभिक प्रवृत्ती आढळतात, त्या वेळी आलमखान त्यांच्यावर कसे तुटून पडतात, हे त्यांच्या सहाव्या क्रमांकाच्या पदात स्पष्टपणे दिसतं. ईश्वरास 'शरणागती'च्या अवस्थेतील व भक्तिपर पदांतील त्यांचं आर्त मन या वेळी किती कठोर होतं, त्याची प्रचीती पाखांडखंडनपर पदं वाचताना येते. त्यांतील ढोंगी साधूंचा 'ठकपणा' धनवंत पाहून उपदेश करण्याची प्रवृत्ती, त्यांच्या ठायी विरक्तीच्या ऐवजी आसक्तीची असलेली ओढ, मंत्रतंत्र यांचा बडिवार माजवून जनसामान्यांना नाडण्याची प्रवृत्ती यावर आलमखानांनी कसा प्रखर प्रकाश टाकला ते पाहा -[३०]

'एक दांभिक संन्यासी । हिंडतो देशोदेशी ।'
धनवंत पाहोनिया उपदेशी । करी बोध शिष्यासी ।। ध्रु ।।

मनी अर्थाची आवडी । विषयाची गोडी ।
मंत्र सांगोनिया अनाडी । नेणती बापुडी ।। १ ।।

सात्त्विक पाहूनि भुलवीसी । त्यासी नागविशी ।
ऐसे किती एक नाडीसी ? अंती पस्तावीसी ।। २ ।।

मार्ग नोहे रे नोहे रे संतांचा । हा तव ठकपणाचा ।
साठा करविला नरकाचा । तयासी मोक्ष केचा ? ।। ३।।

सिद्‌ध चैतन्य भागले । उर उरी उरले ।
आलंखानासी कळले । नागेश्वरे जागविले' ।। ४।।

त्यांची पाखंडखंडनपर पदं ही समाजप्रबोधनात्मकही आहेत. आलमखानांच्या अशा पदांचा आणखी शोध घ्यायला हवा. त्यांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या एका वेगळ्या पैलूवर प्रकाश पडेल. तुकोबांप्रमाणं आलमखान हेही 'कुसुमाहूनि मृदु' आणि 'वज्रादपि कठोर' कसे होते, याची प्रचीती येईल. ही प्रचीती शेख महंमद यांची कविता वाचताना येते. त्याविषयी संबंधित प्रकरणात विवेचन केलंच आहे.

## आंतरभारतीचं दर्शन

आलमखानांनी मराठी व दक्खिनी या भाषांत पदरचना केली. अशी रचना संत नामदेव, एकनाथ, तुकोबा, निळोबा, अज्ञानसिद्‌ध यांच्यासारख्या संतकवींनीही केली. तथापि आलमखान किंवा मुंतोजी त्याचप्रमाणं शेख महंमद यांच्या कवितेचं वैशिष्ट्य असं की, तिच्यातून त्यांच्या अरबी-फार्सी भाषांच्या ज्ञानाची ही कल्पना येते. अनेक भाषाकोविदत्वाच्या संदर्भात मी मुंतोजींसंबंधी केलेल्या विवेचनात विचार केलाच आहे. आलमखान उत्तरेकडून दक्षिणेकडे आले. त्यांनी त्या त्या प्रदेशातील लोकभाषादेखील आत्मसात केल्या असाव्यात, हे त्यांचं पुढील पद पाहिल्यावर लक्षात येतं. त्यात मराठी, दक्खिनी आणि कन्नड या भाषांचा त्रिवेणी संगम झाला आहे -[३१]

'सिधी वाट पकडो साधु । न लगे तेथे बाधु ।
या देवे निज गुरुबोधु । सर्वदा सेवी सुखवादु ।। १ ।।

समज चलना भायी । लक्ष्य लावुनी गुरुपायी ।
इदु यल्ला रिगे तोरिद न्यासी । समज सो कोयी कोयी ।। २ ।।

दिल सु ज्योत लागे । ज्ञानदीपा हेच्च मनदोळगे ।
अहर्निशी जागे । चित्त स्वस्वरूपी लागे ।। ३ ।।

कंगन वळगे कंगन तोडी । अंतरी ज्ञानदृष्टी उघडी ।
खोल दसवी किवाडी । तव कुदरत दिसे थोडी थोडी ।। ४ ।।

अंदर बैठके देखेतो जुदा । तो व्दंव्दं नानि व्दंव्दा ।
आलमखाना गे बहळ आनंदा । तो रावा बडवाळसिद्धा' ।। ५ ।।

या पदातील पहिल्या कडव्यातील पहिला चरण दक्खिनी व दुसरा-तिसरा-चौथा मराठी आहे. पुन्हा दुस-या कडव्यातील पहिला चरण दक्खिनी, दुसरा मराठी, तिसरा कन्नड तर चौथा पुन्हा दक्खिनी आहे. याचा अर्थच असा की, या लोकभाषा बोलणारे विविध भाषक आलमखानांसमोर आहेत आणि त्या सर्वांशी अनेकभाषाकोविद संतकवी आलमखान यांना संवाद करायचा आहे. यातून त्यांचं या विविध भाषांवरील प्रभुत्वही आपल्या ध्यानी आल्याशिवाय राहात नाही.

**समारोप**

संतकवी आलमखान यांचं संतत्व नि कवित्व हे अशा प्रकारचं होतं. नागेशसम्प्रदायाची परस्पर-सामंजस्याची व समन्वयाची भूमिका त्यांनी स्वीकारली. त्यांच्या संतत्वात नि कवित्वात नाथसंप्रदाय, सूफीसंप्रदाय व वीरशैव धर्मातील षट्स्थलसिद्धान्ताच्या खुणा आढळतात. त्यांच्या प्रतिभेनं 'पद' हे माध्यम स्वीकारलं नि तिचे आविष्कार विविध रूपांनी प्रकटले. त्यांची पदं आज तरी मोठ्या संख्येनं उपलब्ध होत नसली तरी जी पदं उपलब्ध होतात, त्यांतून त्यांच्या आध्यात्मिक अवस्था, त्यांनी केलेलं तत्त्वचिन्तन, समाजप्रबोधन, पाखांडखंडन, योगमार्ग नि भक्तिमार्ग यांचं विवरण, ग्रामजीवनाशी झालेली त्यांची एकरूपता, त्यांचं अनेकभाषाकोविदत्व इ. कितीतरी वैशिष्ट्यांचा प्रत्यय येतो. 'आंतरभारती'चा पाया ज्या मराठी संतकवींनी रचला, त्यांत आलमखानांचा अवश्य निर्देश करायला हवा. त्यांच्या साहित्याच्या संशोधनास महाराष्ट्रात व कर्नाटकात निश्चित वाव आहे.

---

## संदर्भ-टीपा


१. जुने वाङ्मय : नवे संशोधन, लेखक/प्रकाशक- डॉ. पंडित आवळीकर, धारवाड, १९६४, पृ. २५७

२. एकात्मतेचे शिल्पकार, डॉ. रा. चिं. ढेरे, मंजुल प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. ५१

३. नागेशलीलामृत, ३९ X ७८

४. कित्ता ३९ X ९५ -९६

५. जुने वाड्.मय : नवे संशोधन, पृ. २६०

६. भारत इतिहास संशोधक मंडळ, वार्षिक इतिवृत्त, शके १८३७, पृ. २७९-८०

७. जुने वाङ्मय: नवे संशोधन, पृ. २६१

८. एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ५४-५८

९. कित्ता, पृ. ५८

१०. नागेशदर्पण, वि. शं. मोहोळकर, नागेश प्रकाशन,
सोलापूर, १९९१, पृ. १६०-१७५

११. 'नागोबा म्हणजे नागनाथ, नसरुद्दीन हे नागनाथाचे मुसलमानी नाव आहे' डॉ. रा. चिं. ढेरे,
एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ५४.

१२. नागेशदर्पण, पृ. १६३-६४

१३. कित्ता, पद क्र. २४, पृ. १७१

१४. एकात्मतेचे शिल्पकार, पृ ५१-५२

१५. कित्ता, पृ. ३४

१६. नागेशदर्पण, पृ. १६०

१७. कित्ता, पृ. १६५-६६

१८. कित्ता, पृ. १६३

१९. कित्ता, पद क्र. २०.

२०. एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ५५,
महाराष्ट्र-सारस्वत, पाचवी आवृत्ती, पृ.८३१

२१. नागेशदर्पण, पृ. १६५

२२. कित्ता, पृ. १७५

२३. कित्ता, पृ. १७०

२४. कित्ता, पृ. १६१

२५. कित्ता, पृ. १६७

२६. कित्ता, पृ. १६२

२७. कित्ता, पृ. १६६

२८. कित्ता, पृ. १६५, पद क्र. ११

२९. कित्ता, पृ. १६८

३०. कित्ता, पृ. १६२-६३

३१. कित्ता, पद क्र. ३०, पृ. १७४

# १०. जंगली फकीर (सैयद हुसेन)

नागेशसम्प्रदायाच्या मुसलमान संतकवींमध्ये आलमखानांनंतर जंगली फकीर (सैयद हुसेन) यांच नाव घ्यावं लागत. प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी 'मुसलमानांची जुनी मराठी कविता'[१] या पुस्तिकेत त्यांचा आवर्जून उल्लेख केला आहे. 'वडवाळसिद्ध नागेशाचे जंगली फकीर सैयद हुसेन नावाचे शिष्य होते, धुळ्याच्या श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरातील क्र. १६३७ च्या बाडात त्यांची त्रुटित अशुद्ध कविता सापडल्याचा निर्देश प्रा. प्रियोळकरांनी केला आहे. अनेक मराठी वाङ्मयेतिहासकरांनी या संतकवींची आवर्जून नोंद घेतली आहे. डॉ. अ. ना. देशपांडे [२] यांनी हे आलमखानाचे गुरुबंधू असल्याचा महत्त्वपूर्ण निर्देश केला आहे. डॉ. ढेरे यांनी त्यांच्या कथाकाव्यरचनेचा उल्लेख केला आहे. गो. का. चांदोरकरांनी पृ. ४१ व ११६ वर 'संत कविकाव्यसूचींत' 'त्यांचं दैवत वडवाळसिद्ध नागनाथ असून त्यांनी 'तारकासुरवध' हे कथाकाव्य लिहिलं' असल्याची माहिती दिली आहे. त्याचप्रमाणं त्यांच्या 'दुंदभीवध' या कथाकाव्याचाही निर्देश केला आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेनं प्रसिद्ध केलेल्या 'मराठी वाड्मयाच्या इतिहासा'च्या' दुस-या खंडात त्यांच्या काळासंबंधी व चरित्रासंबंधी सांगणं अवघड आहे असं म्हटल असलं तरी आलमखानाच्या काळावरून जंगली फकीर यांच्या काळाविषयीही अनुमान करता येतं. नागेशसांप्रदायिक गाथ्यांमध्ये त्यांची तुरळक रचना उपलब्ध होते.

जंगली फकीरांनी पौराणिक कथांवर प्रदीर्घ ओवीबद्ध कथाकाव्यं लिहिली आहेत. त्यांच्या काव्यातील ओव्यांना क्रमांक नाहीत. त्यांनी आपल्या काव्यात नागनाथांचा उल्लेख अनेक वेळा केला आहे-

'वों नमु सिरी वीद (सिद्ध) वडवाळ नागनाथ ।
तो मज प्रसाद जाला, दिधली ग्यान- माता।
तयाचे प्रसादे ग्यान जाले हृदयांत' ।।

यावरून त्यांचा नागेशसंप्रदायाशी असलेला संबंध स्पष्ट होतो.

त्यांच्या कथाकाव्यात त्यांनी गजासुर-शिव युद्ध, कार्तिकेयजन्म, गणेश- जन्म इ. कथा समरसून वर्जिल्या आहेत. त्यांचं प्रसंग-वर्णन-कौशल्य लक्षणीय आहे.

प्रा. प्रियोळकरांनी[४] उद्धृत केलेल्या त्यांच्या रचनेतील पुढील भागावरून त्यांच्या प्रवाही व रसाळ शैलीची प्रचीती येते. हा अश्वमेधाचा भाग असावा -

' हा अस्वमेधांचा कळस जाण।
अठरा पुराणांचा सौरस गहन।
तो सांगता जाला व्यास आपुन।
जन्मोजयाप्रती सांगे निवडुन।
तव अठरा प्रवात जान।

रुसी घोळती आपुन।
भवीसपुराणांचे हे कथन।
सांगतो व्यास रुसी आपुन।
रनी पडतील महामहावीर।
भारथीचे म्हणे जंगली फकीर
हे कथा मज हो घोळता।
सावधान होवावे सोता।
जंगली फकीर वीनवे संतां।
सैद हुसेन म्हणे काये वै र त ळे।
दोही सैन्यासी आईक सोती।।'

'सैद हुसेन म्हणे।पुढें सांगेन मासियाची वार्ता।।' असा त्यांच्या एका पदाच्या शेवटी उल्लेख आढळतो. 'मासिया' म्हणजे 'मसीहा'(पैगबर). यावरून त्यांनी काही इस्लामविषयक रचना केली असावी, असं वाटतं.

जंगली फकीर हे 'पुराणकथांचे गायक'आहेत, असं डॉ. रा. चिं. ढेरे यानी म्हटलं आहे, ते सार्थ आहे. त्यांनी अभंगपदादी स्फुट रचनाही केली असावी, असं वडवळ-मोहोळ (जि. सोलापूर) येथील नागेशसाम्प्रदायिक मौखिक परंपरेवरून वाटतं.

त्यांतील काही पदं श्री. गुंडूबुवा खर्गेमहाराजांनी नागनाथांच्या पदसंग्रहात प्रसिद्ध केल्याचं मला स्मरतं पण आता हे पुस्तकही दुर्मिळ झालं आहे.त्यांच्या दीर्घ कथा-काव्यांचंही संशोधन-संपादन होणं आवश्यक आहे.

---

## संदर्भ-टीपा

१) मुसलमानांची जुनी मराठी कविता, प्रा. अ. का. प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६५, पृ.२०.

२) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग २, डॉ. अ. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे, पृ १४५.

३) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २, सं. डॉ. स. गं. मालशे, म. सा. प. प्रकाशन, पुणे, पृ. ६१५,२०.

४) मुसलमानांची जुनी मराठी, कविता, प्रा. प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६५, पृ. २६.

# ११. जमाल फकीर

नागेशसम्प्रदायाशी अनुबंध असलेल्या मुसलमान संतांमध्ये संतकवी जमाल फकीर हेही होते. जंगली फकीर (सैयद हुसेन) हे अज्ञानसिद्धांचे गुरुबंधू होते तर जमाल फकीर हे अज्ञानसिद्धांचे शिष्य होते. त्यावरून त्यांच्या काळाचं अनुमान करता येत. 'श्री. दा. का. थावरे' यांनी 'श्रीसकलसंतगाथे'त त्यांचं अल्प चरित्र सांगितलं आहे. त्यातही ते अज्ञानसिद्धांचे शिष्य असल्याचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याविषयीची चरित्रात्मक माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.-

'कोल्हापूर जिल्ह्यात कुंभोज गावाच्या परिसरात त्यांचे तपस्यास्थान होते. ते स्थान अतिरम्य व उपासनेस योग्य होते. फकिरांची समाधी कोल्हापूर येथे रंकाळा तलावानजीक आहे'

'काशीस निघाले विश्वजन ' या चरणानं प्रारंभ होणा-या त्यांच्या रचनेत जन्ममृत्यूचा 'येरझारा' चुकविण्याचा उपदेश केला आहे. श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ यासारखा यौगिक परिभाषा या पदात त्यांनी वापरल्या आहेत. त्यात पद्मासनाचा व उन्मनीचा (समाधि-अवस्था) महत्त्वपूर्ण उल्लेखही आहे. त्यामुळं जीव आणि शिव यांचा 'तुटलेपणा' नाहीसं होऊन त्यांचं मीलन होत, असा भाव प्रकट केला आहे. नाथ आणि नागेश संप्रदायास अभिप्रेत असलेलं 'शिवत्व' यात आढळतं मात्र सुफी सप्रदायाच्या 'तसव्वुफ' (तत्त्वज्ञाना) चे पारिभाषिक शब्द आढळत नाहीत.जमाल फकीरांची अन्य रचना उपलब्ध नसली तरी या छोटेखानी पदरचनेवरुनही त्यांच्या कवित्वाची, तत्त्वचिंतनाची, शैलीच, साधनेची प्रचीती निश्चितपणे येते. त्यांची ही रचनाच, अनेक ठिकाणी उपलब्ध होत असल्यानं ती लोकप्रिय असावी, असं वाटतं. याशिवाय जमालशांनी नागेश-स्तवनपर अभंगरचनाही केली आहे–

'काशीस निघाले विश्वजन। देखूनि हर्षले माझे मन।
गेलो सद्गरूसी शरण। मज दाखवी काशी ।।१।।

मग बोलिले सद्गुरुनाथ। तीनसे साठ गाव दूर पंथ।
ते येरझार व्यर्थ। फेरा चौ-यांशीचा ।।२।।

गंगा, यमुना, सरस्वती। नित्य उफराट्या वाहती।
तेथ आंघोळ करिता। मोक्ष तयासी ।।३।।

जिकडे पाहे तिकडे उदक। मूर्ती पाषाणाच्या ऐक।
त्याहीपरते नाही आणिक। शिष्यापरीस ।।४।।

मग बोलिले सद्गुरु। कां शिष्या धावासी दुरु ?
तीनसे साठ तीर्थे अपारु। तुझेपासी ।।५।।

त्रिवेणीसंगमी जावूनी बैसाया केलास।

धरी तू सद्‌गुरूचा भरवसा।

तेथे आंघोळी करी तू सदगुरूच्या परमपुरुषा।

धरी तू सद्‌गुरूचा भरवसा ।।१२।।

धन्य योगी संन्यासी। उतरून गेले पश्चिमेसी।

जाऊनी बैसले काशीसी।करिती तप ।।१४।।

तेथे आहे जीव-शिव। तुटला दुजेपणा-भेव।

साक्षात भेटला देव । चुकली खेप ।।१६।।

जिकडे पाहावे तिकडे आपण सर्वेश्वर। हे काय सिद्‌धीये उत्तर।

अखंड वर्षे कपिलधार। वरी सत्रावी तुषार।।१८।।

काशीतीर बोले जमाल फकीर। उस्ताद अज्ञानसिद्‌ध सार।

वडवाळसिद्‌ध नागेश्वर। ते आमुचे माहेर।

त्याने दाखविले काशीतीर ।।१९।।[२]

जमाल फकीर व त्यांचं विखुरलेलं साहित्य शोधण्याची गरज आहे, त्यामुळं नागेशसाम्प्रदायिक साहित्यावर अधिक प्रकाश पडेल.

---

## संदर्भ - टीपा

१) श्रीसकलसंतगाथा, सं. दा. का. थावरे,
प्र. वसंतराव नागदे, उस्मानाबाद, १९९०, पृ. ३००-०१.

२) नागेशदर्पण, सं. वि. शं. मोहोळकर,
नागेश प्रकाशन, सोलापूर, १९९१, पृ. २३१-३३.

---

## १२. शहामुनी

### सिद्धान्तबोध : स्वरूपदर्शन

शहामुनींचा 'सिद्धान्तबोध' हा बृहद्ग्रंथ असून त्यात पन्नास अध्याय आहेत. या पन्नास अध्यायांची एकूण ओवीसंख्या ९८५८ असून प्रत्येक अध्यायातील ओव्यांचा तपशील असा आहे -

| अध्याय | | ओवीसंख्या |
|---|---|---|
| १ | — | १५१ |
| २ | — | १४६ |
| ३ | — | १८६ |
| ४ | — | १३४ |
| ५ | — | १७२ |
| ६ | — | १५० |
| ७ | — | ११५ |
| ८ | — | १८१ |
| ९ | — | २०५ |
| १० | — | ११९ |
| ११ | — | १३५ |
| १२ | — | २०१ |
| १३ | — | १०० |
| १४ | — | १६२ |
| १५ | — | १३२ |
| १६ | — | ११३ |
| १७ | — | १५१ |
| १८ | — | १३० |
| १९ | — | १७६ |
| २० | — | १५८ |
| २१ | — | १७७ |
| २२ | — | २२७ |
| २३ | — | २४० |
| २४ | — | २४७ |
| २५ | — | २५८ |

| अध्याय | | ओवीसंख्या |
|---|---|---|
| २६ | — | २९६ |
| २७ | — | १९१ |
| २८ | — | २५२ |
| २९ | — | २०२ |
| ३० | — | १६३ |
| ३१ | — | २०३ |
| ३२ | — | २१२ |
| ३३ | — | २२३ |
| ३४ | — | ३०० |
| ३५ | — | २६२ |
| ३६ | — | १८१ |
| ३७ | — | २०५ |
| ३८ | — | १५२ |
| ३९ | — | १७१ |
| ४० | — | २०४ |
| ४१ | — | १३१ |
| ४२ | — | २०० |
| ४३ | — | २२० |
| ४४ | — | ३१४ |
| ४५ | — | २०१ |
| ४६ | — | २०१ |
| ४७ | — | २०२ |
| ४८ | — | २०३ |
| ४९ | — | २८२ |
| ५० | — | ४११ |

एकूण ओवीसंख्या ... ९८५८

यांतील ३१ ते ५० या अध्यायांच्या कर्त्याबद्दल वाद असून मी इथं एकूण ५० अध्यायांचा तपशील दिला असला तरी मूळ शहामुनींनी पहिले तीसच अध्याय लिहिले आहेत, असं माझं साधार मत 'स्वरूपदर्शनां' नंतर मांडलं आहे.

**अध्याय -१**

या अध्यायात गणेश, सरस्वती, दत्तात्रेय व कुळदेवत यांना वंदन करून गुरुमाहात्म्य वर्णिलं आहे. मंगलाचरणतील दुसरीच ओवी व्दैताव्दैतातील अव्यक्त परमेश्वराला वंदन करणारी असून शहामुनींचा इस्लामधर्म व भारतीय दर्शनातील ईश्वराचं निर्गुणत्व यांतील साम्याकडे या वंदनामुळं आपलं लक्ष वेधलं जातं. ही ओवी अशी -

'अचळ, अढळ, अमळ विश्वेशा । व्दैताव्दैतातील परमेशा।
स्वयंभा सदोदिता स्वयंप्रकाशा। अव्यक्त- व्यक्तावेगळा।'
।।ओ.२।।

प्रत्यक्ष परमेश्वरच आपल्या तोंडून हा ग्रंथ वदवीत आहे, असंही कवी म्हणतो -

'मग हृदयी प्रगटला परमेश्वर।
करोनि बुद्धिस प्रकाश थोर। सिद्धान्तबोध वदविला।।
।।ओ.११।।

ग्रंथा नाम 'सिद्धांतबोध'। वर श्रीदत्तकृपेचा वरद।
मतीस फुटले सहस्त्रकंद। ज्ञानांकुराचे ।।ओ.१२।।

आपले गरू मुनींद्र याच्या आज्ञेनं हा ग्रंथ आपण लिहीत आहोत, हा त्यांनी केलेला उल्लेखही महत्त्वाचा आहे -

'मुनींद्रस्वामी पूर्ण जाण । त्याचा सेवक शहा जाण ।
ग्रंथ आरंभिला गुरु -आज्ञेन। बोध होईल तो परिसा' ।।ओ.१५।।

वेगवेगळ्या धर्मपंथांचा, मतामतांचा, देवदेवतांचा गलबला झाल्यानं जनमनात गोंधळ उडतो. काही पाखंडी चुकीच्या धर्मकल्पना, कर्मकांड प्रसृत करतात, त्यामुळं नवससायास, गळ टोचणे इ. प्रथा व अंधश्रद्धा रूढ होतात, याचं सविस्तर विवेचन करून त्यावर शहामुनी प्रखर टीका करतात. हे. अज्ञान नष्ट करून खरं ज्ञान देण्यासाठी या ग्रंथाची निर्मिती झाली आहे, असं सूचन करून आपण या गंथात 'अध्यात्म'-निरूपणाची 'मात' करणार आहोत, खरा सिद्धान्त सांगणार आहोत, असं कवी या अध्यायाच्या शेवटी सांगतो.

**अध्याय-२**

या अध्यायाच्या प्रारंभी श्रीकृष्णवंदन आहे तथापि पुढं पासष्टाव्या ओवीत 'अव्यक्त 'परमेश्वराचं स्तवन करून तो विश्वाचा सूत्रधार असल्याचं प्रतिपादन केलं आहे -

'तू अपरिमित परमेश्वर। सुरासुरा न कळे पार।
अव्यक्त आत्मा विश्वंभर। सर्व सुत्रें तुझे हाती ।।'

श्रीकृष्णामहिमा, ऋषीश्वराचं कौतुक, ब्रह्मलोक महिमा इ. विषयी विवरण केल्यानंतर शहामुनी पुढील आत्मनिवेदन नम्रतेनं करतात –

'नव्हे यातीचा ब्राह्मण। क्षत्रिय, वैश्य नोहे जाण।
शूद्रापरीस हीन वर्ण। अविंधबंशी जन्मलो।।....
... ऐसें खाणीत जन्मलों। श्रीकृष्णभक्तीस लागलो।
तुम्ही संतांचे पदरीं पडिलो। अंगिकारावे' ।।ओ.१३०, १३२।।

कवीला आपल्या श्रोत्यांना परमार्थाचा बोध करावयाचा असल्यानं तो 'हरिभक्तीची घालूनि कास। मन- बुद्धीस करून उल्हास। प्रसंगे निवेदीन सावकाश' ।।ओ.१४५।। असं सांगून या अध्यायाच्या समारोपप्रसंगी मूळ विषयांचे अनुसंधान साधतो. 'शहामुनीच्या। वचनाला। रहस्य ईश्वर' या शेवटच्या चरणात आपण ईश्वराचं 'रहस्य' प्रतिपादन करीत आहोत, असंही कवी म्हणतो, परमेश्वराचं यथार्थ ज्ञान जनसामान्यांना व्हावं, ही त्याची सुरवातीपासूनची भूमिका दिसते.

## अध्याय –३

या अध्यायात कुळस्वामिनीवंदन, श्रीकृष्णमहिमा, दत्तस्तुती, सत्यलोक, ब्रह्मदेवमहिमा इ. विषय आले आहेत. कवी विषयानुसंधान अध्यायाच्या शेवटी साधतो- 'परमार्थभांडार श्रीगुरूचे। मी व्यापारी सेवक त्याचे। माझ्या बाचे काय वेचे? बोलावया ग्रंथासी या ।।ओ.१८०।।'

## अध्याय –४

श्रीकृष्णाचरणी वंदन करून कवीनं या अध्यायात परमेश्वराचा अगाध महिमा वर्णिला आहे- 'श्रीकृष्णा तुज मी शरण। माझा तोडा अभिमान।।' ही शरणागताची/साधकाची भूमिका विषयानुसंधान साधते.

'बाणासुराचा घेऊन कैवार। घेऊनि आला शंकर।
इंद्र जितेंनि शाङ्गधर । पण नेला सिद्धीतें ।।ओ.१०।।

या ओवीतील शिवस्तुतीकडे अभ्यासकांचे लक्ष वेधावंसं वाटतं.

या अध्यामातील 'सद्गुरुमहिमा' परमार्थमार्गातील वाटचालीस साहाय्यभूत असल्यानंच वर्णिला आहे.

## अध्याय –५

या अध्यायात मानवी जीवनात उदात्त आचार- विचारांची जोपासना कशी करावी, याविषयी विवेचन केलं आहे. ते साधकाच्या साधनेस उपकारक आहे. यासाठी मर्यादापुरुषोत्तम रामाच्या जीवनातील निवडक प्रसंगांच वर्णन करून दाखले दिले आहेत. ईश्वराच्या अगाध महिम्याचं अन्तःसूत्र संपूर्णअध्यायात दडलेले आहेत.

देव शरणागताला आधार देतो, साहाय्य करतो व त्याचा उद्धार करतो. (महानुभाव संप्रदायाचे अवतार-स्वरूप- श्रीचक्रधरस्वामी यांचं 'शरण आलिया मरण काइं असे'? हे 'ससीक-रक्षण' लीळेच्या संदर्भातील वचन इथं आठवतं.)

शहामुनी या अध्यायाच्या प्रारंभीच 'पुर्वानुसंधान श्रीगुरुकृपेसी। मी तो शरणागत देवासी। येचि भांडवल मजपाशी। शरणागताचा अभिमान हरसी '।।ओ.१।।

असं म्हणून गरुड, मारुती, सत्यभामा यांच्या कथा सांगून देव भक्ताचा उद्धार कसा करतो,- ते स्पष्ट केलं आहे.

## अध्याय–६

या अध्यायातही पुन्हा आपण देवास कसे शरण गेलो, ते सांगून त्याचं स्तवन केलं आहे. साधकान निष्ठेनं देवाला शरण जावं नि त्याची भक्ती करावी म्हणजे देव त्याला मोक्ष देतो, हा त्यातील भावार्थ आहे. ही पहिली ओवी अशी–

'नमन माझे देवाधिदेवा। ज्याचे नावे मोक्ष जीवा।
ऐसे मानोनी अनुभवा।। शरण आले तुजलागी ।।ओ.१।।

पण यापुढं श्रीकृष्णस्तवन करताना विठ्ठल व पंढरीचा जो उल्लेख आला आहे, तो 'चिन्त्य' आहे. (महानुभाव श्रीकृष्णालाच 'पूर्णवतार' मानतात, मग तोच विठ्ठल आहे, असं शहामुनी कसं म्हणू शकतात? कारण ते महानुभाव आहेत.

हा उल्लेख पहिल्या ओवीनंतर आला आहे–

'माझा तूंच विठ्ठल पंढरी। तूंच रामेश्वर काशीपूरी।
गंगा आणि ब्रह्मगिरी। हेही तूंच श्रीकृष्ण।।

या अध्यायातही हनुमान-महिमा इ. पौराणिक आख्यानप्रसंग आले असून ज्या जालंधराने 'श्रीकृष्णचरणी माथा ठेविला। ते कथेचं निरूपण।
पुढील अध्यायी, परिसोत'।। असं शहामुनी श्रोत्यांना सांगतात.

## अध्याय–७

या अध्यायाच्या प्रारंभी पूर्वीच्या अध्यायातील विचारांची पुनरावृत्ती झाली आहे. याचा प्रारंभ असा 'श्रीकृष्ण राजाधिराजा । करी त्रैलोक्यांच्या मौजा।
पावे भक्तांचिया काजा। संकट पडतां निर्वाणी'।।ओ.१।।

महानुभाव कान फुंकून मंत्र सांगत वा उपदेश देत, असं म्हणतात, इथं श्रीदत्तानं कान फुंकून मंत्र दिला, व गुरूच्या मार्गदर्शनानुसार साधना करायला सांगितली, त्यामुळे आपलं जीवन सफळ झालं, असं शहामुनी सांगतात. (ओ.१३ व १६)

त्यांनी साधकांना मनावर नियंत्रण ठेवून (विकारवश न होता) साधना करायला सांगितलं आहे-

'आनंद- तुरंगी बैसनी। मन- लगाम करी धरुनी।
दत्तकृपेच्या पटांगणी। कविताछंदे नाचवी'।।ओ.१७।।

ईश्वराचा अगाध महिमा व सामर्थ्य वर्णन करण्यासाठी त्यांनी जालंधर-शिव-युद्धाबरोरच भ्रमर-समुद्र, चिमणा-चिमणी यांच्या लोककथाही सांगितल्या आहेत. त्यांतून त्याचं प्रसंगवर्णन-संवाद-लेखन-कौशल्य प्रतीत होतं.

या अध्यायात शिव-महिमा वर्णन करतात, याकडे मुद्दाम लक्ष वेधावंसं वाटत. ज्या शब्दात तो हा महिमा वर्णितात, तो महानुभावांना मान्य होईल, असे वाटत नाही–

**सकळ देवांचा अदिदेव**। ज्यासी म्हणती महादेव।
त्याचा सांगोन नाव-ठाव। तो पूज्य सुर-नरांसी।। (ओ. १०८)

**सकळ देवांचा मुकुटमणी** । सदैव स्तविती देव फणी।
जयाशी अगाध करणी। कर्ता हर्ता ईश्वर।। ओ.१११।।

(ठळक टाईप माझा)

कवींन या अध्यायात ईश्वराच्या नाममहिम्याचं वर्णन केलं असून ते साधकास उपयुक्त कसं आहे, ते सूचित केलं आहे. त्यातच कर्मसिद्धान्ताचा आधार घेऊन त्यासाठी 'नाम' हेच कसं उपयुक्त आहे, याचा 'बोध' केला आहे–'असेल दैवी ते भोगावें। नातरी पूर्वकर्मावर रुसावे। परमेश्वराचे नाम घ्यावे। सार्थक होय ज्याचेनी ' ।। ओ.११।।

शहामुनींना जो 'सिध्दान्ताचा बोध' करायचा आहे तो फार सावकाशीनं पुढं चालला आहे, हे आता जाणवू लागतं.

## अध्याय–८

या अध्यायात प्रारंभीच 'श्रीकृष्णचरणकमळ सकळ मंगळाचे मंगळ' होत, असा प्रारंभ करून त्याचं नाव उच्चारताच भवव्यथा नाहीशा होतात, ते सांगितलं आहे. संत समाजाला त्याच्या कल्याणाचा मार्ग सांगतात पण काही जण त्यांची निंदा करतात. असं असलं तरी संत श्रेष्ठच आहेत, अशा आशयाचं प्रतिपादन शहामुनी करतात व समाजाला सन्मार्ग दाखवितात–

'करोनि अहंकाराचा वध। मग ऐको सिद्धान्तबोध।।
(ओ. ३०)

असं सांगून आपला जन्म सार्थकी कसा लावावा, त्याविषयी असा हितोपदेश करतात–
'मानवी जन्माचे हेचि फळ। ईश्वरकार्जी वेचिजे सकळ।। (ओ. ६८)

या विवेचनाच्या ओघात कौशिक ऋषी, हरिश्चंद्र तारामती इ. विषयी पौराणिक दाखलेही ते देतात.

**अध्याय–९**

साधना केल्यानं अज्ञानाची रात्र संपून हृदयात जगदीश प्रकटतो व ज्ञानाच्या प्रकाशानं जीवन कसं उजळून जातं, त्याचं वर्णन प्रारंभीच केलं आहे–

'आज धन्य उगवला दिवस। हृदयी प्रगटला जगदीश।
जाहला ज्ञानाचा प्रकाश। दाही दिशा उजलेल्या।।
सरली अज्ञानाची रजनी। अवघे मार्ग दिसती नयनीं।।

सत्पुरुष नरदेहाचं सार्थक करतात. भक्तिभावानं ईशसेवा करून जन्ममृत्यू यांच्या सीमारेषा उल्लंघून सायुज्यमुक्ती प्राप्त करतात, अशा आशयाचं विवेचन कवीनं या अध्यायात केलं आहे. नेहमीप्रमाणं वृतासुर, चांगुणा यासारख्या पौराणिक कथाही येतातच-

**अध्याय–१०**

या अध्यायाच्या प्रारंभी दत्त-वंदन केलं असून 'सिद्धांतबोध' ग्रंथाच्या वाचनाची फलश्रुती सांगितली आहे–

'सिद्धान्तबोध' हा ग्रंथ। वाचितां ज्ञान होईल सत्य।
चौ-यांयशीचे आवर्त । चुकती सत्य त्रिवाचा ।।ओ.२।।

(-अधोरेखन माझं.)

या अध्यायाच्या शेवटी आपण कृष्णोपासक असून देशवाणी मराठीत गूढार्थ प्रकट करीत आहोत, असं म्हटलं आहे–

'ते कथा श्रोतयांलागुनी। सांगेन महाराष्ट्र देशवाणी।
कृष्णउपासक शहामुनी। प्रगट करीतो गूढार्थ।।ओ.११९।।

याशिवाय या अध्यायात श्रीकृष्णाच्या बालक्रीडा, शिवनाम-माहात्म्य, वाराणसी-माहात्म्य, अनुसूयेची सत्वपरीक्षा इ. विषयी विवरण केलं आहे.

त्यातील 'शिव शिव स्मरण ज्यासी। निवारा कोटी विघ्नासी।।१६।।

यासारखा भाग तसंच 'विश्वव्यापक शिवशंकर। अंतर्साक्षी परमेश्वर'।।ओ.३२।। यासारखे उल्लेख महानुभाव शहामुनी कसे काय करतात, असा प्रश्न मनात निर्माण होणं स्वाभाविक आहे.

**अध्याय–११**

या अध्यायाच्या मंगलाचरणात श्रीदत्तास व विद्यादेवीस प्रथम वंदन केलं असून देवाचा अगाध महिमा व त्यानं केलेली ब्रह्मांडरचना यांचा उल्लेख करून जीव व शरीर यांचा परस्परसंबंध वर्णिला आहे. जीवात आत्मा म्हणजे चैतन्य नसल्याप्रमाणं शरीर प्रेतवत् होतं, यासाठी 'आत्मबोध' होणं आवश्यक असून तोच सांगण्यासाठी आपण 'सिद्धान्तबोध' हा ग्रंथ लिहिला, हे या ग्रंथाचं निर्मितिप्रयोजनही शहामुनी सांगतात. यातून देहाचे क्षरत्व व आत्म्याचे अक्षरत्व हेही त्यांनी सूचित केलं आहे. भारतीय दर्शनातील हा विचार वारकरी-महानुभावादी संप्रदायांनीही स्वीकारला आहे.

(तो या दोन्ही संप्रदायांत समान आहे.) इस्लाम धर्म व सूफीमतही निर्गुण ईश्वरतत्त्व, त्यानं केलेली सृष्टिरचना, जीवांची निर्मिती, त्यात 'रूह' (आत्म्या) च्या रूपानं ओतलेलं चैतन्य आदि बाबी मान्य करतात. शहामुनींना हा समान धागा इस्लामदर्शनात व भारतीय दर्शनात निश्चितपणे जाणवला असावा, वरील बाबीसंबंधीचं शहामुनींचं अकराव्या अध्यायांतील विवरण या ओव्यांत येतं–

**सृष्टिरचना**

'अगाध महिमा देवाची। केली रचना ब्रह्मांडांची।
पेंढी बांधोनि पंचभूतांची। त्यात घातले जीवमानू।।
(ओ. २)

**जीव : 'क्षर' शरीर, 'अक्षर' आत्मा**

'जीव शरीराची प्रीत । दोन्ही एकरूपे वर्तते।
घरीदारीं सुखदुःखात। एकमेकां न सोडिती ।।ओ. ३।।
तुजवाचून (देहा?) प्रत। लोक म्हणती, 'पडले प्रेत'।
अवघे 'उचला उचला' म्हणत। दहन करिता स्मशानी' ।। (ओ. ९)

**यासाठी आत्मबोधाची आवश्यकता आहे–**

'जाहला बुद्धीसी आत्मबोध। यालागी निर्मी 'सिद्धान्तबोध'।
सकळ देवांचा घेत शोध। मुख्य देव ओळखावा।। (ओ. २०)

इस्लाम धर्म व वारकरी-महानुभाव संप्रदाय एका मुख्य (निर्गुण) देवाची भक्ती करावी, अनेक-दैवतवाद मानू नये असं प्रतिपादन करतात, हा विचारही 'सिद्धान्तबोधा'च्या या अध्यायात आला आहे.

'परमात्मा तो निर्गुण। गुणत्रयावेगळा '।।२६।।

'जितुके देव नामांकित। तितुक्यास लागला कलंका
हाही पुरता विवेक। समजा तुम्ही' ।। ओ.१२०।।

..... यानंतर या अध्यायात कवीनं एकशेतीसाव्या ओवीपासून मायाविवरणही केलं आहे.

महानुभाव तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनंच विचार करायचा झाल्यास या तत्त्वज्ञानातील जीव-देवता-प्रपंच-परमेश्वर ही चतुःसूत्री या अध्यायात आली आहे तथापि श्रीकृष्णास्तवनाबरोबरच कवी शिवमहिमाही गातो, ही बाब खटकल्यावाचून राहात नाही, एवढंच नाही तर तो बारा ज्योतिर्लिंगांच्या निर्मितीविषयीही विवरण का करतो (ओ. ११४-११५), याविषयीही मन भोव-यात सापडतं पण शेवटच्या चरणावरून त्याचा उलगडा होतो.

## अध्याय–१२

अकराव्या अध्यायातील मायेचं सूत्र धरून तिच्याविषयी कवीनं या अध्यायात सविस्तर विवेचन केलं आहे. पूर्वानुसंधान सांगून कवी म्हणतो,

'मागिल अध्यायीं अमूप। सांगितला शिवाचा खटाटोपा।
पुढे मायेचा प्रताप। वर्णी ऋषी तें ऐका ' ।।ओ.२२।।
मायनें रचिलें ब्रह्मांड। केले देश- डोंगर नवखंड।
उभारीले कौतुकार्थ पिंड। बहु बंड उभविले।।ओ.२४।।

पाखंडी, अज्ञानी, नास्तिक यांच्यावर या अध्यायात टीका करून 'पाखांडखंडन'ही केले आहे, (ओ. ५४-६५) त्यातला वानगीदाखल उल्लेख-

'काढोनी अष्टकोनी मंडळास। स्थापिती भैरव आणि गणेश।
मेळवोनि मद्यमांसास। तीर्थशुद्धि बोलती' ।।ओ.५८।।

उपासनेसाठी जे विविध मार्ग आहेत, त्यांत योगाचंही महत्त्व आहे, ते कवी या अध्यायातील ७८ ते ८५ या ओव्यांत विशद करतो. यासाठी कामक्रोधावर 'बंदी' घालून 'अचाट नेम' करावा लागतो, असं कवी म्हणतो (ओ.७३) यातील यौगिक प्रक्रियेचा एक उल्लेख महत्वाचा वाटतो-

'प्राण जातसे नासापुटीं। तयां तोंडी देऊनिया खुंटी।
प्राण अपान एके नेहुटी। गाठी पडली दोहोंची।। (ओ. ७९)

आपला हा ग्रंथ आत्मबोधाची वाट दाखवील व सर्व शंकांचं निश्चितपणे निवारण करील, अशी ग्रंथमहतीही या अध्यायात आली आहे-

'ग्रंथसमाप्तीपर्यंत जाण। करावें ग्रंथाचें श्रवण।
न होय जरी संशय-खंडण। तेव्हा दोष ठेविणें।।
ज्या ग्रंथी संशयाची राहाटी। ग्रंथ नव्हे तो देहांती नरोटी।।
मग ग्रंथ म्हणणे श्रेष्ठी। केवी मिरवी श्रोतियां?।। (ओ. १९-२०)

या अध्यायात कवीनं शुक-रंभा-संवादही रंगविला आहे.

**अध्याय—१३**

'सिद्धान्तबोधा'तील तत्त्वाविवेचनाच्या दृष्टीनं हा अध्याय महत्त्वाचा वाटतो. त्यातील पहिल्याच ओवीत ईश्वराच्या निर्गुण-निराकारत्वाचा उल्लेख असून ही भूमिका इस्लामला व भारतीय आस्तिक दर्शनांना (वारकरी-महानुभावादी संप्रदायांनाही) मान्य आहे.

'जो निराकार निर्गुण आहे। पूर्ण ब्रह्म सनातन।
तोचि राजाधिराज जाण। महाराज श्रेष्ठ ।।ओ.१।।

जीवसृष्टीत प्रत्येकाला काम वाटून दिल्याविषयीचा उल्लेख (चातुर्वर्ण्यव्यवस्थेतील?) कर्मविभागणीकडे अंगुलिनिर्देश करतो, ब्रह्मा-विष्णू-महेश 'हे सृष्टीचा जमाखर्च करणारे कारकून' आहेत, असं म्हणून दैवतांचं गौणत्व सूचित केलं आहे! महानुभाव दैवतांना गौण मानतात, शहामुनींची ही भूमिका त्या विचाराशी जुळते.

'तिजासी तिघे कारकुन तिघे कारकुन । ब्रह्मा विष्णु महेश जाण।
सृष्टीचा जमाखर्च करून। झाडा देती प्रलयान्ती।। (ओ. ३)

कामक्रोधादी विकार साधनेत अडथळा निर्माण करतात. यावर नियंत्रण ठेवण्याविषयीचं विवेचन १० ते १३ व्या ओव्यात आलं आहे. प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधावा, हा महत्त्वपूर्ण विचारही या अध्यायात आला आहे. असं करून जन्मयातना चुकवाव्यात व मुक्ती मिळवावी, असं प्रतिपादन शहामुनींनी केलं आहे-

'यालागी सावधपणे। प्रपंच साधुनि परमार्थ करणें ।

इहलोकी परमार्थ साधनें। सार्थक तरीच जन्माचें।।

चुकवावया। जन्मयातना। शरण जावें नारायणा।

नाही तरी नरक चुकेना। भोगणे लागे जीवासी' (ओ. १७-१८)

यासाठी मागील अध्यायात 'मायेचं निरसन' केलंच आहे, असं सांगून विषयानुसंधान साधलं आहे. (ओ. २३).

ईश्वर हा सर्वांचा स्वामी आहे. तो सगुण रूपात पाहा किंवा निर्गुण-निराकारात पाहा, ही कवीची व्यापक भूमिका सर्वधर्मसमभावाचं सूचन करते. यातील 'सर्वज्ञ' ही संज्ञा महानुभाव पंथाच्या ईश्वरकल्पनेशी संबद्ध आहे.

'सगुण आणि निर्गुण। सत्य आपोनारायण।

सर्वसाक्षी सर्वज्ञ। ईश्वर स्वामी सर्वांचा।। (ओ. ९७)

शेवटी 'माझी कविता तुळसीदळ। कृष्णार्पण होतसे' असं म्हणून या अध्यायाचा समारोप केला आहे. यातील 'सर्वज्ञ' ही संज्ञा श्रीचक्रधरस्वामींसाठी व परमेश्वरासाठी महानुभाव तत्त्वज्ञानात योजिण्यात येते, हे लक्षात घ्यायला हवं.

## अध्याय-१४

ईश्वरानं मानवासाठी, त्याचं जीवन सुखी होण्यासाठी पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाशादी पंचमहाभूतांची निर्मिती केली (यांतील जलमाहात्म्य तेराव्या अध्यायात आलंच आहं) व त्यानं जीवन कस सुखी केलं, याचं विवेचन या, अध्यायात आहे.(कुराणातही विश्वाच्या निर्मितीचा व प्राणिजात -निर्मितीच्या संदर्भात असंच विवेचन आहे. शहामुनी हे मुसलमान आहेत, हे लक्षात घेतलं की त्यांना इस्लाम व भारतीय दर्शनातील हे साम्य का जाणवलं असावं, याचा उलगडा होतो.) विवेक बाळगून विचार केला तर हे धर्मोधर्मीचे भेद गळून पडतात, हे शहामुनींना सुचवायचं आहे-

'अहो, ऐका ग्रंथ पांजळ। होय विवेकाचा सुकाळ।

जोडीन अक्षरें सुढाळ। गोडी जेंवी पीयूष'।। (ओ. १५२)

असं त्यांनी इथं स्पष्टपणे म्हटलंच आहे. त्याचप्रमाणं

'आता निंदो की वंदो जना। आम्हांस ते अवघे समान'।। (ओ. १६१)

असं स्पष्टपणे सांगून ते मोकळे झाले आहेत.

## अध्याय-१५

ईश्वरानं ही सृष्टी निर्मिली व मानवाच्या सुखासाठी काय काय दिलं, याचा तपशील या अध्यायाच्या आरंभी आला आहे, तो कुराणाच्या एतद्विषयक प्रारंभीच्या तपशीलाशी बराच

तंतोतंत जुळतो. शहामुनी यांचा इस्लामधर्माचा व्यासंगही यातून प्रतीत होतो. यांतील काही ओव्या उद्‌धृत करतो (८४ योनींत जन्म आदि कल्पना मात्र इस्लामला मान्य नाहीत.)

'अपूर्व नरदेहाची प्राप्ती। बहुतां जन्म असेना।
या मनुष्यांकारणे। निर्मिली नाना पक्वान्नें ।।
कित्येक शाखांची चवी भिन्नें। चाखिती श्रीमंत आवडी।।
बहुत फळें बहुत मेवे। मानवांसाठी केलें देवें।
बहु सुगंधाची नावें। कोठावर सांगावी?' ।।ओ.१-३)

यासाठी 'काही सार्थक करोनिं घ्यावे। आयुष्य आहे तंवरी।।'(ओ. १७) असा उपदेश शहामुनी करतात. समाजातले काही जण आपलं आयुष्य सत्कारणी न लावता कसं वाया घालवितात, तेही त्यांनी मार्मिकपणे चित्रित केलं असून उदात्त जीवनादर्शांकडे समाजाचं लक्ष वेधलं आहे.

या अध्यायाच्या शेवटी आलेला अव्दैतविचार लक्षात घेण्याजोगा आहे. 'महानुभाव' शहामुनी असं कसं म्हणतील, हाही प्रश्न मनात डोकावणं अत्यंत स्वाभाविक आहे-

'अहो, मुळीच अव्दैत। पुढे कोठून होईल व्दैत?
हा सांख्यांचा सिद्‌धान्त। उघड तुम्हा दाविला।।
ज्याणे सौख्य नाही पाहिले। तयाचे ज्ञानी अंध डोळे।
यालागी अभ्यास बळें। सांख्यशास्त्रीं असावें।।
अवघे एकचि ब्रह्म। ऐसें श्रुति बोलति वर्म।
तें नेणोनिया अधम। नसते व्दैत कल्पिती।।
जंववरी व्दैताचे ज्ञान। तंववरी न चुके जन्म-मरण।
म्हणोनि तेचि धन्य। अव्दैतबोधे रतला' ।।ओ. ९-१२।।

.....'अळंकाराते आले। तरि सोनेपण काइ गेले?' हा ज्ञानदेवांचा अव्दैतपर दृष्टान्त शहामुनींनी या अध्यायात ८९ व्या ओवीत जसाच्या तसा सांगितला आहे. ज्याला अव्दैतबोध झाला आहे त्याला हे जग मिथ्या वाटतं, अशा ज्ञानी माणसाला 'जीवन्मुक्त' म्हणावं, असंही ११६ व्या ओवीत सांगतात. हा भाग पूर्वविवेचनाशी सुसंगत नाही, तो कुणी त्याची (म्हणजे ३१ ते ५० या अध्यायांच्या कर्त्यानं) नंतर इथं समाविष्ट केला असावा.

## अध्याय–१६

या अध्यायात ईश्वराची अगाधता, त्याची अगम्यता, ईश्वराचा नाममहिमा, मायेचा विस्तार (ओ. ३८), ज्ञान-अज्ञान-भेद, ब्रह्मस्वरूप (ओ. ६१-६४) इ. विषयी विवेचन केलं आहे. आतापर्यंतच्या अध्यायांतील विवेचनाचा आढावा घेताना शहामुनी म्हणतात-

**'मागे जितुकें निरूपण जाहलें। तितुक्याचें दर्शन पुढे केले।**
**अवघ्या मतांची मुळें। दाऊन निवडिला परमात्मा।। (ओ. १०५)**

इथपर्यंतचा भाग हा पूर्वपक्ष या 'पूर्वार्ध' आहे, असं शहामुनी म्हणतात.

आतापर्यंतच्या विवेचनातील शिवादी देवतांचा उल्लेख व अव्दैतमतपर विवेचन या प्रयोजन इथं स्पष्ट होतं. यापुढं आपण 'उत्तरार्ध' कथन करणार असल्याचं व एक 'नवल' घडल्याचं शहामुनी सांगतात. ते नवल असंः त्यांची व म्हाइंभटांची भेट होते. त्यांनी एक संवत्सर अनुष्ठान केलं होत, अशी माहितीही ते देतात. म्हाइंभटांच्या या उल्लेखामुळं व प्रत्यक्ष भेटीमुळं शहामुनींचा महानुभाव पंथाशी संबंध कसा आला, याचा उलगडा होतो-

'आता येथून उत्तरार्ध। अपूर्व निरूपणाचा स्वाद।
श्रोतयां होईल आनंद। तैसे वंदन गुरुकृपें।।
महिभट्टें अनुष्ठान। केलें एक संवत्सर जाण।
परमपुरुषातें लक्षून। निश्चयो धरिला परब्रह्मासी' ।।
मग तेथे नवल वर्तलें। अव्यक्त स्वरूप व्यक्तीस आलें।
परब्रह्म साकारलें। महिभट्टाकारणें।।ओ. ५०-५१।।

माहीमभट्टाला ईशदर्शन झाले आणि त्यांनी परमेश्वराला चार प्रश्न विचारले-

'चहूं वेदांचे महाबंड। जाहलें त्रिखंड तींठाई ।।
तरी न कळे तुझी व्याप्ती। मौनावली वेदांची स्फूर्ती।
मग ऋषी-मानवांची गती। काय वदती मिरवील,?।। (ओ. ८५-८६)

-असं म्हाइंभट परमेश्वराला विचारतात. इथून या ग्रंथात महानुभाव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचं विवरण सुरू होतं. जीव, देवता, प्रपंच, परमेश्वर यासंबंधीचे हे प्रश्न व त्यांची उत्तरं ही महानुभाव तत्त्वज्ञानाची आधारभूत 'चतुःसूत्री' आहे. 'सिद्धान्तबोधा' तील तत्त्वविवरणाविषयी वा शहामुनी 'महानुभाव' असल्याविषयी ज्या अभ्यासकांनी आजवर केवळ जाता जाता उल्लेख केला आहे, त्यांपैकी कुणीही आजवर हा तपशील का दिला नाही, ते कळत नाही. यावरून हा संपूर्ण ग्रंथ मूळातून अभ्यासकांनी वाचला की नाही, याविषयी मनात संदेह निर्माण होतो. 'चौपदांचे हे रहस्य' विचारणारे म्हाइंभटाचे हे प्रश्न असेः

'तुजसमान पुरुष दुसरा । कवण उपमूं परमेश्वरा?
यालागी विनंती अवधारा। स्वरूप निवेदितो पायांसी।।
या ब्रह्मांडाभीतरीं। देव किती असती चराचरीं?
श्रेष्ठ -कनिष्ठ कोणे परी। निवडोनि? सांगा, स्वामिया।।
कैसी प्रपंचाची रचना। कवणापासुनि नारायणा?
याची करोनिया विवंचना । माते सांगो, कृपाब्धी।।
जीव हा कार्य पदार्थ? कीं जाहला मायेचा निर्मित?

किंवा तुझ्या स्वरूपी उत्पन्न होत। किंवा आइता, अनादी ?
स्वयंज्योती परमेश्वर। सकळ व्यापक परातपर।
तुझ्या स्वरूपाचा निर्धार। तोही मातें परिसवीं'।। (ओ. ९३-९७)

यानंतर परमेश्वर प्रथम देवताविषयी विवरण करतात-

'जनीं, वनी, घरोघरी। देव बैसली देव्हारीं।
यांची बंडे पृथ्वीवरी। विस्तारली बहुसाल'।। (ओ. ११३)

आणि **'मुख्य जो परमेश्वर'** तो 'आपणच' आहे, असं सांगतो. ब्रह्मा, विष्णू, महेश हरिहर यांनाच लोक देव मानू लागले व त्यांचा पसारा या पृथ्वीवर झाला, यांत महानुभाव तत्त्वज्ञानाला अभिप्रेत असलेला **अन्य देवतांच्या गौणत्वाचा** महत्त्वाचा गाभा आला आहे.

'सांगितले देव समस्त। परी परमेश्वराचे कर्तृत्व।
**अणुमात्र असेना'** ।। ओ. १४८।।

असा निष्कर्ष परमेश्वराच्या मुखातूनच सांगितला आहे.

या ग्रंथात जे विवेचन केलं आहे त्यांचं वेगळंपण कवीनं असं सांगितलं आहे:

हा ग्रंथ म्हणजे कुठल्या संस्कृत ग्रंथाची प्राकृत टीका नाही.

'इतर ग्रंथांचे ठायीं। जे निरूपण प्रकट नाही।
...... जे नाही देसिलें-ऐकिलें। तेचि जाईल येथे निरूपिले'।।ओ. १५१-५२)

## अध्याय–१८

या अध्यायातही ब्राह्मण (म्हाइंभट) आणि ईश्वर यांचा संवाद पुढं चालू आहे. देवताविषयक विवरणात ईश्वरानं ७२ कोटी देवता असल्याचं सांगितलं आहे. महानुभाव संप्रदायातील देवताविषयक कल्पनेशी हे विवरण जुळतं. महानुभाव तत्त्वज्ञानात देवतांचे 'धोवे' (स्तर) ही सांगितले आहेत. शिवावर ज्यांचा विश्वास आहे त्यांना फक्त कैलासाची प्राप्ती होईल, मोक्षाची नव्हे, असं कवी इथ सांगतो (ओ. ७२)–

'शिवचि परमेश्वर असता। तरी रुंडमाळा। का वागविता?
जटा, मुगुट, कौपिन नेसता। कोण्या अर्थकिरणे? (ओ. ७४)
शिव करी ज्याचे ध्यान। तोचि शेषशायी नारायण।
महाविष्णु पुरातन। क्षीराब्धीचा अधिकारी'।। ओ.७५।।

असं यापूर्वी शिवमहिमा गाणारे शहामुनी म्हणतात,

त्यावेळी कुणीही संभ्रमात पडणं हज शक्य आहे. एवढंच नव्हे तर–

'ब्रह्मादिक हरिहर। ज्या देवाचे आज्ञाधार।
तो क्षीराब्धीचा ईश्वर। महाविष्णु जाण पां'।। ओ.८१।।

-असं म्हणून त्यांनी 'महाविष्णू' चं माहात्म्य वर्णिलं आहे, हे अर्थातच महानुभाव संप्रदायाच्या तत्वज्ञानाशी सुसंगत नाही. 'हा महाविष्णू म्हणजेच ईश्वर,' इस्लामधर्मीयांचा अल्ला अशी सांगड शहामुनींना घालावयाची असावी, त्यामुळं त्यांनी संकल्पनेनं या भागाचा समावेश केला असावा, असं वाटतं.

यापुढं शहामुनींनी इस्लामधर्माविषयी विवरण केलं आहे. याविषयी म्हाइंभट कशी पृच्छा करतील? असा प्रश्न कुणाच्याही मनात निर्माण होणं स्वाभाविक आहे.

**'शेषशायी नारायणाला। यवन म्हणती 'थोर अल्ला'।। ओ.१०४।।**

यातील नारायण व अल्ला ही दोवांचीच वेगळी नावं आहेत., हा समभाव आपण समजू शकतो, पण नारायणानं चार शास्त्रं केली, त्याला यवन 'कुराण' म्हणतात, हे विधानही इस्लामधर्मीयच नव्हे तर अन्य धर्मीयही मान्य करणार नाहीत. हजरत पैगंबरांनी इस्लामधर्माची स्थापना केली व त्याचा प्रसार केला, हे ऐतिहासिक सत्य मात्र शहामुनींनी सांगितलं आहे.

'मीच सृष्टीचा आदिकर्ता। विश्वामध्ये माझी सत्ता'।।

इ. पवित्र कुराणविषयक व ईश्वरविषयक विवरण त्यांनी केलं आहे, ते सर्वज्ञात आहे. शहामुनींनी इस्लामधर्माविषयी इथं जे विवरण केलं आहे, तसं अन्य कुणा मुसलमान संतकवींनी केलं नाही.

'इतर ग्रंथी अन्वय ज्याचा। तेचि येथें मांडितसे '( ओ.१२५)

असं शहामुनी म्हणतात ते बरोबर आहे कारण या विवरणाला इस्लामधर्मात वा अन्यत्र कुठेही आधार नाही, शिवाय म्हाइंभटानं ईश्वराला केलेल्या विचारणेत इस्लामधर्माचा प्रश्नही उपस्थित होणं शक्य नाही.

## अध्याय–१९

या अध्यायातही पुन्हा अल्ला, नारायण, ईश्वर हे एकच होत, हा समभाव वर्णिला आहे. (ओ. ६२). सर्वसामान्य माणसांत चुकीच्या ईश्वरविषयक कल्पना कशा प्रसृत होतात, यावर टीकाही केली आहे. (ओ. १२५).

यानंतर पुन्हा कवी म्हाइंभट-ईश्वर-संवादाकडे वळतात व महानुभाव तत्त्वज्ञानाचं विवरण करतात. म्हाइंभटांनी मोक्षाची आवश्यकता व संकल्पना याविषयी विचारलेल्या प्रश्नाला ईश्वरानं उत्तर दिलं आहे. समाजात मोक्षाविषयी ज्या चुकीच्या कल्पना आढळतात. त्यावरही शहामुनींनी या अध्यायाच्या शेवटी टीका केली आहे.

## अध्याय–२०

'सिद्धान्तबोधा' च्या एकोणिसाव्या अध्यायाच्या प्रारंभी श्रीकृष्णवंदन व स्तवन केलं आहे तर विसाव्या अध्यायाच्या प्रारंभी रुक्मिणी आणि पांडुरंग यांना वंदन केलं आहं. (हे महानुभाव पंथाच्या परंपरेशी सुसंगत नसून वारकरी परंपरेशी सुसंगत आहे, हे लक्षात घ्यायला हवं.) हा भाग कुणी नंतर तर लिहिला नसावा, अशी शंका येते कारण यापुढे पुन्हा महानुभाव तत्वज्ञानविषयक

विवरण केलं आहे. या अध्यायातही म्हाइंभटानं ईश्वराला विचारलेल्या मोक्षविषयक प्रश्नाचं उत्तर अधिक विस्तारानं दिलं आहे.

'मुख्य परमेश्वर कवण? जे ओळखती ज्ञानलोचन।

त्यासी मोक्षपदाचे ठेवण। प्राप्त होय निजभाग्ये'।। (ओ. १५४)

हे या विवेचनाचं सार अध्यायान्ती सांगितलं आहे. महानुभाव संप्रदायाला अभिप्रेत असलेली मोक्ष -संकल्पना यात आली आहे.

## अध्याय–२१

या अध्यायात म्हाइंभटांनी विचारलेल्या इतर प्रश्नांची उत्तरं ईश्वरानं दिली आहे. यातील संज्ञांसाठी तत्त्वज्ञानातील 'पदार्थ' हा शब्द योजिला असून तो लक्षात घेण्याजोगा आहे. महानुभाव तत्त्वज्ञानातील सृष्टीची निर्मिती व विस्तार त्रिगुणविचार, पंचमहाभूतं, प्रपंच, माया इ. विषयी विवेचन केलं आहे.

## अध्याय–२१-अ

म्हाइंभटांच्या आणखी काही प्रश्नांची उत्तरं या अध्यायात ईश्वरानं दिली आहेत. त्यांत आधी ईशमाहात्म्य सांगून 'प्रपंच' या 'पदार्था'चा महानुभाव तत्त्वज्ञानानुसार अधिक विस्तारानं विचार केला आहे. 'पदार्थ' या तत्त्वज्ञानातील विशिष्ट पारिभाषिक संज्ञेचा कवीनं या अध्यायात वारंवार उपयोग केला आहे. या अध्यायाचा समारोप असा-

'जाहला एकविसावा प्रसंग। प्रपंच-पदार्थांचा योग।

गुरुकृपेने यथासांग। निरूपिला भाविकां'।। ओ.१६९।।

त्याचप्रमाणं कवीचं नम्र आत्मनिवेदनही आहे.-

'मी तंव जड पर्वतापरी। कविता-ओघ निघे बाहेरी।

श्रवणें श्रोता स्नान करी। पवित्र होईल गंगेमाजी'।। ओ.१७३।।

## अध्याय–२२

या अध्यायाच्या प्रारंभी लोक मोक्षप्राप्तीसाठी कोणकोणत्या साधनांचा उपयोग करतात, ते सांगितलं आहे. या अध्यायाच्या सत्ताविसाव्या ओवीत 'या ग्रंथाचे निरूपण। उत्तरार्ध परिसा सज्जना' असं म्हटलं आहे. यातील 'उत्तरार्ध' हा शब्द लक्षात घेण्याजोगा आहे. हा 'सिद्धान्तबोधा'च्या महानुभावीय तत्त्वविवरणाचा उत्तरार्ध आहे कारण यानंतरच्या तिसाव्या अध्यायापर्यंत हेच विवेचन केलं आहे.

या अध्यायात **'जीवा'** विषयी सविस्तर विवेचन केलं आहे व तदनुषंगानं पाच ज्ञानेंद्रियांचा विचार केला आहे. ब्रह्म व जीवं यांतील भेदाविषयीशी म्हाइंभटांनी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर ईश्वरानं दिलं आहे. जीवाचा आयुष्याशी संबंध असल्यानं शैशव, तारुण्य व जरा या आयुष्याच्या

त्रिविध अवस्थांचं वर्णन करून साधनेनं हे जीवित सार्थकी लावावं, असा उपदेश केला आहे. तत्कालीन समाजाचं जीवनदर्शनही या अध्यायात ओघानंच केलं आहे, ते महत्त्वपूर्ण आहे. या अध्यायातील महाप्रलयाचा उल्लेख (ओ. २१९) इस्लामधर्मातील महाप्रलय-संकल्पनेशी मिळताजुळता आहे. अध्यायाच्या शेवटी शहामुनींनी स्वतःचा नामनिर्देश केला आहे.

### अध्याय-२३

या अध्यायात महानुभाव तत्त्वज्ञानाला अभिप्रेत असलेलं ब्रह्म, माया (अविद्या), ईश्वर, जड, चंचल, वेद-पुराण, उद्गम, वर्णभेद इ. विषयासंबंधी प्रश्नोत्तररूप सविस्तर विवरण केलं असून हाही म्हाइंभट-ईश्वर-संवादच आहे. तथापि यात कवीनं आपल्या कल्पनेनंही काही विवरण केलं आहे.

वर्णभेद सांगताना 'यवनयातीचा प्रकार' सांगितला आहे. ज्याला यवन 'आदम' म्हणतात तो वैष्णव 'दिल्य ऋषी' असून शिवोपासक 'कार्फ ऋषी' होता. ते एकमेकांच्या देवतांची निंदा करीत, अशी अजब काल्पनिक माहिती ही कवी इथं देतो! महानुभाव पंथविषयक व तत्त्वज्ञानविषयक विवरणात यवनयाती-विवरणाचा काहीही संबंध नाही, हे सांगण्याची आवश्यकता नाही.

आपल्या ग्रंथाचं महत्त्व व वेगळंपण कवी या शब्दांत सांगतो-

'ऐका श्रोते सज्जन। या ग्रंथाचे निरूपण।
नुरे संशयाचे भान। तरीच परिसा सादर।।
ज्याची मति अतिनिश्चळ। होय बुध्दि बहुकुशळ।
तो तत्त्वशोधनीं पायाळ। ज्ञानांजन लेवोनी।।
तयावांचोनि हा ग्रंथ। रुचि न पडे वाचितां अर्थ।
म्हणोनि सुज्ञ पुरुषासी उचित। होय लाभ श्रवणेंची'।। ओ.१-३।।

अन्य संप्रदायांच्या तत्त्वज्ञानांपेक्षा महानुभाव तत्त्वज्ञान वेगळं असल्यानं शहामुनींना ही सूचना द्यावी, असं वाटलं असावं. त्याचप्रमाणं आपल्या कवित्वाविषयीचा यथार्थ आत्मविश्वासही त्यांच्या लेखनातून इथं प्रकटला आहे.-

'भाविकांसि ब्रह्माची खाणी। उघडिली पहावया लोचनीं।
ऐसी अक्षरांची कोंदणी। करीन ग्रंथांतरी, ते ऐका।। (ओ. ७)

अध्यायाच्या शेवटी २४१ व्या ओवीत शहामुनींनी स्वतःचा उल्लेख केला आहे.

### अध्याय-२४

प्रारंभी 'निर्विकार' निरंजनास वंदन केलं आहे. श्रीहंस 'सिंहाद्रीचा रहिवासी' दत्तात्रेयप्रभू, श्रीकृष्ण, परमपुरुष (श्रीचक्रधरस्वामी) यांना केलेल्या वंदनातून महानुभावत्व प्रकटतं. तत्त्वचिंतनाच्या दृष्टीनं हा अध्याय महत्त्वाचा असून त्यात षड्दर्शनं, ज्ञान-कर्म-भक्तिमार्ग, (चार आश्रमांऐवजी) पाच आश्रम (यात परमहंस या पाचव्या आश्रमाची भर घातली आहे) इ. चं विवरण केलं आहे. या अध्यायाच्या शेवटी शहामुनींचा नामनिर्देश आहे.

## अध्याय-२५

प्रारंभी 'अव्यक्त चैतन्यपर' परमेश्वरास नमन केलं असून आपली नमनपद्धती वेगळी आहे, आपण इतरांप्रमाणे अन्य देवदेवतांना वंदन करीत नसून केवळ 'मुख्य देवा'लाच वंदन करतो, हे हेतुपूर्वक सांगितलं आहे. हा देव 'अविद्याबंधछेदन' करणारा आहे.

'इतर कवींचा अनुभव। नमनीं-स्तवनीं अनेक देव।
माझा एकचि भाव। मुख्य देव नमियेला।।ओ ७।।

चार युगं, लोकप्रचलित अवतारकल्पना व त्यांच निरसन, समाजातील रूढ समज-अपसमज, जीवोद्धारासाठी ज्ञान-साधनेचं महत्त्व इ. विवरण या अध्यायात आलं आहे. या ग्रंथाची महत्ता समारोपात अशी वर्णिली आहे-

'ऐकावी ग्रंथाची मात। कौतुक वाढेल या जगात।
म्हणती 'आम्ही जन्मात। शहामुनी देखिला' ।। ओ.२५८।।

## अध्याय-२६

या अध्यायात दशावतारांचं वर्णन करून त्यापेक्षा आपलं महानुभावीय मत वेगळं कसं आहे. ते सांगितलं आहे. म्हाइंभटांच्या प्रश्नावरूनच या वेगळेपणाची जाणीव होते-

'अहो, विष्णूचे दहा अवतार। ऐसा पुराणांतरी गजर।
तुम्ही तो निवडतां भिन्नाकार। अवतारचर्चा वेगळी '।। (ओ. ७७)

यानंतर मोक्षसाधनासाठी महानुभावीय आचारधर्मांचं पालन करावं, याविषयी विवेचन केलं आहे.

'कीजे गृहस्थाश्रम-त्याग। संसाराचा मानिजे उबग।
सर्व विषयांचा संग। वांतिप्राय मानिजे'।। ओ. २७४।।

महानुभाव तत्त्वज्ञानातील अहिंसेचं महत्त्व या शब्दांत सांगितलं आहे-.

'स्थुळ -सूक्ष्म जीवजंतु। मनुष्य पक्षीयांतू।
कोणाचा करू नये घातु। हा परमार्थ भक्तांचा।। (ओ. २८५)

पुढील ज्ञानाची व्याख्या महानुभावीय 'सिद्धान्तसूत्रपाठा'तील व्याख्येशी जुळते-

'जीव, प्रपंच, देवता। जो परमेश्वर मोक्षदाता।
या जाणिजे चौ पदार्था। 'ज्ञान' यास म्हणावे।। ओ. २८८।।

भक्ति, ज्ञान, वैराग्य। हा स्वरूपप्राप्तीचा मार्ग।
आचरेल तो सौभाग्य। होय योग्य मोक्षासी'।। ओ. २९२।।

असं सांगून मार्गदर्शनही केलं आहे-

'शहामुनीचे प्राकृत वचनें। मान्य करी ईश्वर'।

असं म्हणून अध्याय-समाप्ती केली आहे-.

### अध्याय-२७

या अध्यायात राम, वामन-परशुरामादी विविध पौराणिक आख्यानांबरोबर हंसकथा वर्णिली आहे. समारोपात शहामुनी 'कापडी' झाल्याचा उल्लेख करतात-

'घेऊनि भक्तीची कावडी। रामेश्वरा नेतो आवडी।
शहामुनी होउनि कापडी। तोडी बेडी' ।। ओ. १९१।।

### अध्याय-२८

दत्तात्रयास नमन करून या अध्यायात दत्तावताराविषयी विस्तारानं विवरण केलं आहे. त्यात देवतांचं अनेकत्व, दत्तविषयक विविध कल्पना, दत्तनाम-माहात्म्य, गोरक्ष-दत्तसंवाद, दत्तमहिमा इ. विषय आले आहेत.

गोरक्षानं दत्ताला अव्देत-व्देताविषयी जे सांगितलं ते उल्लेखण्याजोगं आहे-

'गोरख म्हणे ब्रह्म अव्देत। तयासी साक्षी वेदांत।
स्वरूप निरामय अव्यक्त। द्वैत तयाते साहीना '।। (-ओ.२२६)

या अध्यायाचा शेवट असा-

'तुटे अनेक मतांचा झगडा। होय परमार्थ रोकडा।
शहामुनीचा चाडा। साह्य जाहला सद्‌गुरू' ।।ओ.२५८।।

### अध्याय-२९

या अध्यायात दत्तवंदन, कृष्णावतार व कृष्णलीला, गीता-भागवताचं थोरपण इ. विवरण केलं आहे. या दोन्ही ग्रंथांचं अधिष्ठान महानुभाव तत्त्वज्ञानात आहे.

'कृष्णासमान नाही अवतार ब्रह्मांडी जाण' हे सूत्र त्यात आहे. भक्ती व विरक्ती यांचं महत्त्व अन्य अध्यायांप्रमाणं यांतही वर्णिलं आहे.

या अध्यायाचा समारोप असा-

'संदेह हरीला सद्‌गुरूनें। मालागी ग्रंथ केला कवीनें।
शहामुनीची वचनें। भूषणे होती भाविक '।।ओ. २०२।।

### अध्याय –३०

या अध्यायाच्या प्रारंभीही दत्तवंदनच आहे. बौद्ध अवताराचाही उल्लेख केला आहे. महानुभाव संप्रदायाच्या संदर्भात या अध्यायातील विवेचन फार महत्त्वाचं आहे. श्रीचक्रधर-नाममहिमा, ब्रह्म विद्येचं महत्त्व, भक्ति-वैराग्य-ज्ञान यांची लक्षणं, ईश्वराचं गुणवर्णन इ. विषयांचं विवरण यात केलं आहे. यातील उल्लेखण्याजोग्या ओव्या अशा-

(१) 'या चक्रधरनामाची प्रौढी। ज्याचे वाचेमजी गडवडी।
तो उभवील मोक्षाची गुढी। कलि त्यासी बाधेना' ।।ओ.६२।।

(२) 'माझी ब्रह्मविद्या हे शास्त्र। काळासि अजिंक शास्त्र।

त्या अनुतिष्ठावें पवित्र। परम सूत्र ईश्वरी' ।।ओ.१४६।।

या अध्यायाचा समारोप असा-

'यापरी बोधोनि व्दिज। सांगितले गोप्य, रहस्य, गुज।

अवतार गुप्त जाहला सहज। तेथिला तेथें संपला।।

ब्राह्मण-ईश्वर-संवाद। परिसतां श्रोतयां होय बोध।

परमार्थ तरणोपाय अगाध। शाहामुनि बोलिला ।।ओ. १६२-६३।।

इति श्रीसिध्दांतबोधग्रंथ तत्वसारनिर्णये त्रिशंत्तमोध्यायः ।।३०।। ओव्या ।।१६३।।

श्रीकृष्णार्पणमस्तु।।

यानंतर पुढील पानावर 'श्रीसिद्धान्तबोध समाप्त' असं म्हटलं आहे. याचा अर्थ या ग्रंथाचा उत्तरार्ध इथं संपला म्हणजे मूळ 'सिद्धान्तबोध' हा ग्रंथच इथं संपला, असं मानता येईल.

## अध्याय –३१

काही अभ्यासक या ग्रंथाचे अध्याय १ ते अध्याय ३० व अध्याय ३१ ते अध्याय ५० असे दोन भाग मानतात तर काही जण या दोन विभागांचे कर्ते वेगवेगळे असावेत, असंही मानतात. ३१ ते ५० या अध्यायांतील तपशील व प्रतिपाद्य लक्षात घेतल्यावर यासंबंधी निर्णय घेता येईल.

या अध्यायाच्या शेवटी कवींनं आपले गरू मुनींद्र यांचा व स्वतःचाही निर्देश असा केला आहे-

'श्रीमुनींद्रगुरूचे वचनें। सर्वांचे झाले कल्याण।

त्या स्वामीस विसरोन। आणि काय जोडावें?

वायूचा होता स्पर्श। तरंग हेलावे समुद्रास।

तेसी गुरुकृपा शहामुनीस। उठे तर्क कवितेचा' ।। (ओ. २०२-०३)

एकाविसाव्या अध्यायात १ ते ३० या अध्यायांचं अनुसंधान असे सांगितलं आहे-

'पहिलिया प्रसंगापासोन। तिसापर्यंत केले कथन।

बहुमतांचे निरोपण। केलें भिन्नभिन्न प्रसंगी ।।ओ. ३३।।

पण त्यानंतर पुढचं विवेचन कशासाठी? याचा खुलासा केला आहे-

'बहुमतांचा कोठा खोलिला। अनेक मतांचा सिद्धांत कथिला।

पुढे उर्वरित भाग उरला। ज्यात बीज पारमार्थिक' ।। ओ. ३४।।

आणि या मताचं समर्थन करताना असंही म्हटलं आहे-

'येथूनि गुरुशिष्याचा संवाद। करितां निघेल अगाध बोध।

तुटती संशयाचे कंद। नुरे द्वंद्व कल्पनेचे ।।ओ. ४१।।

आपण भवसागरी बुडालो आहोत, 'बहुत केले ग्रंथशोधन' पण 'मन, होइना, उन्मन' असं शिष्य गुरूला सांगतो. (ओ. ५०). यासाठी गुरु पुढं मार्गदर्शनपर उपदेश करतो. त्यानंतर पुन्हा दया, क्षमा, शांती, वैराग्य, धैर्य, स्वधर्म-परधर्म, स्मरणभक्ती दान, देवपूजा इ. विषयक विवरण केलं आहे.

श्रवण कसं करावं, ध्यान कसं करावं, नाम कसं उच्चारावं, इ. साधनेतील अत्यंत प्राथमिक स्वरूपाचे प्रश्न शिष्य एकतिसाव्या अध्यायात का व कसे विचारतो, यांच नवल वाटतं, त्यामुळं ३१ व्या अध्यायापासून ५० व्या अध्यायापर्यंतच्या 'सिद्धांतबोधांच्या' भागाचा कर्ता मूळ शहामुनी नसावा, याची जाणीव होऊ लागते.

## अध्याय–३२

या अध्यायात दत्तवंदनानंतर साधु-महिमा, प्रपंच- जीव- स्वरूप, अविद्या, पापपुण्य, अष्टांगयोग, विवेक इ. विषयी विवेचन केलं आहे. या अध्यायाचा समारोप हे लेखन वेगळं वळण घेत असल्याचा निदर्शक आहे. त्यात विठ्ठलाचा आदरपूर्वक उल्लेख आहे–

'तुळसीपत्रे विष्णुसंतोष। बुका लाविता विठ्ठल हरूष।

शहामुनीचे नमनास। सद्गुरू होती कृपाळू।।ओ. २१२।।

## अध्याय–३३

या अध्यायाच्या प्रारंभापासूनच कवीचा वेगळा दृष्टिकोण अधिकच जाणवू लागतो. गुरुवंदनानंतर कीर्तनाचा महिमा सांगितला असून ते शिव आणि ब्रह्मा यांनाही आवडतं. असं म्हटलं आहे. यानंतर प्रकृति-पुरुष-भेद, भक्तिज्ञान, ब्रह्मविचार, सद्गुरु- 'सत्शिष्य-लक्षणं', वर्तणुकीच्या खुणा (उदात्त आचारधर्म) इ. विषयक विवरण केलं आहे. 'पूज्य-पूजक नाही दुजा। मीच देव माझी पूजा' (ओ. ८६) यासारखं विवेचन कवीची अद्वैतमताकडे वाटचाल होत असल्याचं निदर्शक आहे. ब्रह्मविचारात 'सकळ ब्रह्म एक' असं म्हटलं आहे. (ओ. १००) तर दशावतारांविषयी 'दाहा अवतार एक विष्णु' असं म्हटलं आहे. (ओ. ११४).

अध्याय-समाप्तीच्या वेळी कवी म्हणतो<br>
तुम्हा संतांचे आशिर्वाद। लिहिली अक्षरे केला विनोद।<br>
शहामुनीचा हर्षानंद। पूर्ण कर्ता श्रीगुरु ।।ओ. २२३।।

त्यांचं हे निवेदन पूर्वीच्या निवेदनापेक्षा काहीसं 'बाळबोध' वाटतं. 'लिहिली अक्षरे, केला विनोद' असं शहामुनी स्वतः:च आपल्या ग्रंथाविषयी कसं म्हणतील? हा प्रश्न पडतो.

## अध्याय–३४

या अध्यायाच्या प्रारंभी 'निर्विकार' सद्गुरूला नमन केलं आहे. ब्रह्माचं ॐकारस्वरूप, पंचप्राण, वेदशास्त्रमाहात्म्य, सत्त्वरजतमादी त्रिगुणभेद, मायेचं मूळ, चार मुक्ती इ. विषयी विवरण

करून अद्वैतबोध-महिमा वर्णन करण्यावर मुख्यतः लक्ष केन्द्रित केलं आहे-(ओ. ६९-९३). या अध्यायाची समाप्तीही ३३ व्या अध्यायाच्या समाप्तीच्या पार्श्वभूमीवर लक्षात घेण्याजोगी वाटते- 'तो जाहला गुरू कृपाळू। परिपूर्ण रसिक कल्लोळू।
वर्षला ज्ञानशुद्धी परिमळू। शहामुनी तृप्त सदा' ।। (ओ. ३००)

### अध्याय–३५

या अध्यायात गणेशवंदनानंतर ब्रह्मा-विष्णू, महेश यांना वंदन केलं आहे. यावरून 'या' कवीची श्रद्धा कोणत्या देवतांवर होती, हे कळतं. या अध्यायातील 'संतनामावळी' फार महत्त्वाची असून तिच्याकडे आजवर कुणा अभ्यासकाचं लक्ष गेलेलं दिसत नाही. यांत मत्स्येंद्र, गोरखनाथ इ. नाथसांप्रदायिक संत आहेत. रामानंद, कबीर, नानक आहेत. रोहिदास आहेत, शेख महमद, चांद बोधले, बाजीद पठाण, शहा हुसेन, शहा शमना आहेत. राघव केशवचैतन्य आहेत. तुकोबा-रामदास आहेत. मीरा, जनाबाई, कान्होपात्रा आहेत. शांतीलिंगसारखे वीरशैव संतही आहेत पण महानुभाव संत मात्र नाहीत, हे लक्षात घ्यायला हवं.

हा कवी आपण महानुभाव परंपरा मानीत नाही, असं तर यातून सूचित करीत नाही? अशी शंका स्वाभाविकपणेच मनात येते व हे विवेचन हेतुतः अद्वैतमताकडे झुकत असल्याचं जाणवू लागतं.

या अध्यायात कर्मसिद्धान्त, उच्चनीचभाव- विरोध, गुरुमहिमा इ. विषयांचं विवरण केलं आहे. राम आणि कृष्ण यांत भेद नाही, असाही विचार मांडिला आहे. (ओ. ९६)

'निर्गुण सगुण जगदाकारु।
गोठले ब्रह्म एकचि' ।। (ओ.९८)

अशी भूमिका प्रतिपादिली आहे. या संतनामावळींतील सर्व संत अद्वैतवादी आहेत. हेही लक्षात घेण्याजोगं आहे. आपली परंपराही अद्वैतमताधिष्ठित आहे, हे या कवीला इथं सुचवायचं आहे.

### अध्याय–३६

प्रारंभी दत्त व सद्गुरू यांना नमन केलं आहे. २ ते ११ या ओव्यांत शहामुनींची वंशावळ दिली आहे. त्यातील काही भाग उद्धृत करतो. या वंशावळीत शहामुनींच्या घराण्यात शिव, गणेश, विष्णू यांची उपासना केली जात होती, याचे निर्देश केले आहेत-

'आता नमूं वंशावळी। जन्म घेतला ज्यांचे कुळी।
पणजा आमुचा मुळीं। नाव त्याचे शहाबावा ।।ओ.२।।
महाराष्ट्र आणि पारशी। उभयपक्षी विद्या त्यासी।
आराधिलें होते शिवासी। एकनिष्ठ उपासना ।।३।।
आमिना होती त्याची अंगना। परम पतिव्रता सत्य जाणा।

ती प्रसवली पुत्ररत्ना। नाम त्यांचे जनाजी ।।४।।

तो करी विष्णूची भक्ती। मंडुबाई तयाची प्रकृती।

ती प्रसवली पुत्र सुमती। नाम तयाचे मानसिंग।।५।।

त्याची भार्या नाम अमाई। लोक म्हणती तिला ताई।

ती आम्हासी जाहली आई। जन्मविलें पवित्र कुशीतें।।६।।

पिता होता गणेश-उपासक। पोटी आजा आला नामधारक।

हे जाणोनि कौतुक। नाम ठेविले 'शहाबाबा' ।।७।। (-अधोरेखन माझं)

यानंतर गीतेच्या पहिल्या सहा अध्यायांचा 'प्राकृतार्थ' सांगितला आहे. 'बैसे अद्वैत-बोध - ठसा। ब्रह्म दिसे दाही दिशा।।'(ओ. १७५) हे त्यातील अन्तः सूत्र आहे.

## अध्याय-३६

या अध्यायात प्रारंभी दत्तवंदन करून गीतेच्या सातव्या अध्यायापासून बाराव्या अध्यायांपर्यंतचा 'प्राकृतार्थ' सांगितला आहे. त्यातही 'अद्वैतबोध' केला आहे-

'यापरी जो अद्वैतबोधी। श्रीकृष्ण पार्थासी प्रबोधी।

ज्ञानाचा जगी सुधाब्धी। मीही बंदी तयासी' ।।ओ. ८४।।

## अध्याय-३८

या अध्यायात आधी पंढरीचा महिमा वर्णन करून त्यानंतर गीतेच्या तेराव्या अध्यायापासून पंधराव्या अध्यायांपर्यंतचा 'प्राकृतार्थ' सांगितला आहे. त्यातील अद्वैताचं सूत्र असं आहे-

'तोचि गा उत्तम पुरुष। पवित्र जगन्निवास।

जेथें असेना आभास। नसे लेश द्वैताचा।।ओ. १४०।।

अध्यायसमाप्तीत 'शहामुनी सेवक संतांचा।सद्भावे तुळसीपत्र वाहिलें।।' असं म्हटलं आहे. या सर्व विवेचनातून कवीचा वारकरी संप्रदायाकडील ओढा स्पष्ट होतो.

## अध्याय-३९

कवी संत कबीराचा महिमा वर्णन करून 'तोही माझा गुरू पूर्ण' असं विसाव्या ओवीत सांगतो व त्यानंतर गीतेच्या उरलेल्या १६, १७, १८ या अध्यायांचा 'प्राकृतार्थ' सांगतो. 'ब्रह्म एकवट। द्वैतातील अव्दय जे।। '( ओ. १२८) हा विचार कवीचा व्दैतविरोध स्पष्ट करतो.

## अध्याय-४०

दत्त-वंदनानंतर निराकार परमेश्वराला नमन केलं आहे. त्यानंतर ध्रुव- आख्यान सांगितलं आहे. चार पुरुषार्थ, वैराग्याचं महत्त्व, सत्संग-माहात्म्य इ. विषयी विवरण केलं आहे. या अध्यायाच्या १८० क्र. च्या ओवीत ग्रंथाचा शेवट झाल्याचं कवी सांगतो, तेव्हा ग्रंथाचा नेमका शेवट कोणता, ११ याचा संभ्रम पडतो-

'जाहला ग्रंथाचा शेवट। आहे तैंचि बोलिलो स्पष्ट।

अनुभवे उघडिल। स्पष्ट उठविला लोट ज्ञानाचा'।।

आपले गुरू मुनींद्र यांच्या आदेशावरुन आपण 'ग्रंथ' समाप्त करीत असल्याचं निवेदन 'शहा' या नाममुद्रेनिशी कवी करीत आहे. (ओ. २०२-२०४)

यापूर्वी या ग्रंथाचा माहिमाही १९५ ते १९९ या ओव्यांत कवीनं स्वतःच वर्णिला आहे. त्यांतील एकच ओवी पुढं देतो-

'संसार-समुद्र गहन जाणोन। सिद्धांतबोध-नौकेत बैसोन।

सायुज्यतीरा उतरोन। सुखी नांदा, भय नाही'।। ओ.१९५।।

## अध्याय-४१

या अध्यायात प्रथम दत्त व गुरू यांना वंदन केलं आहे. लोपामुद्रेचे तत्त्वचिंतनात्मक प्रश्न व त्यांची उत्तर अद्वैतबोधच करतात.'जीव ब्रह्मीचा अंश। तो लिंगदेही बिंबला असे? हा विचार ११६ व्या ओवीत प्रतिपादिला आहे. याशिवाय मंदोदरी-सुलोचना- कथा, राममहिमा इ. विवरणही या अध्यायात आहे. चाळीसाव्या अध्याय-समाप्तीप्रमाणंच याही अध्यायाच्या शेवटी 'शहा' ही नाममुद्रा आहे, हे लक्षात घ्यायला हवं.

## अध्याय-४२

दत्त व निर्गुण यांना वंदन केल्यावर अनुसूयेची कथा सांगत तत्त्वविवरण केलं आहे. आपल्या ग्रंथासंबंधी वर्णन करून कवीनं ग्रंथाचं महत्त्वही १८६ ते १९५ या ओव्यांत विशद केलं आहे. त्याचा गाभा या ओवीत आहे-

'प्रगट केला बोध अगाध। दाविला बहुमतांचा भेद।

शेवटी केला अद्वयानंद। निश्चयाचा श्रेष्ठ जो।। (ओ. १९१)

या अध्यायाच्या शेवटीही

'पुढे समसप्तीचा प्रसंग। ज्यांत दिसेल आत्मरंग।

स्थिर होईल मन-तुरंग। लागे लग्न जीवा-शिवा'।। ओ.१९९।।

असं म्हणून अद्वैतमतप्रतिपादन केलं आहे. पण अद्यापि ग्रंथ संपला नाही, अशी सूचनाही त्यातून मिळते. ही सूचना 'या' कवीला वरचेवर का द्यावी लागते, अशी शंका मनात येते.

## अध्याय-४३

प्रारंभी सर्व देव, गणेश, सरस्वती यांना वंदन करून मैनावती, भर्तृहरी, रत्नाकर, चंद्रसेन इ. च्या कथा सांगितल्या आहेत. शेवटी 'शहामुनी' ही नाममुद्रा आहे.

## अध्याय-४४

या अध्यायात कवीनं दत्तवंदनानंतर संतसज्जनांना वंदन केलं आहे कारण 'सर्वाभूतीं समसमान। लक्षिती ब्रह्म एकत्र' असा समभाव त्यांच्यामध्ये आहे. कानिफनाथ, गोरक्ष-मत्स्येंद्र-संवाद इ. विषय

या अध्यायात आले आहेत. प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधून भक्ती करावी, असा (वारकरी संप्रदायाचा) संदेश या अध्यायात दिला आाहे. 'संताचे मोचे घेउनि शिरी। निवांत राहिला शहामुनि' या शब्दांनी हा अध्याय संपविला आहे.

## अध्याय-४५

दत्तवंदनानंतर 'निरामय निर्विकार' परमेश्वराला वंदन करून सद्गुरुमहिमा भक्तमहिमा, जातिभेद व वर्णभेद यांतील विषमतेस विरोध इ. विषयांच्या विवेचनाबरोबरच अद्वैतमत-पुरस्कारावर विशेषकरून लक्ष केन्द्रित केलं आहे. 'हा अद्वैतबोधाचा सिद्धान्त' (ओ. १७३), 'हा अद्वैतबोधाचा प्रताप' (ओ. १७६), 'व्दैतपणाचा मत्सर त्यागून राहिला पै. अद्वैती' (ओ. १९५), 'अद्वैतबोध गुरूची किल्ली' (ओ. १९९), इ. कितीतरी उल्लेखांवरून हे सहज स्पष्ट होईल. वर्णजातिभेदांतील विषमतावादाला प्रखर विरोध करताना कवींन मार्मिक दृष्टान्त दिले आहेत–

'मडकें महाराघरी नीच जाहलें। ब्राह्मणाघरी उंचपण पावलें।
परी मडकें उंच-नीच नाहीं जाहलें। आपल्या स्वरूपी खपरा।। (ओ. १५७)

## अध्याय-४६

मंगलाचरणात नारायण, गणेश, सरस्वती व गुरू यांना वंदन करून लगेच कवी चिद्विलासवादाकडे वळतो. हा सिद्धांत म्हणजे ज्ञानेश्वरीचा व वारकरी तत्त्वज्ञानाचा गाभा होय 'हा' कवी 'व्दैतमताच्या अज्ञाना' वर अध्यायाच्या सुरुवातीच्या ओव्यांतच टीका करायला विसरत नाही–

'सांगेन अनेक पंथांचे गुंथाडे। द्वैतभेदाचे कल्प गाढे।
अज्ञानाचे श्रवणी भरे वेडें। लाभ जोडे सज्ञान ।।ओ. १९।।

आणि श्रोत्यांना हेतुतः जी विनंती करतो, त्यातलं मर्म जाणायला हवं–

'**यालागी समग्र ग्रंथ शोधावा**। कळेल वोळखावयाची मात।
उडेल संशय-कल्पनाजात/जिरे ऊर्मी मनाची ।।ओ. २४।।

त्याप्रमाणं ही दुसरी सूचना कवीला का करावी लागली, तेही सहज लक्षात येतं.–

'रचना सिद्धांतबोधग्रंथी। ज्यांत उगवे अवघीच गुंथी।
परंतु मध्ये चित्तांत भ्रांती। श्रोतेजनी न आणिजे।। (ओ. १८)।।

वरचेवर 'परमार्थ म्हणजे शुद्ध अव्दैत'।। (ओ. ३८) असं कवीला सांगावं लागत आहे. शिवाय मुनींदगुरुचा दाखलाही द्यावा लागत आहे–

'मुनींद गुरूचा उपदेश असे। यालागीं शहामुनि नाम असे।
कल्पना सोडून चतुर पुरुषें। अर्थ मनासी आणिजे'।। (ओ. १३)

अध्यायासमाप्तीत 'शहामुनी' ही नाममुद्रा आहे. (ओ. २०१)

## अध्याय-४७

प्रथम श्रीदत्त व 'ब्रह्मांडकर्त्या' ईश्वराला वंदन केलं आहे. ग्रंथानुसंधान सांगताना कवीला हे स्पष्टीकरण का द्यावं लागावं, ते समजून घ्यायला हवं. तीस अध्यायांत केलेलं' विविध मतांचे गंभीर व प्रगल्भ तत्त्वविवेचन ही त्याला 'मौज' कशी काय वाटू शकते, असा प्रश्न इथं मनात निश्चितच येतो-

'तीस प्रसंगापर्यंत। सांगेन अनेक मतांचे सिद्धांत ।

ती मौज आणेनि मनांत। पुढे लक्ष ठेविजे' ।। ओ.१२६ ।।

मध्ये मध्ये राम-कथा, कुरुक्षेत्र -संग्राम इ. विषय येतात ते कवीच्या गोष्टीवेल्हाळपणाचे द्योतक वाटतात.

व्दैतमतवाद्यांना कवी 'भेदवादी काल्पनिक' म्हणतो व अव्दैतमताचा पुरस्कार करतो-

'जो स्वयें मुक्त पुरुष। त्यासि विश्वचि ब्रह्म दिसे।

भेदवादी काल्पनिकास। भिन्नाकार भासत ।। ओ. १०५।।

इथं पुन्हा कवीची गुरुपरंपरा सांगण्याचे काहीच प्रयोजन नव्हतं कारण ती पूर्वी काही वेळा सांगितली आहे पण ग्रंथाच्या या विभागाचा तो स्वाभाविक अंश वाटावा, यासाठी ती सांगितली असावी, असं वाटतं-

'मुनि नाम गुरुस्वामीस। शहा शरण असे त्यास।

म्हणोनि शहामुनि नामास। प्रसिद्ध ग्रंथ मांडिले।।' (ओ.१०६)

यात प्रथम 'शहा'व नंतर 'शहामुनी'असे कवीचे उल्लेख आहेत.

## अध्याय–४८

दत्तनमनानंतर या अध्यायात माया-ईश्वर, धर्म-अधर्म, पाप-पुण्य, सगुण-निर्गुण, जीव-शिव, वर्ण-जातिभेदांतील विषमता यांविषयी विवरण केल आहे पण कवीचं सारं लक्ष कशावर आहे ते पाहा 'जो **अव्दैतबोधी** जाहला निमग्न। कोटी यज्ञांचे केले साधन। भक्ति-ज्ञान- वैराग्यपूर्ण। सर्वही त्याने जोडिले' ।। ओ.१९७।।

शंकराचार्यांचे सर्परज्जू आदि दृष्टान्तही विवेचनाच्या ओघात आले आहेत. (ओ. १०१)

## अध्याय–४९

या अध्यायात अव्दैतबोधाचा उद्घोष जागोजाग केला आहे. त्यातील वानगीदाखल एक उदाहरण पाहा-

'अव्दैतबोध ठसावयासी।कोटी पुण्याच्या पाहिजेत राशी।

निरसे कल्पना सुखसंतोषी। हे ज्ञान लाभे गुरुकृपें' ।। ओ.२५६।।

आपण पूर्वी काही (अव्दैतमतविरोधी वा व्दैतमतसमर्थनपर) विवेचन केलं असताना कळत-नकळत काही दोष घडला असल्यास 'हा ' कवी क्षमाही मागतो-

'जाणतां-नेणतां घडले दोष।क्षमा करणे विरुद्ध तुम्हास।

शरण आलिया पायांस। दया करणे उचित' ।। ओ.२७।।

एवढंच नव्हे तर

'अहो, श्रोते सज्जन। समग्र ग्रंथाचे करा शोधन।

अर्थ मतीस आल्या भरोन। संतोष पावोल जीव आत्मा' ।। (ओ.२२२)

असंही 'हा ' कवी म्हणतो। एकूण समग्र ग्रंथाच्या वाचनावर त्याचा भर यासाठीच दिसतो की तिसाव्या अध्यायानंतर व्दैतमतविरोध व अव्दैतमतसमर्थन केलं आहे. हा ग्रंथाचाअविभाज्य एक भाग वाटावा म्हणून पूर्वी दिलेली गुरुपरंपरा इथंही दिली आहे व 'हीच शहामुनीची जोडी' आहे असं सांगून पुनरावृत्ती केली आहे. (ओ. २४३)

**अध्याय–५०**

हा 'सिद्धांतबोधा'चा सर्वांत मोठा अध्याय असून त्याची ओवीसंख्या ४९५ आहे. या अध्यायात जागोजाग 'या ' कवीनं पुन्हा अव्दैतमताचं समर्थ केलं आहे व द्वैतमतविरोध केला आहे.

'परउपकारासाठी सिद्धांतबोध केला। सोली व स्वानंद।

ज्यात कोंदला ब्रह्मानंद। जिरे फुंद द्वैताचा' ।। (ओ.१९२)

यातील शेवटच्या चरणावरून 'या ' कवीचा अद्वैतमताभिनिवेष स्पष्ट होतो. महानुभावांचा उल्लेख 'मानभाव ' असा केला आहे-

'अविंध म्हणे 'रोटी' देखा। मानभाव त्यास म्हणे 'कोरका'।

'भाकर' म्हणती महाराष्ट्रा मुखा। परदेशी म्हणे 'चुपरिया' ।। (ओ.४७)

अद्वैती मूळाप्रत जातात तर व्दैती मात्र फक्त फांद्या व पानं धांडोळीत राहतात. असं म्हणून द्वैतमतसमर्थकांवर टीकास्त्र सोडलं आहे.

'अद्वैती लक्षती एक बुडास। भेदी मोजी शाखापत्रांस।

यालागी मन त्याचे फोस। गुरु-भक्त ना घेती' ।। (ओ.५७)

या टीकेतील खोच सहज लक्षात येते, त्याचप्रमाणं 'फोस ' सारखी शब्दरचनाही टोचणारी आहे.

तिसाव्या अध्यायापर्यंतच्या काही अध्यायांत महानुभाव पंथाचं व द्वैतमताचं विवरण का केलं याविषयी समर्थन करताना 'तो कवींचा' 'तर्क' आहे असं समजा ' असं 'हा ' कवी म्हणतो, ते पाहून 'मूळ सत्य' काय असावं, ते उमजू लागतं-

'म्हाइंभटाच्या वक्तृत्वात। विवरोनि दाविले अनेक पंथ।

**त्यात वक्तृत्वाचे साहित्य।** 'तर्क' समजा कवीचा'।। (ओ.३८)

**'तीस प्रसंगापर्यंत कथा। निवेदिला मतांचा भेद पुरता।**

**ऐशिया बहु सृष्टीच्या कथा। कोठवर लिहाव्या कवीने'**।। (ओ. ३८७)

यातील 'कवी' हा शब्दही चिन्त्य आहे. दशावतारविषयक कल्पनेविषयी मंडन-खंडनात्मक विवेचन केलं असतानाही या कवीला पुन्हा असं समर्थन करावं लागलं आहे!

'दहा अवतार विष्णूचे न होती। अवतार भिन्न देवाचे असती।

ही पंथवादियांची मती। कवीचा बोध तो नोहे'।। (ओ.३८८)

मग पूर्वी (तीस अध्यायांपर्यंत) द्वैतमतप्रतिपादन व त्यानंतर आता त्याविरुद्ध अव्दैतमतप्रतिपादन आपण कशासाठी करीत आहोत? याच 'स्पष्टीकरण' मोठं उद्‌बोधक आहे :–

'ऋषि भिन्न वंदले अठरा पुराण। हे कथिले मतभेदभाषण।

**समजावया** अभेदलक्षण। भेदप्रकार दाविला'।। (ओ.३८९)

'आता सांगो भेदांचे खंडण। **तिसांपासोन परिसा सज्जन।**

**मुख्य कवीचे बोलणें।** जे ज्ञान गुरुकृपेचे '।। (ओ.३९०)

एवढंच नव्हे तर शहामुनींची गुरुपरंपराही आपलीच (अव्दैतमतवादी) आहे, असंही प्रतिपादिलं आहे. श्रीदत्त-मुनींद्र-शहा अशी परंपरा सांगताना मुनींद्रांना अचानक स्फुरण उद्‌भवलं व त्यांनी शिष्याला वेगळं (अद्वैमतवादी) तत्त्वविवरणपर मार्गदर्शन केलं. त्यामुळं तिसाव्या अध्यायानंतर ग्रंथातील प्रतिपाद्यात परिवर्तन झालं, असं स्पष्टीकरणही 'हा' कवी देतो–

'मुनींद्रस्वामीची कृपा पूर्ण। चित्तवृत्ती समाधान।

त्यात उद्‌भवले स्फुरण। कवण शक्ती वदावया'।। (ओ.३८०)

शके सत्राशेत 'ह्या' ग्रंथाची समाप्ती झाल्याचा निर्देश शहामुनी-शिष्य भगवंत नारायण पांढरकामे (पाडळी-धायगुडेनिवासी) यानं प्रतलेखन करताना, केला आहे. (ओ. ४९८-९९)

हा या **प्रतीचा** लेखनसमाप्तिकाळ असावा.

## 'सिद्‌धान्तबोध': एक अवघड कोडं

'सिद्‌धान्तबोध' चा इतका तपशीलवार व सूक्ष्म अभ्यास इथं प्रथमच केला जात आहे. आजवरच्या कोणत्याही अभ्यासकानं इतका तपशीलवार विचार का केला नसावा. याचं फार आश्चर्य वाटतं. मी स्वतः 'सिद्‌धान्तबोधा'ची हस्तलिखितं धांडोळण्याचा फार प्रयत्न केला. बीड जिल्हयातील शहागडला शहामुनींची समाधी आहे, तिथं अनेकदा गेलो. त्यांच्या शिष्य/वंशपरंपरेतील लोकांनाही भेटलो. अनेक महानुभाव हस्तलिखित-संग्रहात धांडोळा घेतला पण हस्तलिखित स्वरूपातील

'सिद्धान्तबोध' उपलब्ध झाला नाही. माझे स्नेही (व 'महानुभाव' मासिकाचे भूतपूर्व कार्यकारी संपादक, पूर्वाश्रमीचे महंत ऋषिराज शास्त्रीः त्यांच्या या कार्यकाळात मी 'महानुभाव' मासिकाचा सल्लागार- संपादक होतो-) आजचे ऋद्धिपूरचे म. गोपीराजशास्त्री यांनी मला मुंबईचे श्री. पंढरीनाथ विनायक पाठक यांनी प्रकाशित केलेली 'सिद्धान्तबोधा'ची पन्नास अध्यायांची प्रत उपलब्ध करून दिली, याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. ही प्रत लिथोप्रेसवर छापलेली असावी. तिच्या आधारेच मी इथं 'सिद्धान्तबोधा'विषयी विवेचन करू शकलो.

हा पन्नास अध्यायांचा 'सिद्धान्तबोध' म्हणजे एक भलं मोठं कोडंच होत. ते सोडविणं किती अवघड आहे, याची प्रचीती मी त्या ग्रंथाचं जे 'स्वरूपदर्शन' घडविलं आहे, त्यावरून येईलच. आजवर या ग्रंथाविषयी मराठी वाङ्मयेतिहाकार व अभ्यासक यांनी जे लेखन केलं त्यांचा सूर 'हा कवी प्रथम द्वैतवादी होता (३० अध्यायांपर्यंत) व त्यानंतर तो अद्वैती झाला' असाच आहे. या कोड्याचा काहीसा उलगडा करण्यास मला तीन महानुभाव अभ्यासकांच्या लेखनाचं फार साहाय्य झालं, त्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.

'महानुभाव' मासिकाचे भूतपूर्व संपादक श्री. तोंडोळीकर यांनी ब-याच वर्षांपूर्वी शहामुनींविषयी एक लेख लिहिला होता, त्याचा मला उपयोग झाला. (श्री. योगीराज सेंवलीकर (महानुभाव) यांनी 'दोन शहामुनी' नावाचा लेख प्रकाशित केला आहे.) डॉ. अण्णासाहेब अडसोड (महानुभाव) यांनी 'शोधबंद'[१] नामक ग्रंथात 'महानुभावः मुसलमान संत' या लेखात शहामुनींविषयी माहिती दिली आहे. प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी 'मुसलमान मराठी संतकवी' या पुस्तिकेत व डॉ. रा. चिं. ढेरे यांनी 'एकात्मतेचे शिल्पकार' या ग्रंथात शहामुनींविषयी परिचयात्मक लिहिल आहे. तथापि या महानुभाव लेखकांनी 'सिद्धान्तबोध' च्या मूळ स्वरूपाविषयी व त्याच्या कर्त्याविषयी माझ्या मनात कुतूहल व आशंकाही निर्माण केली. त्यामुळं मी या ग्रंथाचं सूक्ष्म अध्ययन करून त्याविषयी मला ते आकलन झालं ते मांडण्याचा प्रयत्न इथं करीत आहे. हे आकलन ग्रंथान्तर्गत प्रमाणांच्या आधारे केलं असून त्याविषयी अन्य अभ्यासकांनीही आपली मतं स्वतंत्रपणे प्रतिपादिली तर सर्वांनाच त्यातील वास्तवाप्रत जाता येईल, अशी माझी श्रद्धा आहे, माझंच आकलन अचूक आहे. असाही माझा आग्रह नाही. संशोधनात असा आग्रह धरणंही योग्य नाही तथापि या निमित्तानं 'सिद्धान्तबोध' आणि 'शहामुनी' यांच्याविषयीच्या वेगळ्या विचारमंथनास प्रारंभ होत आहे, याचा मला आनंद वाटतो.

## द्वैतमत-पुरस्कार

'सिद्धान्तबोध' हा ग्रंथ म्हणजे एक अवघड कोडं आहे, असं का वाटावं? या प्रश्नांचे अनेक पदर आहेत.

(१) आज उपलब्ध असलेल्या व मी निर्देशिलेल्या प्रतीत एकूण ५० अध्याय आहेत. त्यांतील पहिले तीस अध्याय म्हणजेच मूळ 'सिद्धान्तबोध' हा ग्रंथ असावा. याविषयी स्वतः (मूळ) शहामुनीचाच दाखला देता येतो. त्यानी पहिल्या पंधरा अध्यायांना ग्रंथाचा 'पूर्वार्ध' म्हटलं असून सोळा ते तीस या अध्यायांना 'उत्तरार्ध' म्हटलं आहे.

(२) पूर्वार्धात विविध दार्शनिक मतांचा विशेषत: अद्वैतमताचा-विचार केला असून हा या ग्रंथाचा पूर्वपक्ष असून उत्तरार्धात महानुभाव पंथास अभिप्रेत असलेल्या द्वैताधिष्ठित तत्त्वज्ञानाचं सविस्तर विवरण केलं आहे.

(३) त्यात पूर्वार्धातील अव्दैतमतांचं खंडन केलं आहे. त्यानंतरच्या ३१ ते ५० या अध्यायांत पुन्हा द्वैतमताचं खंडन करून अद्वैतमताची पुन:प्रतिष्ठापना केली आहे.

(४) या एकाच विचारक्रमात ठळकपणे तार्किक विसंगती दिसते. प्रथम अद्वैतमतविवरण -द्वैतमतप्रतिपादन व पुन्हा अद्वैतमतप्रतिपादन असा स्थूल मानानं हा विचारक्रम व वैचारिक प्रवास मांडता येईल.

(५) शहामुनी हे महानुभाव संतकवी होते, हे महानुभावच नव्हे तर अन्य सांप्रदायिकही मानतात व त्यांची मराठवाड्यातील बीड जिल्ह्याच्या शहागड येथील महानुभाव परंपराही सर्वमान्य आहे. महानुभाव संप्रदाय द्वैताधिष्ठित संप्रदाय असताना महानुभाव शहामुनी आपल्याच ग्रंथात द्वैतमताचं व महानुभावीय परंपरेचं खंडन कसे करतील? शिवाय ग्रंथात पूर्वपक्ष मांडून त्यांचं खंडन उत्तरपक्षात स्वमतप्रतिपादन करून पुन्हा पूर्वपक्षाचं प्रतिपादन/समर्थन कोणताही संतकवी कशासाठी करील?

(६) श्री. योगीराज सेवलीकर यांनी आपल्या लेखात हाच मुद्दा फार चांगल्या प्रकारे उपस्थित केला असून तो मलाही योग्य, तर्कसंगत व औचित्यपूर्ण वाटतो. मुसलमान शहामुनीनं केलेले पहिले तीस अध्यायच महानुभावीयांना प्रमाण आहेत; हे त्यांचं मत यासाठी मान्य करायला हवं. हा कवी पंधराव्या शतकाच्या अंती व सोळाव्या शतकाच्या आरंभी असावा, अशीही मूळ शहामुनीचा काळ दर्शविणारी माहिती योगीराज सेवलीकर यांनी दिली आहे.

(७) वारकरी संतपरंपरेत शहमुनींचा उल्लेख कुठंही आढळत नाही, हीही यासंदर्भात लक्षात घेण्याजोगी फार महत्वाच्या बाब आहे.

## महानुभावीय नमन-परंपरा

महानुभावीय नमनपरंपरेबद्दल माहिती देऊन 'सिद्धान्तबोध' च्या पहिल्या तीस अध्यायांत तिचं वेगळंपण कसं दिसतं, ते श्री. योगीराज सेवलीकर यांनी साधार स्पष्ट केलं आहे. (मीही 'स्वरूपदर्शन' विभागात याचा विचार केला असून त्यामुळं या विचारास पुष्टी मिळते.) श्री. सेवलीकार म्हणतात, 'या कवीची नमनपरंपरा महानुभावपंथीय नमन-परंपरेप्रमाणेच आहे. महानुभावीय ज्येष्ठ -श्रेष्ठ कवींनी ग्रंथारंभी पंचावतारांना व श्रीगुरूस वंदन केलं आहे तर काहींनी श्रीदत्त, श्रीकृष्ण व श्रीगुरुसही वंदन केलं आहे. हीच परंपरा शहामुनीने स्वीकारली आहे, असे स्वत: शहामुनीने मान्य केले आहे. (अ. ४, ओ. ३-४-५). तो म्हणता 'इतर कवींच्या नमनाहून माझी प्रथा निराळी आहे.' (अ. २५, ओ. ७).

पहिल्या अध्यायापासून सोळाव्या अध्यायापर्यंतचा पूर्वपक्षाचा सिद्धान्त दाखवून 'पूर्वार्ध.' पूर्ण केला आहे. या सोळा अध्यायांतील नमनांचा आढावा पाहू-अ१ ते ११ व १४ अध्यायांमध्ये श्रीकृष्णालाच नमन केलेलं आहे. अ. १२, १३, १६ पैकी १२, १३, १६ या तीन अध्यायांमध्ये निराकार परमेश्वरास वंदन केले असून १, ९ व १२ या तीन अध्यायांत श्रीगुरूस वंदन केले आहे,

तसंच अ. १, ७, १०, ११ व १४ या पाच अध्यायांत ६ वेळा नमन केलं आहे. निराकार परमेश्वरास व गुरूस तीन वेळा वंदन केलं असून श्रीदत्तात्रेयास सहा वेळा तर श्रीकृष्णास १३ वेळा नमन केलं आहे, यावरून शहामुनी श्रीकृष्ण-उपासक होता. हे निश्चित.

पूर्वार्धात नमनाची जी प्रथा आहे तीच उत्तरार्धाच्या प्रारंभी दिसते. अ. १७ च्या पहिल्या ओवीपासून एकतिसाव्या ओवीपर्यंत पुढीलप्रमाणं वर्णन केलं आहे :

पहिल्या ओवीत कृपावंत परमेश्वराला आश्रय मागून माहिमभट्टानं अनुष्ठानानंतर प्राप्त केलेल्या मोक्षदात्या नामाचा अनुभवी जगद्गुरू दत्तात्रेय-परमेश्वराचा मुख्य अवतार-त्यानं माझा अंगीकार करून माझ्या मस्तकी,हात ठेवला, त्याच्या कृपेनं जो बोध झाला तो अनुभव 'सिद्धान्त-बोध' ग्रंथात विस्तारला. ज्या गुरु-आज्ञेनं हे केलं, त्या गुरूस नमन केलं आहे.

अव्यक्त परमेश्वर, श्रीदत्तात्रेय व श्रीगुरू या तिघास पूर्वीप्रमाणंच नमन केलं आहे. उत्तरार्धातील माहिमभट्ट-आख्यान अध्याय १७ ते ३० या १४ अध्यायांत सांगितलं आहे. आता त्यांतील नमनाचा आढावा पाहू-

अ. १८-१९ मध्ये श्रीकृष्णास नमन केलेलं आहे. अ. २० मध्ये 'श्रीदत्तात्रय सद्गुरूच्या कृपेचा अंकुर माझे हृदयी प्रकट झाला, असं सांगितलं आहे'.

अ. २१-२२ व २३ मध्ये परमेश्वराचं वर्णन केलेलं असून अ. २४ निराकारासह श्रीदत्तात्रेय, श्रीहंस, श्रीकृष्ण व परमपुरुष जेणे भट्टास उपदेश केला ते श्रीचक्रधर या चार परमपुरुषांस नमन केलं आहे

अ. २५-२६-२८-२९-३० या सहा अध्यायांचा आरंभ अव्यक्त परमेश्वराला नमस्कार करून केला आहे.

## तीस अध्यायांपर्यंतची एकसंधता

'सिद्धान्तबोधा' च्या अध्यायांपर्यंत एकसूत्रता व एकसंधता जाणवते. पूर्वार्ध-उत्तरार्ध हा मध्ययुगीय ग्रंथलेखन-परंपरेस अनुकूल असाच आहे.मध्ययुगीन तत्वविवेचनपर ग्रंथांत बहुधा पूर्वार्धात 'पूर्वपक्ष' सांगून आपल्या मताखेरीज प्रचलित असलेल्या अन्य मतांचा विचार केला जातो. त्यांचं खंडन केलं जातं व उत्तरार्धात 'उत्तरपक्ष' मांडून स्वमत-प्रतिपादन केलं जातं. 'सिद्धान्तबोधा'च्या पहिल्या तीस अध्यायांत हेच घडत आहे.

श्री. योगीराज सेवलीकर महानुभाव यांचंही हेच मत असून त्यांनी ते 'दोन शहामुनी' या आपल्या लेखात पृ. २६ वर नमूद केलं आहे.

'पूर्वार्धाचे' १६ व उत्तरार्धाचे १४ असे एकूण ३० अध्याय होतात. यावरून तिसाव्या अध्यायापर्यंत उत्तरार्ध समाप्त होणंच इष्ट आहे. पूर्वार्धात अनेक ठिकाणी खंडन-मंडन व द्वैताद्वैत तत्वज्ञानाचा परामर्श घेतल्याचं अ. १६ वरून समजेल-

'ती परमेश्वराची वचने। द्रवतील मुक्तपदीची रत्ने।
तुम्ही श्रोते चातक होऊन। वरच्या वरी झेलावी।।'(१०७)

या ओवीनं उत्तरार्धात शहामुनीला अभिप्रेत असलेल्या 'महात्मपंथा'चं प्रतिपादन करून उत्तरार्धाची इतिश्री करावयाची असणं उचित आहे; परंतु या ग्रंथाचे एकंदर ५० अध्याय आहेत. तथापि शेवटचं २० अध्याय पहिल्या ३० अध्यायांशी सुसंगत नाहीत.

ग्रंथान्तर्गत प्रमाणं व महानुभावीय परंपरा यांचा मेळ घातला की पहिल्या तीस अध्यायांचा ग्रंथ हाच मूळ ग्रंथ असून त्याचा कर्ता महानुभाव मुनींद्र यांचा शिष्य शहामुनी आहे, या निष्कर्षाप्रत आपण येतो. 'सिद्धान्तबोध' या ग्रंथाला व शहामुनी यांना महानुभाव पंथ मानतो त्याचं कारण या दोहोंचं 'महानुभावत्व' हेच आहे. ३१ ते ५० या अध्यायांत अद्वैतमप्रतिपादन व अन्य देवतांची उपासना (- विशेषत: वारकरी संप्रदायास अभिप्रेत असलेली विठ्ठलाची उपासना) असल्यानं तिला महानुभाव संप्रदायाची मान्यता लाभण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आजचे 'शहामुनी' हे पंथीयांत व पंथीयेतरांत महानुभाव कवी म्हणूनच मानले जातात, हे वास्तव आपण ध्यानी घ्यायला हवं.

## ३१ ते ५० हे अध्याय कुणाचे ?

या प्रश्नाचा विचारही ग्रंथान्तर्गत प्रमाणांच्या आधारेच करायला हवा. त्यातील प्रतिपाद्य महानुभाव तत्त्वज्ञानानुसार व परंपरेनुसार नाही. उलट त्याविरोधातच हे प्रतिपादन केल्याचं जाणवतं. या वीसअध्यायांचा कर्ता मूळ शहाममुनी नसावा, हे उघड आहे. श्री. योगीराज सेवलीकर महानुभाव यांनीही हीच भूमिका मांडली असून 'अध्याय ३१ ते ५० या वीस अध्यायांचा कर्ता तसंच पूर्वार्धातील अध्याय २ मधील १२७ ते १३२ या ओव्यांमधून परिचित होत असलेला शहामुनी हा आम्हाला अभिप्रेत असणारा शहामुनी नव्हे' असं त्यांनी स्पष्टपणे म्हटलं असून त्यांचं हे मत ग्रंथान्तर्गत प्रमाणांवरूनही सिद्ध होतं.

त्यांनी या शेवटच्या वीस अध्यायांतील नमनप्रथेच्या 'अ-महानुभावत्वाविषयी त्याचप्रमाणं त्यातील विवेचनाविषयी जो मतभेद व्यक्त केला आहे व त्याच्या वेगळ्या कर्त्याविषयी जो विचार मांडला आहे, त्याच्याशी मी सहमत आहे. ते पृ. २९ वर म्हणतात, '३१ ते ५० या २० अध्यायांत पहिल्या ३० अध्यायांच्या नमनपद्धतीहून निराळी पद्धती आहे. ...... (ती) इतर ग्रंथकारांच्या नमनप्रथेप्रमाणंच आहे. ही प्रथा महानुभावांची नाही कारण ते अन्य देवीदेवतांना नमन करीत नाहीत.

कोणत्याही ग्रंथकारानं आपलं मत त्या विशिष्ट ग्रंथात प्रथमपासून शेवटपर्यंत सारखेच ठेवलेलं असतं परंतु या ग्रंथात, पूर्वार्धात खंडन करून उत्तरार्धात जे मंडन केले आहे त्याचंच पुन्हा खंडन करून ४० व्या अध्यायानं ग्रंथसमाप्ती केली असता पुन्हा दहा अध्याय लिहिले आहेत. वस्तुत: चाळीसावा अध्याय हा ३१ वा कळसाध्याय असणं सुसंगत आहे कारण ४० या अध्यायात ओवी २०२ व २०३ मध्ये

ग्रंथसमाप्तीचा उल्लेख आहे. परंतु लांबविलेल्या ग्रंथाची संपादणी करण्याचा दुस-या कवीनं जो प्रयत्न केलेला आहे तो सफल झालेला नाही. संपादणी ठिकठिकाणी उघडी पडली आहे.'

पहिल्या तीस अध्यायांतही काही उल्लेख घुसडल्याविषयी मी काही ठिकाणी ('स्वरूपदर्शनातो') साशंकता व्यक्त केली आहे. तिचा उलगडा या 'संपादणी'त होतो. वरील प्रमाणांच्या महानुभाव परंपरेच्या आधारे मूळ शहामुनी हेच पहिल्या तीस अध्यायांचे निर्माते असून मूळ 'सिद्धान्तबोध' हा पहिल्या तीस अध्यायांचाच आहे. असा निष्कर्ष काढणं क्रमप्राप्त आहे. त्यामुळंच ३१ ते ५० अध्यायांमधील कुळकथा व आत्मपर उल्लेख हे मूळ शहामुनींचं कितपत असतील, याविषयीही साशंकता व्यक्त करता येते. ते मूळ शहामुनीचे नसतीलच, असं ही 'संपादणी' सांगत असल्यामुळं मी मूळ शहामुनींच्या चरित्राविषयी अधिक 'शहानिशा' करीत बसलो नाही.

वरील निष्कर्षामुळं आता शहामुनी व 'सिद्धान्तबोध' यांच्या अभ्यासकांना व मराठी वाङ्‌मयेतिहासकारांनाही पुनर्विचार करावा लागेल.

'सिद्धान्तबोधा'च्या ३१ ते ५० या अध्यायांत शहा, शहामुनी, गुरु मुनींद्र यांचे उल्लेख आले असले तरी 'संपादणी'मुळं या अध्यायांची विश्वासार्हता संपली असून त्यांचा कर्ता अज्ञात असावा. या अव्दैतसमर्थक कवींविषयी स्वतंत्र संशोधन करायला हवे. तो मुसलमान आहे की नाही, याविषयीही निश्चयात्मक असं काही सांगता येत नाही. योगीराज सेवलीकर महानुभाव तर त्याला 'हिंदू शहामुनी' असं म्हणतात!

मूळ शहामुनी मुसलमान असेल तर सूफी संप्रदायाशी त्यां कितपत संबंध होता याबद्दलही काही माहिती उपलब्ध होत नाही. त्यांचं 'महानुभावत्व' मात्र अबाधित आहे! मुसलमान मराठी संतकवींपैकी हे जवळपास एकमेवच असावेत.

## शहामुनींचं समाजचिंतन व समाजप्रबोधन

शहामुनींचं समाजनिरीक्षण व समाजचिंतन अत्यंत सूक्ष्म नि बारकाव्याचं तसंच चिकित्सक नि मार्मिक आहे. स्थलमर्यादेस्तव तिचा फार विस्तारपूर्वक विचार इथं करता येत नसला तरी काही ठळक मुद्यांचा विचार अवश्य करता येईल. धर्म हे समाजाचं श्रद्धास्थान आहे, त्यामुळं धर्माच्या मूलभूत तत्त्वज्ञानाविषयी समाजात भ्रामक कल्पना नसाव्यात. या तत्त्वज्ञानाचं यथार्थ व विवेकनिष्ठ, तर्कशुद्ध, बुध्दिनिष्ठ अधिष्ठान समाजमनात ठसायला हवं, म्हणजे समाजाच्या मनात वैचारिक गोंधळ राहात नाही. नाही तर मतामतांच्या गलबल्यात समाजमन भांबावून जातं नि अनेकदैवतवादाच्या चक्रव्यूहात सापडत.

'यापरि बाजार भरला। अवघा गलबलाचि जाहला।
कोण निवडील ख-या खोटयाला? बहुत वाढला बंबाळ'।। (अ. १, ओ. ६१)

अशी समाजस्थिती असल्याचं चित्र शहामुनी पाहतात:

'एक म्हणती येमाइं। एक म्हणती तुकाबाई।
एक म्हणती सटवाई। तेचि रक्षील आमुतें।।
एक म्हणती खंडोबा। एक म्हणती बहिरोबा।
एक म्हणती हाजगोबा। म्हाळसाचा भाविती' ।।

परमात्मतत्त्व तर एकच आहे. देवदेवतांची नावं वेगवेगळी असली तरी देव एकच आहे. ही एकेश्वरवादांची बुद्धिनिष्ठ व तर्कशुद्ध भूमिका मांडून शहामुनी आपल्या समाजप्रबोधनाचा पहिला, महत्त्वपूर्ण पायाभूत टप्पा ग्रंथाच्या पहिल्याच अध्यायात गाठतात. धर्माच्या तत्त्वज्ञानाविषयीच्या संकल्पना धूसर नसून सुस्पष्ट असाव्यात, म्हणजे समाज अनेकदैवतवादाच्या भोव-यात गरगरत नाही व त्याचा बुद्धिभेदही होत नाही, ही शहामुनींची निष्ठा आहे.

धर्मांच्या निमित्तानं काही रूढी समाजात निर्माण होतात. त्यांना अंधश्रद्धाही कारणीभूत असतात. त्यामुळं मूळ चांगल्या धर्मसंकल्पनांवर एक प्रकारचं सावट येतं व भोळा अज्ञ समाज अंधश्रद्धांच्या मार्ग धावू लागतो. त्यामुळं समाजाचं एक प्रकारे नुकसानच होतं. देवदासींची प्रथा, गळ टोचण्याची रूढी, अंगात वारं संचारण्याच्या कल्पना इ. वर शहामुनींनी पुढील शब्दांत प्रखर टीका केली आहे-

'गरती वनिता नवस करिती। 'पोटीची कन्या देवदासी' वदती।
त्या मुरळ्या होऊन व्यभिचार करिती। धन्य नवस त्यांचे।।
एक पाठिंसी गळ टोंचिती। उफराटा टांगोनि फिरविती।
तो म्हणे, 'मी धन्य जगती। कसीं उतरलो देवाचे' ।।
एक नागवे निंब नेसती। एक खोडे बेड्या लेती।
एक मस्तकी भळंदं घेती। घुमो लागती मंडपीं।।
एकाचे अंगे वारें भरत। धावोनि लोक पायां पडत।
दात चावोनि आसुडे देत। हाडें मोडीत कडाकडां' ।। (अ. १, ओ. ३८-४१)

व्रतवैकल्यं व तीर्थयात्रा यांचं मूळातील प्रयोजन व मर्म लक्षात आल्यानं त्यांचं रूपांतर यांत्रिक कर्मकांडात झालं तर त्याचा इष्ट असा परिणाम समाजमानसावर होत नाही व समाज कर्मठपणात, कर्मकांडात गुंतत गुंतत जातो.-

'एक म्हणती, तीर्थें करावी। एक म्हणती, व्रतेंचि बरवी।
एक म्हणती, अवघी वाया गेली। नामस्मरण चांगलं।
एक म्हणती, कीजे तप। एक म्हणती, होम- जप।
एक म्हणती, देऊळ, मंडप। केलीया कीर्त राहिल।। (अ. १, ओ. ५७-५८)
ऐसी ऐसी जनांची प्रकृती। घरोघरी लोक बरळती।
सारासार न विचारिती। नुसती करिती वळवळ' ।। १-६० ।।

या ओवीत सारासार विचाराचा म्हणजेच विवेकनिष्ठेचा विचार आला असून तोच तर समाजप्रबोधनाचा खरा पाया किंवा अधिष्ठान आहे. जोवर हे समाजाच्या लक्षात येत नाही तोवर समाजमानस भरकटलेल्या व गोंधळलेल्या अवस्थेत राहील. यासाठी या समाजाला योग्य (बुद्धिनिष्ठेची) शिकवण द्यायला हवी व अशा प्रकारे त्याचं प्रबोधन करायला हवं, असं शहामुनींना वाटतं, म्हणून या संपूर्ण ग्रंथात त्यांनी विवेकनिष्ठ जीवनदृष्टींचा पुरस्कार केला आहे. समाजाच्या यथोचित धारणेस ही भूमिका उपयुक्त व मार्गदर्शक अशीच आहे.

मूळात काळ हा अखंड आहे, अमर्याद आहे. तो आपल्या बुद्धीच्या कवेत यावा म्हणून आपण आपल्या आकलनासाठी त्याची विभागाणी युगं, शतकं, दशकं, मास, सप्ताह, वार इ. त केली पण त्या वारांच्याभोवतीही शुभाशुभाचं वलय काही जणांनी निर्माण केलं नि त्यातही समाज घोटाळू लागला-

'एक म्हणती अनंतव्रत। एक एकादशीच करीत।

एक म्हणती, सोमवाराचा गुह्यार्थ। प्रगट न कळे कवणासी।।

एक करिती चांद्रायण। एक म्हणती, शिवरात्री धन्य।

एक म्हणती, नारायण। कोण करितो खटपट?।।

एक मंगळवार करिती। एक शनिवार-रविवार धरिती।

गळां साकळी बांधे होती। भुंको लागती श्वानाऐसें' !।। (अ. १, ओ. ३५-३७)

ऐहिक जीवन कसं जगावं, ते जगण्यासाठी कोणते जीवनादर्श आपल्यासमोर ठेवावेत, याचाही विचार शहामुनींनी 'सिद्धान्तबोधा' त जागोजागी केला आहे. याचं कारणही त्यांनी पहिल्या अध्यायाच्या शेवटी सांगितलं आहे-

'दुर्लक्ष मनुष्यदेह पावोन। परमेश्वराच्या भक्तीवीण।

जळो जळो ते वोखटें जाण। कोण भोगील क्लेशाते?'(१-१४६)

कोणताही समाजप्रबोधनकार ज्यात समाजाचे हित आहे, अशा आदर्श जीवनमूल्यांचा पुरस्कार करतो. ज्यामुळं समाजात असंतुलन निर्माण होतं, अशा बाबी देखीलही तो नाकारतो, यासाठी शहामुनींनीही जातिभेदासारख्या नकारात्मक बाबींवर टीका केली आहे.

अज्ञान किंवा 'अविद्या' हे समाजात चुकीच्या कल्पना पसरण्याचं आदिकारण आहे, या वर्मांवर ते नेमकेपणानं बोट ठेवतात. यासाठी अविद्याच समाजातून नाहीशी व्हायला हवी, महात्मा ज्योतीबा फुले यांनी एका अविद्येमुळं किती अनर्थ होतात, याचं जे मार्मिक वर्णन केलं आहे, ते या संदर्भात आठवतं. समाजाची घडी नीट बसायची असेल तर क्षमा, शांती, वैराग्य, धैर्य परमतसहिष्णुता

यासारख्या उदात्त जीवनमुल्यांचं महत्त्व समाजाला पटायला हवं, हे लक्षात घेऊन त्यांचा सविस्तर विचार शहामुनी 'सिद्धान्तबोधा'त अनेक ठिकाणी करतात. हे जीवनादर्श आचरणात आणून आपणं सर्वांनीं 'सज्जन'व्हावं म्हणजे संपूर्ण समाजाचं कल्याण होईल, असा हितोपदेशही ते करतात.

शहामुनींच्या 'सिद्धान्तबोध' या ग्रंथाच्या नावातच 'बोध' आहे. त्यातील प्रबोधनाचा उद्देश स्पष्ट आहे आणि त्याची फलश्रुती त्यांनी अशीच अपेक्षिलेली आहे.

## ग्रंथाची थोरवी

शहामुनींनी आपल्या ग्रंथाची थोरवी ज्या शब्दांत वर्णिली आहे, त्यावरून या ग्रंथाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश पडतो, तो मुद्दामच विस्तारानं देत आहे–

१) विदुराच्या घरीचे भोजन। श्रध्देनें स्वीकारी श्रीकृष्ण।
तेसी शहामुनींची वचने पूर्ण। परिसता तृप्ती श्रोतयां।। (१x१५०)

२) 'सिद्धांतबोध' हा ग्रंथ। वाचितां ज्ञान होईल सत्य।
चौ-यायशीचे आवर्त। चुकती सत्य त्रीवाचा ।।१०x२।।

३) अहो, ऐका ग्रंथ प्रांजळ। होय विवेकाचा सुकाळ।
जोडीन अक्षरें सुढाळ। गोड जेवीं पीयूष।।१४x५२।।

४) इतर ग्रंथाचे ठायी। जें निरूपण प्रगट नाही।
तेंचि विस्तारले येथे पाहीं। तरीच कौतुक देवाचें।।१४x५३।।

५) येथील तीर्थवासी श्रोतियांसी। भक्तीचे अन्नसत्र।
घालूनि त्यांसी वाढी। शहामुनी ब्रह्मरसासी।
तृप्त होतील मोक्षमार्गी ।।२०-१५८।।

६) या ग्रंथाचे शोधन। करो नि राहाटे ज्यांचे मन।
त्यांचे चुके जन्म-मरण। सत्य साक्षी परमात्मा ।।२४x२४६।।

७) करोनी अंतःकरण पैस। धरा ग्रंथाची दृढ कास।
संसार-सिंधु पैलतीरास। उतरील माझा सद्गुरु ।।२४x२४५।।

८) अद्‌भुत अध्यात्मनिरूपण। पुढें येईल अतिगहन।

जोडेल मोक्षपदीचे ठेवण। ऐसी गोडी वर्षेल ।।२५x२५७।।

९) ऐकोनि ग्रंथाची मात। कौतुक वाढेल या जगांत।

म्हणती आम्ही जन्मांत। शहामुनी देखिला ।।२५x२५८।।

१०) अगा, गवंडियाचा वोळंबा। त्याआधारे करी घर उभा।

गगनीं प्रगटत चंद्रबिंब। भरती दाटे समुद्री ।।२६-१३७।।

११) कणगीआतून बीज काढून। कृषीवल पेरिती शेती नेऊन।

फिरोनी त्याची सवंगणी करुन। मली आणोनी खळीयात ।। (२२-२२४)

१२) वासनेचे बैल जुंपून। कामनेची तिफणी धरून।

शिस्नचाडियातून। सोडी बिंदू बीजासी ।।२२-१४६।।

याबर आणखी वेगळं भाष्य करण्याची आवश्यकता आहे काय?

कवी, तत्त्वज्ञ, भाष्यकार, समाजप्रबोधनकार, एकात्मतेचा पुरस्कर्ता अशा शहामुनींच्या विविध भूमिकांचा प्रत्यय त्यांच्या या तीस अध्यायांच्या ग्रंथातून आल्याविना राहात नाही. पांगारकर-प्रियोळकरांनी त्यांची जी प्रशंसा केली आहे, ती यथार्थच आहे, याची ही प्रचीती त्यांच्या या ग्रंथातून येते. (एकतीस ते पन्नास हे अध्याय इथं हेतुतः विवेचनासाठी घेतलेले नाहीत.)

## ग्रामीण शब्दकळा व प्रतिमासृष्टी

बरेच मुसलमान संतकवी महाराष्ट्रातल्या खेडोपाड्यांत राहिले. त्यामुळं ते इथल्या ग्रामजीवनाचाच एक अविभाज्य घटक झाले होते. ग्रामजीवन आणि कृषिजीवन यांतील शब्दकळेचं वेगळंपण आणि सौंदर्य त्यांच्या लेखनातुन प्रकटतं. शहामुनी हेही याच ग्रामजीवनात जन्मले-वाढले असल्यानं त्यांच्या 'सिद्‌धान्तबोधा'तही या **ग्रामीण शब्दकळेचं** आगळंवेगळंपण जाणवतं. वानगीदाखल काही उदाहरणं देत आहे (ही उदाहरणं पहिल्या ३० अध्यायांतीलच आहेत).- परडी, जोगवा, चोंडके, संबळ, मसणवटा, कोरांट्या, शीव, लडबड, पेटारा, खबुदर, कोयता, गोंधळी, भराडी, घुमारे, वाघे, मुरळी, किचाटे, पेरणी, आठरापगड, वोळंबा, गवंडी, जाईफुले, वैराग्यपट्टा, झाडा, छापा, सुगरणी, खैर, इंगळ, शूळ, ताडातोडी, झांपडी, गुंढी, माटी, कोडा, बिडाल, दिढी इ.

'सिद्‌धान्तबोधा'तील **ग्रामीण प्रतिमासृष्टीचं** वैभवही अत्यंत देखणं आहे. पहिल्या तीस अध्यायातील असंख्य उदाहरणं इथं देता येतील पण स्थलमर्यादेस्तव फक्त निवडक उदाहरणं देतो-

१) वोखटे पाखरू जन्मले। जैसी हरभ-यांची टरफले।

निमालियाचे नेत्र पसरे। कवण्या पदार्थ लक्षिती ।।१x१०१।।

२) मोटेचा नाडा गेला तुटोन। पुढे पाट बाहील कशाने?।

पुरुषांचे सरलिया व्यसन। संतती कोठून होय? ।।३x८९।।

३) पक्षियाचे पर उपडिले। उडावयाचे स्फुरण गेले।

भाजले बीज शेती पेरिले। धान्य पिके कासयाने?।।३x९०।।

४) अधोलीच्या मापाने। धान्य मोजिती शाहाणे।

तैसे माझ्या सुखाने। माप घाली सद्‌गुरु ।।५x१६७।।

५) चुन्याचे टिमणे शेतात। पाहोनी पळती मृंग तेथ।

ते काय शेतात राखणाइत। मृषाकल्पना कुरंगाची ।।९x४८।।

६) पानकोंबडा लपनडाई। वळल्या करिसी चारसी गाई।

खासी चोरिसी दुग्ध, साई। हस्त पुशीसी टिरीशी ।।१०x५।।

---

## संदर्भ-टीप

(१) शोधबंद, डॉ. अण्णासाहेब अडसोड, मीरा प्रकाशन, पुणे २००१, पृ. ७५-७७.

# १३. लतीफशहा

'महाराष्ट्र-सारस्वता'च्या पाचव्या आवृत्तीत लतीफशहांचा उल्लेख नसावा, यांच आश्चर्य वाटतं. अन्य वाङ्मयेतिहासकारांनी सोळाव्या शतकातील कवींमध्ये त्यांचा उल्लेख केला आहे. त्यात (१) डॉ. अ. ना. देशपांडे, (२)डॉ. स. गं. मालशे, (३) संतकविकाव्यसूचिकार चांदोरकर यांचा उल्लेख करायला हवा, (४) श्री. दा. का. थावरे यांना संपादिलेल्या 'सकल संत-गाथे' तील 'संतांची जीवनगाथा' या संपादकीय विवरणातही लतीफशहांविषयी चांगली माहिती मिळतें. एवढं असूनही लतीफशहांचं चरित्र नि त्यांच लेखन यावर फारसा प्रकाश पडत नाही; ते काहीसं धूसर वाटत. उपलब्ध सामग्रीच्या आधारे त्यांच्याविषयी विवेचन करण्याचा प्रयत्न करीत आहे.

## लतीफशहांचा काळ

श्री. थावरे यांनी लतीफशहांचा जन्म इ. स. १६८९ मध्ये झाल्याचं व त्यांची जीवनयात्रा इ. स. १७५२ मध्ये संपल्याचा निर्देश केला आहे. तथापि त्याला आधार दिलेला नाही. मोरोपंतांच्या 'सन्माणिमाले' त त्यांचा असा उल्लेख आढळतो-

'ख्यात तुकारामस्तुत, साधुसभा प्राणवल्लभ, लतीबा हृदया।
स्मर त्यासि असो श्रीभगवद्भक्त जाति भलति वा'।।

यातील 'ख्यात' आणि 'तुकारामस्तुत' हे शब्द मला महत्त्वाचे वाटतात. श्री. थावरे यांच्या मतानुसार लतीफशहांचा काळ सतराव्या शतकाच्या उत्तरार्ध व अठराव्या शतकाचा पूर्वार्ध असा येतो. ज्या अर्थी ते 'तुकारामस्तुत' आहेत, त्याअर्थी ते इतके उत्तरकालीन नसावेत. महिपतींनीही 'भक्तविजया'त त्यांची चरित्रकथा वर्णिली आहे. स्थूल मानानं त्यांचा काळ सोळावं शतक असावा हे मानण्यास हरकत नाही.

## चरित्र

लतीफशहा यांचा जन्म हाला गावी झाला. ते पुढं हाला गाव सोडून कोटडीत आले, असा उल्लेख श्री. दा. का. थावरे यांनी केला आहे. त्यांचं घराणं 'सैयद' नूरमहम्मद नावाच्या मौलवींकडे त्यांचे इस्लामधर्मांचं शिक्षण झाल. त्यांचा सूफी संतपरंपरेशी संबंध असावा, असं श्री. दा. का. थावरे यांनी केलेल्या विवेचनावरून जाणवतं. ते म्हणतात, ' 'लतीफजी मोठे तत्त्वज्ञ होते आणि कमालीचे प्रभुप्रेमी होते. सूफी संतांच्या मालिकेत ते सर्वोच्च भक्तभागवत होते.' याच विवेचनात श्री. थावरे म्हणतात, 'लतीफजी थोर संत होते, तथपि संमग्र चरित्र उपलब्ध नाही. हिंदू-यवनांमधील भेद-मतभेद दूर करावयाचे फार मोठे कार्य त्यांनी केले.'

महिपतींनी 'भक्तविजय' या ग्रंथात लतीफशहांचा महिमा अशा प्रकारे वर्णिला आहे-

'लतीफशहा मुसलमान। परमभाविक वैष्णवजन।
गीता-भागवत करी श्रवण। श्रीरामभजन अहर्निशी।।

सांडोनि आपुला यवनधर्म। किर्तनी लाविले अद्‌भुत प्रेम।

अर्चन-पूजा नित्य नेम। करी निःसीम आवडी' ।।

यातील 'सांडोनि आपुला यवनधर्म' ।। हा भाग वाच्यार्थानं घेता येणार नाही कारण तसे ऐतिहासिक उल्लेख आढळत नाहीत. त्यांनी आपला धर्म सोडला नव्हता, मात्र ते वारकरी संप्रदायाशी समरस झाले होते, असा याचा भावार्थ होय.

'ते अखंड भजन करीत ...... लतीफजींच्या जीवनात साधुलक्षणे अवतरलेली होती, असे म्हणतात. लतीफजींना शांतिब्रह्म एकनाथांचा अनुग्रह लाभला होता.' असा चरित्रात्मक तपशीलही श्री. थावरे यांनी दिला आहे.[५]

ते रामभक्त होते, असं काही वाङ्‌मयेतिहासकारांनी म्हटलं असलं तरी वरील माहितीच्या आधारे व उपलब्ध असलेल्या त्यांच्या एकुलत्या एका पदाच्या आधारे ते विठ्ठलभक्त असावेत असं फारतर म्हणता येईल. हे पद धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिरात उपलब्ध झाल्याचा निर्देश डॉ. ढेरे यांनी 'मुसलमान मराठी संतकवी.' या पुस्तकात केला आहे. ते पद असं आहे- (पण यातील विठ्ठल म्हणजे ईश्वरच होय-)

'आता पूजा कोठे वाहू ? पाहता देहीच झाला देवु।

भावे पूजन करिता। देहि देव जाला तत्त्वतां।।

ताडू गेली तुळसीपाण। तेथे अवघा मधुसुदन।।

अन्न, गंध, पुष्प, धूप। अवघे विठ्ठलस्वरूप।

फळ, तांबूळ, नैवद्य। पाहतां अवघाचि गोविंद।।

म्हणे लतीफ ब्रह्मज्ञानी। अवघा पाहता चक्रपाणी' ।

यातील 'अवघे विठ्ठलस्वरूप' 'तुळसीपान', 'गोविंद' इ. उल्लेखांवरून लतीफशहांचा वारकरी संप्रदायाशी असलेला अनुबंध स्पष्ट होतो. शिवाय त्यांनी घेतलेला एकनाथांचा अनुग्रह ही बाब या विचारास पूरक ठरते. या अभंगातील अव्दैतविचार, ईश्वराशी एकरूप होण्याचा विचार व सूफीमतातील एतद्‌विषयक विचार यांतील साम्यही आपण लक्षात घ्यायला हवं. यासाठी त्यांचं दक्खिनी भाषेतील उपलब्ध असलेलं. पुढील पद उपयुक्त वाटतं.[६]–

'बजारगीर देख नहिं उपजता नहिं गावदी। आंख्या होके दुनिया आंधी।।

आजब आजब हू इस तनका। घडी पहेर खेल है नहीं गारुडका।।१।।

राजा ओर रंक एक रहा। सबकी मट्टी हो जाय घडी पलख तनकी।।२।।

कहे लतीबशा गुरु मिला जब हमकू। संसार झूटा गारुड हो गया तबकू' ।।३।।

हे भारूड 'गारूड' या विषयाचं असुन संत एकनाथांनीही 'गारूड' नावाचं भारूड लिहिलं आहे, याचं इथं स्मरण व्हावं. त्यातील गुरुमहिमा, सर्व प्राणिमात्रांतील समानतेची भावना, विश्वाचं

अशाश्वतत्त्व, त्यामागील आत्मतत्त्वाचा शोध म्हणजेच आत्मज्ञानाचा शोध इ. बाबी सूफींच्या 'तसव्वुफ' मध्ये आणि वारकरी तत्त्वज्ञानात समानच असल्याचं आढळतं. लतीफशहा यांनी हिंदू-मुसलमानांत एकात्मता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न यासाठीच केले असावेत. अशा प्रकारे धर्मप्रबोधनाबरोबर समाजप्रबोधनाचे व परस्परसामंजस्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करून लतीफशहांसारख्या संतांनी केलेलं सांस्कृतिक कार्य निश्चितच लक्षात घेण्याजोगं आहे.

## साहित्य

'संतकविकाव्यसूचीकार' श्री. चांदोरकर ' लतीफशहांच्या नावावर 'ग्रंथ व पदे' असल्याचा निर्देश करतात पण आजवर त्यांचा कोणताही ग्रंथ उपलब्ध झालेला नाही. धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिरातदेखील डॉ. रा. चिं. ढेरे यांना लतीफशहांची केवळ तीन हिन्दी पदं मिळाली व एकच मराठी पद मिळालं एवढ्या लोकप्रिय संताची रचना इतकी अत्यल्प असणं शक्य नाही. तिचा शोध महाराष्ट्रात ठिकठिकाणी विखुरल्या गेलेल्या हस्तलिखितांत घ्यायला हवा.

---

## संदर्भ-टीपा

१) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग दुसरा, डॉ. अ. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७३, पृ. १४६-४७.

२) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २, म. सा. परिषद, पुणे प्रकाशन, १९८२ पृ. ३८५, ६२०.

३) संतकविकाव्यसूची, पृ. ९५

४) सकलसंतगाथा, संपा. दा. का. थवरे, प्रका. वसंतराव नागदे उस्मानाबाद, पृ. २७०-७२.

५) कित्ता, पृ २७०.

६) कित्ता, पृ २७१

७) कित्ता, पृ. १४८-४९.

८) संतकविकाव्यसूची, पृ ९५.

---

# १४. शेख सुलतान

अठराव्या शतकातील मुसलमान संतकवींपैकी शेख सुलतान हे एक लक्षात घेण्याजोगे संतकवी होत. त्यांना 'शाहीर' म्हणावं की 'संतकवी' म्हणावं, असा संभ्रम पाडणारी त्यांची रचना व शैली आहे. खरं तर, शेख सुलतान हे मुळातले शाहीरच पण त्रिपुटी येथील गोपाळनाथ यांच्या सान्निध्यामुळं नि अनुग्रहामुळं या शाहीराचं 'रूपान्तर' सन्तकवीत झालं. गोपाळनाथांचं एक चरित्र त्रिपुटी मठाचे श्री. वि. भा. घोलप यांनी तेथील श्रीनाथ सेवा मंडळाच्या वतीनं इ. स. १९७० मध्ये प्रसिद्ध केलं. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी 'एकात्मतेचे शिल्पकार'[१] या ग्रंथात याचं चरित्राच्या आधारे शेख सुलतानांविषयाचं विवेचन केलं आहे. साताराचे श्री. द. व्यं. देशपांडे यांनीही पुढं 'श्री. नाथ गोपाळ' हे श्रीगोपाळनाथ चरित्र लिहिलं. या ग्रंथाला माझा पुरस्कार आहे.'

मराठी वाङ्मयेतिहासकारांनी व अन्य लेखकांनी शेख सुलतान यांची जी दखल घेतली, तिचं स्वरूप असं आहे–

## (१) महाराष्ट्र-सारस्वतकार वि. ल. भावे [१]

'गोपाळनाथांच्या शिष्यांत शेख सुलतान व गोविंदनाथ हे दोघे प्रसिद्ध आहेत. शेख सुलतान हा पंढरीचा वारकरी असून त्याची अभंगरचना त्याची समाधी गोपाळनाथांच्याच गावी म्हणजे त्रिपुटी येथे आहे.'

याच पानावरील तळटीपेत शेख सुलतान हे शिवकाळातील नसल्याचा उल्लेख सारस्वताच्या पुरवणीकारांनी असा केला आहे–

'मागे शेख सुलतान हा तुकारामाचा समकालीन होत, असे चुकीनें म्हटले आहे, ते रद्द समजावे.'

पुरवणीकारांनी पृ. ८३३ वर त्यांचा केवळ नामोल्लेख समकालीन मुसलमान संतकवींत करून या सर्वच कवींची कविता अनुकरणात्मक असल्याचा शेराही मारून टाकला आहे. शेख सुलतानांच्या कुठल्याही रचनांचं अवलोकन वा वाचन न करता असा अभिप्राय देणं हे अन्यायकारच होय. डॉ. तुळपुळे यांची या संदर्भातील मूळ विधानं अशी'–

'शेख महंमद, शेख सुलतान, जिंदा फकीर दादू पिंजारी, शहा बेग वगैरे ज्ञात व अज्ञात असे एकूण पाचपन्नास मुसलमान कवि मराठी भाषेत काव्यनिर्मिती करीत असें दिसतें, परंतु यांपैकी बहुतेक सर्व कवि विठ्ठलभक्त असल्यानें भागवतधर्मीय संतकवींचे अनुकरण करून लिहिलेली त्यांची कविता मराठी भाषेंत असली तरी तींत मुसलमानांच्या चालीरीतींचे व संस्कृतीचे प्रतिबिंब पडलें नसल्याने ही मुसलमानांची जातीय कविता होय, असें म्हता येणार नाही. किंबहुना या कवितेतील कवीची नाममुद्रिका काढून टाकली तर ती मुसलमानी कविता आहे हे कळुनहि येणार नाही, इतकी ती हिंदू वळणाची आहे.'

इथं सारस्वताचे पुरवणीकार या मुसलमान संतकवींची प्रशंसा करताहेत. की त्यांच्यामधील (त्यांना वाटणा-या) उणीवांवर बोट ठेवताहेत, हे उमजेनासं होतं! शिवाय सारस्वतकार व पुरवणीकार म्हणतात त्याप्रमाणं शेख सुलतान हे वारकरी संप्रदायाचे नसून त्यांनी विठ्ठलभक्तिपर अभंगलेखन केलं नाही.

## (२) मुसलमानांची जुनी मराठी कविता

या पुस्तिकेत प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी क्र. ८ वर एका पृष्ठातच का होईना, शेख सुलतानांचं एक मराठी पद उद्‌धृत करून ब-यापैकी नोंद घेतली आहे"-

## (३) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास –डॉ. अ. ना. देशपांडे

दोन पृष्ठांमध्ये डॉ. देशपांडे यांनी शेख सुलतान यांचं चरित्र व साहित्य याविषयी साररूपानं चांगली माहिती दिली आहे. तीच इथं उद्‌धृत करतो म्हणजे या कवीच्या जीवनाची व कार्यांची कल्पना येईल. शेख सुलतानांचा प्रारंभीच केलेल्या 'अविंध संत' हा उल्लेख मात्र काहीसा खटकतो. ते म्हणतात' 'हा अविंध संत शाहू छत्रपतीच्या काळातला. त्यांचा आश्रय लाभलेला. ब-हाडजवळच्या कार्वे गावचा राहणारा. हा मूळचा तुरेवाला शाहीर. शृंगारिक लावण्यांबरोबर भेदिक लावण्या रचण्यातही प्रवीण. साता-याच्या गोपाळनाथ नामक सत्पुरुषाचा सत्संग त्याला लाभला व त्याच्या शृंगारासक्तीचा ओघ आटून तेथें ईश्वरी प्रेमाचा वृक्ष वाढीस लागला. रंगेल शाहीर गुरूचा अमृतरूप अनुग्रह होताच कळवळयाने हरिकथा गाणारा कीर्तनकार बनला. गुरूची सेवा, गुरूचे दाखविलेल्या मार्गाने साधना आणि वेदान्ताच्या आधारे कीर्तनरचना अशा त्रिविध प्रवाहांनी शेख सुलतानाचा जीवीतौघ संपन्न झाला. एक मुसलमान वेदान्तावर कीर्तन करतो म्हणून कर्मठ ब्राह्मणांचा तळतळाट झाला. पेशव्यांपुढे तक्रार नोंदली गेली व पेशव्यांनी स्वतः शेख सुलतानाचे कीर्तन ऐकले व त्यांनी त्याच्यावर संतोषाची फुले उधळली.'

यानंतर त्यांनी त्याच्या काव्यरचनेचा संक्षेपात एका परिच्छेदात तपशील दिला आहे, तोही उपयुक्त आहे.-

## (४) एकात्मतेचे शिल्पकार [७]

'एकातमतेचे शिल्पकार' या पुस्तकात डॉ. ढेरे यांनी शेख सुलतानाविषयी चांगलं विवेचन केलं आहे पण त्यांचा क्रम शेख महम्मदाच्या आधी त्यांनी कसा लावला, ते कळत नाही. त्यांचं चरित्र सांगताना आख्यायिकांवर अधिक भर दिल्याचं जाणवत असलं तरी शेख सुलतानांच्या जीवनाच्या व काव्याच्या आकलनास त्यांचे विवेचन उपयुक्त आहे. त्रिपुटीच्या श्रीनाथ मंडळानं प्रसिध्द केलेल्या 'श्रीनाथाधिपे दृवारी' या श्री. वि. भा. घोलप यांच्या ग्रंथाचा व त्रिपुटीच्या काही बाडांचा त्यांनी उपयोग केला आहे. त्याचप्रमाणं प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी 'मराठी संशोधन पत्रिके'च्या अंकातून प्रसिद्‌ध केलेल्या शेख सुलतानविषयक सामुग्रीचाही उपयोग केला आहे.[८]

## (५) श्रीनाथ गोपाळ [९]

यांच्या 'श्रीनाथ गोपाळ' या ग्रंथाचा यापूर्वी मी उल्लेख केलाच आहे. श्रीगोपाळनाथांच्या शिष्याविषयी ॲड. द. व्यं. देशपांडे यांनी आपल्या ग्रंथात चांगली तपशीलवार माहिती दिली आहे. १९८२ साली मीच 'पुरस्कार' लिहिलेल्या या ग्रंथातील माहितीचा मला आजही उपयोग झाला, याचा फार आनंद वाटतो. त्याप्रमाणं मध्ययुगीन भक्तिकवितेतील नाथ वे सूफी संप्रदायांच्या प्रभावाविषयीची जी अनुमानं मी १९८२

साली केली होती, ती २०११ साली का होईना सिद्ध झाली, याचाही आनंद वाटतो. श्री. देशपांडे यांच्या ग्रंथात शेख सुलतानांच्या चरित्रविषयक भागावर अधिक भर दिला आहे.

१९९४ पर्यंतचा शेख सुलतानविषयक अभ्यासकांचा प्रवास हा असा आहे.

## शेख सुलतान व त्यांचा काळ

शेख सुलतानांच्या जन्मतिथीविषयी उल्लेख आढळत नाही. वर उल्लेखिलेल्या सर्वच ग्रंथांत त्याविषयी काही सांगितलेलं नाही व कवीच्या काव्यातून त्यासंबंधीचं कुठलंही प्रमाण उपलब्ध होत नाही. त्यांना छत्रपती शाहूंचा आश्रय होता व पेशव्यांनीही त्यांचा सत्कार करून पुण्याजवळच्या मुंजेरी हद्दीतील बाग मठासाठी इनाम दिली. ही घटना" शके १६५० ची -म्हणजे इ. स. १७२८ मधील आहे.

राजाराम प्रासादी या संतचरित्रकारानं 'भक्तमंजरीमाले' च्या ४७ व्या अध्यायातील ८० ते ८७ या ओव्यांत शेख सुलतानांचं वर्णन

'सच्छिष्य महाभाविक। ज्ञातीचा यवन होता येक।

येकविध जो उपासक। सुलतान शेख नाम तया।।

गोपाळनाथस्वामीपायीं। निःसीम भक्ती ज्याची पाही। '

या शब्दांत केलं आहे. या संतचरित्रकाराकडून जन्मतिथी इ. चीही अपेक्षा होती पण ती पूर्ण झालेली नाही. त्यांनी शेख सुलतानांच्या घरीच विहीर खणल्यावर कृष्णामाई कशी प्रकटली, या चमत्कारावर भर दिला आहे. त्रिपुटी मठाचे उत्तराधिकारी श्री. घोलप यांनी दिलेल्या पारंपरिक माहितीच्या आधारे डॉ. ढेरे यांनी शेख सुलतानांचा 'समाधिदिन'-निर्याळकाळ- 'श्रावण वद्य ३०, शके १६९१-'म्हणजे इ. स. १७६९-असा नोंदविला आहे." या माहितीला त्रिपुटी मठ-परंपरेचा आधार असल्यामुळं त्याचप्रमाणं शेख सुलतानांचा पेशव्यांनी केलेल्या सत्कारचा काळ-शके १६५० (इ. स. १७२८)-हाही उपलब्ध असल्यानं शेख सुलतानं-चरित्राच्या काल-निश्चितीस मोठंच साहाय्य झालं आहे. यावरून अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात शेख सुलतानांचा जन्म झाला असून या शतकाचा उत्तरार्ध हा, त्यांचा निर्याणकाळ आहे असं स्थूल मानानं म्हणता येईल. पण अशी कालनिश्चितीही मराठी वाङ्.मयेतिहासकारांनी केली नव्हती, ती इथं प्रथम केली जात आहे.

## गुरुपरंपरा व संप्रदाय

गोपाळनाथांच्या गुरुपरंपरेच्या आधारे शेख सुलतानांची गुरुपरंपराही ठरविता येते. यासाठी श्री. द. व्यं. देशपांडे" यांच्या ग्रंथाचा फार उपयोग झाला. ही परंपरा मुळात डॉ. रा. चिं. ढेरे यांनी 'श्रीगोरक्षनाथः चरित्र आणि परंपरा' या ग्रंथात नाथसंप्रदायाच्या 'एकनाथोत्तर परंपरे' चा तपशील सांगताना पृ. १८४ वर दिली आहे. ती अशी आहे.

चांद बोधले- जनार्दनस्वामी- एकनाथ- नित्यानंद- कृष्णानंद- विसोबानंद (विश्वंभर)- मल्हारनाथ (मुरारनाथ)-रंगनाथ-गोपाळनाथ-शेख सुलतान.

गोपाळनाथांच्या अन्य शिष्यपरंपरेमध्ये

१) परमहंस- सहजनाथ- सुभाननाथ

२) गोविंदनाथ- देवनाथ- दयाळनाथ आणि

३) (शाहीर) हैबती यांचाही उल्लेख आढळतो.

त्यातून शेख सुलतान व नाथसंप्रदाय यांचा अनुबंध स्पष्ट होतो. गोपाळनाथांनी लाडणभाई टकारी नावाच्या मुसलमानास गुरुपदेश दिला होता, तो उत्तम लावणीकार होता[१३] व मराठवाड्यातील बाभुळगावी सरदार नासरजंग यांनी 'पीर' म्हणून त्यांचा आदरसत्कार केल्याचे उल्लेख आढळतात.[१४] यावरून गोपाळनाथांचा प्रभाव अन्य धर्मीयांवर होता आणि काही लावणीकारांवरही होता, असं दिसत. लाडणभाई, शेख सुलतान व हैबती हे तिघेही लावणीकार होते.

## शेख सुलतानांचं साहित्य

शेख सुलतान हे शाहीराचे कीर्तनकार झाले व पुढं त्यांचं संतात रूपान्तर झालं. त्यांच्या लेखनावर लावणीच्या व स्त्रीगीतांच्या, विशेषतः स्त्रियांचा लोकगीतांच्या, शैलीचा प्रभाव दिसतो.

### (अ) पाच कथाकाव्यं

छोटेखानी ओवीबद्ध रचना हे शेख सुलतानांच्या लेखनाचं वैशिष्ट्य आहे. त्यांच्या या छोटेखानी काव्याचा आकारप्रकार १७ ते ४९ ओव्यांचा असून त्यांचं निर्मिति-प्रयोजन संक्षेपात कीर्तनोपयोगी पौराणिक आख्यान-कथनाचं असावं, असं वाटतं.

त्यांच्या पाच कथाकाव्यांपैकी एकच सामाजिक स्वरूपाचं आहे आणि ते आहे 'कोल्हाट्याचे चरित्र.' या कोल्हाट्यातही स्वतः शेख सुलतानांप्रमाणं परिवर्तन घडतं. शृंगाररसाकडून तोही भक्तिरसाकडे वळतो. त्यांच्या अन्य चार कथाकाव्यांमध्ये दोन पौराणिक जन्मकथा ('गणपतिजन्म'व 'हनुमंतजन्म') असून त्यांची 'सती अनसूया' ही सतीत्वाचा तर 'शिवरात्रिकथा' ही शिवरात्रीचा महिमा गाते.

### (आ) आरत्या

त्यांनी काही आरत्या व पदंही लिहिली आहेत. त्यांनी लिहिलेली तुकाईची व पदमावतीची आरती प्रसिद्ध आहे. आरतीतही केवळ इष्ट देवतेची स्तुती न करता तिच्यामध्ये आपल्या नाथसंप्रदायाला अभिप्रेत असलेला आध्यात्मिक विचार व नाथसाम्प्रदायिक तत्त्वज्ञान शेख सुलतान किती कौशल्यानं मांडतात, ते पाहा-

'आरती निजानंदे। ब्रह्माई तुकाई।
तुळजापुरी राहे। योगध्यान जे ठायी।।
ॐकार नाही जेथें। तेथें निर्माण माया।
ॐकार मूळ बीज। तत्त्वे पांच पंचकाया।।
त्रिगुण रेखियले। वस्तु आणिली ठाया।

नादां दु ज्योतिरूप। देहसाक्षिणी तुर्या।।

ब्रह्मा देव तिन्ही। तुझ्या पोटीची बाळें।

निर्मा विश्वकर्ता। झाले त्रिदशा पाळे।।

ब्रह्माड ब्रह्माशक्ती। केली सप्तपातळें।

इच्छिले विश्वमाये। दृश्य ब्रह्माच्या खेळे।।

भक्ति ज्ञान वैराग्य। तुझी कृपा जयासी।

नातळे कामक्रोध। मळ धुतला काशी।।

अद्य नाम पातकाच्या। सर्व जाळिल्या राशी।

पाहता सुलतान। गुरु गोपाळ अविनाशी।।'

शेख सुलतानांच्या या 'तुकाईच्या आरती' त्यांच्या नाथसंप्रदायाच्या खुणा कशा आढळतात ते' 'योग,' 'ध्यान,' 'ॐकार,' 'नाद,' 'बिंदु,' 'ब्रह्मांड' (नाथ-संप्रदायातील पिंड-ब्रह्मांड-विचार सर्वज्ञात आहे.) यांच्या उल्लेखावरून हे लक्षात येईल. त्यांच्या 'पद्मावतीच्या आरती' तदेखील विश्वशक्तीचं वा विश्वचैतन्याचं 'ब्रह्मांडा'त भरून उरलेलं रूप वर्णिलं आहे. आरतीसारख्या छोट्या वर्णनात्मक व स्तुतिपर काव्यप्रकाराला शेख सुलतानांच्या प्रतिभेमुळं तेजस्वी नाथसाम्प्रदायिक आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची सोनरी किनार लाभली.

## (इ) पदरचना

आरत्यांप्रमाणंच त्यांची उपलब्ध अल्पस्वल्प पदरचनाही लक्षणीय आहे. एका पदात त्यांनी 'त्रिशूळ, डौरा, शिंगी' असलेल्या भैरव जोग्याचं महत्त्व वर्णिल आहे. हाही त्यांच्यावरील नाथ संप्रदायाच्या प्रभावच नाही का? डॉ. ढेरे[१५] यांना उपलब्ध झालेल्या या संतकवीच्या इन मिन तीन पदांचंही महत्त्व कमी नाही. त्यांतील एक पद 'निजयोग्याच्या शोधाचं, दुसरं संसाराचं 'हुताशन चित्रीचा धडके जैसा' असं वर्णन करणारं तर तिसरं 'हुमान' म्हणजे कोडं हे सिद्ध पुरुषाच्या कूट वाणीतलं आहे. पहिल्या व तिस-या पदावरील नाथसंप्रदायांचा प्रभाव अगदी स्पष्ट आहे. इथं शेख सुलतानांमधला तुरेवाला शाहीरच डोकावत नाही का?

शेख सुलतानांच्या मराठी पदांची त्यांच्या 'जोगी' सारख्या दक्खिनी पदांशी तुलना करण्याजोगी आहे. त्यातही 'सहज खेचरी मुद्रा' 'निरंजन' 'जोगी' हे शब्द आपल्या नाथसाम्प्रदायिक खुणा जपतात. त्यातून एका ध्यानमग्न/आत्ममग्न योग्याचं शब्दचित्र अत्यंत रेखीवपणे साकारतं–

'धुंद भया जब नयन फिरावे। देख रहे अविनासी।

सहज खेचरी मुद्रालागी। निरंजनका रहिवासी।।

बैठा आपे आप अकेला। जोगी सदा झुले मतवाला'।।

## सूफी मताचा प्रभाव ?

शेख सुलतान मुसलमान संतकवी असूनही त्यांच्यावर सुफी मताचा प्रभाव कसा नाही, याचा विचार मी करीत होतो. महाराष्ट्रातील व कर्नाटकातील (आळंद, गुलबर्गा वगैरे भागांतील) नाथसाम्प्रदायिक संत व सूफीसंत यांचा परस्परांशी असलेला संबंध सर्वज्ञात आहे. शेख सुलतानांच्या एकनाथ-परंपरेतील पूर्वसूरी चांद बोधले हे सूफीच्या कादरी शाखेचे तर शेख महंमद हेही 'सिजरा-जदि-कादरी'शी नातं सांगणारे.

तुरेवाले शाहीर शेख सुलतान यांचं रूपान्तर संतकवीत झाल्यावर त्यांच्यामध्ये या दोन्ही संप्रदायांपैकी नाथसंप्रदायाच्या खुणा स्पष्टपणे जाणवतात तर सूफींच्या खुणा अस्पष्टपणे जाणवतात. त्यांच्या पुढील[१] पदातील 'साहेब', हा शब्द स्वामी/परमेश्वर याअर्थी नाथसांप्रदायिक व सूफी हे दोघेही दक्खिनी पदांत नेहमी वापरतात–

'मूर्ति येकली मी देखिली। मसुरेपरि रेखिली।
आरक्त पीत वर्णी । श्वेत भरित कारणी।।
कृष्णवर्ण सांवळी। जे कां ब्रह्मांडातें गिळी।
साहेबनाथ गुरुकिल्ली। शेख सुलतान दाखविली' ।।

शेख सुलतानांनी लाल रंगानुभव काही हिंदी कवितांमध्ये अभिनव पद्धतीनं सांगितल्याचं डॉ. ढेरे[२] यांनी म्हटलं आहे पण त्यात सूफींचं एक लक्षणीय वैशिष्ट्य दडलं आहे, हे ध्यानात घ्यायला हवं. डॉ. ढेरे यांना सूफींची ही शैली जाणवली की नाही, ते कळत नाही पण अशा प्रकारची शैली अमीर खुसरो, जायसी यांच्याप्रमाणंच कितीतरी सूफी संतकवींच्या हिन्दी व दाक्खिनी काव्यात आढळते. साधक परमात्म्याशी किती एकरूप होतो, हा मधुराभक्तीचा प्रीतिभावही त्यातुन ओसंडतो. डॉ. ढेरे यांनी उद्धृत केलेली 'सुनो जी देखे प्यारी लाल' ही शेख सुलतानांची पदरचना याच प्रकारची आहे-

'सुनो जी देखो प्यारी लाल। साडी पहेली लाल।
गोद में लिया गुलाल। लालगी के करना।।
नैना लाल ही लाल। सुर्मा दिया री लाल।
गले मे तो मोहनमाल। चली लाल देखने।।
मुख मे तंबोले लाल। लालस करे खयाल।
होरी खेलत लाल। बांधे बन में झूल ने।।
भर सब रंग लाल। लाल ही खेले धुमाल।
चतुराई किये लाल। शेख सुलताना' ।।

यातील प्रेयसी (साधक) आपल्या 'लाल' ला-प्रियकर(परमात्म्या) ला-पाहून 'तद्रूप' होते. वाच्यार्थ व लक्ष्यार्थ हे दोन्ही समांतर प्रवाह या पदात आहेत व सूफी संतकवींच्या हिंदी व दक्खिनी रचनांमध्ये ते प्रामुख्यानं आढळतात. मराठी संतांच्या मधुराभक्तिपर लेखनातही ते आढळतात.

शेख सुलतान हे काही फार असामान्य संतकवी नाहीत. त्यांचं सामान्यत्व त्यांच्या लेखनातुन प्रकटतं, हेही मान्य करायला हवं. वाङ्मयाच्या प्रवाहात चढउतार हे येतच असतात पण ते आहेत म्हणून तो प्रवाह जिवंत राहतो व पुढं गतिमानही होतो. शेख सुलतानांचे मराठी भक्तिसाहित्याला योगदान हे अशा प्रकारचं आहे.

## संदर्भ-टीपा


१. एकात्मतेचे शिल्पकार, डॉ. रा. चिं. ढेरे, मंजुल प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. ६०

२. श्रीनाथगोपाळ, द. व्यं. देशपांडे, श्रीनाथ सेवा मंडळ, त्रिपुटी, १९८२.

३. महाराष्ट्र-सारस्वत, पाचवी आवृत्ती, वि. ल. भावे- शं. गो. तुळपुळे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६३, पृ. ६१८.

४. कित्ता, पृ ८३३

५. मुसलमानांची जुनी मराठी कविता, प्रा. अ. का. प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ प्रकाशन, मुंबई, १९६५, पृ. २९.

६. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग दुसरा, डॉ. अ. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन, पुणे १९७३, पृ. १२२-२३.

७. एकात्मतेचे शिल्पकार, डॉ. रा. चिं. ढेरे, मंजुल प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. ६०.

८. कित्ता, पृ. ७६.

९. श्रीनाथगोपाळ, द. व्यं. देशपांडे, पृ. १४३ ते १४७.

१०. कित्ता, पृ १४५.

११. एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ६५.

१२. श्रीनाथगोपाळ, पृ. १५७.

१३. कित्ता, पृ. ७९.

१४. कित्ता, पृ. ८१.

१५. एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ७२.

१६. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, क्र. १७३३.

१७. एकात्मतेचे शिल्पकार, पृ. ७३-७४.

# १५. 'रिवायत' कार गरीब अब्दुल

फार्सीतून मराठीत 'गजल' हा काव्यप्रकार आला त्याचप्रमाणं मराठी सन्तसाहित्यात 'रिवायत' हा गीतप्रकारही आला. 'रिवायत' हा इस्लामधर्मीयांचा शोकगीत-प्रकार असून त्यात हजरत इमाम हसन व हुसेन यांच्या जीवनाच्या दुःखद अन्ताबद्दल शोक प्रकट केला जातो. अहमदनगरच्या भिंगार भागात आजही 'रिवायती' मौखिक परंपरेनं रूढ आहेत. मोहरममध्ये त्या म्हटल्या जातात. अशी माहिती प्रसिद्ध इतिहाससंशोधक व अहमदनगर जिल्हा वस्तुसंग्रहालयाचे माजी संचालक श्री. सुरेश जोशी यांनी मला दिली.

अठराव्या शतकातील गरीब अब्दुल या संतकवींनी अनेक 'रिवायती' लिहिल्या. ते कुणा राजे भास्करांचे आश्रित असावेत कारण त्यांचा उल्लेख गरीब अब्दुल यांनी आपल्या रिवायतींच्या शेवटी केला आहे. रिवायतींच्या बाडांचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केला पण त्याविषयी फारशी माहिती मिळाली नाही.

गरीब अब्दुल यांच्या दोन रिवायती उपलब्ध आहेत, त्या पुढं देत आहे. पहिल्या रिवायतीत सर्वांना वंदन केलं असून आपण 'मोहरम' चे फकीर आहोत, असं म्हटलं आहे-

''प्रथम सलाम सर्वांला। लहानथोर सा-या सभेला।।
चित्त देऊन ऐका ह्याला। सत्तगुरूच्या वचनाला।।१।।
फकीर झालों मी मोहरमचा। प्रवरते शाहे हुसेनीचा ।।
निवरति आहे निरंजनाचा। फकीर मी सात दिवसांचा।।२।।
घालून विरशाचा लंगोटा। घेऊन हिंमतीचा हाती सोटा।।
ध्यानं नामाचा आहे मोठा। भक्ति जपमाळ घेऊन बोटा।।३।।
... सयालि आमुची। पंचरंगी झोळी हजार ठिगळांची ।।
लाभुनि राख दर्शनाची। धुनि लाविली मी पंची।।४।।
मोडुन घेतल्या सात शेनि। पंच राख करुनिया अगनी ।।
निरंकार पेटलि धुनी।।५।।
इरादा एक आहे आमुचा। निघुन करबला जाण्याचा ।।
हुकूम घेऊन नबाबाचा। अंतरि भेद समज ह्याचा।।६।।
गरिब आबदूल असे म्हणी। घ्यावे गुरुपुत्र समजोनि ।।
आले हैलीकोंच्या हो मैदानि। येऊ आला वा खेळुनि।।७।।''

आरे हे लोकाच्या हो मैदानि। येऊ आला वा खेळुनि।।७।।''

दुसऱ्या रिवायतीत मातेची पुत्रवियोगाची व्यथा गरीब अब्दुल यांनी चित्रित केली आहे.

''रंगित पाळना हौसेनं केला। रेसमी दोऱ्या लाऊनी त्याला।।
माझा झुलणार निघुन गेला। आता हालऊन बगु कुणाला?।।१।।
माझ्या बाळाची हौस मोठी। दागिना मोडून केली पेटी।।
माझा झुलणार निघुन गेला। आता हालऊन बगु कुणाला?।।२।।
आंगडे-टोपडे आसगराला। पिंपळपान शोभे कपाळाला।।
माझा लेनार निघुन गेला। आता हालऊन बगु कुणाला?।।३।।
आसगर माझा लहान होता। पौर्णिमेचा चंद्र दिसत होता।।
माझा झुलणार निघून गेला। आता हालऊन बगु कुणाला?।।४।।
पोक्त रिवायत गमाचि झाली। गरिब आबदुल यानें केली।।
राजे भास्कराची दया झाली। गरिब आबदुल यानें केली।।५।।

# १६. उपसंहार

गेल्या पाच दशकांच्या चिंतन-संशोधनाचं फलित म्हणजे प्रस्तुत ग्रंथ होय. जवळपास बहमनी-कालापासून पेशवाईच्या अखेरपर्यंत म्हणजे जवळजवळ चार दशकांमधील मुसलमान (सूफी) संतांच्या मराठी साहित्याचा विचार या ग्रंथात केला आहे. मुंतोजी (खिलजी) सारख्या 'वजीरुलमुल्का' पासून रिवायतकार 'गरीब' अब्दुल यांच्यापर्यंतचा हा अखंड प्रवास आहे. यात मुंतोजी बामणी (बहमनी), अंबर हुसेन, शेख महंमद, शहामुनी, आलमखान, शेख सुलतान हे महाराष्ट्रातील प्रमुख मुसलमान (सूफी) मराठी संतकवी असल्यानं त्यांच्या लेखनावर मी विशेष लक्ष केंद्रित करून त्यांच्या साहित्याचा, तत्वज्ञानाचा व कार्याचा सूक्ष्म विचार केला आहे. यांपैकी अनेक संतांच्या सूफी परंपरेचा व तिचा त्यांच्यावरील प्रभावाचा सविस्तर विचार मराठी संशोधनक्षेत्रात प्रथमच या ग्रंथाच्या रूपानं होत आहे. त्याचप्रमाणं यांपैकी अनेक संतांनी वारकरी, महानुभाव, नागेशादी संप्रदायांशी व त्यांच्या विचारसरणीशी कशी सांगड घातली, एकात्मतेच्या विचाराला कशी गती दिली, अंधश्रद्धानिर्मूलन करून विवेकनिष्ठ जीवनदृष्टी देण्याचा कसा प्रयत्न केला. पाखांडखंडन कसं केलं याचंही साधार विश्लेषण या ग्रंथात परिश्रमपूर्वक करण्याचा विनम्र प्रयत्न मी केला आहे.

यांतील अनेक संतांनी महाराष्ट्राची ग्रामसंस्कृती आपल्या ग्रामीण शब्दकळेद्वारा व ग्रामीण प्रतिमासृष्टीद्वारा कशी जपली, यासंबंधीचा विचारही इथं प्रथमच होत आहे. या संतांची प्रभावकक्षा केवळ महाराष्ट्रापुरतीच सीमित नसून ती कर्नाटकापासून तंजावरपर्यंत कशी विस्तारित झाली होती, याची साक्ष या सर्व विभागांत विखुरलेल्या त्यांच्या रचनांची हस्तलिखितं देतात. लोकमानसावर त्यांच्या उदात्त आचारविचारांचा एकात्मतावादी व समन्वयवादी ठसा उमटल्याविना राहिला नाही.

सगनभाऊ हे लावणीकार होते, संतकवी नव्हेते म्हणून त्यांचा विचार इथं केला नाही. मराठी वाङ्मयेतिहासातील मुसलमान मराठी संतांविषयीचा आजवरचा विचार किती अपुरा, तोटका होता, याची प्रचीती या ग्रंथातून येईलच. त्यांच्या अनेक रचना दुर्लक्षित राहिल्या होत्या, त्यांचा विचार या ग्रंथात साधार केला आहे. आजवर ज्या संशोधकांनी या संतांकडे व त्यांच्या साहित्याकडे लक्ष वेधलं, त्या सर्वच संशोधकांचं ऋण मी इथं आदरपूर्वक प्रकट करतो.

महाराष्ट्रातील मुसलमान (सूफी) संतांनी धावे, रिवायती, उपाख्यानं, कथाकाव्यं, अभंग भारुडं, रूपकं, कूटरचना, तत्त्वविवरणात्मक प्रकरणं, भाष्यग्रंथ, अनेकभाषिक दार्शनिक परिभाषाकोश, संतनामावळ्या इ. कितीतरी आकृतिबंधांच्या माध्यमातून आपलं लेखन केलं. त्यांतील विविधताही विलोभनीय आहे, लक्षणीय आहे.

मुसलमान (सूफी) मराठी संतांच्या रचनांचे त्यांच्या व्यक्तित्वाचे व संतत्वाचे अनेक पदर नि आयाम शोधण्याचा मी यथाशक्ती प्रयत्न केला. या विषयाकडे यापुढंही संशोधक-अभ्यासक अधिक आस्थेनं लक्ष देतील, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

त्यांच्या 'सहवासात' व साहित्यात मला जे आनंदाचे सुवर्णक्षण लाभले, ते मी आयुष्यभर कसे विसरेन ?

---

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद



## पद्मश्री डॉ. यू. म. पठाण

त्रेसष्टाव्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. यू. म. पठाण यांना सन्त- साहित्याचे भाष्यकार म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. भारतीय साहित्याच्या संकल्पनेत भक्तिसाहित्याचा प्रामुख्यानं अन्तर्भाव केला जातो. महाराष्ट्रीय धर्म व पंथ यांच्या साहित्यचिन्तनाबरोबरच त्यांनी भारतीय सूफी सन्तसाहित्याचंही सखोल चिन्तन, मनन, संशोधन केलं आहे. त्यांचं बहुभाषाकोविदत्व त्यांना या मौलिक वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्यात साहाय्यभूत ठरलं आहे. इ. स. २००४ चा फार्सीचा राष्ट्रपति पुरस्कार व म. रा. हिन्दी साहित्य अकादमीचा सर्वोच्च श्रीछत्रपती शिवाजीमहाराज एकता राज्यपुरस्कार या त्यांच्या बहुभाषाकोविदत्वावरील राजमुद्रा म्हणता येतील.

मुखपृष्ठ छपाई - शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१